म. ग्रं. सं. ठाणें ५८

विषय: चरित्र

संग्रहालय क्रमांक: ५९

लेखक: विनायक कोंडदेव ओक.

सन: १८७८

पुस्तकाचें नांव: ड्यूक ऑफ वेलिंग्टन

(चरित्र)

N-9
स्थळप्रत
५७

मुंबई इलाक्यांतील सरकारी विद्याशाळाखातें.

# पीतर धि ग्रेत ह्याचें चरित्र.

हें पुस्तक,

अनेक इंग्लिश ग्रंथांच्या आधारानें,

**विनायक कोंडदेव ओक,**

फर्स्त असिस्तंत मास्तर, फर्स्तग्रेड्

आंग्लोव्हर्न्याक्युलर स्कूल, अहमदनगर,

ह्यांनीं केलें.

... ग्रंथ संग्रहालय ...

आवृत्ति पहिली.

एक हजार प्रती.

ह्या पुस्तकाची मा० सन १८६७च्या २५व्या आक्ताप्रमाणें नोंदिली आहे.

मुंबई.

गव्हर्नमेंत सेंत्रल बुक् दिपो.

सन १८७४ इ०

ह्या पुस्तकासंबंधीं सर्व अधिकार सरकारानें स्वाधीन ठेविले आहेत.

किंमत चौदा आणे.

मुंबईंत.

गणपत कृष्णाजी यांचे छापखान्याचे मालक आत्माराम कान्होबा

यांनीं छापिलें.

# प्रस्तावना.

सेनिकानामक तत्त्ववेत्ता असें म्हणे कीं “इतिहास हा उ-
दाहरणद्वारा सुबोध आहे.” होय. हें शब्दशः खरें आहे. पहा, अमुक मनुष्य अमक्या वर्षीं जन्मला, आणि अमक्या वर्षीं मरण पावला, हेंच नुसतें कळल्यानें कोणाचा कांहीं फायदा होईल काय.? अमुक लढाई अमक्याचे वेळीं झाली, आणि तींत अमका राजा पराभव पावला, किंवा अमक्यानें अमक्यास मारिलें, किंवा अमक्यास अमक्यास अमक्या अमक्या रीतीनें राज्य मिळालें, किंवा अमक्याचें वैभव अमक्या कारणांनीं लयास गेलें, एवढेंच नुसतें कळून मनुष्यास कांहीं उपयोग आहे काय.? कांहीं नाहीं; तर, इतिहासामध्यें, अनेक प्रसंगीं मनुष्याच्या स्वभावाचीं जीं अनंत चमत्कारिक स्वरूपें दृष्टीस पडतात, तीं इतिहासाचा अभ्यास करणाऱ्यांस फार उपयोगीं पडतात. मनुष्याच्या स्वभावाचें संपूर्ण वर्णन करण्याविषयीं आजपर्यंत पुष्कळ तत्त्वज्ञान्यांनीं प्रयत्न केले, परंतु ते सफल झाले नाहींत. अग्नि म्हणजे काय, हें जसें काष्ठादिकांच्या आश्रयाखेरीज दाखवितां येत नाहीं, त्याप्रमाणें मनुष्याच्या स्वभावाचीं अनेक रूपें, त्याच्या कृतींच्या आश्रयाशिवाय कधीं दाखवितां येणार नाहींत, असा सर्व विद्वान लोकांचा अभिप्राय झाला आहे. आणि त्या कृतींचें जें वर्णन, त्यासच इतिहास हें नांव आहे. तेव्हां इतिहासाचा चांगला अभ्यास केल्याविना मानवस्वभावाचें ज्ञान व्हावयाचें नाहीं, ह्या गोष्टीविषयीं तिळभर देखील संशय राहिला नाहीं. बरें, आपणां सर्वांस आपलीं आयुष्यें मनुष्यांशीं वागून आणि त्यांशीं व्यवहार करून घालवावयाचीं आहेत. ह्यास्तव, हें इतिहासाच्या अभ्यासानें प्राप्त होणारें मानवस्वभावाचें ज्ञान फार आवश्यक आहे.

बरें, आतां दुसऱ्या पर्यायानें पाहिलें असतां, इतिहास म्हणजे थोर आणि पराक्रमी पुरुषांच्या चरित्रांचा संग्रह आहे,

असें दिसून येईल. जगामध्यें आजपर्यंत जे थोर आणि परा क्रमी पुरुष होऊन गेले, त्या सर्वांचीं वृत्तें जर कोणी शिकेल तर त्याला जगाचा संपूर्ण इतिहास येईल. परंतु, हें कृत्य म नुष्यास दुष्कर आहे. त्यास जगांतील सर्व थोर पुरुषांचीं चरि त्रें आधीं मिळणार नाहींत; आणि मिळालींच तर तीं त्याच्या शिकवणार नाहींत. हें खरें आहे. तथापि, " जेवीन तर तु पाशीं नाहीं तर उपाशीं, " असें धरून बसणें नीट नव्हे. ज्ञान संपादण्याकरितां, स्वसामर्थ्यानुरूप प्रत्येक मनुष्यानें करवे ल तितका प्रयत्न करावा, हें योग्य आहे.

मनुष्याचें आयुष्य थोडें आहे, आणि त्यास कामें कराव याचीं फार आहेत. ह्यास्तव त्यानें प्रत्येक कामाचा आवश्यक आवश्यक तेवढा भाग साधण्याचा प्रयत्न करावा; सर्व कामें पूर्ण करण्याचा घाट घालूं नये. इतिहासाचा अत्यंत ग्राह्य अं श म्हटला म्हणजे थोर पराक्रमी पुरुषांचीं चरित्रें होत. त्यांत ही, ज्यांनीं स्वप्रयत्नेंकरून आपल्या देशांचें हित केलें आहे त्यांचीं आख्यानें तर अत्यंत अगत्याचीं होत. अशा प्रकार च्याच सन्मणिमालेंत पीतर धि ग्रेत ह्याची गणना आहे. त्या चें चरित्र फार चमत्कारिक आणि मनोरम आहे. तें पुष्कळ ग्रंथकारांनीं वेगवेगळ्या रीतींनीं लिहिलें आहे. तेंच मासल मराठी भाषेंत उतरण्याचा हा प्रयत्न केला आहे. ह्या स्वदेश हि तकरणाऱ्या मेहनती पुरुषाचा कित्ता घेऊन, केवळ राजांचेंच हित होईल असें नव्हे, तर साधारण संसारी मनुष्यास त्याच्या कित्त्या नें वागून आपल्या कुटुंबाचें व लोकांचें हित साधितां येईल

आमच्या देशांतील राजेरजवाड्यांनीं आणि संस्थानिकांनीं हें पुस्तक वाचावें; ह्याचें तात्पर्य समजावें; त्याप्रमाणें वागावें; आणि आपलें व आपल्या देशांचें हित साधावें; हीच आमची विश्वंभरापाशीं प्रार्थना आहे; ती तो सफल करो.

स्वच्छ प्रत
.... ८७

# पीतर धि ग्रेत ह्याचें चरित्र.

## भाग पहिला.

ह्या पृथ्वीवर सांप्रत काळीं जीं राज्यें आहेत, त्यां मध्यें रूसच्या राज्या एवढें राज्य दुसरें कोणतेंही नाहीं, ही गोष्ट केवळ नकाशा पाहून देखील लक्षांत यावयासारखी आहे. तें राज्य परिमाणानें जसें इतर राज्यांपेक्षां मोठें आहे, तसें बलेंकरून ही बरेंच श्रेष्ठ आहे. ह्या राष्ट्राचा एवढा भरभराट होण्यास त्याच्या अनेक बादशाहांचे गुण कारणीभूत झाले आहेत, ही गोष्ट सत्य होय. तथापि, ह्या राष्ट्रांतील लोकांचें अज्ञान घालविण्यास, ज्ञान वाढविण्यास, आणि सर्व प्रकारीं खरें कल्याण करण्यास जितका पीतर धि ग्रेत हा झटला, तितका दुसरा कोणी झटला नाहीं; अथवा, त्या देशास जें एवढें महत्त्व प्राप्त झालें आहे, तें ह्या थोर पुरुषाच्या श्रमाचें फल आहे, असें म्हटलें तरी चालेल. स्वदेशहितार्थ परिश्रम करणारे जे पुरुष आजपर्यंत होऊन गेले, त्यांतील उत्तमांत पीतर धि ग्रेत ह्याची गणना आहे. ह्याचें चरित्र फार मनोरम आहे. तें थोडक्यांत लिहिण्यास आतां आम्ही आरंभ करितों.

पीतर धि ग्रेत ह्याच्या कथेस आरंभ करण्यापूर्वीं, त्याचा पिता आलेक्सिस ह्याविषयीं थोडीशी माहिती सांगितली पाहिजे. आलेक्सिस हा तरी मोठा पराक्रमी पुरुष होता. त्यानें स्वदेशकल्याणाचे अनेक उद्योग केले; परंतु लोकांच्या अज्ञानामुळें व दुराग्रहामुळें त्यास यश आलें नाहीं; त्यास त्याचा काय उपाय ? तरी त्याच्या कारकीर्दींत त्याच्या राज्यामध्यें किती एक नवे कारखाने सुरू झाले; प्लेस्को आणि स्मालेन्स्को हे प्रांत त्यानें आपल्या राज्यास जोडिले; कायद्यांत पुष्कळ सुधारणा करून

त्यास न्यायशास्त्राचें स्वरूप आणिलें; राजकीयप्रकरणांत धर्माधिकाऱ्यांचा वर्चष्मा फार होता, तो कमी करून टाकिला; आणि लष्करांत कवाईत वगैरे टापटिपीचे सर्व प्रकार गार्दन, लेस्ली, इत्यादि परदेशीय हुशार मनुष्यांच्या साह्यानें चालू केले. परदेशचें कलाकौशल्य आपल्या लोकांस आलें असतां किती फायदा होईल हें त्याला चांगलें समजत होतें; म्हणूनच त्यानें हालंद देशचे खलाशी व गलबतें बांधणारे लोक आपल्या चाकरीस ठेविले होते. आपल्या देशांत इतर देशचीं गलबतें यावीं, आपल्या देशचीं गलबतें इतर देशांत जावीं, आणि अशा प्रकारें व्यापाराची वृद्धि व्हावी, अशी त्याची फार इच्छा असे. तसेंच आपल्या हाताखालीं मोठें आरमार असावें, आणि काळा समुद्र व कास्पियन समुद्र ह्यांजवर आपला अमल चालावा, असें त्याच्या मनांत निरंतर घोळत असे. व त्याविषयीं तो यथाशक्ति प्रयत्नही करी; परंतु, कार्यबहुत्वामुळें व लोकांच्या अज्ञानामुळें ह्या गोष्टी त्याच्या मनाप्रमाणें घडून आल्या नाहींत. तथापि, तेवढ्यांवरून, तो कोणत्या प्रकारचा मनुष्य होता, ह्याचें अनुमान सहज करितां येतें. असो.

आलेक्सिस ह्याला दोन बायका होत्या. त्यांपैकीं दुसऱ्या बायकोला एक पुत्र आणि एक कन्या अशीं दोन मुलें झालीं. त्यांतला मुलगा तोच ह्या विषयाचा नायक होय. आलेक्सिसाच्या ह्या दुसऱ्या लग्नाची हकीकत ग्रंथांतरीं फारच चमत्कारिक सांगितली आहे. ती अशी.– आलेक्सिसाच्या प्रधानमंडळी मध्यें मातव्हि आफ ह्या नांवाचा एक गृहस्थ सुमंतगिरीचें म्हणजे परराज्यसंबंधाचें काम पाहात असे. त्याजवर आलेक्सिस फार लोभ करी. तो त्याचे घरीं वारंवार जाई, व त्याला आपल्या मनांतल्या सर्व गोष्टी सांगे. मातव्हि आफ ही त्याची एकनिष्ठपणें सेवा करी. असें कितीएक वर्षें चाललें असतां, एके दिवशीं संध्याकाळीं, आलेक्सिस सहजगत्या

त्याच्या घरीं गेला. तों तेथें पात्रें वाढून भोजनाची अगदीं सिद्धता झाली होती. ती पाहून बादशाहा त्यास म्हणाला, "अहो, तुमचे घरचा भोजनाचा बेत नेहमीं फार चांगला असतो; मी येथें आलों म्हणजे मला जेवून जावेंसें वाटतें, मी आतां सुद्धां तुमच्या पंक्तीस येतों; पण तुम्ही मजकरितां कांहीं कमजास्त करूनकाहो. ! मला तुमचा नित्याचा बेत फार आवडतो." मातव्हि आफ ह्यानें उत्तर केलें, "बरें आहे; जशी सरकारची मर्जी असेल तशी.–" इतकें बोलणें होऊन ते पात्रांवर बसले, तों मातव्हि आफ ह्याची स्त्री तेथें आली; तिजबरोबर दोन मनुष्यें होतीं; एक तरुणसा मुलगा, आणि दुसरी सुस्वरूप तरुण मुलगी. हीं तिघेंजणें, राजाची स्वारी बसलेली पाहून मोठ्या मर्यादेनें उभीं राहिलीं. त्यांस बसण्याविषयीं आलेक्सिसानें पराकाष्ठेचा आग्रह केला, तेव्हां तीं बसलीं. त्या मुलीचें पान बादशाहाच्या समोरच आलें होतें. तिच्या सौंदर्यानें त्याचें चित्त वेधिलें. तो तिजकडे व त्या मुलाकडे टक लावून पाहात असतां मातव्हि आफ ह्यास म्हणाला, " अहो तुम्हांला अपत्य कायतें एक मुलगाच आहे, असें मी समजत होतों." मातव्हि-आफ ह्यानें उत्तर दिलें, " सरकारचा समज आहे तोच बरोबर आहे. कैरिला नारिस्किन म्हणून एक गृहस्थ आमचा मित्र व आप्त आहे, त्याची ही कन्या आहे. हिला शिकविण्या संवरण्याचें काम माझ्या कुटुंबानें पतकरिलें आहे. ती आतां बरीच हुशार झाली आहे. तिला ईश्वरकृपेनें घरदार चांगलें मिळो, एवढीच कायती इच्छा आहे."

भोजन आटपल्यावर घरांतली इतर मंडळी उठून गेली; आणि बादशाहा व मातव्हि आफ हे इकडच्या तिकडच्या गोष्टी सांगत बसले. ती तरुण स्त्री तेथून निघून गेली होती; तरी ती बादशाहाच्या अंतःकरणांतून ढळली नव्हती. तिजविषयीं पुनः गोष्ट काढून आलेक्सिसानें मातव्हि आफ ह्यास म्हटलें कीं, ह्या

अशा सद्गुणी आणि सुस्वरूप मुलीस तुम्हीं योग्य स्थल पाहून दिलें पाहिजे. तें ऐकून मातव्हि आफ ह्यानें उत्तर केलें, "महाराज, आमचा मनोदय तसाच आहे; परंतु, हिजपाशीं फार पैसा नाहीं, आणि आम्हीं कांहीं तजवीज करावी, तर आम्हांलाही तसें सामर्थ्य नाहीं, अशी स्थिति आहे; पाहूं आतां पुढें काय घडून येतें तें." ह्या प्रसंगास कांहीं दिवस लोटल्यावर एके वेळीं आलेक्सिस मातव्हि आफ ह्याजकडे येऊन त्यास म्हणाला, "ह्या तरुण स्त्रीस मी एक स्थळ पाहिलें आहे. तो पुरुष बराच सद्गुणी असून, त्याला द्रव्याची गरज नाहीं; कारण कीं तो स्वतःच मोठा धनवान् आहे. तेव्हां तो हिला पसंत पडेल असें वाटतें." तें ऐकून तो पुरुष कोण असें त्यानें बादशाहास खोदखोदून विचारिलें. तो प्रथम बरोबर सांगेना. परंतु, आपल्या मित्राचा फारच आग्रह पाहून, किंचित् हास्यवदन करून आलेक्सिस म्हणाला, "बरें, मातव्हि आफा, मी खरेंच सांगतों कीं, स्वतः माझेंच मन तिजवर जडलें आहे; ही गोष्ट तिला कळवा; तिला वरण्याचा मीं निश्चय केला आहे." ह्या मुलीचें नांव नातालिआ असें होतें.

बादशाहाची ही इच्छा पाहून मातव्हि आफ यास फार आश्चर्य वाटलें. आणि तो बादशाहाचे पायां पडून हात जोडून नम्रतेनें म्हणाला, "महाराज माझी सेवकाची एक विनंती ऐकावी. आपले दरबारांत मला पुष्कळ वैरी आहेत; ते आधींच माझ्या नांवानें दगड फोडीत आहेत; आणखी त्यांत जर मीं बाळगलेली मुलगी आपण बायको केली, तर मग त्यांच्या जीवाचें काय होईल कोण जाणे; ह्यास्तव, एकाएकीं असें करूं नका; काय करावयाचें तें विचारपूर्वक करा; म्हणजे मला बरें आणि आपणांलाही बरें." बादशाहानें उत्तर दिलें, "छिः ! इतके भितां कां. ? ते काय करतात. ?" तें ऐकून मातव्हि आफ बोलला, "महाराज, ते कांहीं करोत किंवा न करोत;

पं. ८

मी आपणांपाशीं हात जोडून एक मागणें मागतों, तें आपण कृपा करून द्यावें. तें हेंच कीं, हा आपला हेतु आपण लोकांमध्यें एकदम कळवूंनये; तर, लग्नाचा मोघम विचार सर्वांस कळवून, आपल्या देशरीतीप्रमाणें, वधु निवडून काढण्याकरितां सर्व बडे लोकांच्या अविवाहित मुली राजवाड्यांत बोलवाव्या; त्यांत नातालिआ ही सहज येईलच, ती तेथें आपण निवडून काढून पसंत करावी; आणि मग चालीप्रमाणें तिशीं लग्न लावावें. ” त्यास बादशाहानें म्हटलें “ बरें; तुमच्या इच्छेप्रमाणें मी करितों.”

पुढें त्याप्रमाणें नातालिआ हिशीं बादशाहाचें लग्न लागलें. तिजवर आलेक्सिस फार प्रीति करीत असे. पहा, नशीबाची तार कशी आहे ती. ! जी नातालिआ मातव्हि आफ ह्याचे येथें गरीबशी मुलगी होती, ती, स्वतः कांहीं एक प्रयत्न न करितां, एकदम बादशाहाची पट्टराणी होऊन बसली. ! हें मोठें नवल नव्हे काय ? मनुष्य कितीही शाहाणा असला तरी, त्यास राजाच्या दरबारीं एकादें साधारण काम मिळविण्यास देखील फार श्रम करावे लागतात. ! असो. परमेश्वराच्या घरचे खेळ कांहीं विचित्र आहेत. ! अशा गोष्टी दृष्टीस पडल्या म्हणजे मनुष्याच्या मनांतली उद्योगावरची निष्ठा नाहींशी होते. पराक्रमी राजे देशांचे देश जिंकितात; पण अशा पराक्रमी राजांस स्त्रियांचें सौंदर्य जिंकितें. असो.

आलेक्सिस हा इ० स० १६७६ त मृत्यु पावला. त्याला पहिल्या बायकोच्या पोटचीं साहा मुलें होतीं; थिओदोर आणि जान हे दोन मुलगे; आणि सोफ़्या, क्याथेराईन, मेरी आणि सेदिआसा अशा चार मुली. ज्या दुसऱ्या बायकोच्या लग्नाचा प्रकार वर सांगितला, तिच्या पोटीं त्याला दोन मुलें झालीं; एक मुलगा आणि एक मुलगी; त्यांपैकीं मुलाचें नांव पी-

तर, आणि मुलीचें नांव नातालिआ आलेक्सीवना असें होतें. पीतर ह्याचें जन्म इ०स० १६७२ त झालें होतें.

आलेक्सिस तिवर्तल्यावर त्याचा वडील पुत्र थिओदोर हा त्याच्या गादीवर बसला. तो शरीरप्रकृतीनें अगदीं अशक्त असून नेहमीं अजारी पडे. तेणें करून त्याच्यानें राज्यकारभार चांगल्या रीतीनें चालववेना. त्याचे भाऊ लहान व दरबारचें काम पाहण्यास असमर्थ असे होते, आणि त्याच्या बहिणी, त्या वेळच्या रिवाजाप्रमाणें, महंतिणींसारखें आयुष्यक्रमण करण्याकरितां मठांत पाठविल्या होत्या. त्यामुळें राज्याचा सर्व कारभार बहुतकरून प्रधान लोक पाहात असत. थिओदोर ह्याच्या बहिणींमध्यें सोफया म्हणून जी एक होती, ती स्वभावतः मोठी धूर्त, चपल, मसलती, आणि महत्वाकांक्षी अशी होती. अशा प्रकारच्या मनुष्यास मठवास आणि जोगीपण हीं कोठून आवडणार. ? आपला प्रवेश दरबारांत कसा होईल, ह्याविषयीं सोफया निरंतर विचार करीत असे. आपला हेतु दांडगेपणानें सिद्धीस जावयाचा नाहीं, हें तिच्या मनांत येऊन चुकलें होतें. ह्यास्तव तिनें तेथें असें एक साधन योजिलें कीं, त्यास व्यत्यय आणणें हें मोठें पाषाणहृदयपण आहे, असें कोणालाही वाटावें. तें साधन कोणतें म्हणाल तर बंधुप्रीति होय. प्रधान मंडळीस तिनें सांगितलें कीं, माझा भाऊ थिओदोर हा अगदीं अशक्त आणि आजारी आहे, हें ऐकून मला अगदीं चैन पडत नाहीं; माझा सगळा जीव त्याजकडे गुंतला आहे; कसें करा, पण मला थिओदोर याजपाशीं असण्याची परवानगी द्या; मी जपून खपून त्याला औषध पाणी तरी करीन. ही तिची विनंती दरबारच्या लोकांच्यानें अमान्य करवेना. तिला राजवाड्यामध्यें थिओदोर ह्याजपाशीं जाऊन राहण्याची परवानगी मिळाली.

ह्या प्रकारेंकरून सोफया ही मठांतून निघून राजवाड्यां-

त आली. ह्यांत आपला अर्धा हेतु सिद्धीस गेला, असें तिला वाटूं लागलें. ती थिओदोर ह्यास जीव का प्राण करीत असे. तारुण्य; सुंदर स्वरूप; बोलण्या चालण्याची ऐटदार ढब; ऐकणाऱ्याच्या मनास पान्हा फुटावा असें मधुर भाषण; आणि कोणाला कसें वश करून घ्यावें ह्याविषयींचें पूर्ण मर्मज्ञान; इतके गुण सोफयेच्याठायीं चांगले वसत होते. त्यांच्या साह्यानें तिनें दरबारची मंडळी अगदीं आपलीशी करून टाकिली. प्रथम कांहीं दिवस तिची भीड कोणाला लोटेनाशी झाली; असे बरेच दिवस लोटल्यावर, दरबारचे कितीएक लोक तिच्या अर्ध्या वचनांत वागूं लागले. त्या वेळीं तेथे गालिट्झिन नामक कोणी मोठा मुत्सद्दी, तिचे सारखाच खोल, मसलती, धूर्त आणि महत्वाकांक्षी असा होता, त्यास तिनें हातीं धरिलें. त्याबरोबर त्याची मंडळीही तिला अनुकूल झाली. ह्याप्रमाणें त्या दरबारामध्यें सोफया हिची फळी वेगळीच बनली. पुढें कांहीं वेळानें तर असें झालें कीं, सोफयेच्या हुकुमाशिवाय राज्यामध्यें एक पान सुद्धां हालेना. अशीं किती एक वर्षें लोटलीं. इ० स० १६८२ त थिओदोर मरण पावला; त्याला मूलबाळ कांहीं नव्हतें. आणि आपला सखा भाऊ जान हा व्यंग आहे, हें त्याला ठाऊक होतें; म्हणून आपले मागें आपल्या गादीवर आपला सापत्न बंधु जो पीतर त्यानें बसावें, असें त्यानें ठरवून ठेविलें होतें. त्यावेळीं पीतर हा केवळ दाहा वर्षांचा होता. तरी त्याची चालचर्या व बुद्धि हीं पाहून, हा पुढें मोठा पराक्रमी निघेल, असें सर्व लोक म्हणत असत.

थिओदोर ह्याचा हा ठराव ऐकून सोफया हिच्या पायांची आग मस्तकास चढली. कारण, तिला असें वाटत होतें कीं, थिओदोर मेला म्हणजे, देशरीतीप्रमाणें जान हा गादीवर बसेल; तो आंधळा, बोबडा आणि फेंफऱ्या असा आहे; त्याला राज्यकारभार चालवितां येणार नाहीं; तेव्हां अर्थात सर्व राज्य-

सूत्र आपले हातीं येईल; परंतु, तसें घडून येण्याचें लक्षण मुळींच कांहीं दिसलें नाहीं. तेव्हां तिनें स्त्रेलैट्झ* लोकांचा नाईक कोव्हान्स्की, ह्याचे साह्यानें मोठा अनर्थ मांडिला, तो असा. सर्व लोकांचीं आणि त्यांत विशेषेंकरून स्त्रेलैट्झ लोकांचीं मनें खवळावीं, म्हणून तिनें अशी एक गप्प प्रसरिली कीं, थिओदोर माझा भाऊ, हा हात पाय पसरून आपल्या प्रारब्धयोगाप्रमाणें मेला नाहीं; तर त्याला विषप्रयोग करून मारिलें. ही गोष्ट स्त्रेलैट्झ लोकांस कोव्हान्स्की ह्यानें तिखट मीठ लावून अशी सांगितली कीं, ती ऐकतांच ते रागानें अगदीं वेडे होऊन गेले. त्यांनीं पहिल्या सपाट्यास, जे दोन वैद्य थिओदोर ह्यास औषध देत होते, त्यांस ठार मारिलें. मग त्यांचें लक्ष दरबारच्या मंडळीकडे वळलें. ज्या मुत्सद्दी लोकांवर त्यांनीं विषप्रयोग केल्याचा आरोप घातला होता, त्यांपैकीं किती एकांस राजवाड्याच्या उंच गच्चीवरून झुगारून देऊन, खालीं शिपायांकडून भाल्यांच्या टोंकांवर झेलविलें. ! दोल गोरौकी, मातव्हिआफ, नारिस्किन म्हणजे आलेक्सिसाच्या दुसऱ्या बायकोचा सखा भाऊ, सालतिखोफ, असे कितीएक थोर गृहस्थ त्यांस अनुकूल नव्हते, त्यांचे त्यांनीं फटाफट प्राण घेतले. !! ह्या प्रमाणें आणखीही कितीएक लोकांचे वध झाले. ! प्राण जातात कोणाचे, आणि राज्य मिळतें कोणाला. ? जगाच्या राहटीचा मोठा चमत्कार आहे. ! असो. हा यमाजी पंताकडचा कारखाना आटपल्यावर सोफया हिनें असें प्रसिद्ध केलें कीं, पीतर आणि जान हे दोघे भाऊ बादशाहा झाले आहेत, आणि ते लहान आहेत म्हणून राज्याचा कारभार मी सोफया पहात आहें.

हा वर सांगितलेला धरमारीचा सपाटा सुरू झाला त्या गड-

* स्त्रेलैट्झ हे रूस देशांतले जुने कडवे शिपायी होते. ते ह्या देशांतील कडक शीख किंवा आरब लोकांसारखे असावे, असें वाटतें.

वडींत, भयभीत होऊन, पीतर आणि इवान हे दोघेही, आपल्या आयां बहिणींसह, मास्को शहरांतून निघून त्रोयत्स्की म्हणून एक वीस पंचवीस कोसांवर मठ आहे, तेथें पळून जाऊन राहिले. तेथें त्यांच्या रक्षणाकरितां कांहीं जर्मन शिपायी व अमलदार पाठविले होते. असें असतां, स्त्रेलैट्झ लोकांपैकीं दोन असामी, त्या बिचाऱ्या मुलांचे प्राण घेण्याकरितां एकेवेळीं त्या मठांत घुसले, आणि त्यांतल्या एकानें आपली तरवार उपसून पीतराच्या आंगावर उगारिली सुद्धां; इतक्यांत त्याचा सोबती त्यास मोठ्यांनीं ओरडून म्हणाला, "अरे मित्रा, अरे पवित्र स्थंडिलाजवळ कारे असें करावयाचें. ?" हें ऐकतांच त्यानें आपली तरवार मागें घेतली. पीतराच्या जीवावरचें विघ्न टळलें, आणि ह्यास कारण त्या दुसऱ्या मनुष्याचा दयाळूपणा नव्हे, तर त्याचें धर्मभोळेपण होय. कारण कसेंही बरें वाईट असो, पण त्यापासून कार्य उत्तम झालें, ह्यांत कांहीं संशय नाहीं.

ही गडबड आटोपल्यावर मास्को शहरांत जिकडे तिकडे स्वस्थता झाली; सरकारी कामकाज बरोबर चालूं लागलें; आणि दरबारांत सोफया हिचें प्राबल्य तिच्या इच्छेप्रमाणें वाढलें. तिच्या मनांत काय होतें, ह्याविषयीं लोकांस संशय आल्यावांचून राहिला नव्हता, ही गोष्ट खरी आहे; तथापि त्याविषयींचीं चिन्हें तिनें त्यांच्या दृष्टीस पडूं दिलीं नाहींत. तिच्या इच्छेप्रमाणें पुष्कळ गोष्टी घडून आल्या. बादशाहाचे सर्व अधिकार तिच्या हातीं आले, व तिचा हुकूम चोहींकडे चालूं लागला. दरबारांत कोणतीही गोष्ट तिच्या सल्ल्यावांचून होत नसे. तिच्या मुखवट्याचें नाणें सुद्धां चालूं लागलें. इ० स० १६८४ त तिनें आपला भाऊ जान ह्याचें लग्न मोठ्या समारंभानें केलें. ह्याचा सोहळा पुरता होत होता इतक्यांत, कोव्हान्स्की ह्यानें केलेला बंडाचा कट उघडीस आला. त्याचे मनांत असें होतें कीं, दोघे तरुण बादशाहा, त्यांच्या आया, आणि सोफया खे-

रीज करून त्यांच्या बहिणी ह्या सर्वांचा वध करून सोफयेशीं लग्न लावावें. ही गोष्ट कानीं पडतांच, जान, पीतर, आणि त्यांच्या कुटुंबांचीं सर्व माणसें, त्रोयत्स्कीमठामध्यें, आपल्या जीवांच्या रक्षणाकरितां तावडतोब निघून गेलीं. तेथून सोफया हिनें कोव्हान्स्की ह्याशीं कांहीं बोलणें लावण्याचा घाट घालून त्यास अकस्मात पकडिलें, आणि त्याची चौकशी करून त्याचा शिरच्छेद केला. त्याबरोबर त्याच्या कटांतले इतर अमलदारही प्राणांस मुकले. हें वर्तमान इ० स० १६८५ त घडलें. तेव्हां पीतर तेरा वर्षांचा होता.

आलेक्सिस मरायास टेंकला तेव्हां त्यानें पीतर ह्यास शिकविण्या सवरण्याचे कामावर मिनीस नामक एका गृहस्थाची योजना केली. तो मोठा विद्वान असून त्याला युरोपांत चालणाऱ्या बहुतेक भाषा येत असत. आणखी युरोपांतल्या राज्यांची अंतर्गत स्थिति त्याला चांगली माहीत होती. हा पुरुष इमानी नौकर होता. तो नेहमीं पीतराचें हित पाहात असे. परंतु, पीतर हा आपलें कांहीं चालूं द्यावयाचा नाहीं, असें जेव्हां सोफया हिला पक्कें वाटलें, तेव्हां तिनें मिनीस ह्यास खरमरीत ताकीद देऊन पीतराच्या विद्याभ्यासाची बंदी केली. ! केवढी बंधुप्रीति. ! जगामध्यें सर्वांत शाहणें होण्याचे उपाय दोन आहेत; इतरांपेक्षां अधिक ज्ञान संपादणें हा एक; आणि आपणापेक्षां दुसऱ्या कोणास अधिक शाहणें न होऊं देणें, हा दुसरा. ह्यांपैकीं दुसऱ्याचें अवलंबन करण्याविषयीं दुष्ट मनुष्यांस बुद्धि होते. कारण, प्रयास न पडतां आपला हेतु त्याच्या योगानें सिद्धीस जाईल, असें त्यांस वाटत असतें. परंतु, ही भ्रांति आहे. ज्या गोष्टीविषयीं इतर सर्व लोकांचा प्रयत्न चाललेला असतो, तिचा बंदोबस्त एकाच्या उद्योगानें कसा होईल. ? असो.

पीतराचें लक्ष विद्येकडे लागूं नये, व त्यानें शाहणें होऊं नये, म्हणून, सोफया ही त्याला नेहमीं मूर्ख, अमली, व्यभिचा-

री अशा लोकांच्या मंडळींत ठेवीत असे, असें किती एक चरित्रकार लिहितात. परंतु त्यास कांहीं चांगला आधार नाहीं. आणखी दुसरी एक गोष्ट अशी आहे कीं, मनुष्य कितीही दुष्ट स्वभावाचा असो; त्यास, ज्या वाईट गोष्टी आहेत, त्या वाईट म्हणाव्या लागतात; आणि ज्या चांगल्या आहेत, त्या चांगल्या म्हणणें भाग पडतें; आणि ज्यांस तो वाईट म्हणतो, त्या त्याच्यानें उघडपणें, नाइलाज नसतां, करवणार नाहींत. ह्याःस्तव आपल्या प्रत्यक्ष सापत्न बंधूस, बुद्ध्या मूर्ख करण्याकरितां, सर्व जनाची लाज सोडून सोफया हिनें, दुष्ट मनुष्यांच्या मंडळींत ठेविलें असावें, हें संभवत नाहीं. सोफया ही स्वतः फार शाहणी होती, व तिनें आपला सखा भाऊ जान ह्याच्या विद्याभ्यासाची चांगली तजवीज ठेविली होती, हें खरें आहे. पीतराची मातुश्री ह्या वेळीं जीवंत होती. ती त्याच्या विद्याभ्यासाकडे फार लक्ष देत असे. अंकगणित, रेखागणित, आणि किल्ले बांधण्याची कला, ह्या विद्या ज्यानें पीतरास प्रथम शिकविल्या, त्याचें नांव तिम्मरमन असें होतें. ह्या शिवाय एक दोन दच गृहस्थ तेव्हां दरबारीं नौकरीस होते, त्यांनींही पीतरास थोडेंबहुत शिकविलें असावें असें म्हणतात.

आतां येथें रूसच्या बादशाहाच्या सामान्य नामाविषयीं सांगून ठेवितों, म्हणजे पुढें त्याचा उपयोग करण्यास ठीक पडेल. रूसदेशच्या बादशाहास सामान्यत्वें झार असें म्हणतात. हा त्यांचा किताब फार प्राचीन काळापासून चालत आला आहे. गादीवर स्त्री असली तर तिला झारिना म्हणतात. असो.

मागें सांगितलेली मास्को शहरांतली सर्व गडबड मोडून तेथें शांतता झाल्यावर सोफया ही स्वेच्छेप्रमाणें राज्य हांकूं लागली. इतक्यांत दुसरें एक प्रकरण उद्भवलें, तें असें.- किमियाचा खान हा रूसच्या राज्यावर साठ सहस्र रूबल* खंडणी बद्दल

* एक रूबल म्हणजे एक रूपया दाहा आणे.

म्हणून मागूं लागला. तें सोफया हिला सोसलें नाहीं. तिनें, पूर्वी सांगितलेल्या बेसिल गालिटझिन नामक आपल्या शूर सरदारास सैन्यासहवर्तमान क्रिमियावर स्वारी करण्यास हुकूम केला. तो त्यान मोठ्या आग्रहानें कबूल केला. तो निघाला तेव्हां त्याच्या मदतीस रूस देशचे कोजाख लोकही बरेच पाठविले. परंतु, ह्या स्वारीचा परिणाम चांगला झाला नाहीं. बेसिल गालिटझिन ह्यास विन्मुख परत यावें लागलें. हें कोणाच्या चुकीचें फळ होतें ह्याविषयीं इतिहास कांहीं सांगत नाहीं. परंतु, गरीब आणि थोर एकाद्या कामास लागले असतां, यश आलें तर तें थोराचें, आणि अपेश आलें तर तें गरीबाचें, अशी जनांत वहिवाट आहे, तीप्रमाणें, गालिटझिन ह्यानें पराभवाचा सगळा दोष कोजाख लोकांच्या सरदारावर घातला. इतकेंच केवळ नव्हे; तर त्याची चौकशी केलीशी करून, त्यास त्याच्या पुत्रासहवर्तमान सैबीरिया प्रांतीं वनवासास पाठविलें. तेथें ते गरीब बिचारे हाल हाल होऊन मरण पावले. थोरांच्या सहवासानें गरीबांचें कधीं कधीं बरें होतें, किंवा कधीं कधीं असें उलटें होतें. ! जगाचा इतिहास दोहीं प्रकारच्या उदाहरणांनीं भरला आहे. ! !

इ० स० १६८९ त, पुनः एकवार आपलें सैन्य क्रिमियावर पाठवावें, असें सोफया हिनें ठरविलें; आणि त्याजवर पुनरपि गालिट झिन ह्याचीच नेमणूक झाली. ह्याही प्रसंगीं त्यास कोजाख लोकांची मदत दिली होती; आणि ह्या खेपेस त्यांचा सरदार माझेप्पानामें होता. ह्याही मोहिमेचा परिणाम मागच्या मोहिमेप्रमाणेंच प्रतिकूळ झाला. त्या मुळें एवढें मात्र झालें कीं गालिटझिन हा सोफयेच्या मनांतून अगदीं उतरला.

गालिटझिन तिकडे गुंतला असतां, त्याच्या व सोफया हिच्या विरुद्ध जो पक्ष होता, त्या पक्षाच्या लोकांनीं पीतराचें लग्न केलें. त्याच्या बायकोचें नांव ओतो केसा फेदिरौना लापु-

चिन असें होतें. ती फिओदोर आबा ह्मा व्हिट्झ ह्याची मुलगी होती. तिचें वय सत्रा वर्षांचें होतें. हें लग्न सोफ्या हिचें मत न घेतां केलें होतें, तेव्हां तें तिला आवडलें नाहीं, हें सांगावयास नको. गालिटझिन स्वारीहून परत येऊन पाहतो तों पीतर हा लग्न झालेला त्याच्या दृष्टीस पडला. तेव्हां त्याला अतिशयित वाईट वाटलें. कारण, ह्या लग्नामुळें आपले पुढचे सगळे विचार फसले, असें त्याच्या मनांत आलें. आणखी कांहीं दिवसांनीं नवी झारिना* गरोदर आहे असें जेव्हां त्याला कळलें, तेव्हां तर त्याला अतिशयित दुःख झालें. परंतु, करतो काय. ? हें लग्न मास्कोशहरच्या इतर सर्व बड्या लोकांस व सरदारांस आवडलें होतें, त्यामुळें त्याचा कांहीं उपाय चालेना. पण, दुष्ट मनुष्यें कधीं स्वस्थ बसावयाचीं आहेत काय. ? पीतराचा पक्ष सबल होत चालला असें पाहून, सोफ्या आणि गालिटझिन ह्यांनीं त्यास ठार मारविण्याचा बेत ठरविला. हें कृत्य स्त्रेलैट्झ लोकांकडे त्यांनीं सोंपिलें. त्याची सर्व तयारी होत आहे, इतक्यांत ही गोष्ट पीतर ह्यास समजली. तेव्हां तो भयभीत होऊन, प्राणरक्षणाकरितां पळत पळत मठांत गेला, आणि तेथें स्वस्थ राहिला. कांहीं वेळ गेल्यावर, त्यानें आपल्या पक्षाचे सरदार व मुत्सद्दी तेथें बोलावून आणून त्यांस सर्व हकीकत सांगितली. नंतर मारेकऱ्यांची चौकशी झाली. त्यांचा मुख्य तेकिलाव्हिताफ म्हणून होता. त्यास मारहाण केल्यावर, तो सर्व गोष्टींस कबूल झाला. त्यानें त्या कटाची कच्ची हकीकत पीतरास कळविली. तेव्हां पीतरानें त्यास व त्याच्या अनुयायांस देहान्त शासन ठरविलें. परंतु त्याच्या एका प्रिय मित्राच्या मध्यस्थीनें गालिटझिन ह्याच्या जीवास धका न लावण्याविषयीं पीतरानें वचन दिलें. तथापि त्याची सर्व जिनगी जप्त

* झारिना म्हणजे झाराची पत्नि.

करून त्यास आर्केंजल नामक शेजारच्या प्रांतांत घालवून दिलें. तेथें तो २४ वर्षें होता. पुढें इ० स० १७११ त त्याला दोषमुक्त करून परत बोलाविलें, आणि त्याची सर्व मालमत्ता त्यास परत दिली. ह्याप्रमाणें पूर्व स्थितीप्रत पावल्यावर गालिटझिन हा दोन वर्षांनीं मरण पावला. हिकडे सोफया हिला मास्कोशहरामध्यें मठांत प्रतिबंधित करून ठेविलें होतें, तेथें ती १५ वर्षें तशीच राहून इ०स० १७०४ त निवर्तली. आणि जान हा वेडा खुळा झार, खाऊन पिऊन उगाच पडलेला असे, तो ही इ०स० १६९६ त परलोकवासी झाला. अशा प्रकारें सर्व विघ्नांचें निवारण होऊन, पीतर हा सर्व सत्ता हातीं घेऊन, स्वेच्छेप्रमाणें राज्य करूं लागला.

ह्या वेळेपर्यंत पीतराकडे राज्य कारभार संबंधीं कांहीं एक काम नव्हतें; तेणेंकरून त्याची बुद्धि कशी आहे, हें लोकांच्या दृष्टोत्पत्तीस आलें नव्हतें. मनुष्याचे ठायीं नुसता गुण असून उपयोगीं नाहीं; तर, तो दाखविण्याचा प्रसंगही त्यास प्राप्त झाला पाहिजे; नाहीं तर तो असून आणि नसून सारखाच असें होतें. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें सर्व गोष्टी घडून येऊन, पीतरास राजपद मिळालें, तेणेंकरून त्यास आपले आंगचे गुण जनास प्रदर्शित करण्यास चांगली संधी सांपडली. हेंच सिंहासन जर त्याला प्राप्त न होतें, तर, राजाधिकार उत्तम रीतीनें चालविण्याचे त्याचे गुण कधींही उदयास आले नसते. सुंठ ही सर्व औषधांमध्यें मोठी गुणाकारी आहे; ती जर हिमालयाच्या एका अतिउंच शिखरावर पडलेली असती, आणि आजपर्यंत मनुष्याच्या हातीं न लागती, तर वैद्यशास्त्रांत तिच्या गुणांची इतकी प्रशंसा झाली असती काय.? असो पीतर राज्यकारभार पाहूं लागल्यावर, त्याचे आंगचे अनिर्वाच्य उत्तम गुण पाहून सर्वलोक अगदीं थक्क होऊन गेले. तो ह्या वेळीं सगळा अठरां वर्षांचा होता. तो शरीरानें उंच, धडाखडा, निटस बांध्या-

चा आणि फार देखणा होता. तो रागावला असला किंवा कांहीं मोठ्या विचारांत असला म्हणजे तें त्याच्या मुखचर्येवरून तेव्हांच दिसे; आणि त्यावेळीं त्याचे पुढें जाण्यास कोणालाही छाती होत नसे. परंतु, रागबीग नसला, म्हणजे तो सर्वांशीं मोकळ्या मनानें बोले, आनंदानें हंसे खेळे, आणि हा आपल्या मंडळींतलाच एक जण आहे, असें जवळच्या लोकांस वाटे. त्याचे ठायीं हिम्मत, उद्योग, आणि तरतरी हीं निरंतर पूर्णपणें जागृत असत, तेणेंकरून त्याला कोणतेंही काम दुष्कर वाटेना. हातीं राज्यकारभार आल्यावर त्यानें त्याची नीट व्यवस्था लावण्यास व आपल्या लोकांची सुधारणा करण्यास आरंभ केला; ह्यावरून राज्यकारभार हातीं नव्हता तेव्हां, बाळपणांत ह्यानें ह्या गोष्टींचा विचार करून ठेविलेला असावा, असें दिसतें. ही गोष्ट सामान्य बुद्धीची नव्हे. त्यानें प्रथम आपल्या लष्कराच्या स्थितीकडे लक्ष दिलें; आणि तींत जे फेरफार आवश्यक वाटले ते लागलेच करून टाकिले. नंतर त्यानें मुलकी खात्यांत पुष्कळ सुधारणा केली. ह्या कामीं तो जर्मन लोकांचें साह्य घेत असे; व त्यांच्या उपयुक्त मदतीबद्दल त्यांस चांगलें उत्तेजन देत असे. ते लोक व्यापाराकरितां मास्कोशहरांत येऊन राहिले होते. तसेंच, तेथें कितीएक दच लोक येऊन स्थायिक झाले होते, त्यांजवरही पीतराची फार कृपा असे; ह्याचें कारण एवढेंच कीं, ते गलबतें बांधण्यांत व हांकारण्यांत फार प्रवीण असत, आणि तो विषय पीतर ह्यास मनापासून आवडत असे. पहा, लोक कोणत्याही देशांतले असले, तरी त्यांच्या आंगच्या सद्गुणांवरून पीतर त्यांस चाहात असे. ही गोष्ट पुष्कळ राजांस कित्ता घेण्यासारखी आहे.

पीतर ह्यास लहानपणापासून पाण्याचें भय अतिशयित वाटत असे. एकादा लहानसा ओढा वलांडून जाण्याचा प्रसंग प्राप्त झाला असतां, तो थरथरां कांपायास लागून त्याच्या सर्वां-

गाचा घाम घाम होई. ह्या भीतीचें मूळ कारण असें सांगतात कीं, पीतर हा चारपांच वर्षांचा असतां, त्याची आई त्यास घेऊन, गाडींत बसून एके ठिकाणाहून दुसरे ठिकाणीं जात होती. तेव्हां पीतराप तिच्या मांडीवर झोंप लागली होती. इतक्यांत त्यांची गाडी एका धबधब्याजवळून जात असतां त्याची मोठी गर्जना ऐकून पीतर एकाएकीं दचकून उठला, आणि त्याला अतिशयित ज्वर भरला. तेव्हांपासून पाणी म्हटलें म्हणजे त्याच्या आंगाचा थरकांप होई. जरा समंजसपणा आल्यावर, पीतर ह्यास ह्या खोडीविषयीं फार वाईट वाटूं लागलें; आणि ती हर प्रयत्नानें घालविण्याचा त्यानें निश्चय केला. मास्कोशहरांतून एक लहानशी नदी वाहाते, तींत तो दररोज होडी खेळवायास जाऊं लागला. अशा नित्याभ्यासानें त्याचें जलभय गेलें एवढेंच केवळ नव्हे, तर त्याला पाण्यांतल्या खेळाचा मोठा नाद लागला. पहा, अभ्यासाच्या योगानें पीतराच्या स्वाभावाची किती व्युत्क्रमस्थिति झाली ती. ! ही गोष्ट विचारी पुरुषांस फार लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

पीतर ज्या होडींत बसून नदींत खेळत असे, ती होडी इतर होड्यांहून कांहीं वेगळ्या प्रकारची बांधिलेली होती. हें अंतर पाहून त्यानें तिम्मरमन ह्यास विचारिलें कीं, " ही होडी इतर होड्यांपेक्षां वेगळ्या रीतीनें कशारितां बांधिली आहे बरें. ? " त्यानें उत्तर दिलें कीं, " वारा उलट वाहूं लागला, तरी ही नीट चालावी, म्हणून ही अशी बांधिली आहे." ह्या उत्तरानें पीतराचें चित्त वेधिलें. ती होडी आलेक्सिसाच्या वेळीं ब्रांत नामें कोणी दच कारागीर रूस देशांत आला होता, त्यानें बांधिली, असें त्यास सांगितलें. त्यानें लागलेंच त्या कारागिरास बोलावून आणिलें, आणि त्याजकडून त्या लहानशा गलबतास डोलकाठी लावविली, दोरखंडें बांधविलीं, त्याची सर्व दुरुस्ती करविली; आणि तें नदीवर हांकिलें, तें पाहून त्याला फार आनंद

झाला. पीतर ही मौज पाहून स्वस्थ बसला नाहीं; तर, तें गलबत तसें हांकण्यास आपण स्वतः शिकला. दुसऱ्याच्या आंगच्या सद्गुणांची स्तुति करणें हा एक सद्गुण आहे; परंतु ते सद्गुण स्वतः संपादणें हा खरा पुरुषार्थ आहे.

नंतर कांहीं वेळानें पीतर ह्यानें ब्रात ह्याजकडून आपणाकरितां दुसरें एक लहानसें गलबत बांधविलें; आणि तें चालविण्याकरितां त्यानें एक दच खलाशी ठेविला. त्याचे हाताखालीं राहून, पीतर तें गलबत चालविण्याचें काम त्याजपाशीं इतकें शिकला कीं, त्यांत तो आपल्या गुरूस देखील बोलूं देईना. ह्या प्रकारेंकरून त्यास गलबतें हांकण्याचा फार शौक लागला. त्यानें दच लोकांकडून आणखी पांच मोठीं गलबतें प्लेस्को सरोवराच्या कांठीं बांधवून तयार करविलीं. तीं तो त्या सरोवरांत फिरवूं लागला. तें सरोवर बरेंच मोठें होतें; म्हणजे त्याचा घेर सुमारें नव्वद कोसांचा होता; तरी, पीतरास असें वाटलें कीं, गलबतें फिरविण्यास तें स्थल फार संकुचित आहे; म्हणून तो तीं गलबतें समुद्रावर हांकून आर्केंजल येथें गेला. तेथें एक त्याला दच व्यापाऱ्याचें गलबत आढळलें, तें त्यानें विकत घेतलें, आणि त्यास पीतर असें नांव ठेविलें. नंतर तेथून तो निघाला तो, गलबतांत बसून, इतर गलबतांबरोबर लापल्यांदच्या किनाऱ्यावर पोनाय येथें आला. हें स्थल आर्केंजल बंदरापासून सुमारें पाऊणशें कोस आहे.

ह्यानंतर कांहीं वेळानें पीतर हा पुनः आर्केंजल येथें गेला, आणि तेथें तीन चार महिने राहिला. तितक्या अवकाशांत त्यानें झांदाम येथील मस्क नावाच्या एका व्यापाऱ्याचा स्नेह संपादिला. त्या गृहस्थाचें एक गलबत असून, तें तो स्वतः आंगावर घेऊन चालवीत असे. तें गलबत पाहण्यास पीतर वारंवार जाई; आणि त्याविषयीं नानाप्रकारच्या गोष्टींची माहिती करून घेई. त्यानें एके दिवशीं मस्क ह्यास असें सांगितलें कीं,

मीं कांहीं दिवसां पूर्वीं माझ्या लष्करांतली शिपायाची चाकरी पतकरिली होती, तेव्हांपासून, तत्संबंधीं सर्व कामें मी बजावीत आलों, म्हणून मला आतां एक लहानशी अमलदारीची जागा मिळाली आहे; त्याप्रमाणें गलबत चालविण्याच्या कामीं अगदीं खालच्या पायरीपासून, कामाची माहिती करून घेत घेत आणि आपली योग्यता वाढवीत वाढवीत, आपण तुमच्याप्रमाणे गलबतावरचें मुख्य अमलदार व्हावें अशी माझी फार इच्छा आहे, ती तुम्हीं पूर्ण करावी. मस्क ह्यास ही सगळी थट्टा वाटली. परंतु, आपला हेतु खरोखर तसा आहे, असें पीतरानें त्याचे मनांत बिंबवून दिलें. तेव्हां त्याचें बोलणें मस्क ह्यानें मोठ्या आनंदानें मान्य केलें. रूस देशचा झार मस्क ह्याचा नौकर बनला. त्यानें गलबतावरच्या अगदीं हलक्या कामास आरंभ केला. प्रथमतः त्यानें गलबतावरची झाडफेड पतकरिली; मग दिवाबत्ती करून मस्क ह्यास चिलीम भरून देण्याचें व त्याचे कपडे साफ ठेवण्याचें काम चालविलें. पुढें दारूचे पेले वगैरे भरून देण्याचे कामावर त्याची नेमणूक झाली, तेंही काम त्यानें चांगलें बजाविलें; आणि अशा क्रमानें गलबतावरचा नाखवा होण्यास तो पात्र झाला. तो हीं कामें करतांना डोल काठीवर वगैरे अशा चपलाईनें चढे कीं, आतां हा खालीं पडून मरतो कीं काय, असें मस्क ह्यास वाटे. पण ती गोष्ट पीतर ह्याच्या गांवीं देखील नसे. इतक्या खटपटीचा त्याचा मुख्य हेतु असा होता कीं, कोणतेंही काम चांगल्या रीतीनें येण्यास तें यथाक्रम शिकत गेलें पाहिजे, ही गोष्ट स्वतःच्या उदाहरणावरून आपल्या लोकांचे मनांत बिंबवून द्यावी, म्हणजे भलताच एकादा उठून भलतेंच काम आपणाशीं मागणार नाहीं, अथवा अविचारानें भलत्याच कामास हात घालणार नाहीं. ज्याचे मनांत लोकांचें खरें हित करावयाचें आहे, त्यानें हा कित्ता उचलिला पाहिजे. नुसत्या बडबडीनें लोकांच्या मनांत बोध उपतिष्ठत नाहीं,

त्याच वेळाच्या सुमारास एक चमत्कारिक गोष्ट घडली, ती सांगतों, म्हणजे पीतर त्याचा स्वभाव किती सरळ होता, व मन किती निर्मळ होतें, हें दिसून येईल. एके दिवशीं समुद्रांतून गलबत चाललें असतां एकाएकीं तुफान झालें. तेव्हां सर्व लोक घाबरून गेले. पीतरास असें वाटलें कीं, सुकाण्या ज्या रीतीनें गलबत हांकीत आहे, ती अगदीं बरोबर नाहीं; म्हणून तो त्यास कांहीं सूचना करण्यास पुढें सरसावला, इतकेंच केवळ नव्हे, तर त्यानें त्याचे हातून सुकाणूही आपले हातीं घेतलें. तेव्हां तो सुकाण्या त्यास रागानें म्हणाला, “ अहो, चला व्हा एकीकडे. ! गलबत कसें हांकावें हें तुम्हांपेक्षां मला अधिक ठाऊक आहे.” असें बोलून सुकाणू त्यानें आपले हातीं घेतलें, आणि मोठ्या झपाट्यानें गलबत चालविलें. परमेश्वरकृपेनें तें गलबत त्या संकटांतून पार पडलें, आणि सर्वांचीं मनें शांत झालीं. तेव्हां रूसदेशच्या झारास आपण काय बोललों हें मनांत येऊन, त्या सुकाण्यास अतिशयित वाईट वाटलें. तो हात जोडून पीतरा-समोर उभा राहिला, आणि म्हणाला, “ महाराज, माझ्या पाम-राच्या अपराधाची क्षमा करावी, अशी माझी विज्ञापना आहे.” पीतरानें त्यास उत्तर दिलें, “क्षमा करायाला त्यांत कांहीं नाहीं. इतकेंच केवळ नव्हे; तर तुम्हीं मला आज संकटापासून मुक्त केलें म्हणून आणि योग्य खरमरीत उत्तर दिलें म्हणून मी तुमचे फार उपकार मानितों.” इतकें नुसतें बोलूनच तो राहिला नाहीं: त्यानें त्या सुकाण्यास एक चांगला पोषाक बक्षीस दिला, आणि शिवाय थोडीशी नेमणूक ही चालू केली. त्याचें नांव सुजाण-पण. ! सुकाण्यानें म्हटलेले शब्द एकाद्या साधारण मनुष्यास दे-खील सोसावयाचे नाहींत, ते, बादशाहा असून, पीतरानें ऐकून घेतले, निमूटपणें सोशिले, त्यांचें तात्पर्य जाणिलें, आणि त्यांबद्दल त्याचे उपकार मानिले, तेव्हां त्याचे ठायीं अनुपम सहनशीलता आणि सदसद्विचार हीं निरंतर जागृत असत, असें म्हणण्यास

कांहीं चिंता नाहीं. ज्यांचीं मनें अशीं बनतात ते पुरुष धन्यतर होत.

पीतर हा जसजसा मोठा होत गेला, तसतसा त्यास गलबतांत बसून फिरण्याचा नाद अधिकाधिक लागत चालला. तो बराच वयांत आल्यावर, एके दिवशीं कितीएक पर राज्यांकडून आलेल्या वकीलां सहवर्तमान समुद्रामध्यें गलबतांत बसून मौजेनें इकडे तिकडे फिरत होता. इतक्यांत एकाएकीं मोठें वादळ उठलें. तेव्हां, पीतर आणि त्याचे खलाशी हे खेरीज करून गलबतावरील सर्व मंडळी अगदीं घाबरून गेली. सर्वांच्या तोंडचें पाणी पळालें. आतां ह्या संकटांतून आपण खचीत पार पडत नाहीं, असें त्यांस वाटलें. त्यांनीं पीतरास विनंती केली कीं, "आपण परत पीतर्सबर्ग शहराकडे गलबत वळवा, किंवा आ हांला पीतरहाफ बंदरीं तरी उतरा. ! पण गलबत पुढें चालवूं नका." हें पीतरानें ऐकून स्वस्थ चित्तानें उत्तर दिलें कीं, "अहो, तुम्ही असे भिऊं नका. कांहीं एक भय नाहीं." पुढें कांहीं वेळ गेल्यावर एक वकील त्याजपाशीं येऊन, अगदीं क्रोधायमान होऊन बोलला, "दयानिधे, माझी हात जोडून एवढीच विज्ञापना आहे कीं, आपण पीतर्सबर्ग शहराकडे परत चलावें, अथवा पीतरहाफ बंदर जवळ आहे, तेथें तरी जाऊन उतरावें; माझ्या राजानें मला जें रूस देशास पाठविलें आहे, तें बुडून मरण्यास पाठविलें नाहीं. आतां गति कांहीं बरी दिसत नाहीं; आणि जरकरितां हें जाहाज बुडून माझें कांहीं भलतेंच झालें, तर माझा राजा आपणांस जवाब विचारिल्यावांचून राहाणार नाहीं. हें पक्कें लक्षांत ठेवा." हें बोलणें कानीं पडलें तेव्हां गलबत खरोखरीच धोक्यांत होतें. तरी त्या वकीलाच्या बोलण्याचें जें हंसूं पीतरास आलें, तें त्याच्यानें आंवरवेना. तो जरा हंसून त्या वकीलास म्हणाला, "अहो, गलबत बुडालें, तर तुम्हीं एकटेच का बुडणार आहां. ? जी तुमची अवस्था तीच आ-

त्याची. ! आणि जर तसें झालेंच, तर तुमचा राजा जवाब तरी कोणाला विचारणार. ? ”

आपल्या लष्कराची सुधारणा केली पाहिजे, ही गोष्ट पीतर ह्याच्या अंतःकरणांत फार दिवसांपासून घोळत होती. ह्या कामीं त्याला एका परदेशच्या मनुष्याची फार उत्तम मदत मिळाली, त्याचें नांव फ्रान्सिस लीफोर्त असें होतें. तो जिनिव्हा येथील एका व्यापाऱ्याचा मुलगा होता. त्याच्या बापानें त्याला कारकून करण्याचें मनांत आणून एका व्यापाऱ्याच्या पेढीवर ठेविलें होतें. पण तें काम त्याला आवडलें नाहीं. म्हणून तें सोडून देऊन, त्यानें आपल्या खुषीनें लष्करांत चाकरी धरिली. तेव्हां तो चवदा वर्षांचा होता. पुढें अनेक ठिकाणीं चाकऱ्यांची धरसोड करितां करितां, तो, आलेक्सिसाचा जर्मन सरदार व्हर्स्तिन नामें होता, त्याचे हाताखालीं आला. नंतर, रूस देशामध्यें, आलेक्सिस मृत झाल्यावर जी धामधूम माजली, तींत तो मास्को येथें दीहूर्न नामक एका दानिश गृहस्थाचा आश्रय धरून राहिला. तो त्याजपाशीं जेऊन खाऊन घरचें कामकाज पाहून असे. दीहूर्न ह्याजवर पीतराचा फार लोभ होता. तो एके दिवशीं दीहूर्न ह्याच्या येथें आला होता, तेव्हां लीफोर्त हा त्याच्या दृष्टीस पडला. तो वयानें लहान, मोठा धोरणी आणि शाहणा आहे असें पाहून, पीतरानें तो मनुष्य आपल्या नौकरीकरितां म्हणून दीहूर्न ह्याजपासून मागून घेतला. तो तरी म्हणजे एकाद्या मोठ्या विद्यालयांत शिकून तरबेज झाला होता असें नाहीं; तर ती सर्वहुशारी त्याची आंगचीच होती; आणि पीतराचेंही तसेंच होतें; त्यामुळें त्या दोघांचें फार जमलें; आणखी लीफोर्त ह्यास रूस देशची भाषा येत असे; तेणेंकरून त्यांची मैत्री जमण्यास अगदीं विलंब लागला नाहीं. कोणतेंही काम करणें तें पीतर त्याच्या अनुमतानें करी. कितीएक ग्रंथकारांचें मत असें आहे कीं, रूस देशच्या सैन्यामध्यें टापटीप,

युद्धकौशल्य आणि शिस्त हीं जीं हल्लीं आढळतात, तीं लीफोर्त ह्याच्या व्यवस्थेचीं फळें होत.

लीफोर्त ह्याच्या सल्ल्यानें पीतरानें आपलें लष्कर सुधारण्यास आरंभ केला, तो असा. त्यांनीं प्रथमतः नमुन्याकरितां पन्नास तरुण लोक निवडून काढिले. ते बहुतेक बडे लोकांचे मुलगे होते; म्हणजे ते द्रव्याच्या आशेनें शिपाई झाले होते असें नाहीं. ह्या पूर्वीं शिपायी लोकांचीं डगलीं म्हटलीं म्हणजे उगाच फार लांब असत; तेणेंकरून चालण्या सवरण्यास मोठी अडचण पडे; हें पाहून ह्या नव्या पन्नास लोकांचे आंगरखे अगदीं बेताचे ठाकठीक करविले. तसेंच, शिपायी लोक दाढ्या मिशा आपल्या इच्छे प्रमाणें पाहिजेत तशा ठेवीत असत, त्या बेताच्या आणि एक सारख्या असल्या पाहिजेत, हा ठराव नवीन लोकांत अमलांत आणिला. त्याप्रमाणें कवाइतीच्या उत्तम रीती ही त्यांनीं ह्या नव्या मासल्याच्या पलटणींत सुरू केल्या. ह्या नव्या गोष्टींचा स्वीकार करण्यास कोणीं कुर कूर करूंनये ह्यास्तव त्यानें स्वतः आपलें नांव त्या नव्या पलटणींत घातलें, आणि नवीन केलेल्या नियमांप्रमाणें आधीं आपण स्वतः मोठ्या हौसेनें वागूं लागला. " क्रियेवीण वाचालता व्यर्थ आहे " ह्या गोष्टीवर त्याचा पूर्ण विश्वास होता असें दिसतें. राजाच्या मनामध्यें लोकांत कांहीं नवीन प्रकार चालू करावयाचा असल्यास त्यास उत्तम उपाय हाच होय.

पुढें रूस देशांत जें उत्तम लढाऊ सैन्य तयार झालें, त्याचा हा मूळ पाया होय. ह्या नमुन्या प्रमाणें लीफोर्त ह्यानें, पीतराच्या हुकुमावरून, बारा हजार लोक तयार केले. त्यांत फ्रेंच वगैरे परदेशचे लोकही पुष्कळ होते. हे लोक नित्यशः कवाइतीचा अभ्यास करीत असत. आपसांत दोन भाग करून एकमेकांशीं लढावें, एकमेकांस वेढे घालावे, वेढे उठवावे, इत्यादि गोष्टी नेहमीं ते करीत. त्यांत देखील कितीएक प्रसंगीं

... य संग्रहालय ...

त्यांस इतकें स्फुरण चढे कीं, ते एकमेकांस जखमी देखील क-रीत. ह्या लुटुपुटूच्या युद्धामध्यें लीफोर्त ह्याला सुद्धां एक ज-खम झाली होती.

पीतर हा लष्कराच्या व्यवस्थेकडे जरी इतका गुंतला होता, तरी त्याचें आरमाराकडचें लक्ष कमी झालें होतें, असें कोणीं समजूंनये. व्होरोनिट्झ नदीच्या कांठीं कांहीं डच आ-णि व्हिनीशियन कारागीर पीतरानें गलबतें बांधण्यास लाविले होते. तीं गलबतें तयार होतांच आझोफच्या समुद्राच्या जवळ ठेवावीं, म्हणजे त्या समुद्रावर आपला अमल बसविण्यास व क्रिमियाचे तार्तार राजाशीं युद्धप्रसंग मांडल्यास, मान्याचें ठि-काण धरण्यास फार उपयोगीं पडतील, अशी त्याची खातरी होती. त्या गलबतांचें काम कोठपर्यंत आलें आहे, हें पाहण्या-करितां पीतर नित्य तेथें जात असे. ह्या गलबतांवरचा मुख्य अधिकार त्यानें लीफोर्त ह्यास दिला. परदेशांतील कारागीर लो-कांस आपले देशांत ठेवून त्यांजपासून कामें करून घेतल्याच्या योगानें जो फायदा होतो, तो, रूसदेशच्या बड्या लोकांस ह्या गलबतांवरून, व लष्कराच्या सुधारणेवरून स्पष्ट दिसून आला. तेव्हांपासून, परक्या लोकांस उत्तेजन दिल्याबद्दलची त्यांची कुरकूर अगदीं मोडली. तरी, धर्माधिकारी व कितीएक मध्यम पदवीचे लोक हे त्यांचा फार द्वेष करीत. कारण, त्यांचा समज असा होता कीं, जें आपलें प्राचीन तें उत्तम, आणि त्यांत फेर फार करणें हें वेडेपण आहे. लोकांच्या अशा समजुती अस-णें हें सुधारणेस मोठें विघ्न आहे.

लष्कराची आरमाराची व उपयुक्त कारखान्यांची अशी तजवीज नीट रीतीनें लागली, व त्यांचें काम बरोबर चाललें. परंतु, त्यांहूनही एका मोठ्या गोष्टीचा विचार पीतर ह्यास करावयाचा राहिला होता. ती गोष्ट कोणती, तर राज्याचा ब-सूल. एके वेळीं लीफोर्त ह्यानें पीतर ह्यास स्पष्ट सांगितलें कीं,

आणि जें इतकें लष्कर आणि आरमार वाढविलें आहे, त्यास दरसाल पुष्कळ पैसा लागेल; आणि हल्लींचें आपलें उत्पन्न सांप्रतच्याच साधारण खर्चास पुरण्याची मारामार पडत आहे; ह्यास्तव उत्पन्न वाढविण्याची कांहीं योजना केली पाहिजे. इतकी नुसती गरज दाखवून तो स्वस्थ बसला नाहीं. त्यानें पीतरास असें कळविलें कीं, आपल्या जाहाजांतून जो माल व्यापाराकरितां बाहेर देशीं जातो, व जो माल परक्या देशांतून ह्या आपल्या देशांत येतो, त्याजवर जकात अतिशयित बसविलेली आहे; ती देण्यास व्यापाऱ्यांस अगदीं पुरवत नाहीं. ह्यास्तव तो माल ते साधेल तितक्या लबाडीनें चोरून पाठवितात, अथवा करघेणाऱ्या अमलदारांस लांचदेऊन आपलें काम थोडक्यांत करून घेतात, ह्यामुळें राज्याचे उत्पन्नाचें फार नुकसान होतें; ह्याचा बंदोबस्त आधीं केला पाहिजे; तो बंदोबस्त एवढाच कीं, जकातीचा दर शेंकडा दाहा आहे तो पांच करावा, आणि त्यांत जर कोणी लबाडी करील तर त्यास सक्त शिक्षा ठरवावी. ही गोष्ट पीतराच्या मनांत भरली. त्यानें लीफोर्त ह्याच्या म्हणण्याप्रमाणें एकदम ठराव करून अमलांत आणिला, आणि पाहूं लागला तों पहिल्याच वर्षीं दरसालपेक्षां वीस लक्ष रूबल अधिक आले. पहा, जकात उत्तरल्यानें उत्पन्न वाढलें.! ही गोष्ट फार चमत्कारिक वाटते. पण वास्तविक म्हटलें असतां ह्यांत कांहीं चमत्कार नाहीं. जकात कमी असली म्हणजे पुष्कळ व्यापार करण्यास मनुष्यास उमेद येते; आणि थोडक्याच्या बाबेकरितां लबाडी करण्याची व लांच देण्याची इच्छा मनुष्यास फारशी होत नाहीं. तेव्हां अर्थात व्यापार वाढतो, आणि जकात अधिक जमून सरकाराला फायदा होतो. ही गोष्ट दुसऱ्या कितीएक व्यवहारांस अशीच लागू पडते.

पीतर हा स्वभावानें रागीट आणि उतावळा होता; तेणेंकरून अपराध नसतांही एकाद्याचें नुकसान होण्याचा प्रसंग

येत असे. परंतु, अशा वेळीं चार युक्तीच्या गोष्टी सांगून लीफोर्त हा त्यास ताळ्यावर आणी, आणि निरपराधी मनुष्यांचा बचाव करी. ह्याविषयींच्या अनेक गोष्टी पुस्तकांतून लिहिल्या आहेत. एकाद्या थोर कुलांतल्या मनुष्याच्या हातून जरी एकादा क्षुल्लक अपराध झाला, तरी त्यास, रागाच्या आवेशानें फार मोठी शिक्षा पीतर ठरवीत असे. तेव्हां लीफोर्त त्यास म्हणे कीं, इतकी जलदी करूं नका; जरा शांत व्हा; विचार करा; आणि मग काय करावयाचें तें करा. इतकेंही सांगून तो नवळे तेव्हां लीफोर्त ह्यानें त्यास सांगावें कीं, " महाराज, ती शिक्षा त्या अनाथाला करूं नका, मला करा; मी ती सोसण्यास तयार आहें. " हें कानीं पडल्यावर पीतरानें थोडा विचार करून त्या गरीब निरपराधी आरोपितास सोडून द्यावें. असें कितीएक वेळां घडून आलें. लीफोर्त हा परदेशचा मनुष्य होता; तो, रूस देशच्या लोकांच्या साधारण स्वभावाप्रमाणें म्हटला म्हणजे अगदीं रेतीच्या कणासारखा त्यांच्या डोळ्यांत खुपावा; परंतु, तो असा थोर आणि सज्जन होता तेणेंकरून, त्यांस स्वदेशबंधूपेक्षां देखील अधिक प्रिय वाटत असे. शाहण्याची बलाय दूर.! लीफोर्त ह्याच्या स्वभावाचे पुरुष कोठेंही गेले तरी ते सर्वप्रिय व्हावयाचे.

लीफोर्त ह्यानें एक उत्तम मनुष्य पीतर ह्यास मिळवून दिला, त्याचें नांव अलेक्झांदर मेंझिकाफ. ह्या पुरुषाची मूळ कथा फार चमत्कारिक आहे, ती अशी. ह्याचीं आईबापें वोल्गा नदीच्या कांठीं एका लहानशा खेड्यामध्यें राहात असत. तीं इतकीं दरिद्री होतीं कीं, मेंझिकाफ ह्यास नुसतें लिहिणें वाचणें शिकविण्याची तजवीजसुद्धां त्यांच्यानें करवली नाहीं. तो तेरा चवदा वर्षांचा झाल्यावर आपल्या आईबापांच्या घरांतून त्यांस न विचारितां निघाला, तो, कांहीं निर्वाहाची तज-

बीज पाहण्याकरितां नीट मास्कोशहरास आला. त्याला तेथें एका भटारखान्यांत लहानशी चाकरी मिळाली. तो नित्यशः टोपलीमध्यें पोळ्या व भाकऱ्या घेऊन विकावयाकरितां शहरांत फिरे. तो तरुण असून स्वरूपानें चांगला होता, त्याचा शब्द फार गोड होता, तो आपला गरीबीचा पोषाक नीट नेटका करी, लोकांशीं अति नम्रपणें वागे, आणि रस्त्यांतून जातांना आपली सुस्वर मुरली वाजवून मधुर मधुर गाणीं गाई, इतक्या गोष्टींच्या योगानें लोकांचें लक्ष त्याजकडे तेव्हांच वळे, आणि त्याचा माल फार लवकर खपे. रत्न मृत्तिकेमध्यें पडलें तरी त्याचें तेज झांकत नाहीं; त्याप्रमाणें मेंझिकाफ ह्याचें गुणवैभव दारिद्र्यानें लोपलें नाहीं. एके दिवशीं लीफोर्त ह्याचें लक्ष त्याजकडे गेलें. त्यानें त्यास घरांत बोलावून आणून असें विचारिलें कीं, ही टोपली तूं विकत देशील काय. ? त्यानें उत्तर दिलें "हा आंतला माल विकण्याविषयीं मात्र माझ्या धन्याची मला परवानगी आहे, टोपली विकण्याची नाहीं; आपणांस पाहिजे असल्यास मी त्यास विचारून येतों." हें भाषण ऐकून लीफोर्त ह्यास मोठें नवल वाटलें. नंतर त्यानें त्यास आपले येथें चाकरीस ठेविलें. पुढें कांहीं दिवसांनीं त्यानें त्याची व झार ह्याची ओळख करून दिली. त्याचें मनोरम स्वरूप, चित्तवेधक चालचर्या, आणि प्रामाणिकपणा हीं पाहून, झार हा त्याजवर पुष्कळ लोभ करूं लागला. त्यानें त्यास आपल्या दरबारचें एक मोठें काम सांगितलें. आणि जे विचार त्याचे मनांत घोळत असत, ते सगळे तो त्याला सांगत असे. मेंझिकाफ ह्यास बरोबर घेतल्या खेरीज झार कधीं बाहेर गेला नाहीं. पीतर एके वेळीं असें बोलला कीं, "एका लबाड सरदारानें मला मारण्याकरितां माझ्या खाण्यांत विष घालविलें होतें, तें मेंझिकाफ ह्याचे नजरेस आल्यावरून तें त्यानें मला लागलेंच सांगितलें; तें अन्न पुढें आल्याबरोबर मीं तें एका कुत्र्यास चारिलें, तेव्हां तो तत्काळ मरण पावला. ह्याप्रमाणें

मेंझिकाफ ह्यानें माझे प्राण वांचविले. मीं त्या सरदाराला लागलेंच कैदेंत ठेविलें; परंतु कांहीं वेळानें जाऊन पाहाता तों तो मृत झालेला माझ्या दृष्टीस पडला.” असो. अशा प्रकारें मेंझिकाफ हा फार वेळ न लागतां व फार श्रम न पडतां झाराच्या नाकचा बाल बनला. सद्गुणमहिमा असाच विचित्र आहे.

अलेक्झांदर गार्दन ह्या नांवाचा एक स्काच गृहस्थ पीतराच्या प्रीतीस पात्र झाला, त्याची गोष्ट ही अशीच चमत्कारिक आहे, ती अशी. तो प्रथम मास्को शहरांत आल्यावर, पात्रिक गार्दन नामक मनुष्यानें त्याची आणि झार ह्याची मुलाखत करून दिली. शिवाय, अलेक्झांदर गार्दन ह्याची इतर लोकांशींही बरीच ओळख झाली. त्याला एकेदिवशीं एके ठिकाणीं लग्नास बोलाविलें होतें, तेथें तो गेला. त्या ठिकाणीं पुष्कळ रुशियन लोकांची मंडळी जमली होती. तेथें इकडच्या तिकडच्या गोष्टी निघतां निघतां परदेशीय लोकांवर टीका चालली. त्यांत एका मनुष्यानें स्काच लोकांची अतिशयित निंदा केली. ती ऐकून गार्दन ह्याचें पित्त खवळलें. जात्यभिमान मोठा कठीण असतो. स्वदेशबांधवांची हेलना ऐकून, गार्दन ह्यास इतका राग आला कीं, त्यानें त्या निंदा करणाऱ्यास एकदम एक ठुस्सा मारून जमिनीवर पाडिलें; तेव्हां आणखी पांच साहा असामी त्याच्या अंगावर धांवून आले. त्यांसही त्यानें एक एक ठुस्सा लगावून चोळीत परत लाविलें. मग मात्र त्याचे समोर येण्यास कोणाची छाती होईना. तो वेळ निघून गेल्यावर, ज्यांनीं मार खाल्ला होता ते सगळे बडे लोकांचे मुलगे असल्यामुळें, हा खटला पीतरापर्यंत गेला. गार्दन ह्यानें झारा समोर उभें राहून झालेली सर्व खरी हकीकत त्यास विदित केली; आणि शेवटीं असें म्हटलें कीं, रागाच्या आवेशानें जो हा मजकडून अपराध झाला आहे, त्याची मला क्षमा करावी. गार्दन ह्याचें सत्य भाषण, नम्रता, व साहाजिक रीतीनें हातून घडलेल्या वाईट कामाचा

पश्चात्ताप हीं पाहून पीतरास त्याचा सज्जनपणा पूर्णपणें समजला, व त्यास त्याची दया आली. तेव्हां तो त्यास म्हणाला, "कांहीं चिंता नाहीं; आम्हांला मारिलें म्हणून ज्या असामींनीं तुजवर फिर्याद केली आहे, त्यांनीं जें न्याय्य तेंच केलें आहे; तसेंच मीही जें योग्य तेंच करीन; जरा दम धर, मी आलों." असें बोलून तो अमळसा आंत उठून गेला. गार्दन हा कचेरीमध्यें चिंताक्रांत उभा राहिला. इतक्यांत पीतर हा, मध्यम प्रतीच्या लष्करी अमलदारीचीं वस्त्रें घेऊन आंतून बाहेर आला, आणि त्यानें तीं मोठ्या आनंदानें त्यास दिलीं. हा गृहस्थ पुढें झार ह्यास फार उपयोगीं पडला, हें पुढील चरित्रावरून दिसून येईल. पीतर ह्यास माणसाची पारख फार उत्तम होती, हें आतां सांगावयास नको.

पीतराचें आरमार आणि लष्कर तयार झालें, तें त्यानें उगीच रिकामें बसूं दिलें नाहीं. लीफोर्त ह्यास त्यानें आरमाराचें मुख्य नेमिलें होतें, त्यास दान नदींतून गलबतें हांकून आझोफाकडे यावें असा हुकूम दिला; पात्रिक गार्दन ह्यानें दान नदीच्या बाजूबाजूनें पांच हजार लोकांसहवर्तमान आझोफा नजीक यावें, असें ठरविलें; लीफोर्त ह्यानें नवीन रीतीप्रमाणें तयार केलेले बाराहजार लोक तिकडेच पाठविले; स्ट्रेलैट्झ लोकांची पलटण जनरल स्केरी माताफ आणि जनरल शीन ह्यांच्या हाताखालीं देऊन तिकडे रवाना केली; कोजाख लोकही त्यांस जाऊन मिळाले; आणि ह्या मोहिमींत आपण स्वतः एकादा हुद्दा पतकरून जावें, असें पीतराच्याही मनांत आलें. आझोफ हातीं आलें म्हणजे काळ्या समुद्रावर अमल बसण्यास फार प्रयास लागणार नाहींत, असा पीतराचा मुख्य आशय होता. ह्या मोहिमीची तयारी चांगली होती. परंतु व्हेनीशियन जाहाजें आणि डच जाहाजें त्या नदींत योग्य वेळीं येऊन पोहोंचलीं नाहींत, तेणेंकरून सगळा बेत विसकटला. तथापि,

जाहाजांची वाट न पाहतां रूसच्या सैन्यानें त्या शहेरास ( आझोफास ) वेढा घातला. पण, पीतराच्या लष्करांतील एका लबाड मनुष्याच्या लुचेगिरीमुळें तो सर्व व्यर्थ झाला; त्याचा प्रकार असाः— त्या मनुष्याचें नांव जेकब असें होतें; तो शीन ह्याचे हाताखालीं तोफखान्यावर नेमिला होता. त्यास कांहीं अपराधावरून शीन ह्यानें थोडीशी शिक्षा केली. ती त्याला दुःसह वाटून, त्यानें तिजबद्दल रूसच्या लोकांचा सूड उगविण्याचा निश्चय केला. तो रात्रीं संधी पाहून, इकडील तोफांच्या कान्यांस खिळे ठोकून, हळूच जाऊन किल्ल्यांतील लोकांस मिळाला. असा माहितगार मनुष्य शत्रूकडे सामील झाल्यावर पीतराच्या फौजेचा पराभव झाला, ह्यांत काय मोठें नवल आहे ? झार ह्यानें तो किल्ला, आणखी एकदा छापा घालून घेण्याचा प्रयत्न केला, परंतु तोही व्यर्थ गेला.

एकवेळ अशी गोष्ट झाली, तरी पीतराची हिम्मत खचली नाहीं. गुलाबाच्या झाडाची खची केली म्हणजे जसें तें पुनः दुप्पट जोरानें वाढतें, त्याप्रमाणें ह्या पराभवाच्या योगानें, पीरास दुप्पट वीरश्री चढली, आणि त्यानें पुनः मोहिमेची तयारी केली. आरमाराची सर्व सिद्धता होती. तशीच लष्करामध्येंही कांहीं न्यूनता राहिली नव्हती. अशा तयारीनें इ०स० १६९६ च्या वसंत ऋतूमध्यें पीतर ह्यानें स्वारी केली. ह्या वेळीं त्या किल्ल्यास जो वेढा घातला होता, त्याचें काम तो स्वतः मोठ्या काळजीनें पाहात असे. तो पाहावा तेव्हां लष्करांत आहेच, जाहाजावर आहेच, असा दिसे. तो क्षणभर देखील एके ठिकाणीं स्वस्थ बसला नाहीं. परंतु, आंत शिरकाव होईना. तेव्हां त्यानें सर्व अम्मलदार लोक जवळ बोलावून आणून, पुढें कार्य करावयाचें असें त्यांस विचारिलें. त्यांपैकीं एक खेरीजकरून बाकी सर्वांनीं असें उत्तर दिलें कीं, जलदी करणें हें प्रशस्त नाहीं; तर हल्ल्याचा विचार जरा अवकाशानें करा-

वा, हें बरें आहे. एक खेरीज करून म्हणून जो वर सांगितला, तो एक कोण म्हणाल तर पात्रिक गार्दन. त्यानें उशीर लावणें योग्य नाहीं असें साफ सांगून, जय प्राप्त करून घेण्यास एक विलक्षण युक्ति सुचविली; ती अशी. तो म्हणाला, "आपणांपाशीं दाहाबारा हजार माणसें तयार आहेत, त्या सर्वांस अहोरात्र कामास लावून, हा आपल्या सैन्याच्या पुढचा तट पाया सुद्धां खणून, त्याच्या मातीचा पर्वत लोटीत लोटीत पुढें पुढें चालवावा; शिवाय हें काम जस जसें पुढें जाईल तसतसा तो पर्वत अधिकाधिक वाढेल. ही मातीची रास तो खंदक भरून टाकून, आणखी शहरच्या गांवकुसावेक्षांही पुष्कळ उंच उभी राहील. तेव्हां आंतले लोक आपले हातीं लागतील एक, किंवा आपण त्यांस जीवंत पुरून टाकूं एक; ह्यांहून वेगळा परिणाम व्हावयाचा नाहीं." ही युक्ति सर्वांस मानवली. आणि ती अमलांत आणण्यास सर्व लोक एकदम मोठ्या आवेशानें काम करूं लागले. ही युक्ति सफल झाली. तारीख २८ जुलै रोजी आझोफशहरचे लोक रुशियन सैन्याच्या हातीं लागले. तेणेंकरून पीतरास फार संतोष झाला. जे जे लोक हस्तगत झाले, त्यांत निमकहराम जेकबही सांपडला. त्यास पीतरासमोर येण्यास किती शरम वाटली असेल, ह्याची कल्पना सुद्धां करवत नाहीं. विश्वासघात करणाऱ्या लोकांचा शेवट असा व्हावयाचाच. ! असो.

आझोफशहरची व्यवस्था बरोबर लाविल्यावर, पीतर मास्कोशहरा परत आला. आणि ह्या नवीन आरमाराच्या व सैन्याच्या खर्चास पैसा पाहिजे, म्हणून त्यानें बडे लोकांवर व मध्यम प्रतीच्या लोकांवर कर बसविला. त्याप्रमाणेंच धर्माधिकारी लोकांस मोठमोठीं इनामें होतीं, त्यांनींही दरसाल अमुक रकम द्यावी, असा ठराव केला. आरमाराच्या व सैन्याच्या एवढ्या तयारीचा मुख्य हेतु एवढाच होता कीं, तार्तार लोकांस क्रिमि-

Iraston



यांतून घालवून द्यावें, केप बॉनच्या* द्वारें सर्कासिआ आणि जार्जिआ ह्यांच्या मध्यें व्यापार चालू करावा, आणि ताद्वारें इराणाशीं व्यापार वाढवावा. हा विचार कांहीं सामान्य नव्हे.

ह्या मोहिमेस बाहेर पडण्यापूर्वीं पीतराच्या कुटुंबांत एक मोठी गोष्ट घडली, ती पूर्वीं वर्णावयास सवड सांपडली नाहीं, म्हणून ती आतां सांगतों. ती गोष्ट हीच कीं, त्यानें आपल्या पत्नीचा घटस्फोट करून, तिला तिच्या मुलांसहवर्तमान एका मठांत नेऊन ठेविलें. ह्याचें एक कारण असें कीं, ती व्यभिचारिणी होती असें कोणी म्हणतात; परंतु, किती एकांचें मत असें आहे कीं, तिचं मन जुन्या चालीच्या लोकांच्या मनाप्रमाणें होतें, म्हणजे, जें जुनें तें सर्व चांगलें, आणि जें नवं तें सर्व वाईट, असा तिचा समज असल्यामुळें, पीतर जें कांहीं करण्याचें योजी, त्यास ती हस्तें परहस्तें आड येऊं लागली, म्हणून त्यानें असें केलें. ह्यां पैकीं दुसरेंच कारण विशेष सयुक्तिक दिसतें. कारण, त्या वेळीं अशा जुन्या मताच्या लोकांची फळी वेगळी झाली होती; आणि त्या राणीचा धर्मगुरु जो होता, तो त्या फळींतला होता.

## भाग दुसरा.

अझोफ काबीज केल्यावर मास्कोमध्यें कांहीं दिवस अगदीं शांतता होती. तेव्हां पीतराचें लक्ष लोकांच्या स्थितीच्या सुधारणेकडे लागलें. आपल्या लोकांपेक्षां पश्चिम युरोपांतले लोक फार चांगले व अधिक सुधारलेले आहेत, ह्याविषयीं त्याची पक्की खातरी झाली होती. त्या लोकांप्रमाणें आपले लोक कारागीर व ज्ञानसंपन्न व्हावे, अशी त्याची फार इच्छा असे. त्यांत, आपल्या लोकांस पद्धतवार लढाईचें काम व सशास्त्ररीतीनें गलबतें बांधण्याचें काम, हीं एकदा केव्हां येतील असें त्याला

* हें आफ्रिकेच्या उत्तरेस भूमध्य समुद्रांत आहे.

झालें होतें. त्याच्या आज्ञेवरून आपल्या लष्करांतून सुमारें साठ असामी लीफोर्त ह्यानें निवडून काढून इ० स० १६९७ त वेनिस आणि लेगहार्न येथें गलबतें बांधण्याची व गलबतें हांकण्याची कला शिकण्याकरितां पाठविले; आणि चाळीस असामी त्याच कामाकरितां हालंद देशांत रवाना केले. लष्कराची कवाईत आणि टापटीप शिकून घेण्याकरितां कितीएक लोक जर्मनीमध्यें धाडिले. ह्याप्रमाणें ज्या ज्या ठिकाणीं जें जें मिळविण्यासारखें होतें, तें तें संपादून आणण्याविषयीं पीतरानें आपल्या देशच्या लोकांची योजना केली. बरें, इतकेंच करून तो स्वस्थ राहिला काय ? नाहीं. अनेक विषयांची माहिती करून घेण्याकरितां आपण स्वतः हालंद, जर्मनी, इताली इत्यादि देशीं जावें, असा त्यानें निश्चय केला. उपयुक्त अशा सर्व शास्त्रांचें ज्ञान आपणास असावें, अशी पीतराची फार इच्छा होती, आणि त्यासाठीं तो निरंतर झटे. व्हाल्तेर* ह्याविषयीं असें लिहितो कीं, "प्राचीन आणि अर्वाचीन इतिहास जरी सर्व धुंडाळिले, तरी, पंचवीस वर्षांचे वयाचा बादशाहा, केवळ राज्यव्यवस्थाज्ञान संपादण्याकरितां, स्वराज्य सोडून परदेशीं गेला, असें दुसरें एक देखील उदाहरण सांपडावयाचें नाहीं." ही गोष्ट खरी आहे. राज्यसुख सोडून, तितकी आवश्यकता नसतां, कोणी प्रवास पतकरील काय ? जसा एकादा कुटुंबी गृहस्थ, आपल्या मुलांमाणसांच्या सुखाकरितां, ज्या ठिकाणीं जें चांगलें असें आढळेल, त्या ठिकाणाहून तें हर प्रयत्नानें मिळवितो, तसा पीतर हा आपल्या प्रजेच्या कल्याणाचा उद्योग निरंतर करीत असे. त्यानें आपल्या सुखाकडे कधीं पाहिलें नाहीं. हींच थोरांचीं लक्षणें होत.

---

* हा एक मोठा फ्रेंच ग्रंथकार होता. तो इ० स० १६९४ त जन्मला, आणि इ० स० १७७८ त मरण पावला; त्याचे सर्व ग्रंथ छापिले आहेत. त्यांचीं बरींच मोठालीं ७० पुस्तकें झालीं आहेत.

पीतरास परदेशीं जाण्यास ही वेळ फार चांगली होती. ती कशी ती पहा. त्याचा भाऊ जान, दुसरा झार, तो वारला होता; गडबड करणारी बहीण सोफया तिचेंही नांव घ्यावयास नको असें झालें होतें; दरबारचे बहुतेक लोक अनुकूल होते; आणि अझोफच्या स्वारींत जय मिळाल्यावरून त्याच्या शाहाणपणाची व शौर्याची कीर्ति देशभर पसरून, सर्व लोक त्याला मान देऊं लागले होते, व भिऊंही लागले होते. आतां, धर्माधिकारी लोक व आज्ञान लोक, ह्यांस पीतराचें आचरण आवडत नसे; स्वदेशा बाहेर स्वतः जाणें किंवा लोक पाठविणें हें महत्पाप आहे तें पीतर करितो, म्हणून ते हाकाही मारीत असत. परंतु त्यांच्या बहिष्कारांस किंवा शापांस भिणारा असा पीतर नव्हता. त्याचा निश्चय दृढ होता. त्याप्रमाणें त्यानें परदेशीं जाण्याची तयारी केली. तो इ० स० १६९७ त प्रवासास जावयास निघाला. तेव्हां त्यानें, आपला प्रीतींतला व विश्वासू सरदार जनरल गार्दन ह्यास, चार हजार लढाऊ लोकां सहवर्तमान, मागच्या बंदोबस्ताकरितां मास्को शहरीं ठेविलें. ही तजवीज खरोखरच स्वतः झाराच्या, त्याच्या कुटुंबाच्या, व त्याच्या राज्याच्या रक्षणास कारणीभूत झाली. ती कशी, तें पुढें योग्य प्रसंगीं सांगूं. असो.

पीतराच्या मनांत प्रथमतः हालंददेशांत जावें असें आलें. परंतु, आपण रूसदेशचे बादशाह, अशा वेषानें जाणें हें त्यास योग्य वाटलें नाहीं. म्हणून त्यानें एक युक्ति काढिली, ती अशी. आपल्या दरबारांतून एक मोठी वकिलात हालंदच्या सरकाराकडे जात आहे, असा डौल घातला. व तींत वकील तीन नेमिले; एक लीफोर्त, एक आलेक्सिस गालोविन, आणि एक व्होरिस्तझिन. त्यांजबरोबर चार गृहस्थ त्यांचे चिटणीस म्हणून दिले; आणखी शिवाय बारा सरदार आणि पन्नास शिपाई; अशी मंडळी तिकडे जाण्यास सिद्ध झाली. तींतच पीतरानें

आपली स्वतःची सोय करून घेतली; ती अशी कीं, एक हुजऱ्या, एक कपडे करण्यास नोकर, आणि एक खुजा मनुष्य ह्या तिघांनीं आपल्या सेवेस तत्पर असावें असें ठरविलें. आणि ह्याप्रमाणें एकाद्या साधारण मनुष्यासारखा पीतर त्या वकिलातींत निघाला. तींत एकंदर मिळून दोनशें मनुष्यें होतीं. ही वकिलात इ०स० १६९७ त निघाली.

ही वकिलात रिगाशहरांतून गेली. तेथचा किल्ला नजरेखालीं घालावा, असें पीतराच्या मनांत फार होतें; परंतु, तेथचा सुभेदार त्यास परवानगी देईना, म्हणून तें तसेंच राहिलें. क्यूनिग्झबर्ग येथें ह्या वकिलातीचा मोठा आदरसत्कार झाला. जर्मनींत तर त्यांस जेवणांवर जेवणें आणि मेजवान्यांवर मेजवान्या मिळाल्या. मद्याची तर खूब चंगळ होऊन गेली. दारू प्यावी, तिच्या अमलांत पाहिजे तितकें बडबडावें, आणि मनास येईल तितकी दांडगाई करावी, असा प्रकार तेथल्या मंडळींत फार चाले. त्या मंडळींत एके वेळीं लीफोर्त ह्याच्या कांहीं बोलण्यावरून पीतर ह्यास इतका राग आला कीं, त्यानें त्यास मारण्याकरितां आपली तरवार उपसून त्याजवर उगारिली, आणि त्यास म्हटलें, " कर आतां आपला बचाव; कसा करतोस तो पाहूं." त्यावर त्या एकनिष्ठ राजसेवकानें उत्तर केलें, " महाराज, मी कशाचा बचाव करूं ? मी कधीं करणार नाहीं. धन्याच्या हातुन मरणें बरें, पण त्याची इतराजी करून घेऊन मग आपला बचाव करीत फिरणें ठीक नव्हे." हीं भाषणें चाललीं आहेत इतक्यांत व्हानमिनसेस ह्यानें पीतराचा हात मागच्या मागें धरून लीफोर्त ह्याच्या प्राणांचें रक्षण केलें. तो क्रोधाचा उमाळा गेल्यावर पीतर ह्यास कृतकर्माचा मोठा पश्चात्ताप झाला, आणि तो म्हणाला, " प्रजेची सुधारणा करण्याविषयीं माझी फार इच्छा आहे; परंतु, माझ्यानें स्वतः मला सुधारवत नाहीं, हें सांगण्यास मला मोठी लाज

वाटते. काय करावें. ?" आलेक्झांदर धि ग्रेत म्हणजे शिकंदर बादशाह हा ही एका अशाच प्रसंगीं असें बोलला होता, असें ग्रंथांतरीं लिहिलें आहे. दुसऱ्याच्या डोळ्यांतलें कुसळ दिसावें, पण आपल्य स्वतःच्या डोळयांतलें मुसळ दिसूंनये असा मनुष्याचा सामान्य स्वभाव आहे. त्याचें दमन करून, निष्पक्षपात दृष्टीनें सर्व गोष्टींचें अवलोकन करणें, हें मोठ्या शाहाणपणाचें चिन्ह आहे.

पीतर निघाल्यावर, मी नेमल्या ठिकाणीं जाऊन एकदा केव्हां पोहाचेन, असें त्याला झालें होतें. वकिलीतीची स्वारी हळू हळू चालली होती, तीस मागें टाकून, तो आपल्या स्वतःच्या माणसांसहवर्तमान आमस्तर्दामशहरीं आला; आणि तेथून तावडतोव जो निघाला, तो झांदाम शहरीं दाखल झाला. तेथें त्यास किस्त ह्या नांवाचा एक मासेमार भेटला. तो पूर्वीं रूसदेशामध्यें कांहीं धंदा करून राहिला होता, त्यास पीतरा बरोबर जे साहा असामी होते, त्यां पैकीं एकानें ओळखिलें. त्यानें त्याला लागलेंच आपल्या होडीवर बोलावून आणिलें. आणि तेथें, रूसदेशचा बादशाहा पीतर, हा स्वतः वल्हीं मारितो आहे, असें जेव्हां त्यानें पाहिलें, तेव्हां त्याला जें नवल वाटलें, तें किती म्हणून सांगावें. ? पीतर त्याजपाशीं बसून मोकळ्या मनानें बोलला, आणि त्यानें त्यास शेवटीं असें सांगितलें कीं, मला एक लहानसें बिऱ्हाड पाहून दे; तें तुझ्या घराजवळ असलें पाहिजे. किस्त तरीं अगदीं गरीब होता. तथापि झार ह्याच्या भिडेस्तव त्यानें आपल्या घराजवळच एका बाईपासून दोन खोल्या भाड्यानें घेऊन पीतराची राहण्याची सोय केली. तेथें तो जाऊन राहिला. त्यानें किस्त ह्यास मोठया आर्जवानें असें सांगितलें होतें कीं; कोणीं कसें ही विचारिलें तरी, मी अमुक देशचा अमका आहे, हें बाहेर फुटूं देऊं नका. स्वतः त्यालाच जर तुम्ही कोठले कोण असें एकाद्यानें विचारिलें, तर, आम्ही

परदेशचे सुतार, तेथें पोटभरण्याकरितां आलों आहों, असें तो सांगे. त्याला डच भाषा येत असे, तेणें करून तेथच्या लोकांशीं बोलण्यास त्यास अडचण पडत नसे. तो आपले कडून होईल तितकी पराकाष्ठा करून आपलें सत्य स्वरूप झांकी, तथापि त्याच्या बरोबरच्या लोकांचे उंची पोषाक पाहून, त्यास सर्व लोक ओळखीत असत.

झांदाम येथील कितीएक कारागीर लोक रूसदेशामध्यें कामें करण्याकरितां गेले होते, व त्यांची आणि पीतराची ओळख झाली होती, त्यांच्या कुटुंबांचा समाचार घेतल्या नंतर, पीतर तेथल्या बाजारांत गेला, आणि त्यानें तेथें आपणाकरितां सुतारकाम करण्याचीं हत्यारें घेतलीं; आणि त्याप्रमाणें त्यानें आपल्या बरोबरच्या लोकांकडून ही त्यांच्या इच्छेप्रमाणें हत्यारें घेवविलीं. पुढें कांहीं वेळानें असें समजून आलें कीं, त्या मनुष्यांमध्यें त्याचे प्रीतींतले दोन गृहस्थ मेंझिकाफ आणि गालिट्झिन हे होते. त्यांस देखील तो आपणाप्रमाणें काम करायास लावीत असे.

नागाहून जी मोठी वकिलात येत आहे, तिच्या बरोबरचे हे कांहीं लोक रूस देशाहून आले आहेत, आणि त्यांमध्यें वेष पालटून त्यांचा बादशाहा आहे, असें वर्तमान आमस्तर्दाम येथें कळतांच पीतराच्या बिऱ्हाडापाशीं डच लोकांच्या झुंडींच्या झुंडी जमा झाल्या. परंतु, तो फारसा कोणाच्या दृष्टीस पडला नाहीं. कारण, अशी मंडळी जमणें आणि लोकांनीं आपणाकडे टक लावून पाहणें ह्याची त्याला स्वभावतःच फार चीड होती. जरी तो बाहेर पडत नसे, तरी रूस देशाचा झार येथें आला आहे, ह्याविषयीं कोणाला शंका राहिली नव्हती. त्यांत आणखी असें झालें होतें कीं, आर्कैंजलाहून त्या जमलेल्या लोकांपैकीं एकास एक पत्र आलें होतें; त्यांत झार ह्याच्या स्वरूपाचें वर्णन केलेलें असून, शिवाय त्याची तसबीर ही पाठविली होती.

...ग्रंथ संग्रहालय...

काहीं दिवसांनीं पीतर हा तेथच्या लोकांत अगदीं मिसळू-न गेला. तो त्यांना परका वाटेना, व ते त्याला परके वाटेनात, असें झालें. तो त्यांजबरोबर गलबतें बांधण्याचें काम करी, हंसे, खेळे, आणि मोकळ्या मनानें बोले. तो तेथें इतका लो-कप्रिय झाला होता कीं, तो दररोज जें काम करी किंवा बोले, तें सर्व जवळचे लोक टांचून ठेवीत असत. तो कोणत्या प्रकरचा मनुष्य होता, हें जितकें हालंदांत कळून आलें, तितकें त्याच्या स्वतःच्या देशांत देखील कळून आलें नव्हतें. तो, आपला थोडा-सा वेळ आपल्या दरबारांत आलेल्या परदेशच्या वकीलांशीं बो-लण्यांत खरची, आणि बाकीचा सर्व काळ कारागीर लोकांत नवनव्या कळा शिकण्यांत घालवी.

झांदाम येथील कारखान्यां पैकीं एका कारखान्यांतून त्यानें एक लहानसें गलबत विकत घेतलें, आणि त्याची डोलकाठी स्वतः आपले हातानें तयार करावयाची, असा त्यानें निश्चय केला. तेणंकरून सर्व कारागिरांस मोठें आश्चर्य वाटलें. का-रण, डोलकाठी तयार करण्याचें काम म्हटलें म्हणजे मोठ्या मेहनतीचें आहे, तें करतांना आंगाचा घामघाम होऊन जातो; एवढें श्रमाचें काम रूसचा बादशाहा स्वतः कसें करील, ह्याची त्यांना कल्पना सुद्धां करतां येईना. परंतु, ती गोष्ट त्यांस त्यानें खरोखर करून दाखविली. तें गलबत तयार झाल्यावर त्याजवरील मुख्य अधिकाऱ्याचें काम, जेरित मस्क ह्यास, म्हणजे जो एक मस्क आर्केंजल येथें त्याचा मित्र होऊन मरण पावला, त्याच्या भावास दिलें. ह्या मनुष्याच्या कुटुंबावर पी-तराची कृपा असे. तो त्यांस वारंवार भेटे, त्यांशीं मोकळे मनानें बोले, आणि त्यांस द्रव्यद्वारा पुष्कळ साह्य करी.

रविवारीं आणि इतर सणांचे दिवशीं अमस्तर्दाम येथील लोकांच्या झुंडींच्या झुंडी पीतर ह्यास पाहण्यास झांदाम येथें

येत असत. आणि आपणास एकदम पुष्कळ लोकांनीं पहावें, हें त्यास अगदीं आवडत नसे; इतकेंच नव्हे, तर मोठा समाज आपणाभोंवतीं पाहतांच, त्याची मान आंखडे, तोंड काळें पडे, आणि सर्वांग कांपायास लागे. हा प्रकार त्याच्या बरोबरच्या लोकांस ठाऊक होता. परंतु, ही गोष्ट दच लोकांस माहीत नसल्यामुळें, त्यांचे समक्ष जेव्हां तो असा घाबरला, तेव्हां ते अगदीं भिऊन गेले. कारण, आपण आल्यामुळें रूसच्या बादशाहाची प्रकृति अशी बिघडली कीं काय कोणजाणें, असें त्यांस वाटलें. परंतु, नेहमींच्या पाठाप्रमाणें एक तरुण रूपवती स्त्री पीतरासमोर आणिल्याबरोबर तो शुद्धीवर आला, आणि त्याला बरें वाटलें. त्याला असें कांहीं झालें म्हणजे अथवा अतिशयित राग आला म्हणजे, त्याच्या निरसनार्थ जवळचे लोक तरुण सुंदर स्त्रीची योजना करीत. ती त्याजपाशीं एकांतीं कांहीं वेळ असली म्हणजे, तो चांगला हुशार होई. ही गोष्ट खरोखर चमत्काररिक आहे. मानवस्वभावसमुद्राच्या पोटीं काय आहे आणि काय नाहीं, ह्याचा अंत लागावयाचा नाहीं.!!

पीतर हा गलबतें बांधण्याच्या कारखान्यांत इतर रोजकरी लोकांप्रमाणें काम करी, आणि त्यांत त्याला मोठें भूषण वाटे. त्यास त्या स्थितीमध्यें पाहावें म्हणून ड्यूक अफमार्ल बरो हा थोर गृहस्थ एके दिवशीं तेथें आला. त्यास प्रथम झार ओळखला नाहीं; कारण त्याचा पोषाक इतर कामकरी लोकांप्रमाणेंच होता. तो गृहस्थ आला तेव्हां पीतर एके जागीं जरा विसांवा घेत बसला होता, आणि कांहीं लोक एक मोठी तुळई एके जागेवरून दुसरे जागीं नेत होते. तेव्हां कारखान्याच्या मालकानें पीतरास म्हटलें, "अहो, बसून पाहतां काय.? त्यांना हात लावा." हें ऐकतांच पीतरानें चटकर उठून त्या तुळईच्या खालीं आपला खांदा दिला, आणि ती

न्यावयाची होती तेथें नेऊन पोहोंचविली. तसेंच, पूर्वी आकें-जल येथून परत आल्यावर, तो इस्तिआ येथें म्यूलर नांवाच्या एका गृहस्थाच्या कारखान्यांत कांहीं दिवस राहिला होता; ते-थें त्यानें स्वतः कितीएक पाहरा तयार केल्या, आणि खुणेक-रितां त्यांजवर आपलें नांव घातलें. त्या कामाबद्दल त्यानें म्यू-लर ह्याजपाशीं इतर नौकरांप्रमाणें मजुरीही मागितली. ती त्यानें दिली. ती हातीं घेऊन तो म्हणाला, "हा हा, बरें झालें; ह्या पैशांचा एक जोडा चांगला येईल; हा माझ्या पायांतला जो-डा अगदीं जुना झाला आहे; त्याला तळ दुसरा घातला होता, तो देखील गेला. !" ते पैसे घेऊन लागलाच तो जवळच्या दुकानांत गेला, आणि त्यानें एक जोडा विकत घेऊन पायांत घातला. त्याचें त्याला एवढें भूषण वाटलें कीं, त्याचें वर्णन सुद्धां करवत नाहीं. तो, तो जोडा ज्याला त्याला दाखवी, आणि मोठ्या हौसेनें असें सांगे कीं, "मीं हा आपल्या निढळच्या घामानें मिळविला आहे." खचीत. ! निढळच्या माघानं मिळविलेली वस्तु वापरण्यांत एक प्रकारचा विलक्षण आनंद आहे. त्याची खरी योग्यता कळण्यास मनुष्याचें मन पीतराच्या मनासारखें असलें पाहिजे. ह्या जगांत मनुष्यास ज्या वस्तु प्राप्त होतात, त्यां पैकीं कांहीं त्याच्या स्वकष्टार्जित असतात, आणि कांहीं अन्यसंबंधानें सहजगत्या प्राप्त झालेल्या असतात. त्यांत ह्या कोणत्या आणि त्या कोणत्या, हें कळण्यास बराच समंजसपणा पाहिजे. जे लोक दुसऱ्यांच्या माना पिळून मिळविलेल्या सं-पत्तीवर जगांत वैभव मिरवितात, त्यांनीं ही पीतराची गोष्ट ऐ-कून, खरोखर माना खालीं घालाव्या.

पुढें कांहीं दिवसांनीं ती वकिलात मोठ्या डाम डौलानें आमस्तर्डाम शहरीं आली. त्यावेळीं त्या स्वारींत, साधा पो-षाक करून, पीतरही मागच्या एका साधारण गाडींत बसून चालला होता. तीन वकीलांच्या गाड्या पुढें होत्या, आणि

त्यांचें वैभव मोठें होतें, ह्यामुळें त्यांजकडे सर्व लोकांचे डोळे लागून राहिले, आणि पीतराकडे फारसें कोणीं पाहिलें नाहीं. ही गोष्ट पीतरास फार आवडली.

ह्याच सुमारास इंग्लंदचा राजा तिसरा विलियम अलत्रेच येथें आला होता. त्याची पीतरानें भेट घेतली. त्यावेळीं पीतरानें त्याजपाशीं जें भाषण केलें, त्याचा आरंभ एके ठिकाणीं असा लिहिला आहेः— "कीर्तिमान प्रभो, मी आपलें सिंहासन आणि विजयी सेना सोडून एकटा जो इतक्या दूरच्या देशांत आलों आहें, तो जर्मनीच्या राज्यांतलीं मोठमोठीं शहरें अथवा जगांतलीं प्रजासत्ताक राज्यें पाहण्याच्या उद्देशानें आलों नाहीं; तर, आपणांसारख्या शूरांचीं दर्शनें घ्यावीं, हा ही माझा बाहेर पडण्याचा एक मुख्य उद्देश आहे." पीतरास समयोचित भाषण करितां येत होतें, हें पुष्कळ गोष्टींवरून दिसून येतें.

जिज्ञासाही अज्ञानाची कन्या आणि ज्ञानाची मातुश्री होय, असें एका मोठ्या ग्रंथकारानें एका ठिकाणीं लिहिलें आहे, तें खरें आहे. ही जिज्ञासा पीतराचे ठायीं फार होती, म्हणूनच तो ह्या जगांतल्या उत्तम राजमालेंत गणना पावला, असें म्हटलें पाहिजे. कांहीं नवी गोष्ट कानीं पडली म्हणजे तिजविषयीं जितकी माहिती मिळण्यासारखी असे, तितकी मिळविल्यावांचून तो कधीं राहिला नाहीं. त्यानें हालंदांतल्या मासेमार होड्या पाहिल्या; व्हेल नामक प्रचंड मासा ते कसा धरितात, त्यास कसें मारितात, त्याचीं हाडें कशीं काढितात, त्याचें तेल कसें गाळितात, ह्याविषयीं त्यानें माहिती करून घेतली. पवनचक्क्या, आरेकशी कारखाने, पाणी काढण्याचे कारखाने, कागद करण्याचे कारखाने, हीं सर्व त्यानें नुसतीं पाहिलींच नाहींत, तर त्यांचीं यंत्रें कोणत्या मूलतत्वांवर चालतात, हेंही समजून घेतलें. आपली जिज्ञासा तृप्त करण्याच्या कामीं तो आपल्या जीवाकडे सुद्धां पाहात नसे. तो एके दिवशीं कां-

हीं यंत्रें पाहण्याकरितां एके उंच स्थळीं चढला होता, तेथून पाय घसरून जो खालीं पडला, तो त्याचा एक पायच दुखावला. बादशाहा असून ज्ञानसंपादनाची एवढी इच्छा पीतराचे ठायीं होती, ह्याचें खरोखरच नवल वाटतें.

गलबतें बांधण्याच्याच कामीं त्याचा शोध फार होता असें नाहीं; तर, त्याला इतर विद्यांचाही फार नाद असे. मनुष्य मेलें म्हणजे शरीररचना पाहण्याकरितां व रोगाची परीक्षा करण्याकरितां प्रेतें फाडितात, तें काम, वास्तविक पाहिलें असतां अतिशयित किळस येण्यासारखें आहे; तें देखील पीतर शिकला होता. एकाद्या ठिकाणच्या दुःखाचें रक्त काढणें हेंही त्याला येत असे. एका दच गृहस्थाच्या बायकोला जलोदर झालें होतें, तिला बरें करण्याकरितां कांहीं शस्त्रप्रयोग तिच्या शरीरावर पीतर करीत असतां, तिची प्रकृति अधिक होऊन ती मृत्यु पावली. तेव्हां पीतराला फार वाईट वाटलें. तो, तिच्या नवऱ्याच्या सांत्वनार्थ, तिच्या प्रेतसंस्कारास गेला होता.

आपणास जी शस्त्रविद्या आणि वैद्यकी येत आहे, तिच्या द्वारें आपण नेहमीं लोकांच्या उपयोगीं पडावें, अशी पीतराची इच्छा असे; आणि ह्याकरितांच आपणापाशीं तो निरंतर एक शस्त्रांची पटी आणि एक औषधांचीं पेटी बाळगीत असे. एके वेळीं त्याचे हातून एक चमत्कारिक गोष्ट घडली, ती अशी. बाल बोयराफ म्हणून एक त्याचा हुजऱ्या होता. तो एके दिवशीं वाईट तोंड करून चिंताक्रांत बसलेला त्याच्या दृष्टीस पडला. त्यास पीतरानें विचारिलें, "कांरे, असा कां बसलास. ?" त्यानें उत्तर दिलें,"नाहीं महाराज कांहीं नाहीं; माझ्या बायकोची एक दाढ फार दुखत आहे, त्यामुळें ती फार रडत असते, आणि वैद्याला हात सुद्धां लावूं देत नाहीं महाराज. ! काय करावें. ?" झार म्हणाला, "असें काय. ? कांहीं काळजी करूं नको; मी तिला बरी करितों." असें बोलून, पीतर त्याबरोबर त्याच्या

घरीं गेला, आणि त्याच्या बायकोची प्रकृति पाहूं लागला. तेव्हां ती घाबरून म्हणाली, "अहो महाराज, माझें कांहीं एक दुखत नाहीं; अहो मी खरोखर सांगतें ऐका, मला कांहीं एक आजार नाहीं. कृपा करून मला उगाच त्रास देऊं नका." तें ऐकून नवरा पीतराकडे वळून म्हणाला, "पाहिलें महराज; वैद्य पाहिला म्हणजे ही अशी ओरडत बसते, आणि तो गेला कीं रडण्याकण्हण्याला आरंभ." पीतर बोलला, "बरें कांहीं चिंता नाहीं. मी हिला आतां बरी करितों. जरा तुम्ही हिला अमळ धरा मात्र." त्यानें तिचे हात धरिले; आणि अमुक दांत दुखत असावा असें अजमासानें पाहून, पीतरानें तो चिमट्यानें धरून सटकर उपटून काढिला. ह्या गोष्टीस बरेच दिवस लोटल्यावर पीतरास असं समजलें कीं, आपली बायको व्यभिचारिणी आहे असें समजून, तिला शासन करण्याकरितां तिच्या नवऱ्यानें ही कपटयुक्ति योजिली होती; वास्तविक म्हटलें असतां तिचा दांतबीत कांहीं दुखत नव्हता. हें कळतांच पीतरानें त्या दुजऱ्यास बोलावून आणून त्याला स्वतः हातानें खूब मार दिला. !

पीतर ह्यास नजर देण्याकरितां स्तेत्सजनरलांच्या* आज्ञेवरून, वितसेन ह्याच्या मार्फत एक जाहाज झांदाम येथें तयार करविलें होतें. त्याचा त्यानें आदरपूर्वक स्वीकार केला, आणि त्यास आमस्तर्दाम असें नांव ठेविलें. त्याजवरील मुख्य अधिकाऱ्याचें काम त्यानें मस्क ह्या नांवाच्या मनुष्यास दिलें. हा मनुष्य आर्केंजल येथें मरण पावलेल्या मस्काचा मुलगा होय. ज्यांस एकदा आपलें म्हटलें, त्यांचें निरंतर कल्याण करण्याविषयीं पीतराची बुद्धि फार चांगली असे. राजांचीं मनें अशीं असलीं म्हणजे गरीबगुरीबांचें बरें चालतें.

इव्हान व्हासिलो व्हिट्झ म्हणून जो रूसदेशांत एक झार होऊन गेला, त्याच्या वेळेपासून याहुदी लोकांस रूसच्या राज्यां-

---

* हालंदामध्यें कायदे करणारी जी सभा होती, तिचें नांव.

त बिलकुल राहूं देत नसत. ह्यास्तव त्यांनीं वितसेनच्या मार्फ-त पीतरास असा अर्ज केला कीं, रूसच्या राज्यामध्यें वास क-रण्यास आम्हांस परवानगी असावी. आणि त्याबद्दल नजराणा म्हणून त्यांनीं त्याजकडे बराच पैसाही पाठविला. त्यांच्या व-तीनें वितसेन जितकें बोलला, तितकें सर्व शांतपणें ऐकून घेऊन पीतर म्हणाला, "अहो याहुदी लोक कसे आहेत, व त्यांजवि-षयीं आमच्या देशाच्या लोकांचे अभिप्राय कसे आहेत, हें म्ह-णजे तुम्हांस माहीत नाहीं असें नाहीं, विदितच आहे. आणि तें मीही जाणतों. आमचे लोक ज्या दृष्टीनें सांप्रत काळीं या-हुदी लोकांकडे पाहतात, तिचा विचार केला असतां, ह्यांनीं म्हणजे आमच्या मुलुखांत येऊन राहावें, हें मला नीट दिसत नाहीं. तथापि, त्यांस माझा असा निरोप कळवा कीं, तुम्हीं जो नजराणा मला दिला, त्याबद्दल मी तुमचे फार आभार मा-नितों; आणि जर तुम्ही रूस देशांत येऊन राहाल, तर माझी तुम्हांवर मेहेरबानी राहील. आणखी त्यांस स्पष्ट असें सांगा कीं, सर्व दुनयेस कसें फसवावें, हें तुम्ही समजतां, तरी, आम-च्या देशांतले लोक तुम्हांला टोपी घालतील, हें खचीत लक्षांत ठेवा."

पीतर ह्यानें हालंदांतील विद्वान लोकांचाही स्नेह संपादिला. तो, प्रख्यात गुरु रैच ह्याच्या वैद्यक व्याख्यानांस जात असे; आणि तेथें शरीरविदारण करून जे जे चमत्कार तो दाखवी, ते ते तो फार लक्ष लावून पाहात असे. तेथें देखील तो अगदीं खालच्या बांकावर बसे; म्हणजे, त्याला आपलें मोठेपण मिरवि-ण्याचो अगदीं इच्छा नव्हती. आमस्तर्दाम शहरांतील पदार्थ-संग्रहालयें, दवाखाने, जुनीं नाणीं, आणि कलाकौशल्याचे चम-त्कारिक पदार्थ, हीं सर्व त्यानें पाहिलीं. लीऊव्हेनहूकी ह्या नां-वाचा एक मोठा यंत्रविद्याभिज्ञ गृहस्थ सूक्ष्मदर्शक यंत्रें करीत असे, त्याचेही भेटीस पीतर गेला, आणि त्याचीं चमत्कारिक यंत्रें

पाहून, त्यानें त्याची फार वाहवा केली. बिंकर्सहूक म्हणून एक त्या वेळीं फार नामांकित अर्थशास्त्रवेत्ता होता, त्याजकडे जाऊन त्यानें त्यास आपले दरबारीं यऊन स्वस्थ राहण्याविषयीं सुचविलें. तें त्यानें मान्य केलें किंवा नाहीं हें काठें लिहिलें नाहीं. हेग मुकामीं कोइहार्न नामक मोठ्या चतुर कारागिराची आणि त्याची गांठ पडली. तेणेंकरून पीतरास बहुत संतोष झाला. त्या देशामध्यें महान अपराधी मनुष्याची चौकशी कशी होते, आणि त्यास शिक्षा कशी करितात, हें त्याचे मनांत पाहायाचें होतें. ह्यास्तव तो न्यायाधीशांच्या कचेरींत जाऊन बसला, आणि तशा प्रकारचे दोन खटले त्यानें पाहिले. त्यांतील दोघां ही आरापितांवर अपराध शाबीद होऊन त्यांस न्यायाधीशांनीं देहान्त शासनें ठरविलीं. हा कशीं अमलांत आणिलीं हेंही पीतरानें पाहिलं. त्यांत त्याला एवढेंच अधिक वाटलें कीं, चौकशीला इतका उशीर लागतो हें बरोबर नाहीं. खरोखर, गुन्हा घडल्यापासून चौकशीचा निकाल होईपर्यंत, आरोपितास तसेंच कारागृहांत कुचंबत ठेवणें हें कांहीं चांगल्या राज्यवस्थेचें चिन्ह नव्हे. ह्याविषयीं सांप्रत काळच्या सुधारलेल्या राजांनीं देखील चांगला विचार केला पाहिजे.

झाराची स्वारी हालंदांत होती तोंच असें वर्तमान आलें कीं, क्रिमियाच्या जवळ, त्याच्या सैन्यानें मोठी लढाई मारून तुर्क आणि तार्तार ह्या लोकांचा अगदीं पराभव करून टाकिला. हें वर्तमान कानीं पडलें तेव्हां पीतरास मोठा आनंद झाला. त्यानें, त्या प्रीत्यर्थ, आमस्तर्दामच्या सर्व लोकांस मोठी थाटदार मेजवानी दिली. तीस मोठमोठे बडेलोक आपल्या कुटुंबांसहवर्तमान आले होते. तो मोठा उत्सव झाला. सर्व लोकांस फार आनंद वाटला. इतका दूरचा बादशाहा ह्या आपल्या देशांत केवळ ज्ञानसंपादनार्थ येऊन, आपणांवर इतकी प्रीति करितो व

आपणांत इतका मिसळतो हें पाहून तर ते त्याची फार फार वाहवा करीत.

ह्या प्रकारेंकरून सुमारें नऊ महिने हालंदांत पीतरानें घालविले. नंतर, आतां आपण दुसऱ्या देशांत जावें, असें त्याच्या मनांत आलें. तेव्हां पुनः एकदा झांदाम येथें जाऊन त्यानें आपल्या ओळखीच्या सर्व कामदारांचा निरोप घेतला. पुढें तो हेग येथें गेला, तेव्हां त्याबरोबर लीफोर्त हा होता. त्या ठिकाणीं इंग्लंद देशचा राजा तिसरा विलियम ह्याची त्यानें गांठ घेतली. त्या प्रसंगीं उभयतांच्या इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर असें ठरलें कीं, झार साहेबांची स्वारी आपल्या लवाजम्यासह इंग्लंदास यावयाची आहे, ह्याजकरितां त्यांस नेण्यास, तीन लढाऊ जाहाजें आणि एक खासास्वारीचें जाहाज, अशीं चार जाहाजें विलियम राजानें हेल्हू तस्लो इस येथें पाठवावीं. त्याप्रमाणें तीं जाहाजें नेमल्या वेळीं तेथें आलीं. आणि झार ह्याची स्वारी आपल्या मंडळीसहवर्तमान त्यांत बसून इ० स० १६९८ च्या जानेवारी महिन्यांत इंग्लंदास प्राप्त झाली.

झार महाराजांची स्वारी, तारीख २१ रोजीं, लंदन शहरीं गलबतांतून उतरली. तेथें गुप्त रूपेंकरून राहावें, असें त्याच्या मनांत नव्हतें. तरी, आपणास एकाद्या सभ्य गृहस्थाप्रमाणें मानावें, त्याहून अधिक मानपान करूंनये, असें त्यानें विलियम राजास सांगून ठेविलें होतें. त्याप्रमाणें त्याची सर्व व्यवस्था राहिली. म्हणजे, त्यास त्याच्या लोकांसह राहण्यास पुरे, असा एक मोठा वाडा दिला, आणि त्यांस जें कांहीं लागेलसवरेल, तें तावडतोब मिळण्याविषयीं तजवीज ठेवविली. त्या वाड्यांत पीतर राहिला असतां, त्यास पाहण्यास पुष्कळ लोक येत; परंतु त्या गोष्टीची त्याला फार चीड असे, म्हणून तो त्यांच्या नजरेस पडत नसे. तरी, खटपटी उद्योगी लोक, नानाप्रकारच्या युक्ति योजून त्यास पाहण्याची संधी साधीत.

तो लंदन शहरीं नाटकास एकदोनदा गेला होता; व तशा प्रकारच्या ज्या दुसऱ्या मौजा असत, त्या पाहण्याची संधी तो फुकट जाऊं देत नसे. अशा प्रकारें तेथें त्याला बरीच करमणूक होई. तरी त्या शहरांत राहणें त्यास आवडलें नाहीं. ह्याचें एक कारण असें कीं, तो विशेषेंकरून नौकानयनसंबंधीं व इतर उपयुक्त विषयसंबंधीं ज्ञान संपादण्याकरितां तेथें आला होता, तो त्याचा हेतु, त्याच्या इच्छेप्रमाणें सिद्धीस गेला नाहीं; आणि दुसरें कारण असें कीं, त्याला पाहण्याकरितां लोकांचे थव्यांचे थवे येत, तेणेंकरून त्यास अतिशयित त्रास होई. आणि इंग्लंदच्या लोकांच्या रीतीही त्याला फार चमत्कारिक वाटत. तो एके दिवशीं, इंग्लंदच्या एका मानकरी मनुष्याबरोबर रस्त्यांतून जात असतां, एक हमाल डोक्यावर मोठें ओझें घेऊन चालला होता, त्यानें पीतरास धक्का देऊन नाल्यांत ढकलिलें. हें पाहून, तो मानकरी गृहस्थ त्यास म्हणाला, "अरे, हे झार महाराज आहेत, हें तुला ठाऊक नाहीं काय. ?" त्यावर त्या हमालानें दांत विचकून उत्तर दिलें, "अंः ! कोण. ? झार. ! येथें सगळेच झार आहेत. ! " ह्यापेक्षां इंग्लिश लोकांच्या फाजीलपणाचा त्यास फार राग येत असे. तो भोजनास बसला म्हणजे ते लोक, कांहीं तरी निमित्त काढून त्याच्या खोलींत जात. त्या वेळीं त्यास इतका संताप येई कीं,तो कधीं कधीं अर्ध्या जेवणावरून देखील उठून जात असे. असें एक दोन वेळां घडल्यावर, उगाच त्रास होऊं नये म्हणून, त्यानें आपल्या जवळच्या माणसांस अशी सक्त ताकीद देऊन ठेविली कीं, मनुष्य कोणत्याही योग्यतेचा असो, व तो कोणतीही सबब सांगो, आम्हीं भोजनास बसल्यावर आंत कोणालाही येऊं देऊं नये.

पीतर ह्याच्या इंग्लंदांतल्या कालक्रमणेची हकीकत तपशीलवार लिहिलेली कोठें सांपडत नाहीं. तथापि स्तोरी नामक ग्रंथकारानें त्याच्या कांहीं गोष्टी टिपून ठेविल्या आहेत, त्यां

त कितीएक फार चमत्कारिक आहेत. त्यांमध्यें तो एक असा प्रकार सांगतो कीं, पीतर हा आपल्या जवळच्या आपल्या हाताखालच्या लोकांशीं फारच सलगीनें वागत असे; तो इतका कीं, मला मोठ्या बहुमानाच्या नांवानें हाक मारूं नका, नुसतें पीतर म्हणा म्हणजे झालें, असें त्यानें त्यांस सांगितलें होतें; आणि त्याला त्यांनीं तशी हाक मारिली म्हणजे त्याला मोठी खुषी होई. आणखी पीतर ह्याचा समज असा होता कीं, आपल्या ताब्यांतल्या मनुष्यांची मालमत्ता व जीव हीं आपलीं आहेत; त्यांचें आपण पाहिजे तें करूं; ह्याविषयीं त्याची एक गोष्ट पुस्तकांतरीं लिहिली आहे, ती अशीः— एके दिवशीं बाजारामध्यें, तो, आपल्या कांहीं मुत्सद्दी लोकांसह उभा राहिला होता. इतक्यांत पाऊस पडूं लागला. तेव्हां पीतरानें, त्या मुत्सद्यांपैकीं एकाच्या डोक्यास केसांची मोठी टोपी होती, ती चटकर उचलून घेऊन आपल्या डोक्यास घातली, आणि त्या बिचाऱ्या मुत्सद्यास तसेंच भिजत उभें ठेविलें.!

एक महिना इकडच्या तिकडच्या वस्तु पाहिल्यावर, लंदनांतील गोदीची माहिती करून घ्यावी, असें पीतराच्या मनांत आलें. म्हणून त्यानें राजाच्या परवानगीनें गोदीच्या शेजारींच एक वाडा राहावयास घेतला, आणि त्यांतून त्या कारखान्यांत सहज जातां यावें, अशी एक नवी वाट केली. त्या कारखान्यांत पीतर हमेषा जात असे खरा; तरी त्यानें, हालंदांतल्या प्रमाणें, स्वतः असें एक देखील काम तेथें केलें नाहीं. तो काम कसें चाललें आहे तें पाही, आणि त्या विषयीं माहिती करून घेई. आणखी त्यास, तेम्सनदीमध्यें फिरविण्याकरितां पांचचार उत्तम गलबतें त्याचे तैनातीस दिलीं होतीं; त्यांत बसून पीतर वारंवार त्या नदींत इकडून तिकडे हिंडत असे. इंग्लंदच्या आरमाराचा मुख्य अधिकारी ह्याचा व पीतराचा बराच परिचय पडला होता. त्यापासून त्यानें आरमाराच्या व्यवस्थे-

विषयीं व जाहाजांविषयीं पुष्कळ माहिती करून घेतली. तीं त्याला स्वदेशाच्या आरमाराची सुधारणा करण्याचे कामीं फार उपयोगीं पडली. एके समयीं विलियम राजाच्या आज्ञेवरून इंग्लंदच्या सर्व आरमारांची कवाईत पीतर ह्यास दाखविली. तीं पाहून तो इतका खुष झाला कीं, “ रूस देशच्या झारापेक्षां इंग्लंदच्या आरमारांच्या मुख्य अधिकारी खचीत थोर आहे ” असें सर्वांसमक्ष त्यानें बोलून दाखविलें. ! हें अतिशयित मोकळ्या मनाचें लक्षण होय. आपल्या आणि दुसऱ्याच्या स्थितींमध्यें अंतर काय आहे, हें म्हणजे कोणास कळत नाहीं, असें नव्हे; परंतु, तें स्पष्ट सांगणारा असा मनुष्य विरळा. !

इंग्लंदांत असतांनां पीतर पुष्कळ मद्यपान करीत असे, असें तेव्हांच्या एका वर्तमानपत्रांत लिहिलें आहे. ही त्याजमध्यें फार वाईट खोड होती, व ती त्याला लहानपणासून लागली होती असें म्हणतात. तो दोनतीनदा नाटकासही गेला होता. तेथें क्रास नामक एका नर्तकी स्त्रीनें त्याचें चित्त वेधिलें होतें, व तिची त्याची पुढें गांठही पडली होती, असें सांगतात. मग त्यांत खरं किती आहे, कोणजाणे. मनुष्य कितीही सुज्ञ आणि विचारी असला, तरी विषयापुढें त्याचा उपाय चालत नाहीं.

तो तेथें असतां एका राजकन्येच्या वाढदिवसाचा उत्सव झाला. त्यास, राजाच्या आमंत्रणावरून, पीतर आला होता; परंतु, तो अशा ठिकाणीं बसला होता कीं, तेथून तो कोणालाही दिसूनये, पण मेजवान लोक त्याच्या सर्व दृष्टीस पडावे. इतकी त्याला मंडळीची भीति वाटे. तसेंच, त्याचे मनांत एकदा, हौस अफ कामन्स सभेंतील वादप्रतिवाद ऐकावे असें आलें. त्याकरितां तो, त्या सभामंडपाच्या कडीपाटास जी एक बारीकशी भेग आहे, तिला कान लावून हळूच बसला होता. ह्या सभेंतले वादप्रतिवाद स्त्रियांनीं ऐकूनयेत असा प्रतिबंध आहे; म्हणून, ज्या बायकांना राज्यव्यवस्थेमध्यें लुडबुडेपणा करण्याची

चट असते, त्या ह्या द्वाराशीं चोरून येऊन बसतात, आणि कोण काय काय बोलतात, तें ऐकतात. ह्या जागेंतली हवा अगदीं कोंडलेली असते, तरी, जनसमाजभयास्तव रूसचा बादशाहा तेथें बसला होता. त्याप्रमाणेंच लार्डांच्या सभेंत राजाचें दरबार कसें भरतें तें पाहावें, अशी त्याची फार इच्छा होती. ती पुरविण्यास्तव त्याला जवळच्या एका वाड्याच्या गच्चीवरच्या पनळांत बसविलें होतें. तेथून ती सभा पाहण्याकरितां पीतरानें खिडकींतून तोंड जेव्हां बाहेर काढिलें, तेव्हां तें इतकें विचित्र दिसलें कीं, तेणेंकरून राजा आणि सभासद ह्यांचीं हंसतां हंसतां पोटें दुखूं लागलीं. ! तें पाहून पीतर पटकर मागें सरला.

ह्या नंतर पुनः एकदा पीतरास संकोचास मोठें कारण घडलें, तें असें. एके दिवशीं विलियम राजा त्यास भेटावयाकरितां त्याच्या बिऱ्हाडीं आला होता. त्याचा त्यानें प्रेमपूर्वक स्वीकार केला. सर्व मंडळी बसली. झाराचें एक बाळगलेलें लाडकें माकड होतें, तें त्याच्या खुर्चीच्या पाठीवर बसलें होतें. तेथें इकडच्या तिकडच्या गोष्टी चालल्या असतां, मध्येंच, तें माकड रागावल्या सारखें होऊन, पटकर राजाच्या आंगावर उडी मारून बसलें. तेव्हां तो दचकून भ्याला, आणि तेथें सर्वांचीं तोंडें उतरून गेलीं. तें माकड झारानें लागलेंच उडवून लाविलें खरें. तरी राजा तेथें होता तों पर्यंत त्याची क्षमा मागतां मागतां त्यास पुरेपुरेसें झालें. ! पहा, अपराध कोणाचा आणि क्षमा मागतो कोण. ? झारानें माकड बाळगलें होतें, हा मोठा दोष झाला काय. ? बरें, राजास माकडाचें भय वाटलें ह्यांत राजाचा तरी कांहीं दोष आहे काय.? परंतु, मानवस्थितीची रीती अशी आहे.!

लंदन शहरांतलीं सगळीं भजनालयें पाहावीं, आणि त्यांविषयींची माहिती करून घ्यावी, असें पीतराच्या मनांत होतें. ही त्याची जिज्ञासा पुरविण्याकरितां राजानें बिशपबर्नेत ह्यास

त्याजकडे पाठविलें. त्यानें त्यास धर्मसंबंधीं आणि भजनालयां-संबंधीं जें जें पाहिजे होतें, तें तें सर्व सांगितलें.

ह्याच वेळीं लंदनच्या कितीएक व्यापाऱ्यांनीं, मेंझिकाफ आणि गोलोवियन ह्यांच्या द्वारें पीतरास अशी विनंती केली कीं, ह्या देशांतला तमाखू व्यापाराकरितां रूस देशांत नेऊं लागलें असतां जी मनस्वी जकात पडते, तिची माफी असावी. ही विनंती पंधरा हजार पौंद नजराणा घेऊन, पीतर ह्यानें मान्य केली. त्या प्रसंगीं त्या व्यापाऱ्यांच्या मुख्यानें झार ह्यास इतकेंच सुचविलें कीं, तमाखू खाणें किंवा ओढणें हें महत्पाप आहे, म्हणजे केवळ नरकाचें साधन आहे, असें तुमचे मर्धाध्यक्ष नेहेमीं लोकांच्या कानीं कपाळीं ओरडत असतात, ह्यामुळें आमच्या व्यापारास किंचित कमतरता येईल, इकडे आपलें लक्ष असावें. त्यावर पीतरानें उत्तर दिलें कीं, "कांहीं चिंता नाहीं; धर्मोपदेशक काय काय बडबडतात, तें सर्व पाहून घेईन; मी त्यांस माझ्या इच्छेप्रमाणें उपदेश करावयास न लावीन, तर माझें नांव दुसरें. !" एवढें म्हणूनच तो स्वस्थ राहिला नाहीं. त्यानें त्याप्रमाणें पुढें करून दाखविलें.

पीतर देतफोर्ड येथें ही गेला होता. तेथें गोदी होती, तींत त्यानें कांहीं वेळ स्वतःही काम केलें. ह्याठिकाणीं दाक्तर हाली ह्यास तो भेटला. ह्या महाविद्वान गृहस्थाचें भाषण ऐकून पीतरास अत्यंत संतोष झाला. त्यानें आपल्या प्रवासाचा मुख्य हेतु त्यास कळविला, आणि आपल्या प्रजेची सुधारणा कशी करावी, ह्याविषयींचे अनेक उपाय त्यास विचारून घेतले. ह्या विद्वान पुरुषाबरोबर जाऊन पीतरानें ग्रीनविच मैदानांतील वेधशाळा पाहिली.

आमस्तर्दाम शहरांत असतांना जशा तेथील सर्व दर्शनीय वस्तु पीतरानें पाहिल्या, तशा लंदनांतल्याही पाहिल्या. चमत्कारिक आणि उपयोगी असें त्याच्या दृष्टीस कांहीं पडलें, म्ह-

णजे लागलेंच तो त्याविषयीं सगळें विचारून घेत असे. त्यानें तेथें पुष्कळ चमत्कारिक वस्तु खरीद केल्या. त्यांत एक मोठें घड्याळ घेतलें. त्यांत कोणत्या देशीं कोणत्या वेळीं किती वाजले, हें कळे; कोठें रात्र आहे व कोठें दिवस आहे, हें समजे; शिवाय राशिचक्र दाखविलेलें होतें. घड्याळाची कृति पीतरास फारच चमत्कारिक आणि मनोरंजक वाटली, म्हणून त्यानें ती सर्व समजून घेतली. ती त्याला इतकी चांगली समजली कीं, पाहिजे तें घड्याळ तो अगदीं उखळून पुनः जडवून तयार करीत असे. ज्यांस घड्याळें माहीत आहेत, असे लोक आज लक्षावधि आहेत; त्यांत, आंतली सर्व युक्ति जाणणारे असे शेंकडा पांच असोत, पण दोन सुद्धां निघावयाचे नाहींत. ही गोष्ट, विचार करून पाहिला असतां, सर्वांच्या लक्षांत येण्यासारखी आहे. ह्यावरून, पीतर आणि इतर लोक ह्यांच्या बुद्धीमध्यें काय अंतर होतें तें पहा. !

पीतर बादशाहास कलाकौशल्याचा इतका शौक आहे असें पाहून, त्यास विलियम राजानें सांगितलें कीं, आपणांस जे कारागीर स्वदेशीं न्यावयाचे असतील, ते खुशाल न्यावे; आमची कांहीं हरकत नाहीं. त्याप्रमाणें त्यानें सुमारें दोनशें कसबी लोक, रूसदेशास नेण्याकरितां निवडून काढिले, आणि त्यांस पगार ठरवून दिले. ह्या लोकांमध्यें फरग्यूसन हा एक मोठा गणिती पुरुष होता, व पोरी म्हणून दुसरा एक यंत्रशास्त्री होता. हे लोक, पीतराची आस्था पाहून, त्याबरोबर रूस देशामध्यें आले खरे; परंतु, तेथील लोकांच्या दुष्ट स्वभावामुळें त्यांचें काम जसें व्हावें तसें झालें नाहीं, असें सांगतात. असो.

विलियम राजानें पीतरास स्वदेशीं जाण्याकरितां जाहाजें तयार केलीं. त्यांत बसून पीतर पुनः हालंदांत आला. तेथें तो कांहीं दिवस राहिला. तेथून निघून तो विएना येथें प्राप्त झाला. तेथच्या लिओपाल्द बादशाहानें त्याचा मोठा सत्कार केला; व

त्यास त्याच्या मंडळीसह मोठी एक मेजवानी दिली. परंतु, हा प्रकार पीतरास फारसा आवडला नाहीं. कारण, त्या बादशाहाच्या लष्कराची टापटीप, व्यवस्था, कवाईत इत्यादि गोष्टी कशा आहेत, त्या पाहाव्या, आणि ज्या उत्तम वाटतील त्या आपल्या लष्करांत सुरू कराव्या, एवढ्याच उद्देशानें तो तेथें आला होता.

विएना येथून निघून इताली देशांत जावें, असा पीतराचा विचार होता; आणि त्याकरितां त्यानें बहुतेक तयारी सुद्धां केली होती. इतक्यांत मास्को येथून पात्रिक गार्दन ह्याजकडून त्यास असा निरोप आला कीं, इकडे स्त्रेलैट्झ लोकांनीं बंड करून मोठी गडबड मांडिली आहे, ह्यास्तव आपण तावडतोब निघून यावें. म्हणून पीतरानें लागलीच तिकडची वाट धरिली. गार्दन ह्यानें पीतरास असा निरोप पाठविला खरा, पण त्या बंडाचा बंदोबस्त करण्यास त्यानें त्याची वाट पाहिली नाहीं. हा नवा झार परदेशांत जातो आणि नव्यां गोष्टी चालू करितो, हें अशास्त्र आहे, मूर्खपण आहे, अथवा महत्पाप आहे असें मनांत आणून, त्याच्या शासनार्थ, सोफयाच्या पक्षाच्या लोकांनीं ही धामधूम चालविली होती. परंतु, गार्दन ह्यानें त्यांचें कांहीं एक चालूं दिलें नाहीं. त्यानें त्यांजवर सैन्य पाठवून त्यांचा पराभव केला, त्यांच्यांतले पुष्कळ लोक रणांगणीं मारून टाकिले, आणि बाकीचे धरून प्रतिबंधांत ठेविले. इतक्यांत झार साहेबांची स्वारी येऊन दाखल झाली. ह्या प्रसंगीं गार्दन जर मास्को शहरांत नसता, तर बंडखोरांनीं राज्याची अगदीं धूळधाणी करून टाकिली असती.

पीतरानें, राजधानीस आल्याबरोबर, बंडखोर गुन्हेगारांच्या चौकशीस आरंभ केला. ह्या वेळीं अत्यंत कडक स्वभाव त्यानें धरिला होता. त्यानें ज्या शिक्षा दिल्या व अमलांत आणिल्या, त्यांचें वर्णन अनेक ग्रंथकारांनीं अनेक प्रकारीं केलें आहे. कितीएकांचें म्हणणें असें आहे कीं, त्यानें ह्या प्रकरणांत अ-

निशयित क्रूरपणा केला. त्यावर कोणाचें उत्तर असें आहे कीं, तो क्रूरपणा नव्हे, तर तें दयेचें एक दुसरें स्वरूप होय; म्हणजे, आपल्या प्रजेच्या जीवांची दया मनांत आणून त्यानें त्या अपराध्यांस शिक्षा केल्या. आणि हेंच मत आम्हांसही मान्य आहे.· जीं मनुष्यें सर्पांस मारितात, त्यांस निर्दय म्हणावें काय. ? त्या वेळच्या इतिहासावरून स्पष्ट दिसून येतें कीं, पीतर जर त्या प्रसंगीं इतका सक्त न होता, तर, राज्यांतील गडबड करणारांवर त्याचा दाब कधींही नबसता. झार ह्यानें किती एक अपराध्यांच्या झिंजा एका मुत्सद्याकडून धरवून, आपण स्वतः तरवार घेऊन त्यांचीं डोकीं उडविलीं, असें एका ग्रंथकारानें लिहिलें आहे. तसेंच दोनशें असामी तर, लांकडाच्या गंजीवर जीवंत उभे करून जाळिले, असें सांगतात. ! ह्या कामास मदत करण्याविषयीं पीतरानें लीफोर्ट ह्याला सुद्धां एक दोनदां म्हटलें. परंतु, हें आमच्या देशरीतिविरुद्ध आहे, असें सांगून त्यानें तें टाळिलें. तेव्हां त्यास पीतर म्हणाला, “अहो अपराध्यांच्या रक्तापेक्षां दुसरा कोणताच बळी ईश्वरास अधिक प्रिय नाहीं.”

दुसऱ्या एका गृहस्थानें ह्याविषयीं असें लिहून ठेविलें आहे कीं, झार ह्यानें एकदा मोठ्या मेजवानीचा थाट करून, त्यामध्यें सर्व लोकांसमक्ष, एका हातीं दारू पिण्याची कांचेची पंचपात्री आणि दुसऱ्या हातीं कुऱ्हाड घेऊन, एक पंचपात्रीभर दारू प्यावी आणि एकाचें डोकें त्या कुऱ्हाडीनें तोडावें, असे वीस असामी ठार मारिले. ! आणि त्या प्रेतांचीं धडें आणि शिरें, लोकांस चांगली दहशत बसण्याकरितां, शहरांतल्या मोठमोठ्या रस्त्यांच्या बाजूंस कितीएक दिवसपर्यंत ठेविलीं होतीं. तसेंच, मठाच्या·खोलींत सोफया राहात असे, त्या खोलीच्या खिडक्यांसमोर, अशा अपराध्यांची एक माळचीमाळ फांशीं दिली होती. अशा प्रकारेंकरून पीतरानें त्या बंडखोर लोकांचा निकाल केला.

ह्या बंडखोरांस पीतरानें सक्त शिक्षा दिल्या, ही गोष्ट खरी

आहे; तथापि, त्यानें, वर सांगितला इतका क्रूरपणा केला नसा-
वा, असें पुष्कळ सुज्ञ ग्रंथकारांचें मत आहे. अपराध्यांस
शिक्षा करण्याचे मुख्य हेतु दोन असतात; पापकर्माचें प्रतिफल
ज्याचें त्यास मिळावें हा एक; आणि, तें पाहून त्या कर्मापासून
इतर लोकांनीं दूर राहण्याविषयीं जपावें, हा दुसरा. हे दोन
हेतु मनांत धरूनच, झार ह्यानें ह्या प्रकरणीं असें आचरण केलें
असावें असें वाटतें.

हें बंडाचें काम आटपून जिकडे तिकडे शांतता झाल्यावर,
पीतर आपल्या लोकांच्या सुधारणेविषयीं विचार करूं लागला.
त्याचें लक्ष पहिल्यानें त्याच्या शिपायांच्या स्वरूपाकडे गेलें.
त्याच्या लष्करांतल्या शिपायांचीं डगलीं खोंटांपर्यंत लोंबत असत;
त्यांवर कुंवरेभोंवता एक पट्टा असे; विजारी फार पोकळ अ-
सत; डोक्याला एक उंचशी टोपी असे; आणि दाढ्यामिशा
अशा मोठ्या ठेवीत कीं, त्यांच्या योगानें ते लोक मंद, घामट,
आणि वेडगळ असे दिसत. आणि पीतरानें युरोपांतल्या इतर
देशांतल्या पलटणी नुकत्याच पाहिल्या होत्या; त्यांच्या तुलनेनें,
हे स्वतःचे शिपाई त्यास इतके वाईट वाटले कीं, अगोदर ह्यांची
सुधारणा केल्याशिवाय दुसरे कामास हात घालणें व्यर्थ आहे,
असा त्याच्या मनाचा निश्चय झाला. आणि ह्या कामीं आप-
णास जुन्या समजुतीच्या लोकांचा फार त्रास सोसावा लागेल,
हें तो जाणून होता. परंतु, 'निश्चयाचें बळ, तेंच उद्योगाचें फ-
ळ,' ह्यावर त्याची पूर्ण निष्ठा होती. त्यानें आपल्या इष्ट कार्या-
स एकदम आरंभ केला, तो असा.- त्यानें आपल्या लष्करी
लोकांसच केवळ नव्हे, तर साधारण सर्व लोकांस सुद्धां असा
हुकूम फरमाविला कीं, अमुक मुदतीचे आंत तुम्हीं आपल्या
डगल्यांचे झोल कापून काढावे, व दाढ्या काढून टाकाव्या, आ-
णि ह्यांत जर तुम्हांकडून अंतर होईल, तर तुम्हांला शंभर शंभर
रूबल दंड द्यावा लागेल. ह्या कायद्यानें त्याच्या राज्याच्या

उत्पन्नास बरीच भर पडली. कारण, ज्या खुणांच्या योगानें आपण परक्या लोकांपासून ओळखले जातों, असें ते लोक समजत असत, त्या खुणा टाकण्यास त्यांस प्रथम फारच अवघड गेलें. परंतु, 'राय करी तर काय न होई. ?' पीतराच्या इच्छेप्रमाणें लोकांचे पोषाक झाले. ह्या कामामध्यें दंड जमा करणारे सरकारी कामदार, दंड भरणाऱ्यांस, पावती ऐवजीं, एक तांब्याच्या पत्र्याचा तुकडा देत असत; त्याच्या एका बाजूस, नाक, तोंड, मिशा, आणि भली मोठी झुबकेदार दाढी, अशीं ठशानें वठविलेलीं असत; आणि दुसरे बाजूस दंड दिल्याचें वर्ष छापलेलें असे. !

पीतरानें आपल्या लोकांची जी सुधारणा केली, तिची हकीकत त्यानें स्वतः देखील लिहून ठेविली आहे. ती अशी.—'मी छापखाने चालू केले; इमारती बांधणें, तोफखाना, यंत्रें आणि दुसऱ्या उपयुक्त कला ह्या विषयांच्या पुस्तकांचीं भाषांतरें करवून छापिलीं; त्याप्रमाणेंच इतिहासाचे ग्रंथ तयार करविले; नाविक विद्या व दुसऱ्या विद्या शिकविण्याच्या शाळा घातल्या; लातिन, जर्मन आणि अशा दुसऱ्या भाषा शिकविण्याच्या शाळा स्थापिल्या; पूर्वीं, परदेशाशीं व्यापार करील त्यास देहान्त शासन करीत असत तो कायदा रद्द करून, आपल्या लोकांस परदेशाशीं व्यापार करण्याची परवानगी दिली, इतकेंच केवळ नव्हे, तर त्यांस तो व्यापार करण्यास उत्तेजन दिलें; आणि तह, जाहीरनामे, इत्यादिकांवर स्वतः सह्या करण्याचा पाठ चालू केला.' ह्या गोष्टी कांहीं थोड्या नाहींत; फार आहेत. ह्यांच्या योगानें त्याच्या देशच्या लोकांचें किती हित झालें असेल, हें सांगावयास नको.

परमेश्वरानें ही सृष्टि सप्तंबर महिन्यांत निर्माण केली, असा खीस्तीधर्मी लोकांचा समज आहे; त्यावरून, रूस देशामध्यें नवीन वर्षाचा आरंभ त्या महिन्यापासून करीत असत. ही

रीत, ज्योतिष शास्त्राच्या मानानें, व युरोपांतील इतर देशांच्या रीतीच्या तुलनेनें, अगदीं बरोबर नाहीं, असें पीतराच्या मनांत आल्यावरून, त्यानें असा हुकूम केला कीं, चालू वर्षापासून म्हणजे इ० स० १७०० पासून वर्षाचा आरंभ, इतर युरोपियन राष्ट्रांप्रमाणें जानेवारीच्या पहिले तारखेपासून धरावा. ही गोष्ट लोकांस आवडली नाहीं; म्हणून कांहीं दिवस पर्यंत त्यांनीं पहिल्या रीतीप्रमाणेंच आपला व्यवहार चालविला होता. परंतु, सरकारी काम नवीन रीतीप्रमाणें धडका चाललें तेव्हां, जुन्या रीतीची त्यांची त्यांसच अडचण वाटून त्यांनीं नवी रीती घेतली.

पीतराच्या वेळेपर्यंत रूसच्या लोकांची चाल अशी होती कीं, जेवणाखाणांत अथवा बसण्याउठण्यांत, स्त्रिया पुरुषांत मिसळत नसत; म्हणजे, सर्व कृत्यांमध्यें पुरुष वेगळे आणि स्त्रिया वेगळ्या, असें असे. ही रीति स्त्रीपुरुषांच्या भावणादि सुखास चांगली सोईची नव्हे, असें पाहून ती त्यानें मोडून टाकिली. आणि हरएक प्रसंगीं स्त्रीपुरुषांनीं एकत्र व्हावें, आणि बोलून चालून सुखांत काळ घालवावा, असा त्यानें पाठ घातला. ह्याप्रमाणेंच, बडे लोकांस लग्न करणें झाल्यास, शहरच्या सुंदर सुंदर तरुण मुली एके ठिकाणीं जमवाव्या, आणि त्यांमध्यें जी आवडेल ती करावी, अशी एक प्राचीन चाल होती, ती रद्द करून, सांप्रत काळीं युरोपियन लोकांत चाल आहे तीप्रमाणें प्रीतिविवाहाचा प्रघात चालू केला. ह्या दोन गोष्टींच्या योगानें त्या देशांतील स्त्रियांचें दास्य आणि पराधीनपण हीं समूळ नाहींतशीं झालीं, असें म्हटलें पाहिजे. अशा गोष्टींवरून आपल्या लोकांविषयींची पीतराची खरी आस्था दिसून येते.

लष्कराच्या सुधारणेचें काम जें पीतरानें बरेच दिवसांपूर्वीं हातीं घेतलें होतें, तें तसेंच पुढें चालविलें होतें. नवीन पद्धतीच्या पलटणींत त्यानें स्वतः आपलें नांव घालून एक लहानसा हुद्दा पतकरिला होता, त्यावरून हळू हळू, बडे लोकांचे मुलगे

ही आपोआप त्या पलटणींत आपलीं नांवें घालूं लागले. "क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे" हें मनांत धरून पीतर सर्व कामांस स्वतः लागत असे. म्हणूनच त्यांत त्याला यश येत असे. तसेंच, दान नदीवर आरमार तयार करण्याची तजवीज चालली होती, तिकडे ही त्याचें लक्ष होतें. इंग्लंदांतून आणिलेले व हालंदांतून पाठविलेले सर्व कारागीर लोक त्यांत गुंतले होते. दान आणि वाल्गा ह्या दोन नद्या एकमेकींस मिळविण्याचें काम पूर्वी ब्रकिल नामक जर्मन गृहस्थावर पीतरानें सोंपिलें होतें; तें त्याला करतां आलें नाहीं. म्हणून, त्या कामावर, इंग्लंदांतून आणिलेल्या कामदारांपैकीं पेरीनामक गृहस्थाची योजना केली. तरी, त्याचें लक्ष आरमाराच्या तयारीकडे असलें पाहिजे, अशी त्यास सक्त ताकीद होती.

इकडे इतकी व्यवस्था लाविल्यावर, व्होरोनिट्झ येथें गलबतांचें काम चाललें होतें, तें पाहण्याकरितां पीतर तिकडे गेला. तो तेथें फारवेळ राहिला नाहीं तोंच त्याला एक अति दुःखकारक वर्तमान कळलें; तें हेंचकीं लीफोर्त ह्यास देवाज्ञा झाली. ! हें कानीं पडतांच पीतरास फार वाईट वाटलें. तो त्याचा जिवलग मित्र होता, हें तर खरेंच; पण आणखी असें होतें कीं, आपण ज्या नवीन सुधारणेच्या गोष्टी आरंभिल्या आहेत, त्या लीफोर्त ह्याच्या मसलतीनें खचीत शेवटास जातील, असा पीतरास मोठा भरंवसा होता; ती त्याची सर्व आशा फुकट गेली. ! इहलोकची वस्ती अशीच आहे. ह्या मृत्युलोकच्या मनुष्यांच्या सर्व आशा जर सफल होऊं लागल्या, तर ह्यामध्यें आणि स्वर्गलोकामध्यें अंतर तें काय राहिलें. ? आणखी दुसरें असें आहे कीं, सर्वांच्या आशा म्हणजे नेहमीं चांगल्या असतात असें नाहीं; दुष्ट मनुष्यांच्या आशा फार वाईट असतात; त्या सफल झाल्या तर जगांत दुःखांचे पर्वत कोसळावयाचे. ! ह्यास्तव, परमेश्वरानें मनुष्यास जी स्थिति लावून दिली आहे, तीच त्यास

योग्य आहे. असो. लीफोर्त ह्याच्या मरणानें केवळ पीतरासच वाईट वाटलें असें नव्हे, तर रूसदेशच्या सर्व लोकांसही फार दुःख झालें. कारण, पीतराच्या हातून एकदा अन्याय होऊन गेला असतां, तो मध्यें पडून न्याय करवीत असे, आणि तेणें-करून पुष्कळ लोकांचे जीव बचावले होते. परदेशचा मनुष्य म्हणजे रूस देशच्या लोकांस रेतीच्या कणासारखा डोळ्यांत खुपावयाचा; असें असतां लीफोर्त हा, परका गृहस्थ, त्यास स्वदेशबंधूपेक्षांही अधिक वाटत होता, ह्यावरून तो किती चां-गला आणि किती थोर पुरुष असावा, ह्याचा विचार सुज्ञ वा-चकांनीं करावा. पीतर ह्यानें मास्को शहरास परत येऊन, ली-फोर्त ह्याचा प्रेतसंस्कार मोठ्या समारंभानें केला. ह्याच्या स्मरणार्थ ह्यानें एक मोठें थडगें बांधून, त्याजवर लातिन आणि दच ह्या भाषांमध्यें त्याच्या स्तुतीचीं वाक्यें खोदविलीं. को-णी पीतराचें चरित्र लिहूं लागलें असतां त्यांत लीफोर्त ह्याचें नांव आल्या खेरीज राहावयाचें नाहीं.

लीफोर्त ह्याचा प्रेतविधी आटोपल्यावर, पीतर पुनः व्होरो-निट्झ येथें आपल्या कारखान्यावर गेला. तेथें इंग्लिश, दच, जर्मन, इतालियन असे अनेक देशचे कारागीर जमा झालेले होते; त्यांत तो मिसळून, त्यांच्या सारखा पोषाक वगैरे करून, त्यांचेइतकें किंबहुना त्यांच्याहून अधिक सुद्धां काम करी. तो डच लोकांशीं फार बोले, कारण, त्याला त्यांची भाषा चां-गली येत असे. एकाद्या मजूरास त्याचें काम करतां न आलें, कोणी थकला, अपघातानें कोणाला कांहीं इजा झाली, तर त्याचें साह्य करण्याविषयीं तो नेहमीं तत्पर असे.

तो कांहीं वेळानंतर परत मास्को शहरीं आला. तेथें, त्यानें नुकताच शिक्षांचा कडकपणा दाखविला होता, तेणेंकरून लोक त्याला भीत असत. परंतु, ही गोष्ट त्याच्या ध्यानीं मनीं सुद्धां नव्हती. तो आपल्या लहानमोठ्या लोकांशीं खुशाल

Protuberance



बोले, हंसे, खेळे, आणि मी तुमच्यांतलाच एक जण आहें, असें दाखवी. तो गरीब लोकांच्या घरीं जाऊन त्यांचा समाचार घेई, आणि कोणी अडला गांजला आढळल्यास त्याला द्रव्यद्वारा साह्य करी. अशी त्याची परोपकारी वृत्ति असे. त्यानें बंडखोरांस ज्या शिक्षा केल्या, त्यांवरून तो मोठा क्रूर असावा, असें एकाद्यास वाटेल; परंतु, तो क्रूर नव्हता; फार दयाळू होता. त्याविषयीं एक ग्रंथकार असें लिहितो कीं, तो स्वभावतः क्रूर नव्हता, तर, प्रसंगवशात्, राज्याच्या हितास्तव त्यास क्रूरपणा धरावा लागे. होय. हीच गोष्ट खरी दिसते. आणि ही पीतरास अत्यंत भूषणप्रद होय. कारण, इजवरून इतकें स्पष्ट सिद्ध होतें कीं, तो रागाच्या स्वाधीन नव्हता, तर राग त्याचे स्वाधीन होता. हें तर उत्तम साधूच्या लक्षणांपैकीं एक लक्षण आहे. !

लीब्रायन ह्यानें पीतर ह्यास मेंझिकाफ ह्याचे वाड्यांत कांहीं दारूचा चमत्कार करून दाखवितांना पाहिलें. तो आटपल्यावर, झार ह्यानें त्यास म्हटलें, "अहो, तुम्हीं पुष्कळ फिरलां अहां. तुम्हीं तर पुष्कळ चमत्कार पाहिले असतील. परंतु, आतां आम्ही तुम्हांला एक मौज दाखवितों, बरेंका." असें बोलून त्यानें गरीब आणि अशक्त असा एक रूस देशचा मनुष्य आणून उभा केला. त्याच्या आंगांतले कपडे काढविले. तेव्हां त्याच्या बेंबीच्या जरा वरच्या आंगास एक आवाळूं दृष्टीस पडलें; तें वाहात होतें; त्यांतून, जें कांहीं तो खाईपिई तें अर्धवट पचलेलें असें होऊन बाहेर येई. हें पाहून लीब्रायन ह्यास फार चाईट वाटलें. त्या मनुष्याविषयीं पीतराचें अंतःकरणही फार कळवळे, व तो त्याच्या बरेपणाकरितां पुष्कळ खटपट करी. परंतु तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं. ती इजा त्या दुर्दैवी मनुष्यास तशी नऊ वर्षें भोगावी लागून, तो त्याच व्यथेनें मरण पावला. ! ईश्वराच्या अवकृपेपुढें मनुष्याचें काय चालणार. ? असो.

# भाग तिसरा.

परदेशाशीं व्यापार उत्तम रीतीनें चालल्याखेरीज आपले लोक सुधारणार नाहींत, व संपत्तिमान होणार नाहींत, अशी पीतराची पक्की समजूत झाली होती; आणि व्यापाराची भरभराट होण्यास, आपल्या देशांत पुष्कळ चांगलीं बंदरें असलीं पाहिजेत, व समुद्रावर आपला अमल चालला पाहिजे, हें तो पूर्णपणें जाणत होता. आणि ह्याच हेतूनें त्यानें आरमारांची व गलबतांची एवढी सक्त तयारी चालविली होती. त्यानें अझोफ काबीज केल्याची हकीकत मागच्या भागांत लिहिलीच आहे. अझोफ घेण्याचा त्याचा मुख्य हेतु हा होता कीं, तेथें आपला अधिकार चांगल्या रीतीनें चालूं लागला म्हणजे काळा समुद्र सहज आपल्या ताब्यांत येईल. त्याच्या मनांत असें येऊन चुकलें होतें कीं, बालतिक समुद्राच्या पलीकडचा किनारा, म्हणजे फिनलांदचें अखात* येथें आपला व्यापार मोकळेपणें सुरळीत चालूं लागला म्हणजे, समुद्राच्या इतर प्रदेशीं प्रवेश करण्यास अगदीं जड पडणार नाहीं. परंतु, फिनलांदचें अखात स्वीदनच्या राजाच्या सत्तेखालीं होतें; शिवाय, निवा नदीच्या दोहींकडचा प्रदेश, तहत लादोगा सरोवरापर्यंत त्याजकडेसच होता. तेव्हां पीतरास चोहोंकडून कोंडल्यासारखें वाटून मोठा विचार पडला. आणि त्याला असें पक्कें माहीत होतें कीं, स्वीदनच्या राजाशीं टक्कर देण्याचें आपलें एकट्याचें सामर्थ्य नाहीं. तर, ह्या कामास इतर कोणा राजांचें साह्य घेतलें पाहिजे. आणि तेंही साह्य लेंचें पेंचें उपयोगीं नाहीं. असा विचार करीत होता, तोंच त्याला असें कळलें कीं, पोलांद व देन्मार्क येथील राजेही स्वीदनच्या राजावर चाल करण्याच्या बेतांत आहेत. तेव्हां त्यानें त्यांस लागलेंच अनुकूल करून घेतलें. ते तिघे

---

* युरोपाचा नकाशा पहा म्हणजे हें स्पष्ट कळेल.

एक झाले. मोहिमेची तयारी कडीकोट चालली. हें वर्तमान स्वीदनचा राजा बारावा चार्लस ह्यास समजतांच तोही युद्धाची तयारी करूं लागला. तो ह्यावेळीं, म्हणजे इ० स० १७०० ह्या वर्षी, सगळा अठरा वर्षांचा होता.

मनुष्याचें धैर्य अथवा शौर्य हें त्याच्या वयावर नसतें. हा प्रसंग चार्लस राजास जरी प्रथम फार भयंकर वाटला, तरी थोडा वेळ विचार केल्यावर त्याला युद्ध करण्याची मोठी उमेद आली. त्यानें आपली प्रधानमंडळी जमवून तींत असें स्पष्ट सांगितलें कीं, "अन्यायाचें युद्ध मी कधीं करणार नाहीं, आणि न्याय्य युद्धास एकदा आरंभ केल्यावर शत्रु धुळीस मिळविल्या वांचून तें मी कधीं सोडणार नाहीं. जो कोणी आधीं माझ्या वाटेस जाईल, त्याजवर मी प्रथम हल्ला करून त्याची खोड मोडीन, म्हणजे बाकीच्यांचे हातपाय सहजच मोडतील." असें भाषण करून चार्लसानें आपले सर्व ऐषआराम एके बाजूस ठेवून, आपल्या आरमारासहवर्तमान प्रथमतः देन्मार्कच्या आरमारावर हल्ला करण्याचा घाट घातला; परंतु, तो कांहीं बनून आला नाहीं. त्याचे मनांत कोपेनहेगेन ह्या राजधानीस वेढा घालून देन्मार्कच्या राजाची व लोकांची पुरती दुर्दशा करावयाची होती. परंतु, त्या राजानें चार्लसास ४०००० रिक्सदालर देऊन तहाचें बोलणें लाविलें. तें त्यानें मान्य केलें. ह्या तहाच्या योगानें, हालस्तीन प्रांत ज्याचा त्यास मिळाला. हाच प्रांत मिळविण्याकरितां मुळीं त्या राजानें एवढी खटपट मांडिली होती; पण ती अशी फुकट गेली.

तिकडे पोलांदच्या राजाच्या सैन्यानें रिगा ह्या शहरास वेढा घातला; तें शहर तेव्हां लिव्होनिया प्रांताची राजधानी होती. त्या सैन्याच्या साह्यास झारही आपली सेना बरोबर घेऊन यावयास्तव निघाला. तें शहर घेण्याकरितां पोलांदच्या सैन्याचा

सरदार फ्लेमिंग ह्यानें पुष्कळ प्रयत्न केले. परंतु आंतला सरदार दीआलबर्ग ह्यानें त्याचें कांहीं चालूं दिलें नाहीं. शेवटीं, निराश होऊन, रिगामध्यें, जो इतका व्यापाराचा माल आहे तो डच लोकांचा आहे आणि ते आमचे दोस्त आहेत, ह्यास्तव आम्ही त्यांस इजा देऊं इच्छीत नाहीं, अशी कांहीं तरी सबब लावून, पोलांदच्या राजानें तो वेढा उठविला. ह्याप्रमाणें त्या त्रिकूटापैकीं दोन राजांस चार्लसाच्या सैन्यानें हतवीर्य करून टाकिलें. नंतर, बाकी राहिला एक, म्हणजे पीतर, त्याचा समाचार घेण्याकरितां चार्लसानें कंबर बांधिली.

पीतरानें आठ सहस्र सैन्य बरोबर घेऊन इंग्रिया प्रांत लुटून उद्वस्त करून टाकिला. आणि असें करण्याच्या कारणांबद्दल जो जाहीरनामा तेथें त्यानें प्रसिद्ध केला, त्यांत असें लिहिलें कीं, "रिगा येथें आमचा स्वतःचा एकदा मोठा अपमान झाला, व तेथें आमच्या दरबारच्या वकीलांस सामान सुमान अतिशयित महाग घेणें भाग पडलें, म्हणून आम्हांस अशा प्रकारास प्रवर्तावें लागलें." पीतर हा थोर मनुष्य होता, असा जरी आमचा अभिप्राय आहे, तरी हीं हल्ल्याचीं कारणें अगदीं पोरकट आहेत, असें म्हटल्यावांचून आमच्यानें राहावत नाहीं.

असा इकडेतिकडे दंगा केल्यावर, पीतर ह्याच्या सैन्यानें, नारोवा नदीच्या कांठीं नार्व्हानामक बरेंच बळकट एक शहर आहे, त्यास वेढा घातला. तो सुमारें दोन महिने होता. आंतले स्वीदनच्या राजाचे लोक बाहेरच्या रूसदेशच्या लोकांचें कांहीं एक चालूं देईनात. शेवटीं, इ० स० १७०० च्या नोवेंबर महिन्याच्या १९ व्या तारखेस आंतल्या लोकांवर बाहेरच्या लोकांनीं असा जबर हल्ला केला कीं, त्यांनीं लागलींच आपलीं शस्त्रें खालीं ठेवून, लढाई तूर्त बंद ठेवण्याविषयीं विजयी लोकांस विनंती केली. तेव्हां अमळसें युद्ध थांबलें. परंतु, पुढें जो सपाटा उडाला, त्याच्या पुढें पीतराच्या लोकांच्यानें टिकाव धर-

...ग्रंथ संग्रहालय...

वेना. ते पळूं लागले, आणि शत्रूंनीं त्यांची पाठ घेतली. ही लढाई फार मोठी झाली. ती इतिहासांत फार प्रसिद्ध आहे. ह्या प्रसंगीं पीतराच्या पक्षाकडील एकंदर ऐशीं हजार सैन्य होतें, त्याचा पराभव साडेआठ हजार स्वीद ( स्वीदनच्या ) लोकांनीं केला. ! जसें शौर्य हें वयावर नाहीं, तसा सैन्याचा पराक्रम त्याच्या संख्येवर नाहीं, तर करामतीवर व शाहाणपणावर आहे. पीतराची एवढी मोठी फौज होती खरी; तरी, तिजपैकीं बारा-हजार लोक खेरीज करून, बाकीच्यांस कवाईत येत नव्हती, इतकेंच केवळ नव्हे, तर ते अगदीं रानटी होते. म्हणजे असें कीं, त्यांतले कितीएक कातडीं पांघरीत, आणि बंदूक कशाला म्हणतात हें त्यांस माहीत सुद्धां नव्हतें. ह्या लढाईची हकीकत पीतरानें स्वतः लिहून ठेविली आहे. तींत असें सांगितलें आहे कीं, ह्या युद्धांत रूस देशच्या सैन्यांतले सुमारें साहाहजार लोक पडले, आणि स्वीदनाकडचे सुमारें तीन हजार पतन पावले. हा अनर्थ घडला तेव्हां पीतर तेथें नव्हता; कारण, पोलांदच्या सैन्याची तिकडील अवस्था ऐकून, तो त्याचे आदले दिवशीं तेथून निघून, पोलांदच्या राजास भेटण्याकरितां व पुढें कशी काय तजवीज करावयाची हें ठरविण्याकरितां त्याजकडे गेला होता. तों मागें हें असें झालें.

ह्या अपजयाविषयीं इतरांचे अभिप्राय कसकसे झाले होते, हें समजण्यांत कांहीं विशेष फायदा नाहीं. परंतु, त्याच्या योगानें पीतराच्या मनांत कोणकोणते विचार आले होते, हें समजण्याविषयीं वाचकांस सहज इच्छा होईल. ती पुरविण्याकरितां आम्ही पीतराच्या स्वतः हातच्या लेखाचेंच तात्पर्य येथें दाखल करितों. तें असें. “आमच्या अशिक्षित सैन्याचा पराभव स्वीद सैन्यानें केला, ही गोष्ट खरी आहे. ह्या आमच्या सैन्यामध्यें, लीफोर्त ह्यानें तयार केलेली एक पलटण होती, व दुसरे कांहीं शिपायी होते; त्यांनीं अझोफच्या दोन लढायामात्र

मारिल्या होत्या; त्यांस दुसरा कांहीं अनुभव नव्हता; त्यांनीं कवाईत शिकलेल्या अशा सैन्याशीं कधींच टकर दिली नव्हती. अशा अशिक्षित आणि अनुभवशून्य लोकांचा पराभव सुशिक्षित आणि चांगल्या अनुभव घेतलेल्या जुन्या लोकांनीं केला, ह्यांत मोठें नवल नाहीं. शत्रूस जो हा एवढा जय प्राप्त झाला, त्याच्या योगानें आम्हांस फार वाईट वाटलें, व पुढें यश प्राप्त होण्याविषयींची निराशा झाली, हेंही खरें आहे. आमच्या मनांत असें आलें कीं, आम्हांवर परमेश्वराची अवकृपा झाली आहे. तथापि, ह्या अवकृपेचा जों जों विचार करावा, तों तों तींत आमचें हित आहे, असें आम्हांस दिसे. तें कसें तें पहा.– आमच्या अशा अशिक्षित लोकांनीं चांगल्या सुशिक्षित शूर लोकांचा जर ह्या समयीं पराभव केला असता, तर आमच्या लोकांस खचीत गर्व झाला असता, आमचे हातून अधिक सुधारणा करण्याचा उद्योग झाला नसता, आणि अज्ञान व अभिमान वाढून आमची गति काय झाली असती, हें सांगवत सुद्धां नाहीं.!! ह्या जयाच्या योगानें स्वीद लोकांस जो गर्व चढला, त्याचीं फळें त्यांस पलूतव्हा* येथील लढाईत भोगावीं लागलीं. हा पराभवाचा धक्का आम्हांस बसला हा आम्हांला मोठा गुणाकारी झाला. कारण, तेव्हांपासून आम्ही दुप्पट सावध झालों, आणि अनुभवाची वाण विशेष काळजीनें बुजवूं लागलों." हा पीतराच्या लेखाचा सारांश आहे. ह्यावरून त्या पराजयाविषयीं त्याचे विचार कसे होते, हें सहज लक्षांत येईल.

नार्व्हा येथें सैन्याचा पराभव झाल्यावर, तिकडे सरहद्दीवर कांहीं फौज बंदोबस्तास ठेवून पीतर मास्को शहरास परत आला, आणि पुढच्या मोहिमीकरितां सैन्याची आणखी तयारी

---

* ही लढाई पुढें इ० स० १७०७ त चार्लस आणि पीतर ह्यांच्यामध्यें झाली. तींत स्वीद लोक केवळ पराभव पावले. त्यानंतरचा हा पीतराचा लेख आहे.

करूं लागला. त्या शहरामध्यें भजनालयांतून व मठांतून मोठ-मोठ्या पुष्कळ घांटा होत्या, त्यांतल्या कितीएक गाळून त्यानें त्यांच्या तोफा व बंदुका ओतविल्या. येणेंकरून तेथील धर्मोपदेशकांस फार वाईट वाटलें, आणि ते असें म्हणूं लागले कीं, पीतराच्या बुद्धीस असा विपर्यास झाला आहे, आणि तो अशीं अशास्त्र कर्मे करितो, म्हणूनच त्यास अपेश येतें. तरी पीतर भ्याला नाहीं, व आपला क्रम त्यानें सोडिला नाहीं.

पुढें कांहीं वेळानें पीतर पीपस सरोवराकडे गेला; आणि तेथें इ० स० १७०१ ह्या वर्षाचे अखेरीचे आंत आरमाराचीं पन्नास गलबतें सर्व सामानासुद्धां सिद्ध व्हावीं, अशी तजवीज त्यानें चालविली होती, तें काम कोठपर्यंत आलें आहे, हें त्यानें स्वतः पाहिलें. ह्यांतील प्रत्येक गलबतावर पन्नास पन्नास लोक ठेविले होते. त्याप्रमाणेंच त्यानें, लादोगा सरोवरांतील गलबतांवर ठेवण्याकरितां दाननदींतल्या जाहाजांतील लोक आणविले. ही लढाईची खटपट चालली होती तरी, मास्को शहरांत लोकसुधारणेचें काम कसें चाललें आहे, हें पीतर वारंवार जाऊन पाहात असे. ह्याविषयीं व्हालतेर हा नामांकित ग्रंथकार असें लिहितो कीं, “ राज्यांत कोठें कांहीं गडबड नसली म्हणजे जे राजे लोकहिताच्या कामाकडे लक्ष देतात, त्यांची प्रशंसा पुस्तकांतरीं केलेली असते, ती ठीकच आहे. परंतु, नार्व्हा येथें नुकताच पराभव झालेला असतां, आणि पुढच्या लढाईची तयारी करीत असतां, काळा समुद्र, कास्पियन समुद्र, आणि बालटिक समुद्र हे एक मेकांशीं जोडण्याविषयीं पीतराचा प्रयत्न चालला होता, ही गोष्ट त्यास अत्यंत भूषणप्रद होय. हिच्या योगानें तो जितका स्तुतिपात्र झाला आहे, तितका मोठा जय मिळवून देखील झाला नसता.”

नार्व्हा येथील युद्ध झाल्यावर, वास्तविक म्हटलें म्हणजे, चार्लसानें पीतराची पाठ घ्यावी; परंतु, त्यास तशी बुद्धि झाली

नाहीं. त्यानें पीतराचा पाठलाग अगदीं सोडून देऊन, पोलंदच्या राजाकडे सगळें लक्ष दिलें. तेणेंकरून झार ह्यास आपली फौज तयार करण्यास व आपल्या लोकांत सुधारणेचा प्रसार करण्यास पुष्कळ सवड सांपडली. ह्या संधीस त्यानें, साक्सनी येथील मेंढरें व मेंढके आपल्या देशीं आणविले; ह्याचा हेतु एवढाच कीं, कारखान्याकरितां लोंकर जी बाहेरच्या देशांतून आणावी लागत असे, ती देशांतल्या देशांत उत्पन्न व्हावी. त्यानें तागाच्या कापडाचे व कागद करण्याचे कारखाने चालू केले. दवाखाने बांधिले. परदेशचे चांगले कसबी पितळकाम करणारे, लोहार, सुतार वगैरे लोक बोलावून आणिले. म्हणजे, जीं कामें इतर राजे अगदीं स्वस्थतेच्या वेळीं करितात, तीं ह्यानें अगदीं लढाईच्या गडबडींत केलीं. तेव्हां ह्याची शाबास नव्हे काय. ? स्वीदनचा बारावा चार्लस म्हणजे पीतराचा शत्रु ह्याचें ह्याच्या उलट होतें. तें असें. त्याला सुधारणेची रुचि मुळींच नव्हती; व तो आपल्या प्रजेविषयीं तिळभर देखील काळजी वाहात नसे. आणखी तो कांहींसा नादी असे. त्यानें इ० स० १७०२ ह्यावर्षींतर पीतराचें नांव सुद्धां काढिलें नाहीं, आणि असा निश्चय केला कीं, त्याचा साह्यकारी पोलंदचा राजा जो आगस्तस ह्यास गादीवरून हांकून लाविल्याखेरीज राहावयाचें नाहीं. अशा त्याच्या वृत्तीमुळें झार ह्याचा पुष्कळ फायदा झाला. ह्या जगामध्यें एकाच्या आज्ञानामुळें दुसऱ्याचा लाग साधतो, असें जें म्हणतात, त्याचें हें एक उदाहरण आहे.

ह्या मुदतींत पीतराची सर्व सेना म्हणजे अगदीं स्वस्थ बसली होती, असें कोणीं समजूं नये. त्यांचा कवाईत आणि टापटीप ह्यांचा अभ्यास चाललेला असून, इंग्रिया व लिव्होनिया ह्या प्रदेशांतील स्वीद सैन्याशीं प्रसंगोपात्त लहानमोठ्या लढाया करून, आपण किती सुधारलों ह्याविषयीं ते आपली [ खातरजमा करून घेत होते. पीतर स्वतः तर एकसारखा चोहींकडे फि-

रत होता. ह्या आठवड्यांत प्लेस्को येथें पाहावा तों तो आहे-च, पुढच्या आठवड्यांत मास्को येथें हजर, तिसऱ्यांत आर्कैंजल येथें तो आपल्या कामाची देखरेख करीतच आहे, असें नेहमीं दृष्टीस पडे. आर्कैंजल ह्या ठिकाणावर हल्ला करून तें घ्यावें, असा स्वीदनच्या राजाच्या विचार त्यास कळला होता. ह्या-स्तव त्याच्या संरक्षणार्थ तेथें एक किल्ला बांधण्याचा निश्चय क-रून, त्याच्या पायाचा पहिला दगड त्यानें स्वतः आपल्या हातानें घातला, आणि त्या किल्ल्यास न्यूद्वैना असें नांव ठेविलें. ज-नरल स्कीरमेताफ हा पीतराचा एक मोठा सरदार होता. तो बरोबर पुष्कळ सैन्य घेऊन नेहमीं शत्रूच्या फौजेच्या पाठीवर असे. तारीख १ माहे जानेवारी सन १७०२ रोजीं, इरेस्फोर्त ह्या नांवाच्या खेड्यानजीक, त्यास स्वीदनच्या राजाच्या फौजे-ची मुख्य टोळी भेटली. तेव्हां त्यांची तेथें मोठी लढाई झाली. तींत स्वीद फौज अगदीं पराभव पावली. त्या लढाईविषयीं स्वतः पीतराचा लेख असा आहे.- "आमचे लोक नवे होते, त्यांना लढाईचा अनुभव नव्हता, आणि आमचा तोफखाना त्यां-स येऊन मिळाला नव्हता, तेणेंकरून शत्रूच्या फौजेनें त्यांजवर चाल करून त्यांस घाबरवून प्रथम पळायास लाविलें, ही गोष्ट खरी आहे. परंतु, तोफखाना येऊन दाखल होतांच आमच्या लोकांस नवी वीरश्री आली. त्यांनीं आपला सगळा बातबेत पुनः जमवून, मोठ्या निकरानें शत्रूच्या सैन्यावर हल्ला केला. तेव्हां एकसारखें प्रहर दाहा घटिका युद्ध करून, त्यांनीं शत्रूस मागें हटविलें, इतकेंच केवळ नव्हे; तर त्यांस आपला तोफखा-ना टाकून पळायास लाविलें. ह्या प्रसंगीं स्वीद लोकांचा फार नाश झाला असावा; कारण, नुसत्या समरांगणावरच त्यांचे ती-न सहस्र लोक पतन पावले. ! आमच्या लोकांपैकीं सगळे एक हजार पडले."

ह्या जयाचा पीतरास मोठा संतोष झाला. त्यानें स्कीरमे-

ताफ ह्यास एक मोठी मानाची पदवी दिली, आणि त्याचा बहुमान केला. मोठी सभा भरून त्यानें सर्वांसमक्ष परमेश्वराचे आभार मानिले, आणि त्या उत्सवाप्रीत्यर्थ त्या ठिकाणीं पुष्कळ दारूकाम सोडिलें. ह्याच वेळीं पीतर उघडपणें असें बोलला कीं, "ह्या प्रसंगीं आपलें सैन्य शत्रूच्या दुप्पट होतें, तेव्हां तर आपण जय मिळविला आहे. कांहीं चिंता नाहीं; कांहीं वेळानंतर, त्यांचे आपले लोक बरोबर असतां आपण त्यांचा पराभव करूं."

स्कीरमेताफ ह्या शूर सरदारानें तारीख १७ जुलै रोजीं ह्युमोलोवा येथें स्वीदनच्या सैन्याशीं दुसरी एक लढाई केली. तिजविषयीं पीतरानें असें लिहिलें आहे कीं, "परमेश्वराच्या कृपेंकरून आमच्या सैन्यानें शत्रूंस रणांगणांतून पळायास लाविलें; आणि, आमच्या ज्या तोफा व निशाणें त्यांनीं पूर्वीं आम्हांपासून घेतलीं होतीं, तीं माघारीं घेऊन, त्यांच्या तोफखान्याची इतकी दुर्दशा उडविली कीं, त्यापैकीं फारच थोडे लोक आपल्या छावणींत परत गेले असतील, असें वाटतें. आमच्या सरदारानें पायदळ मागें टाकून, घोडेस्वारांनिशीं शत्रूंवर चाल करून, त्यांच्या छावणीच्या शहराच्या आलीकडेसच त्यांची पुनः एकवार दाणादाण करून टाकिली; तेव्हां त्यानें त्यांचीं १६ निशाणें आणि १५ तोफा त्यांजपासून हिसकावून घेतल्या. शिवाय पुष्कळ लोक पाडाव करून नेले ते वेगळेच. आमचे कडील दाहा अमलदार आणि चारशें शिपायी मरण पावले."

ही दुसरी निकराची लढाई झाल्यावर तरी पीतराचा सरदार स्कीरमेताफ हा स्वस्थ राहिला नाहीं. स्वीद लोकांचें आज हें ठाणें घेतलें, उद्यां तें घेतलें, परवां दुसरें घेतलें, असें करीत करीत तो मरीनबर्ग शहरा पर्यंत आला. त्या शहरावर त्यानें हल्ला केला तेव्हां लागलेच आंतील लोक आपलीं शस्त्रें खालीं ठेवून शरण आले, आणि स्वसंरक्षणाविषयीं विनंती करूं लागले.

हें चाललें आहे तों इतक्यांत, स्वीद लोकांचा एक शिपाई आपल्या बायकोस ओढीत ओढीत नेऊन दारू ठेवण्याचे खोलींत शिरला, आणि त्यानें त्या दारूस आग लाविली. तेव्हां ती इमारत पेटून जो भडका झाला, त्याच्या योगानें कितीएक स्वीद लोक व कितीएक रुशियन लोकही प्राणांस मुकले. ह्यामुळें त्या विजयी लोकांस फार राग येऊन, त्यांनीं, जे कोणी त्या शहरांत सांपडले, त्यांस सरसकट कैद केलें, आणि तें शहर धुळीस मिळविलें. !

मरीनबर्ग येथें जीं स्वीद मनुष्यें कैद केलीं, त्यांमध्यें एक मनुष्य असें निघजलें कीं, ह्या लेखाचा आदि नायक जो पीतर, त्याचें आणि त्या मनुष्याचें फार प्रेम वाढावें, आणि मरणानें तूट पडेपर्यंत त्यानें पीतराच्या सर्व सुखदुःखांचें वांटेली व्हावें, असा ईश्वरी संकेत होता. तें मनुष्य कोण म्हणाल, तर मार्था ह्या नांवाची तरुण आणि परम रूपवती एक स्त्री होय; हिलाच पुढें क्याथेराइन असें नांव प्राप्त झालें; आणि इतिहासांत ती ह्याच नांवानें प्रसिद्ध आहे. मरीनबर्ग येथें जे लोक पाडाव केले होते, ते तपासून त्यांची व्यवस्था ठेवणें हें काम बाअर नामक एका मोठ्या लष्करी सरदाराकडे सोंपिलें होतें. तीं मनुष्यें एका मागून एक पाहतां पाहतां, मार्था हिला त्याजपुढें नेलें. त्यानें तिजकडे पाहिलें तेव्हां, तिच्या नेत्रांतून खळखळां अश्रुधारा वाहात आहेत, व ती अत्यंत शोकाकुल झाली आहे, असें त्याच्या दृष्टीस पडलें. आधींच लावण्याची खाण, त्यांत अगदीं तरुणपण, आणि तिची अशी दुःखितावस्था, ह्या गोष्टींनीं बाअर ह्याचें चित्त वेधिलें. आणि, त्यानें आपले लोकांस असा हुकूम केला कीं, हें काम आटोपल्यावर आम्ही रिकामे असूं तेव्हां ही स्त्री पुनः एकदा आम्हां समोर हजर करा; आणि तोंपर्यंत हिची सर्व तजवीज बरोबर ठेवा. त्याप्रमाणें तो प्रसंग प्राप्त झाला. तिचें शरीर फार तेजःपुंज होतें; आणि

तिची उठण्याबसण्याची व बोलण्याचालण्याची ढब अत्यंत मनोरम होती; तेणेंकरून तिची मूळ पीठिका कशी आहे, ती विचारून घेण्याविषयीं बाहर ह्यास इच्छा उत्पन्न झाली. तो तिजपाशीं बोलूं लागला तेव्हां ती लज्जेनें खालीं मान घालून कांहींशी भयभीत होत्साती स्तब्ध उभी राहिली. तेव्हां तिला त्यानें सांगितलें कीं, तूं कांहीं भिऊं नको, तुला आम्ही चांगल्या रीतीनें वागवूं. तें ऐकून, थोडेंसें धैर्य धरून, तिनें आपली सर्व हकीकत त्यास ऐकविली. ती अशी.- "लिव्होनियामध्यें दोर्त सरोवराच्या कांठीं रिंजेन म्हणून एक लहानसें खेडें आहे, तेथें मी जन्मलें. त्या खेड्याचा मालक कौन्त रोजेन म्हणून होता, त्याच्या आश्रयानें कांहीं कामधंदा करून, माझी गरीब आई आपला चरितार्थ चालवी. मी तीन वर्षांची होतें तेव्हांच माझी मातुश्री आणि तिचा आश्रयदाता कौन्त रोजेन हीं मरण पावलीं. तेव्हां मला, अर्थाताच, त्या तालुक्याच्या कारकुनानें आपले ताब्यांत घेतलें, आणि मला थोडीबहुत विद्या शिकवावी, असा त्यानें निश्चय केला. त्याप्रमाणें मी शिकूं लागलें. असें चाललें असतां एके दिवशीं, मरीनबर्ग तालुक्याचा धर्माधिकारी दाक्तर ग्लक तेथें आला; आणि त्यानें मला त्या अमलदारापासून मागून घेतलें. त्यानें मला आपले घरीं नेऊन, आपल्या मुलांप्रमाणें माझें पालनपोषण केलें. मला कळूं लागल्यावर मी त्याच्या घरचें कामकाज करूं लागलें. मला कोणीं काम सांगितलें आणि मीं नाहीं म्हटलें, असें कधीं झालें नाहीं. मला प्रथम लिव्होनियन भाषामात्र येत होती. परंतु, ग्लक ह्याचे येथें आल्यावर मला जर्मन भाषा चांगली बोलतां येऊं लागली. मी उपवर झालें तेव्हां कितीएक गृहस्थांनीं मला आपणांशीं लग्न करण्याविषयीं नुसतें विचारिलेंच नव्हे, तर भीड ही घातली. त्यांत एका लष्करी मनुष्याचें मन मजवर फारच बसलें. मलाही त्याविषयीं प्रेम उत्पन्न झालें. तेव्हां

ग्लक बापास विचारून त्या गृहस्थाशीं मीं लग्न केलें. ही गोष्ट परवांचे दिवशीं घडली; आणि काय सांगावें महाराज, माझा भ्रतार ह्या कालच्या लढाईंत पडून मरण पावला. ! आतां काय करूं ?" ही हकीकत ऐकून बाअर ह्यास फार वाईट वाटलें. परंतु, त्याच्या अंतः करणांत केवळ दयाच घोळत होती असें नव्हे; तर, तिजबरोबर मदनाची ही कुरकुर चाललीच होती. कांहीं वेळ लोटल्यावर, दया बिचारी अबला, ती एकेबाजूस राहून, मदनाचें प्राबल्य झालें. त्यानें दयेच्या दयेनें आपलें काम साधून घेतलें. म्हणजे, ती अनाथ झाली म्हणून तिचें रक्षण करावयाचें, अशा डौलानें, त्यानें तिला आपल्या घरीं नेलें, आणि खाऊंपिऊं घालून खुशाल ठेविलें. त्याच्या येथच्या सर्व माणसांवर तिचा हुकूम चालूं लागला. ह्यावरून, ती तेथें कोणत्या संबंधानें राहात असे, ह्याविषयींचा विचार सुज्ञ वाचकांनीं करावा.

अशा प्रकारें ती बाअर ह्याच्या येथें राहिली असतां, एके दिवशीं मेंझिकाफ त्याचे घरीं आला. तेव्हां ती त्याच्या दृष्टीस पडली. तोही मोठा विषयी होता. त्याचें मन तिजवर गेलें. ती कोणाची कोण व तेथें कशी आली, ही सर्व कथा त्यानें प्रथमतः बाअर ह्यास विचारून घेतली. नंतर, "ही तुम्ही आम्हांस देतां काय. ? " असें त्यानें त्यास विचारिलें. ती बाअराच्या मनांत द्यावयाची नव्हती. परंतु, करतो काय बिचारा. ! त्यास लष्करामध्यें ही जी मोठी जागा मिळाली होती, ती केवळ मेंझिकाफ ह्याच्या कृपेच्या योगानें प्राप्त झाली होती. हें उपकाराचें ऋण त्याच्या डोक्यावर असल्यामुळें त्याच्यानें त्यास ना म्हणवेना. तथापि, तिची खुषी कशी काय आहे, ती दोघांसही स्पष्टपणें कळावी, म्हणून त्यानें तिला जवळ बोलावून विचारिलें कीं, "तूं ह्यांजकडे जायास खूष आहेसना. ? आमच्या येथल्या पेक्षां ह्यांचे घरीं तुझें पुष्कळ चांगलें होईल." हें भाषण

ऐकून ती सलज्ज होत्साती, कांहीं एक उत्तर न देतां, मोठ्या आदबीनें आणि नम्रतेनें तेथून निघून गेली. बाअर ह्याचें बोलणें तिच्या मनांत बिंबलें. आणि ती दुसरे दिवशीं मेंझिकाफ ह्याच्या वाड्यांत जाऊन त्याच्या घरच्या माणसांत मिसळली. त्या विषयी पुरुषाच्या सेवेंत ती बरेच दिवस राहिली. ती तेथें कोणत्या नात्यानें वागत होती, हें ग्रंथकारानें स्पष्ट सांगण्यापेक्षां रसिक सुज्ञ वाचकांनीं मनच्यामनांत समजावें हें बरें. पुढें, ती १७ वर्षांची असतां, इ० स० १७०४ ह्यावर्षी पीतराच्या पाहुण्यांत आली. तोही तिला पाहून उल्लु झाला. तेव्हां जशी ती मेंझिकाफ ह्यानें बाअर ह्याजपासून मागून घेतली म्हणून वर सांगितलें, तशी ती पीतरानें मेंझिकाफ ह्याजपासून मिळविली. त्यानें तिशीं प्रथम गंधर्वविवाह केला; आणि पुढें कांहीं दिवसांनीं तिला मोठ्या समारंभानें प्रसिद्धपणें वरिलें. ह्या प्रकारें करून, मरीनवर्गच्या वेढ्यांत पाडाव केलेली, यःकश्चित् एका स्वीद मनुष्याची पोरगी, कांहीं एक प्रयत्न नकरितां, केवळ आपल्या सौंदर्याच्या बलेंकरून, अर्ध्या पृथ्वीवर अमल चालविणारा महापराक्रमी रूसदेशचा बादशाहा जो पीतर त्याची पट्टराणी होऊन बसली. ! हिच्या चरित्रास लावण्यविजय असें नांव ठेवण्यास काय चिंता आहे. ? असो. ही बायको जशी रूपानें सुंदर होती, तशी विचारानें फार खोल आणि मोठी शाहणी होती. ह्याविषयींचीं उदाहरणें ह्या चरित्रांत पुष्कळ दिसून येतील. असो.

आतां मूळ कथाभागाकडे लक्ष दिलें पाहिजे. इ०स०१७०२ ह्या वर्षींही इंग्रिया आणि लिव्होनिया ह्या प्रदेशांत पीतर ह्याच्या सैन्यास जय मिळाला. लादोगा सरोवराच्या पलीकडच्य किनाऱ्यास आपला अमल राहावा एतदर्थ तेथच्या स्वीद गलबतांस पीतराच्या गलबतांनीं हुसकून लाविलें. ह्याच सरोवराच्य खालच्या भागांतून नीव्हानदी निघून, प्रथम तिचे फांटे फां

होऊन, ती बालतिक समुद्रास मिळते. ज्या प्रदेशांतून हे फाटे वाहतात, त्याच प्रदेशावर सेंतपीतर्सबर्ग शहर वसविलें आहे, त्याचें तेव्हां कोणाला स्वप्नसुद्धां पडलें नव्हतें. ही नदी जेथें समुद्रास येऊन मिळते, तेथें रातीबर्ग म्हणून एक मजबूद शहर होतें, व तेथें एक चांगला किल्ला होता. आणि हीं दोन्हीं स्वीड-नच्या राजाच्या अमला खालीं होतीं; तीं त्याजपासून घ्यावीं असा पीतरानें बेत केला. आणि ह्या वेढ्याचें काम त्यानें स्की-रीमाताफ ह्या सरदारास सांगितलें. तारीख १८ सप्तंबर रोजीं वेढा पडला, त्या लष्करांत आपापल्या हुद्यांचीं कामें बजावि-ण्याकरितां स्वतः पीतर, व मेंझिकाफ हे दोघे झटत होते. आ-क्टोबरच्या बाराव्या तारखेस, हल्ला करून, तें शहर, रूसदेश-च्या सैन्यानें हस्तगत केलें. पुष्कळ सामानसुमान व युद्धसा-मग्री त्याचे हातीं लागली. ह्याविषयीं पीतरानें एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, "आमचे सेनापति आंत गेले, त्यांनीं जयसूचक तोफांची सरबत्ती केली, आणि ह्या यशाबद्दल परमे-श्वराचे आभार मानिले. हें स्थल आमचे हातीं आलें, ही श-त्रूच्या सर्व देशाची किल्लीच आम्हांस मिळाली असें आम्ही समजतों."

रातीबर्ग शहर घेतल्यावर, विजयी लोकांनीं परत येऊन, मोठ्या थाटानें वाजत गाजत, आणि दारूकाम उडवीत मास्को शहरांत प्रवेश केला. ज्यांनीं, जीवाकडे नपाहतां आपलीं का-में बजाविलीं होतीं, त्यांस योग्य बक्षिसें दिलीं. कितीएकांचा पदव्या देऊन बहुमान केला. कितीएकांचे पगार वाढविले. स्वतः पीतरानें सुद्धां ह्या प्रसंगीं एक मोठें जीवावरचें काम बजा-विलें होतें; परंतु, त्यानें स्वतः आपणास कांहीं बक्षीस घेतलें नाहीं, इतकेंच केवळ नव्हे, तर तिळभर मोठेपणसुद्धां मिरविलें नाहीं. ह्यालाच म्हणावें खरा थोरपणा.! वास्तविक पाहिलें

असतां, अशा प्रकारच्या डामडौलाचा आणि समारंभाचा पीत-
रास मुळींच शौक नव्हता, येवढेंच नव्हे, तर त्याला त्याची अरु-
चि होती असें म्हटलें तरी चालेल. परंतु, लोकांस उत्तेजन या-
वें, व आपण जें करितों तें खरोखर देशहिताचें करितों, असें
जुन्या लोकांस वाटावें, एवढ्याकरितां त्यानें ही सगळी खटपट
केली. दुसरें कांहीं नाहीं.

जसें ह्या देशांत पूर्वी हिंदु लोकांमध्यें शंकराचार्यांचें महात्म्य
असे, तसें पीतराच्या वेळेपर्यंत रूस लोकांत, त्यांचा धर्माध्यक्ष
पात्रिआर्क ह्या पदवीचा होता, त्याचें महात्म्य असे. तो बोले-
ल तें खरें व करील तें प्रमाण, असें, बाकीचे लोक तर असोत,
पण स्वतः झार देखील मानीत असत. पात्रिआर्कांची स्वारी
बाहेर पडली म्हणजे झारानें तिजबरोबर अनवाणी चालावें, आ
णि त्यानें दिलेली देहान्त शिक्षा तात्काळ अमलांत आणावी, अ-
शी प्राचीन चाल होती. ती पीतरास अगदीं आवडत नसे.
कोणत्या तरी उपायानें ती एकदा नाहींशी करावी, असें त्याच्या
मनांत फार दिवस घोळत होतें. तें सिद्धीस नेण्याचा प्रसंग त्या-
स ह्या संधीस प्राप्त झाला. तो असा.– आद्रियन ह्या नांवाचा
पात्रिआर्क होता, तो मरण पावला; तेव्हां ती जागा अर्जी कमी
करावयाची असा पीतरानें निश्चय केला; आणि धर्मसंबंधीं सर्व
व्यवस्था पाहण्यास त्यानें दुसरा एक मनुष्य नेमिला. तेणेंकरू-
न सर्व धर्माधिकाऱ्यांचें वजन अगदीं कमी झालें. त्यांस को-
णी नुसतें पुसेना सुद्धां. तेव्हां त्यांनीं पीतराची निंदा आरंभिली.
जो छापखाना झारानें त्या लोकांच्या सुधारणे करितां आणवि-
ला होता, त्याच्याच द्वारें त्यांनीं त्याजवर उपहासास्पद लेखांचा
वर्षाव चालविला. कितीएकांनीं असें स्पष्ट सांगितलें कीं,
पीतर हा ख्रीस्ती धर्मी नाहीं; तो भलभलत्याच नव्या गोष्टी प्र-
चारांत आणायास पाहतो, म्हणूनच त्याला संकटें प्राप्त होतात.
ह्या पोकळ गप्पांकडे पीतर बिलकुल लक्ष देत नसे. तथापि

व्हालतेर ह्यानें बाराव्या चार्लसाच्या इतिहासांत असें लिहिलें आहे कीं, अशा प्रकारच्या मोठ्या अपराध्यास पीतरानें फार शिक्षा दिली होती. एके समयीं धर्माधिकाऱ्यांनीं एकत्र जमून, पात्रिआर्क नेमा, पात्रिआर्क नेमा, म्हणून एकच गर्दी उठवून दिली. तेव्हां तो अतिशयित संतापून, आपली बर्ची म्यानांतून काढून, ती मेजावर आपटून मोठ्यानें म्हणाला, "काय. ? तुम्हांला पात्रिआर्क पाहिजे काय. ? बरें आहे. हा पाहा तुमचा पात्रिआर्क. ! !" हे शब्द कानीं पडतांच लोकांची पांगापांग झाली.

हालंदांतून व इंग्लंदांतून प्रवास करून आल्यापासून, पीतराचा लाजाळूपणा पुष्कळ कमी झाला होता, व तो मंडळींतही मिसळूं लागला होता. तो परदेशच्या व्यापाऱ्यांकडे हरहमेषा जाई, व्यापार वाढविण्याविषयीं आपले विचार त्यांस सांगे, आणि इतर विषयांवर त्यांजपाशीं मोकळेपणें बोले. तो एके दिवशीं अशाच एका व्यापाऱ्यास भेटावयास गेला होता; त्यानें त्यास तेथें भोजनास राहविलें. जेवायास बसल्यावर, त्या व्यापाऱ्याच्या तरुण मुलीकडे पीतराची दृष्टि वळली. तिचें सौंदर्य पाहून त्यास तिजविषयीं काम उत्पन्न झाला. तो इतका कीं, हिला आमच्या वाड्यांत पाठवून द्या, असें त्यानें तिच्या बापाला एकदम स्पष्ट सांगितलें. ही गोष्ट त्या सद्गुणी रूपवती स्त्रीस केवळ शराप्रमाणें लागली; आणि तिनें तेव्हांच्या तेव्हां उत्तर दिलें कीं, हें कालत्रयीं घडावयाचें नाहीं. परंतु, आपला निश्चय ह्या स्वेच्छाचारी बादशाहापुढें सिद्धीस जाईल किंवा नाहीं, ह्याविषयीं तिला मोठी शंका प्राप्त झाली. ठीकच आहे. अहो, दुसरा कोणी मारील तर प्रभूकडे दाद मागावयाची; पण जर प्रभूच मारावयास उठला, तर काय करावयाचें. ? पण, अशाही संकटांच्या निवारणाच्या युक्ति मनुष्यांनीं योजून ठेविल्या आहेत; त्यांपैकीं एकीचें अवलंबन ह्या प्रसंगीं त्या मुलीनें केलें. तें असें.- ती, त्याच रात्रीं, आपल्या आईबापांस कांहींएक न

सांगतां, थोडासा पैसा बरोबर घेऊन, मास्को शहरांतून बाहेर पडली, आणि पायींच हळूहळू जवळच्या एका खेड्यास गेली. तेथें तिची लहानपणची बाळगती दाई कसाबसा निर्वाह करून राहात असे, तिच्या येथें जाऊन ती उतरली. घरांत दाई, दाईचा नवरा, आणि त्यांची एक मुलगी अशीं तीन मनुष्यें होतीं. त्यांस त्या सद्गुणी बाईनें आपली सर्व हकीकत कळविली, आणि अशी विनंती केली कीं, माझ्या नेमाच्या भंगार्थ, म्हणजे आपल्या समाधानार्थ, आतां माझा पाठलाग तो बादशाहा खचीत करील, तर त्याचे हातीं म्यां न लागावें, अशा ठिकाणीं मला कोठें तरी दडवा. तेव्हां त्या खेड्याच्या शेजारीं एक मोठें थोरलें जंगल होतें, त्यांत एक लहानशी झोंपडी बांधून, तिजमध्यें त्यांनीं तिला नेऊन ठेविलें. तिचें अन्नपाणी दाईनें घरीं तयार करावें; तें त्या तिघांपैकीं कोणींतरी एकानें तिला नेऊन पोंचवावें; आणि तिला भय न वाटावें म्हणून, रात्रीं, त्या दाईनें किंवा तिच्या मुलीनें त्या झोंपडींत जाऊन तिला सोबत निजावें; असा नित्यक्रम चालला. ह्याप्रकारें तिनें तेथें बारा महिने काढिले.

इकडे, ती स्त्री आपल्या आज्ञेप्रमाणें वाड्यांत आली नाहीं असें पाहून, पीतर दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्या व्यापाऱ्याकडे आला; आणि त्यावर इतका क्रोधायमान झाला कीं, मी आतां ह्याला काय करूं आणि काय न करूं, असें त्याला झालें. तो व्यापारी आणि त्याची बायको हीं अत्यंत शोकाकुल होऊन, त्याच्या पायां पडून म्हणालीं, 'महाराज, कालपासून आमची मुलगी कोठें गेली आहे, व तिचें काय वर्तमान आहे, हें आम्हांस खरोखर माहीत नाहीं; आम्ही निरपराधी आहों; आम्हांवर अवकृपा नसावी.' कांहीं वेळानंतर त्याला त्यांचें बोलणें खरें वाटलें. नंतर त्यानें चोहींकडे असे जाहीरनामे लाविले कीं, अमुक स्त्री कोठें आहे, ह्याचा जर कोणी पत्ता लावून देईल, तर त्याला अमुक इनाम मिळेल. परंतु, त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं

शेवटीं, ती कोठें तरी मेली, असें समजून, तिच्या मातापितरांनीं व इतर आप्त जनांनीं तिचें सुतक देखील धरिलें. !

अशी ती वनवासांत कालक्रमण करीत असतां, पीतराच्या लष्करांतला एक सरदार, एका मृगाच्या मागें लागून, एकाएकीं त्या झोंपडीपाशीं आला. आणि आंत पाहूं लागला तों, ती सुस्वरूप तरुण स्त्री, शेतकऱ्याच्या बायकोसारखा पोषाक केलेली अशी त्याच्या दृष्टीस पडली. परंतु, जें दिसत आहे, तें तिचें खरें स्वरूप नव्हे, ही कोणा थोर गृहस्थाची कन्या असावी, असें तिच्या आंगच्या तेजावरून तेव्हांच त्याच्या मनांत आलें. इतक्यांत त्याला असा संशय प्राप्त झाला कीं, ज्या स्त्रीविषयीं कांहीं दिवसांपूर्वीं इतके जाहीरनामे लागले होते, आणि इतका शोध चालला होता, तीतर ही नसेलना. १ ती गोष्ट त्यानें तोंडाबाहेर काढतांच, भयानें त्या मुलीची इतकी गाळण झाली कीं, तिच्यानें एक शब्द सुद्धां बोलवेना. ! ती अतिशयित घाबरून, घामाघूम होऊन, मान खालीं घालून हात जोडून उभी राहिली, आणि त्यास म्हणाली, "महाराज, ही गोष्ट आतां फोडूं नये, एवढेंच माझें दीनाचें मागणें आहे, तें कृपाकरून द्यावें." त्यानें तिला सांगितलें, "आतां तुला कांहीं भय नाहीं. आमच्या झारसाहेबांचें लक्ष सांप्रत काळीं दुसऱ्याच एका गोष्टीकडे लागलें आहे; तुला आतां उघडपणें येऊन आपल्या आईबापांस भेटण्यास कांहींएक चिंता नाहीं." असें भाषण चाललें असतां, त्या एकांत वेळीं, परस्पर प्रेमभाव त्या उभयांचे ठायीं उत्तम रीतीनें उत्पन्न झाला असावा, हें सांगितलें पाहिजे असें नाहीं. त्या सरदारानें तिची सर्व हकीकत तिच्या आप्तांस कळविली; एवढेंच केवळ नव्हे, तर तें सर्व प्रकरण त्यानें क्याथेराइन हिच्या कानावर घातलें. दुसरे दिवशीं सकाळीं तिनें त्याची आणि पीतराची भेट करून दिली. तत्पूर्वींच तिनें त्याला त्या स्त्रीच्या वनवासाचीं सर्व दुःखें ऐकविलीं होतीं. त्यांच्या योगानें तिज-

विषयींची त्याची कामवासना नाहींशी होऊन, तीं दीन अनाथ आहे, ह्यास्तव तिचें साह्य करावें, असें त्याच्या मनांत आलें. तेव्हां क्याथेराइन हिनें त्याला असें सुचविलें कीं, जर आपली इच्छा तिचें खरें हित करण्याची असेल, तर तिला अन्नवस्त्राची विवंता पडणार नाहीं, अशी वेतनाची तजवीज करून द्या, आणि तिचें लग्न त्याच सरदाराशीं लावा, म्हणजे झालें. पहा, मनुष्याच्या स्वभावाचें ज्ञान पीतरापेक्षां त्याच्या पट्टराणीस पुष्कळ अधिक होतें, हें उघड दिसून येतें. तिची सूचना पीतरानें मोठ्या आनंदानें मान्य केली; आणि तिच्या लग्नकार्याचा सव खर्च आपले पदरचा करून, तिला चांगलें वेतन ठरवून दिलें. कपतानब्रूस साहेब असें लिहितो कीं, ही गोष्ट मीं स्वतः त्या स्त्रीचे तोंडून ऐकिली आहे. !

पीतराच्या इषकाविषयीं दुसरी एक गोष्ट पुस्तकांतून लिहिली आहे. ती अशी.– पहिल्या बायकोचा घटस्फोट केल्यानंतर, तो मोननामक एका सुस्वरूप स्त्रीच्या नादीं लागला होता. तो तिजवर अतिशयित फिदा असे, परंतु, ती म्हणजे केवळ त्यालाच धरून राहिली होती असें नाहीं. झारमहाराजांची स्वारी कोठें कांहीं कामाकरितां मुलखांत गेली असतां, मागें, मास्कोशहरीं मोन हिनें, इराणच्या बादशाहाचा वकील कीझरलिंग हा रूसच्या दरबारीं होता, त्याशीं लग्न लाविलें. पुढें कांहीं वेळानें पीतर परत आला; आणि पाहतो तों मोन ही कीझरलिंगाची पत्नी होऊन बसली आहे, असें त्याच्या दृष्टीस पडलें. मग काय विचारावें. ? त्याच्या आंगाचा केवळ कल्पान्त होऊन गेला. आणि त्यानें कीझरलिंगास तात्काळ बोलावून आणून, असें सांगितलें कीं, तुम्हीं ह्या वेळेस आमच्या राज्यांतून निघून जावें. त्याप्रमाणें तो तावडतोब निघून स्वदेशीं गेला. नंतर इराणच्या बादशाहानें दुसरा गृहस्थ त्याचे जागेवर पाठविला.

ह्याच प्रकरणीं पीतराची आणखी एक चमत्कारिक गोष्ट

लिहिली आहे; ती येथें सांगतों.- त्याच्या लष्करामध्यें एका सरदाराची मोएन्सनामक एक कन्या फार रूपवती होती, तिजवर त्याचें मन गेलें. ती हातीं लागण्यास त्याला फार खटपट करावी लागली. शेवटीं त्यानें तिला घराबाहेर काढून वेश्येप्रमाणें आपणापाशीं ठेविलें. त्याची प्रीति तिजवर इतकी बसली होती कीं, तिजवांचून त्याला एक दिवस देखील चैन पडलें नाहीं. अशीं कितीएक वर्षें लोटलीं. तिच्या नित्याचरणावरून पीतरास असें वाटत असे कीं, हिचा सगळा जीव काय तो मजवर आहे. परंतु, जितकें पिंवळें दिसतें तितकें म्हणजे सर्व सोनें असतें असें नाहीं. परिणामीं एके दिवशीं तिच्या अंतःकरणाची खरी स्थिति एका विलक्षण प्रकारेंकरून पीतरास समजली; तेव्हां जें त्याचें आणि तिचें विटलें तें विटलेंच. तो प्रकार असा.- त्यानें समुद्रकांठीं कोठें जवळच एक किल्ला बांधिला होता, तो पाहण्याकरितां तो एके वेळीं आपल्या दरबारच्या दिवाणमंडळीस व वकीलमंडळीस बरोबर घेऊन गेला होता. किल्लाबिल्ला पाहून परत येत असतां, पोलंद देशचा वकील एका हातपुलावरून पडून पाण्यांत बुडाला. तेव्हां मोठी त्वरा करून पीतरानें त्याच्या खिशांतले कागद तेवढे शाबूद काढविले. त्यांत एक लहानशी तसबीर त्याच्या दृष्टीस पडली; ती जरा स्वस्थपणें पाहिल्याबरोबर, ती मोएन्स हिची आहे, अशी त्याची खातरी झाली. तेव्हां ही तसबीर येथें ह्याच्या खिशांत आली असावी कशी, ह्याविषयीं तो विचार करूं लागला. परंतु, कांहीं केल्या त्याची कल्पना बसेना. तेव्हां आणखी कांहीं पत्ता लागावा म्हणून त्यानें ते खिशांत सांपडलेले कागद वाचून पाहिले. त्यांत मोएन्स हिजकडून त्या वकीलास आलेलीं पत्रें निघालीं. तीं शृंगाररसानें केवळ परिपूर्ण होतीं. त्यांवरून त्याला असें स्पष्ट दिसून आलें कीं, ह्याजवर तिचें प्रेम पराकाष्ठेचें जडलें होतें. हें पाहून तो अत्यंत क्रोधायमान झाला, आणि

लागलाच मंडळींतून उठून आपल्या दासींपैकीं एकीचे घरीं गेला. तेथें त्यानें मोएन्स हीस बोलावून आणिलें, आणि तिला विचारिलें कीं, तुझा आणि त्या वकीलाचा संबंध असण्याचें कारण काय. ? तिनें मुळींच कानांवर हात ठेवून सर्व गोष्ट नाकबूल केली. तेव्हां तिचे हातचीं पत्रें जवळ होतीं तीं त्यानें तीस दाखविलीं, आणि ती तसवीरही तिजपुढें ठेविली. तरी ती आपली ननाची बाराखडी सोडीना. परंतु, तो वकील बुडून मरण पावला, असें जेव्हां त्याच्या तोंडांतून तिनें ऐकिलें, तेव्हां तिच्या काळजानें ठाव सोडिला. तिचें तोंड खरकन उतरलें, आणि तिच्या नेत्रांवाटे खळखळां अश्रुधारा चालल्या. तें पाहून पीतराच्या मनाची अवस्था काय झाली असेल, ह्याविषयीं आमच्या रसिक वाचणाऱ्यांनीं कल्पना करावी. तो अतिशयित संतापला आणि आतां तो तिला तेथच्या तेथें मारून टाकितो कीं काय, असें जवळच्या माणसांस वाटलें. ! परंतु, काय चमत्कार झाला पाहा. ! तो एकाएकीं खळखळां अश्रु गाळून मोठा गळा काढून रडूं लागला; आणि तिजकडे वळून म्हणाला, "बरें; झालें तें झालें. मी तुला क्षमा करितों. कारण, जेथें तुझी वासना तुला नच आंवरे, तेथें त्वांतरी काय करावें. ? असो. तूं मजपाशीं फार इमानानें वागलीस. ! होय. तुला तरी काय बोल लावावा. ! मीच असें मूर्खपण करून तुझ्या नादीं लागलों नसतों, तर असा हा पश्चात्तापाचा प्रसंग मला कां प्राप्त होता. ? हें माझ्या मूर्खपणाचें फळ आहे; हें मला निमूटपणें भोगिलें पाहिजे. परंतु, आतां पुढें तुजशीं संबंध ठेवणें हें अगदीं बरोबर नाहीं. म्हणून तूं आतां येथून काळें करून लवकर निघून जा. मला तोंड दाखवूं नको. मी आपला क्रोध आंवरून धरितों. पण ह्यापुढें तूं येथें राहूं नको. तुला माझी गरज नाहीं, आणि मी तुझें मुखावलोकन करणार नाहीं." इतकें बोलणें झाल्यावर त्यांची तुटातूट झाली. तथापि आपलें पूर्वी-

चें वचन शेवटास नेण्याकरितां त्यानें तिचें लग्न एका ग्रहस्थाशीं लावून देऊन त्यांस दूर एका खेड्यांत ठेविलें. त्यांस तेथें तो द्रव्यद्वारा पुष्कळ साह्य करीत असे. असो.

पीतर मास्को शहरामध्यें कांहीं लोकसुधारणेच्या कामांत गुंतला होता, तेव्हां स्वीदनच्या ईशान्ये कडचें त्याचें सैन्य चार्लसाच्या फौजेशीं लढत होतें. तेथें त्याची फार जरूर लागली. म्हणून लागलाच तो तिकडे गेला. लादोग सरोवराच्या कांठीं, नीव्हा नदीच्या जवळच, स्वीद लोकांच्या ताब्यांत एक किल्ला होता, तो घेण्याकरितां पीतरानें त्यास वेढा घातला. आंतल्या लोकांचा कांहीं बचावाचा उपाय चालेना म्हणून ते स्कीरीमातार्फ ह्या सरदारास शरण आले. ह्या प्रसंगीं पीतरानें ही मोठ्या धैर्यानें लढाई दिली. म्हणून त्यास लष्करी अमलदाराच्या नात्यानें एक मोठा किताब मिळाला. त्याप्रमाणेंच, ज्या ठिकाणीं सेंतपीतर्सबर्ग हें अप्रतिम दिव्य शहर आहे, तें ठिकाण त्या वेळीं अगदीं दलदलीचें असून स्वीद लोकांच्या अमला खालीं होतें, तें पीतरानें मोठ्या पराक्रमानें हस्तगत करून, तेथें तारीख १६ माहे मे स० १७०३ इसवी रोजीं नवीन किल्ला बांधण्याच्या मुहूर्ताचा पहिला दगड स्वतः हातानें जमिनींत घातला. हें ठिकाण नीव्हा नदीच्या अगदीं पात्रावर आहे, असें म्हटलें तरी चालेल. तें स्थल तेव्हां अगदीं यःकश्चित होतें; त्यास पीतरानें नांवारूपास आणिलें. तेथें किल्ला कसा बांधावयाचा, ह्याचा नमुना पीतरानें लांकडाचा करून दाखविला; आणि त्याप्रमाणें तो बांधण्याचें काम मेंझिकार्फ ह्याजकडून सुरू करविलें. त्यावर पीतर ह्याची सक्त नजर असे. किल्ल्याचें काम अशा प्रकारें चालल्यावर, सेंतपीतर्सबर्ग शहर वसविण्याकडे लक्ष दिलें. तें शहर व तो किल्ला बांधण्यास पुष्कळ मनुष्यें लाविलीं होतीं; आणि तेथची जमीन अगदीं दलदलीत होती; तेणेंकरून सुमारें एक लक्ष मजूर-

दार लोक आजारी पडून मरण पावले, असें सांगतात. ! किल्ला पांचमहिन्यांत बांधिला, व शहर बारा महिन्यांत तयार झालें. तेव्हां त्यांत लहानमोठीं घरें सुमारें तीस हजार होतीं. ! !

मनुष्यानें एकाद्या इष्ट कामाला एकदा आरंभ केला, म्हणजे तें केव्हां एकदा मनाप्रमाणें सिद्धीस जाईल, असें त्याला होत असतें. तसें ह्या वेळीं पीतरास सेंतपीतर्सबर्ग शहराविषयीं झालें होतें. कांहीं होवो, पण पीतर्सबर्गशहर एकदा उत्तम राजधानी बनो, असें त्याला वाटे, आणि त्याकरितां तो हरप्रयत्न करी. धर्माधिकाऱ्यांच्या ढोंगाचा आणि फाजीलपणाचा त्याला फार राग येत असे. तरी धर्माची हेलसांड व्हावी, अशी त्याची मुळींच इच्छा नव्हती. पीतर्सबर्गशहरामध्यें ज्या इमारती त्यानें मोठ्या आस्थेनें बांधिल्या, त्यांतच तेथील भजनालयाची गणना आहे. तें भजनालय तयार झाल्यावर, तेथें जाऊन राहण्याविषयीं व उपदेश करण्याविषयीं पीतरानें मास्को येथील धर्माधिकाऱ्यांस सांगितलें. परंतु, पीतर जितकें नवें करितो तितकें वाईट, असा त्यांचा ग्रह झालेला असल्यामुळें, व त्या नव्या शहरची जमीन ओलसर असल्या कारणानें आपण आजारी पडून मरूं अशी त्यांस भीति असल्यामुळें, त्यांनीं त्याचें म्हणणें कबूल केलें नाहीं. तसेंच कितीएक व्यापाऱ्यांना तेथें दुकानें घालण्याविषयीं त्यानें ताकीद दिली, आणि त्यांच्या उतरण्याच्या वगैरे सोईकरितां धर्मशाळा वगैरे बांधिल्या. तरी सुद्धां तेथें जाण्यास लोक तकरारी करूं लागले. तेव्हां त्यास थोडी सक्ती करणें भाग पडलें.

ही सक्ती चालली तेव्हां लोकांत मोठा गवगवा झाला. जो तो जुलूमजुलूम म्हणून ओरडूं लागला. आणि त्यांत धर्माधिकारी पुढारी. त्या सर्वांनीं तर असें सिद्ध केलें कीं, पीतराच्या ह्या सक्तीमुळें सगळी प्रजा त्रासून गेली आहे; ती इतकी कीं, त्यांची विपत्ति पाहून शहरची देवता देखील ढळढळां रडते. आ-

णि तिच्या नेत्रांवाटे खरोखरच कांहीं प्रवाही पदार्थ बाहेर येतांना लोकांच्या दृष्टीस पडे. तेणेंकरून त्यांस कुरकुर करण्यास अधिक बळ येई. असा प्रकार मास्कोमध्यें चालला होता, तेव्हां पीतर हा कांहीं कामाची देखरेख करण्याकरितां लादोगा सरोवराकडे गेला होता. तेथें त्याला हें वर्तमान समजलें. तेव्हां तो लागलाच मास्को येथें परत आला, आणि देवीचा साक्षात्कार पाहण्याकरितां व लोकांचीं गाऱ्हाणीं ऐकण्याकरितां त्यानें एके दिवशीं मोठी सभा भरविली. त्या प्रसंगीं देवीच्या डोळ्यांतून पाण्यासारखें कांहीं गळतांना त्याच्या दृष्टीस पडलें. त्याचा त्याला चमत्कार वाटला नाहीं; तर, त्यांत कांहीं कपट आहे, असें त्यांच्या मनांत येऊन, त्यानें ती मूर्ति एका धर्माधिकाऱ्याकडून उचलवून जवळ आणविली, आणि आपले हातांत घेऊन त्यानें तिजवरचें सगळें आच्छादन काढिलें; तेव्हां तिच्या डोळ्यांच्या भोंकांमागें एक एक लहान तेलाचा बोळा बसविला होता, आणि त्याचें थेंबथेंब तेल तिच्या नेत्रद्वारांतून निघे, ही गोष्ट त्यानें सर्व लोकांस उघड करून दाखविली; आणि हें सगळें ढोंग धर्माधिकाऱ्यांचें आहे, असें त्यानें त्यांस स्पष्ट सांगितलें. ती मूर्ति त्यानें आपले पदार्थसंग्रहालयांत नेऊन ठेविली. ! ! ह्या कृत्यांत पीतरानें जें धैर्य प्रकट केलें, तें अत्यंत स्तुत्य होय. मूर्ति हातांत घेतल्यावर जो प्रकार त्यानें केला, तो इतर दुसऱ्या कोणत्याही साधारण माणसानें केला असता; परंतु, तींत कांहीं कपट आहे असें पक्कें समजून तें दाखविण्याच्या निश्चयानें तिला जागेवरून उचलून हातांत घेणें, हें कांहीं सामान्य नव्हे. ! पीतर हा असामान्य पुरुष होता. तेव्हां त्याचे हातून असामान्य कृत्यें घडावीं, हें साहजिकच आहे. !

मास्को शहर सोडून नवी राजधानी पीतर्सबर्ग येथें जाण्यास लोकांनीं पुष्कळ आढेवेढे घेतले. परंतु, पीतरानें आपला आग्रह सोडिला नाहीं. त्यानें थोडक्याच दिवसांत तें शहर सर्व

प्रकारच्या लोकांनीं व सर्व प्रकारच्या कारखान्यांनीं सजविलें. एक सुज्ञ ग्रंथकार असें म्हणतो कीं,"पीतर हा जर स्वेच्छाचारी बादशाहा नसता, तर त्याला पीतर्सबर्ग हें शहर इतकें जलद वसवितां आलें नसतें." होय. ही गोष्ट खरी आहे. तथापि, अशा प्रकारच्या कामांस राजाचा स्वतंत्र अधिकारच बस होत नसतो; तर त्याला थोडें शाहाणपणही लागतें. हिंदुस्थानच्या एका बादशाहानें असाच कांहीं विचार मनांत आणिला होता; परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. पीतर्सबर्ग शहरीं जाऊन राहण्याविषयीं त्यानें केवळ लोकांसच आग्रह केला असें नाहीं; "क्रियेविण वाचाळता व्यर्थ आहे" हें समजून तो स्वतः आपण तेथें जाऊन राहिला. तेव्हां अर्थातच त्याची प्रधानमंडळी त्याजबरोबर तेथें आली. दरबारें भरूं लागलीं; कामकाज चालूं लागलें; श्रीमंत लोक तेथें स्थायीक झाल्यामुळें सर्व प्रकारचा माल तेथें खपूं लागला; त्यामुळें व्यापार वाढला; कारखाने सुरू झाले; मोठ्या भव्य व सुंदर इमारती पुष्कळ बांधिल्या; अशा प्रकारें तें शहर तेव्हांपासून सुधारायास लागून, सांप्रत काळीं सर्व सुधारलेल्या शहरांमध्यें अग्रगण्य होऊन बसलें आहे. !

असें हें शहर तयार होऊन पुरते पांच महिने झाले नाहींत तोंच एक मोठें दच लोकांचें गलबत व्यापाराकरितां त्या नदींत नांगरलें. तें पाहून पीतरास जें समाधान झालें, त्याचें वर्णन देखील करवत नाहीं. आपल्या नव्या राजधानीशीं वास्तविक समुद्राच्या द्वारें परकीय राष्ट्रांनीं व्यापार करावा, हा त्याचा मोठा हेतु होता; आणि त्याकरितांच त्यानें एवढी खटपट केली होती. तो हेतु सफल होण्यास आरंभ झाला, हें पाहून त्याला, आपण कृतकृत्य झालों, असें कां वाटणार नाहीं बरें ! माझें आरमार तयार होईल केव्हां आणि तें चार्लसाच्या आरमारास मागें हटवील केव्हां असा त्याला मोठा घोष लागला होता. त्याला ध्या-

नींमनीं त्याशिवाय दुसरें कांहीं दिसेना. तो व्होरोनितूझ येथें आपल्या गलबतांची कडीकोट तयारी करण्यांत अगदीं गुंतला असतां, त्यास पालीक गार्दन त्यानें असें विचारिलें कीं, " महाराज, आपल्या ताब्यांत बंदरें कोंठें दिसत नाहींत. ! आपण ह्या इतक्या गलबतांचें करणार तरी काय ? " त्यावर त्यानें उत्तर दिलें कीं, " अहो, कांहीं चिंता नाहीं. माझीं जाहाजें आपल्याला बंदरें करून घेतील बरें ! लक्षांत ठेवा. !" ईश्वरकृपेनें कांहीं काळानंतर त्याप्रमाणें घडून आलें. !

ज्या दच जाहाजाविषयीं वर सांगितलें आहे, त्यांतला बहुतेक माल पीतर आणि मेंझिकाफ ह्यांनीं विकत घेतला. शिवाय त्या गलबतावरच्या मुरव्यास बक्षिसें दिलीं तीं वेगळींच. आणखी असें ठरविलें कीं, असा परदेशांतून जो माल प्रथमतःच येईल, त्यावर जकात बिलकुल घेऊंनये. तेणेंकरून, तेथें व्यापारास येण्याविषयीं परदेशीय लोकांस विशेष उत्तेजन आलें. ते हमेषा नानाप्रकारचा माल आणूं लागले. तो पीतर्सबर्ग शहरच्या लोकांस बराच सस्ता मिळूं लागला; तेणेंकरून त्यांस संतोष झाला. अशा प्रकारें पीतर्सबर्ग येथील व्यापार वाढत चालला. हें त्या शहराच्या भरभराटीचें वर्तमान एके दिवशीं कोणीं एकानें, स्वीदनचा राजा बारावा चार्लस ह्यास सांगितलें. तेव्हां तो मोठ्या गर्वानें म्हणाला, " कांहीं चिंता नाहीं; पीतराला शहरें बांधून खुशाल मजा मारूंद्या; मी त्याची राजधानी घेऊन तेथलीं सगळीं घरें जाळून टाकीन. ! " केवढी थोर बुद्धि. !

ह्या संधीस आणखी एक मोठी गोष्ट झाली, ती येथें सांगितली पाहिजे. ती ही कीं, पीतराचा परम मित्र, पोलंद देशचा राजा आगस्तस ह्यास त्याच्या प्रजेनें गादीवरून काढून टाकून, स्तानिलस लेसझिन्स्की ह्या नांवाच्या एका सरदारास त्याचे

जागीं बसविलें. ह्याविषयीं पीतरास फार वाईट वाटलें. म्हणून त्यानें त्यास साह्य करण्याकरितां आपले कवाईत शिकलेले बारा-हजार लोक पाठविले. असो.

इ० स० १७०४ ह्या वर्षाच्या वसंत ऋतूमध्यें पीतर पुनः युद्धाचे तयारीस लागला. त्यानें आपल्या सैन्याचे दोन भाग केले; आणि त्यांतला एक स्कीरीमाताफ ह्या सरदाराचे हाता-खालीं देऊन त्यास दोर्त शहरास वेढा घालवयास सांगितलें; व दुसऱ्या भागाचें स्वामित्व स्वतः आपणाकडे घेऊन, ज्या ठिका-णीं पूर्वीं पराभव झाला होता, त्या नार्व्हानामक स्थलावर चाल करण्याचा विचार ठरविला. ह्या प्रसंगीं त्याची सर्व तयारी य-थास्थित होती; तोफखाना चांगला होता; बंदुका चांगल्या हो-त्या; आणि लोकांस कवाईत चांगली येत होती; तेणेंकरून त्या-स यश येण्यास अगदीं देखील आयास पडले नाहींत. ह्या श-हरास वेढा घातल्यावर, आंतल्या स्वीद सरदारानें कांहीं वेळप-र्यंत चांगला टिकाव धरिला; परंतु तो शेवटीं रूसच्या बादशाहास शरण आला; आणि प्राणरक्षणाचें वचन घेऊन तें शहर त्याचे हवालीं करिता झाला. रूस लोक आंत शिरतांक्षणींच त्यांनीं कापाकापीचा सपाटा चालविला. तेथें जो प्रळय त्यांनीं केला, त्याचें वर्णन सुद्धां करितां येत नाहीं. स्त्रियांचें पातिव्रत्य आ-णि पुरुषांचे प्राण ह्यांच्या नाशार्थ त्यांनीं जसा कांहीं अवतारच घेतला आहे कीं काय, असें त्या वेळीं वाटलें. हें पीतरास अ-गदीं आवडलें नाहीं. तो अशा आपल्या जुलमी लोकांस वि-चाराच्या गोष्टी सांगून व भय घालून त्यांचा बंदोबस्त करी. आणि त्यांत जे कोणी त्याचें ऐकेनात, त्यांचा तो शिरच्छेद करी. ह्याप्रमाणें जिकडे तिकडे स्वस्थता करून, तो, आपली रक्तानें माखलेली तरवार घेऊन, एका मोठ्या सरकारवाड्यांत गेला. आणि तेथें ती एका मेजावर ठेवून, तो तेथच्या लोकां-कडे पाहून म्हणाला, "अहो, माझी तरवार ह्या शहरच्या लोकां-

च्या रक्तानें विटाळली नाहीं; तर ज्यांनीं तुमच्या लोकांचे प्राण घेण्याचा प्रयत्न चालविला होता, त्या माझ्या स्वतःच्या लोकांस मीं ठार मारिलें बरें. ! आणि त्यांच्या रक्तानें ही तरवार भरली आहे. !"

ह्या प्रकारें करून पीतर ह्यानें नार्व्हा घेतलें, तसेंच, तिकडे स्कीरीमाताफ ह्यानें दार्त काबीज केलें. तेव्हां सगळा इंग्रिया-प्रांत त्याच्या सत्तेखालीं आला, हें उघड आहे. ह्या नवीन मिळालेल्या मुलुखावर त्यानें मेंझिकाफ ह्यास सुभेदार नेमिलें, आणि त्यास मोठी एक बहुमानाची पदवी दिली. मेंझिकाफ हा एका आचाऱ्याचा मुलगा होता; त्यास पीतरानें एवढा अधिकार दिल्याचें त्याच्या लोकांस तिळभर देखील वाईट वाटलें नाहीं. कारण, संपत्ति, कुलश्रेष्ठत्व, इत्यादि गोष्टींकडे लक्ष न देतां केवळ आंगच्या सद्गुणांवरून मनुष्यास महत्पद प्राप्त झाल्याचीं उदाहरणें पाहण्याची त्यानें त्यांस सवय लाविली होती.

इ० स० १७०५ ह्या वर्षी कितिननामक बेटावर बावीस स्वीद जाहाजांचा हल्ला आला. तेथें पुष्कळ स्वीद लोक उतरल्यावर त्यांचें व रूस देशच्या सैन्याचें युद्ध झालें. त्या प्रसंगीं स्वीद लोक केवळ पराभव पावले. त्यांचा त्या वेळीं इतका घोंटाळा होऊन गेला कीं, जाहाजांवर पळून जातेसमयीं त्यांस आपले जखमी झालेले व मेलेले लोक बरोबर घेऊन जाण्याचें भान सुद्धां राहिलें नाहीं. ! त्यांचे तीन हजार लोक रूस लोकांनीं पाडाव केले. !

ह्याप्रमाणें इकडची काळजी दूर झाल्यावर, चार्लस पोलांदामध्यें काय गडबड करीत आहे, ह्या विचाराकडे पीतराचें लक्ष लागलें. त्यानें, तेथील पदभ्रष्ट राजा आगस्तस ह्यास मदत करण्याकरितां आणखी साहाहजार पायदळ आणि साहाहजार स्वार इतकें सैन्य रेपनिननामक सरदाराबरोवर रवाना केलें, आणि आपण स्वतः पोलंदाकडे जावयास निघाला. ह्या प्र-

कारेंकरून इ० स० १७०५ च्या युद्धास आरंभ झाला. उभय पक्षांची मोठी लढाई कोर्लंदाचें मुख्य शहर जिमाएस येथें झाली. तेव्हां स्वीद लोकांचा मुख्य सरदार लिवेनहास ह्यानें आपल्या राजास असें लिहून पाठविलें कीं, "ह्या प्रसंगीं रूस देशचे शिपायी जिवावर उदार होऊन लढले." पीतराच्या सैन्याचा ह्या वेळीं जरी असा मोड झाला, तरी त्या धैर्यशाली पुरुषाची हिंमत खचली नाहीं. त्यानें कोर्लंदामध्यें आणखी फौज पाठवून तेथील एक मोठा किल्ला घेतला. त्याचें नांव गित्ता.

पीतर मास्को शहरामध्यें सुधारणेच्या कामाची देखरेख करीत असतां, इ० स० १७०६ च्या आरंभींच, त्यास असें वर्तमान समजलें कीं, चार्लस राजा मोठ्या सैन्या सहवर्तमान ग्रादनो शहराकडे रोंख धरून निघाला आहे, आणि तेणेंकरून आगस्तस ह्यास एकाएकीं साक्सनी प्रांताकडे पळून जाणें भाग पडलें आहे. तेव्हां तो धैर्यशाली झार, एका पलाचाही विलंब न करितां आगस्तस ह्याचें साह्य करण्याकरितां बरोबर मोठी फौज घेऊन निघाला. त्याची आणि स्वीदनच्या राजाचा सरदार रेन्सचिल्द ह्याची गांठ नेनस्ताल्त नामक शहरा जवळ पडली. तेथें मोठें युद्ध झालें. त्यांत पीतराचें सैन्य पराभव पावलें. त्याविषयीं स्वतः पीतरानें असें लिहिलें आहे कीं, "युद्ध आटोपल्यावर तीन दिवसांनीं शत्रूंनीं आमचे लोक असावधपणें पडलेले असतां त्यांस एकाएकीं कापून टाकिलें."

ह्या सुमारास आगस्तस ह्याजपाशीं सुमारें वीस हजार फौज जमली होती. आणि त्याजबरोबर पीतराकडचा पातकल नामा एक वकील होता. त्यानें आगस्तस ह्यास असा आग्रह केला कीं, तुम्हीं आपल्या फौजेसहवर्तमान पोलांदांत जाऊन, तेथें झार ह्याची स्वारी आली आहे, तीस मिळावें. ही गोष्ट त्यानें मान्य केली. त्याप्रमाणें त्या दोन्ही राजांचा संगम ग्रादनो येथें झाला. तेथें त्यांनीं एकमेकांचा मोठा आदर सत्कार के-

ला. आणखी तेथें एक सांगण्यासारखा प्रकार घडला, तो अ-सा. आगस्तसानें एका मोठ्या पदवीचीं वस्त्रें पीतरास दिलीं, आणि पीतरानें त्यांचा स्वीकार केला. ! देव नाहीं देव्हाऱ्यांत, आणि उत्सवाची गडबड, असा प्रकार येथें दृष्टीस पडला. आ-पण स्वतः पदभ्रष्ट असून दुसऱ्या मोठ्या बादशाहास पदवी दे-ण्यास आगस्तस ह्यास कांहीं वाटलें नाहीं. असो. मनुष्याच्या स्वभावाचा अंत लागत नाहीं, ही गोष्ट खरी आहे.

हे समारंभ चालले होते तोंच, आस्त्राखान येथें बंड झाल्याचें वर्तमान पीतरास कळलें. तेव्हां सगळ्या म्हणजे वीस हजार सैन्याचें स्वामित्व मेंझिकाफ ह्याजकडे देऊन तो तावडतोब तिकडे निघून गेला. इकडे मेंझिकाफ ह्यानें चांगला बंदोबस्त ठेविला होता; तरी बारावा चार्लस हा आगस्तासाच्या मूळच्या मुलुखांत म्हणजे साक्सनी प्रांतांत खूब धुमाकूळ करीत चा-लला होता. त्याला भिऊन म्हणा अथवा दुसऱ्या कोणत्या कारणामुळें म्हणा आगस्तस ह्याच्या काळजानें ठाव सोडिला. त्याला असें झालें कीं, बाराव्या चार्लस राजाशीं नम्रतेनें तह करीन केव्हां आणि त्याचें अभय संपादीन केव्हां. ह्या का-माकरितां त्यानें इमहाफ आणि फिंगस्तेन असे आपले दोन वकील, बरोबर मोठ्या नम्रतेचीं विनंतीपत्रें देऊन, तावडतोब चार्लसाकडे रवना केले. आणि ड्रेसदन येथें झार ह्याचा वकी-ल पातकल हा होता, त्यास एकदम कैद करण्याविषयीं हुकूम पाठविला. ! ह्या वेळीं बाराव्या चार्लसाची स्वारी अलतूरान-स्तात येथें होती. त्याच्या लष्करामध्यें ते दोघे वकील रात्रीं गेले, आणि त्यांनीं आगस्तसानें दिलेलीं पत्रें राजास प्रविष्ट केलीं. तीं वाचून पाहिल्यावर तो राजा कांहीं वेळ एकांतीं जाऊन ब-सला, आणि त्यानें तेथून चार कलमांची एक यादी तयार करू-न आणिली. तीं कलमें अशीं.–१ आगस्तसानें पोलंदच्या गा-दीवरचा सर्व हक्क सोडावा, आणि सांप्रत काळीं जो तिजवर

बसला आहे, तो स्तानिलस राजा खरा आहे, असें कबूल करावें.-२ आगस्तस ह्यानें जे कांहीं तह रूस देशच्या झाराशीं केले असतील ते सर्व रद्द आहेत, असें उघडपणें म्हणावें.-३ स्वीद लोक आगस्तसानें पाडाव करून धरून ठेविले आहेत, ते मुक्त करावे.-४ शिवाय आणखी कोणी स्वीद लोक आगस्तसाकडे असतील, ते त्यानें परत पाठवावे, व पातकल ह्यास आमचे हवालीं करावें.

ह्याप्रमाणें गुप्तपणें इकडे ठराव होत आहेत तों, तिकडे मेंझिकाफ आपल्या तीस सहस्त्र सैन्या सहवर्तमान, कालीशी शहरा नजीक आगस्तस ह्याच्या फौजेस जाऊन मिळाला. तेव्हां त्या पदच्युत राजास अशी भीति पडली कीं, आपण जें कांहीं गुप्तपणें करीत आहों, तें जरका ह्या मेंझिकाफास समजलें तर आपली अत्यंत दुर्दशा होईल. तेणेंकरून तो अगदीं घाबरून गेला. काय करावें हें त्याला सुचेना. इतक्यांत दाहाहजार सैन्या सहवर्तमान एक स्वीद सरदार त्याजवर चाल करण्यास सन्निध प्राप्त झाला. मग त्याची जी दशा झाली, तिचें वर्णन म्हणून किती करावें. ? त्यानें त्या स्वीद सरदारास सांगून पाठविलें कीं, आम्हीं तुमच्या राजाशीं तह करण्याकरितां वकील पाठविले आहेत, ते येत तोंपर्यंत दम धरावा. त्या सरदारानें त्या निरोपाकडे बिलकुल लक्ष दिलें नाहीं; तर त्याचा आणखी उपहास केला, आणि कांहीं वेळानें तर तो युद्धास उभा राहिला. त्याच्या व रूस देशच्या फौजेचे दोन हात तेथें झाले, त्यांत रूसच्या लोकांस जय मिळाला. त्यांनीं सुमारें तीन हजार स्वीद लोक रणांगणीं मारून त्यांचे मुख्यमुख्य सरदार कैद करून आपल्या लष्करांत आणिले. ते विजयी लोक मोठ्या जयोत्सवानें वार्सा शहरांत प्रवेश करिते झाले. ते स्वस्थ बसत होते तोंच फिंगस्तेन ह्यानें ती तहाच्या ठरावाची चार कलमांची यादी आगस्तस राजा ह्याचे हातीं आणून दिली. !

हां तह तर असो. पण ही वर सांगितलेली लढाई आटपल्यावर त्यानें आपल्या दोन वकीलांच्या द्वारें जें एक पत्र चार्लस राजास पाठविलें, तें तर फारच लाजिरवाणें आहे. त्याचें तात्पर्य असें.– "मीं आपल्या सैन्याचा पराभव केला ह्याबदल मला माफी असावी. ही लढाई करावी, असें माझ्या मनांत मुळींच नव्हतें; परंतु, रूस देशच्या लोकांनीं मजकडून जुलमानें शस्त्र धरविलें, तेथें माझा उपाय नाहीं; मी तर मुळीं मेंझिकाफास सोडून देऊन आपणांस मिळणार होतों; पण तसें झालें नाहीं, ह्याचें मला वाईट वाटतें; आपल्या सरदारानें थोडी संधी घालविली; नाहींतर त्यानें खरोखर मेंझिकाफ ह्याचा पराभव खचीत खचीत केला असता; मी सगळे स्वीद कैदी सोडून देईन आणि रूसच्या लोकांपासून वेगळा होऊन आपणांकडे येईन; सारांश, माझे हातून आपल्या सैन्याचा जो नाश झाला आहे, त्याबद्दल जें आपण म्हणाल तें ऐकण्यास मी तयार आहें." ह्या पत्रांत शौर्य आणि शाहाणपण किती आहे, ह्याचा विचार आमच्या सुज्ञ वाचणाऱ्यांनींच करावा.

बरें. आगस्तसाची एवढीच अप्रतिष्टा होऊन हें प्रकरण आटपलें काय. ? नाहीं. तर त्याला आणखी ही थोडीशी भर पडली. ती अशी. त्यास पदच्युत केल्यावर त्याचे गादीवर जो मनुष्य चार्लसाच्या अनुमतानें बसला, त्याचें नांव स्तानिलस असें होतें. त्याजविषयीं आगस्तसाचे मनांत वैषम्य किती आलें होतें हें सांगवयास नको. जर टळण्यासारखें असतें, तर आगस्तसानें त्याचें नुसतें नांव देखील घेतलें नसतें; परंतु, त्याजकडून चार्लसानें स्तानिलस ह्यास असें पत्र लिहिविलें कीं, "आपणांस राज्य पद प्राप्त झालें, हें पाहून मला फार संतोष झाला आहे; ईश्वरानें आपलें असेंच उत्तरोत्तर कल्याण करावें." ही मोठ्या अप्रतिष्टेची गोष्ट नव्हे काय. ? ज्याकडे सहज दृष्टि गेली असतां आंगाचा संताप व्हावयाचा, त्याजकडे पाहून अत्या-

नंद प्रदर्शित करण्याचा प्रसंग प्राप्त व्हावा, ह्याहून दुःखप्रद गोष्ट अशी दुसरी कोणती आहे बरें. ! अगस्तसानें तें पत्र लिहिलें तें सुखासुखी लिहिलें काय. ? पण करील काय. ? तो फांशांत सांपडला तेथें त्याचा उपाय चालेना. ! काळ फिरला म्हणजे असेंच होत असतें. !

ह्या सुमारास बाराव्या चार्लसानें जें एक अति वाईट कृत्य केलें, तें अद्याप सांगावयाचेंच आहे. तें कोणतें तर पातकल ह्याचा वध.! हा पुरुष पीतराकडचा वकील होऊन आगस्तसाकडे आला होता, व त्यास आगस्तसानें चार्लसाच्या हवालीं केलें हें वर सांगितलें आहे. हा देहान्त शासनाचा प्रकार त्यानें इतक्या भयंकर रीतीनें अमलांत आणिला कीं, त्याचें वर्णन सुद्धां करवत नाहीं. मारण्याच्या ठिकाणीं शिक्षेचा कागद वाचिला, त्यांत चार्लस राजास दयाळू असें म्हटलें होतें, तें ऐकतांच, पातकल बोलला, "हा कशाचा दयाळू. !" तसेंच आरोपितास राजद्रोही म्हटलें होतें, तें कानीं पडतांच, तो ओरडून म्हणाला, "कां मला राज द्रोही म्हणतां. ! नाहीं बरें. ! मला असें उगाच म्हणूं नका.! मीं आपल्या देशाची चाकरी यथाशक्ति बजाविली आहे. !"

ह्या शिक्षेविषयीं व्हालूतेर हा नामांकित ग्रंथकार असें लिहितो कीं, "ह्या भयंकर अन्याय्य कर्माकडे पाहून, केवळ सुधारलेल्याच मनुष्याच्या नव्हे, तर अगदीं रानटी मनुष्याच्या देखील आंगावर कांटा उभा राहिला असता. स्वराष्ट्राचीं दुःखें प्रदर्शित करून दाद मागण्या करितां लिव्होनियन लोकांनीं जे साहा गृहस्थ आपल्या वतीनें राजाकडे पाठविले होते, त्यांत मुख्य होण्याचें काम ह्यानें पतकरिलें, हेंच ह्या दुर्दैवी मनुष्यानें प्रथम मोठें पाप केलें; आणि हें उत्तम कर्तव्यकर्म त्यानें चांगल्या रीतीनें बजाविलें, म्हणूनच जणुकाय त्याची चौकशी होऊन त्यास शिक्षा झाली. ! पातकल म्हटला म्हणजे एका मोठ्या पराक्रमी बलाढ्य राजाचा वकील होता; ह्याकरितां तरी त्याची थोडी प्र-

तिष्ठा ठेवावयाची होती. अत्यंत क्रूरपणाच्या योगानें, चार्लस ह्यानें, सृष्टीचे व राजव्यवहाराचे जे पवित्र नियम त्यांचें उल्लंघन केलें. ! " ही गोष्ट खरी आहे. समरांगणीं उभे राहिल्यावर मगमात्र परस्परांचें हाडवैर; तेथें कोणाला मारूं आणि कोणाला वगळूं ह्याचा विचार नाहीं; सर्व सारखे; परंतु, अशा एकएकट्या मनुष्यास धरून मारणें हें राजनीतीस अगदीं विरुद्ध होय. अगदीं रानटी लोक सुद्धां असें करीत नाहींत; तेव्हां अशा कर्मानें सुधारलेल्या प्रबळ राजाच्या नांवास कलंक लागवा, ह्यांत कांहीं विशेष नाहीं. असो.

पातकल ह्याची अशी अवस्था झाली हें ऐकून पीतरास अतिशयित वाईट वाटलें. त्यानें युरोपच्या इतर राजांस पत्रें लिहून कळविलें कीं, चार्लसानें अशी अशी ही अति वाईट गोष्ट केली आहे, ही आपणांस विदीत असावी. त्या संतापाच्या वेळीं पीतराच्या एका प्रधानानें त्यास असें सुचविलें कीं, आपल्या मास्को राजधानीमध्यें कांहीं स्वीद लोक प्रतिबंधांत ठेविले आहेत, त्यांचे प्राण घेऊन ह्या गोष्टीचा सूड उगवावा. ही गोष्ट झार ह्यास अगदीं देखील रुचली नाहीं, आणि तिजविषयीं त्याचा निषेध करून त्यानें असें उत्तर दिलें कीं, "असें नीच कर्म मी कधीं करणार नाहीं; अरे, एका चार्लसानें आपल्या कीर्तिवर आणि भूतदयेवर पाणी सोडिलें, म्हणून मीं तसेंच करावें काय.?" वास्तविक आहे. ज्या गोष्टीविषयीं आपण लोकांस दोष ठेवितों, ती गोष्ट आपण स्वतः बुद्धिपुरस्सर करणें, ह्या मूर्खपणा इतकें मूर्खपण दुसरें कोठेंही आढळणार नाहीं. तथापि, जगामध्यें तशीं उदाहरणें पावलोपावलीं दृष्टीस पडतात. !

तथापि चार्लस राजाचा सूड उगवूं नये, असें पीतराच्या मनांत नव्हतें. त्याचे मनांत सूड घ्यावयाचा होता, पण त्याचा प्रकार असा हलकट आणि नीचपणाचा नव्हता. त्यानें असा निश्चय केला कीं, कितीही श्रम करावे लागले तरी लागोत, प-

ण स्तानिलस जो एवढ्या मोठ्या थाटानें चार्लसाच्या जीवावर उड्या मारून राज्योपभोग घेत आहे, त्यास गादीवरून हांकून द्यावयाचें. ह्या कामा करितां त्यानें झालकिया येथें मोठें दरबार भरून पोलांदांतल्या बड्याबड्या लोकांच्या भेटी घेतल्या. ते सर्व त्याच्या म्हणण्यास कबूल झाले.

साक्सनीमध्यें स्तानिलस ह्याच्या दरबारामध्यें फ्रेंच सरकाराकडचा एक वकील होता. त्याचे मनांत चार्लस आणि पीतर ह्यांचा सल्ला करून द्यावा, असें आलें. त्यास चार्लसानें एकच उत्तर दिलें कीं, " झार ह्याशीं तह करणेंच आहे तर, मी मास्को शहरांत गेल्यावर करीन, एरव्हीं करणार नाहीं. " तें पीतराच्या कांनीं गेलें. तेव्हां तो म्हणाला, " चार्लस हा शिकंदर बादशाँहा* होण्यास एका पायावर तयार आहे; पण मी दरायस कोठें आहे. ? "

इ० स० १७०७ ह्या वर्षीं चार्लस राजा, बरोबर पन्नास हजार सैन्य घेऊन, पीतराशीं युद्ध करण्या करितां आलारानूस्तात येथून निघाला. त्याचें लस्कर ड्रेसदन ह्या शहरावरून जात असतां, तितक्या गर्दींत जार्लसानें आगस्तस ह्याची भेट घेतली. व्हालतेर असें म्हणतो कीं, चार्लसानें हें मोठेंच साहास केलें असें समजलें पाहिजे; कारण इतके प्रकार घडून आल्यावर त्यांनीं एकमेकांस भेटावें ह्यांत कांहीं अर्थ राहिला नव्हता, इतकेंच केवळ नव्हे, तर तें कर्म भयप्रद होतें. स्वीदलोकांचें सैन्य पोलांदांतून गेलें तेव्हां त्यानें तो प्रदेश अगदीं धुळीस मिळविला. त्या वेळीं पोलांदच्या लोकांनीं देखील त्याचा सूड उग

---

* शिकंदर हा मासिदोन देशचा बादशाहा होता; आणि दरायस हा इराणचा बादशाहा होता. त्यांचें प्रसिद्ध युद्ध इ० स० पूर्वीं ३३३ वे वर्षीं इस्सस येथें झालें. त्यांत दरायस केवळ पराभव पावला. ह्या बोलण्यावरून असें दिसतें कीं, पीतर ह्यास प्राचीन इतिहास बराच अवगत होता.

विण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं. चार्लसाची सेना हिंवाळ्याच्या मुकामाकरितां लुथिआनिआ प्रांतांत जाऊन राहिली; आणि पीतराच्या फौजेनें आपला तळ ग्रोदनो आणि मिन्स्क ह्या प्रांतांत दिला.

ह्याप्रमाणें तिकडे व्यवस्था करून पीतर मास्कोशहरीं आला. तें शहर, कार्यबहुत्वामुळें, गेल्या दोन वर्षांत त्यास पहावयास सांपडलें नव्हतें. तेथें दवाखाना, कापड विणण्याचा कारखाना, कांचेचें सामान करण्याचा कारखाना, टांचण्यांचा कारखाना, ईत्यादि गोष्टी उत्तम रीतीनें चालल्या आहेत असें पाहून त्यास परमसंतोष झाला. आणि आपण ज्या कांहीं नव्या गोष्टी देशांत चालू केल्या आहेत, त्यांविषयीं लोकांची जी कुरकूर चालली होती, ती अगदीं कमी झाली आहे, असें पाहून त्याला फार बरें वाटलें. आणि आणखी कांहीं सुधारणेचा विचार तो करूं लागला. इतक्यांत मेंझिकाफ ह्याजकडून निरोप आला कीं, चार्लस राजा मोठ्या सैन्यासहवर्तमान आपल्या लष्करावर चाल करून येण्याच्या विचारांत आहे, ह्यास्तव आपण तावडतोब निघून यावें. तो कानीं पडतांच झार ह्याची स्वारी निघाली. ती ग्रोदनो येथें प्राप्त झाली. आणि तेथें तो सैन्याचा नीट बंदोबस्त करून राहिला. हें वर्तमान चार्लसास कळलें. त्यानें आठशें लोक बरोबर घेऊन त्या शहरावर चाल केली, आणि तेथें रूस सैन्याचा अगदीं पराभव करून टाकिला. असें होण्यास कारण झाराच्या एका जर्मन सरदाराचें निमकहरामपण होय. तो सरदार एका वेशीवर संरक्षक होता; त्यानें चार्लसाच्या लोकांस आंत येण्यास हरकत करावयाची, ती न करून त्यानें त्यांस स्वस्थपणें आंत शिरूं दिलें. तेव्हां तें शहर अर्थातच स्वीद लोकांच्या हातीं लागलें. ह्या प्रसंगीं स्वतः पीतरच त्यांस सांपडावयाचा; परंतु, तो मोठ्या तजविजीनें तेथून निसटून निघून गेला. त्यानें आपलें सैन्य मिन्स प्रांतांत जमा करून पीतर नदीच्या कांठीं मोघिली आणि ओर्षा ह्यांच्या मधल्या प्रदेशांत

छावणी केली. आणि स्वीद लोकांस असें आंगावर घेतलें कीं, त्यांस परत पळून जाण्यास देखील मार्ग राहूं नये; आणि आपण अशी जागा धरली होती कीं, तेथें शत्रूचा उपाय चालूं नये, आणि जर कदाचित तसा प्रसंग आलाच, तर मागें परतण्यास चांगली सोय सांपडावी. ! ह्यावरून पीतराचें युद्ध कौशल्य दिसून येईल.

---

## भाग चवथा.

इ० स० १७०८ च्या आरंभीं उभय पक्षांचीं सैन्यें युद्धाकरितां सिद्ध होऊन कोठें येऊन राहिलीं होतीं, ह्याविषयींचें वर्णन मागच्या भागाच्या अंतीं केलें आहे, तें आमच्या वाचणाऱ्यांच्या ध्यानांत असेलच. त्या काळीं पीतर आणि चार्लस हे युरोप खंडामध्यें मोठे बलाढ्य भूपति होते; त्यांचीं राज्यें मोठीं होतीं; त्यांचीं सैन्यें पराक्रमी होतीं; आणि ते स्वतः नव्या उमेदीचे पुरुष असून त्यांचे ठायीं शौर्य निरंतर जागृत होतें. ह्या योध्यांची प्रत्यक्ष गांठ पडण्याचा प्रसंग समीप आला. पीतराकडे एक लक्ष सेना सिद्ध होती; आणि चार्लसाकडे अठ्यायशीं हजार लोक तयार होते. तारीख २५ माहे जुलै सन १७०८ इ० रोजीं त्या दोहों फौजांतील कांहीं लोकांची एक लहानशी लढाई झाली. ती सुमारें चार तास चालली होती. तींत स्वीदनच्या राजाचे ५००० लोक पतन पावले; आणि पीतराचे २००० प्राणांस मुकले. ह्या समरामध्यें आणीबाणीच्या प्रसंगीं चार्लसाच्या एका सरदाराचा घोडा जायबंदी झाला; म्हणून त्या राजानें स्वतः आपला खासा घोडा त्यास देऊन, तो आपण त्या युद्धाच्या गर्दींत पायींच फिरूं लागला. ही झटापट झाली तेव्हां पीतर तेथें नव्हता. तो तें युद्ध झाल्यानंतर दोन दिवसांनीं तेथें आला. तेव्हां त्याला असें वर्तमान कळलें कीं, चार्लस, आपल्या

सैन्या सहवर्तमान, मास्को शहरावर जाण्याचा विचार गुप्तपणें करीत आहे. त्याच्या बंदोबस्ता करितां त्यानें, त्या ठिकाणापासून मास्को शहरास जाण्याचा जो मार्ग होता, त्याच्या आसपासचा सर्व मुलुख इतका ओसाड करून टाकिला कीं, त्या मार्गानें जाणारा कितीही प्रबळ असला तरी त्याला मरणाची पाळी प्राप्त झाल्या खेरीज राहूं नये. !

वर सांगितलेल्या विचारा प्रमाणें रूस देशामध्यें स्वीद लोकांनीं प्रवेश केला; आणि ते स्मालेन्स्को पावेतों आले देखील. परंतु, तेथें त्यांचे अन्नपाण्यावांचून इतके हाल झाले कीं, त्यांचें वर्णन सुद्धां करवत नाहीं. शिवाय पीतराच्या सैन्यानें त्यांजवर वारंवार हल्ले करून त्यांस अगदीं टेंकीस आणिलें होतें; म्हणून त्यांनीं आपला मार्ग एकदम बदलून ते अकरेनाँकडे* चालते झाले. तेणेंकरून चार्लस राजाची आणि त्याच्या सैन्याची अगदीं धूळधाणी उडाली. ह्या मोहिमेंत उभय पक्षांच्या पुष्कळ झटापटी झाल्या. त्यांचें साद्यंत वर्णन करण्यास येथें जागा नाहीं. तथापि पलतुवा येथें जो प्रकार सरते शेवटीं घडला, तो सांगितला पाहिजे. हें शहर रूसच्या झाराच्या ताब्यांतलें होतें; तेथें एक लहानसाच पण चांगला मजबूद किल्ला होता; आणि तेथून मास्को शहरास जाण्याचा नीट रस्ता होता. ह्या धोरणावर चार्लसाचा हेतु मनांत आणून, तेथें धनधान्य व दारूगोळा ह्यांची तजवीज पीतरानें चांगली करून ठेविली होती. त्याच्या अजमासाप्रमाणें चार्लसाच्या आठ हजार फौजेनें त्यास वेढा घातला. आंतल्या लोकांचा मुख्य सरदार आलर्द ह्या नांवाचा होता; तो फार जुना असून त्यानें पुष्कळ प्रसंग पाहिलेले होते.

आपल्या आरमाराच्या तयारीचें काम कोठपर्यंत आलें आहे, हें पाहण्याकरितां व्होरोनितूझ ह्या गांवाकडे पीतर गेला हो-

* अकरेन हा रूस देशांत एक प्रांत आहे.

ता; तिकडे त्याला हें वेढ्याचें वर्तमान कळतांच, तो, बरोबर पन्नास साठ हजार फौज घेऊन पल्तुवा शहरासमोर प्राप्त झाला. नंतर त्यानें मेंझिकाफ ह्याजबरोबर कांहीं सैन्य देऊन, त्यास वेढा घालणाऱ्यांवर हल्ला करण्यास पाठविलें; त्यांतला मुख्य हेतु असा होता कीं, लढण्याच्या मिषानें मेंझिकाफ ह्यानें त्या लोकांस वेढ्याच्या स्थलापासून गुंतवीत गुंतवीत नादीं लावून दूर न्यावें, आणि मागें जरा सवड झाली म्हणजे आलार्द ह्याच्या साह्यास पलतुवा येथील किल्ल्यांत कांहीं लोक व युद्धसामग्री हीं पाठवावीं. ही मसलत पीतरास चांगली साधली. अशा प्रकारें त्या किल्लेदारास चांगली मदत मिळाली, असें जेव्हां चार्लसास कळलें, तेव्हां तो म्हणाला, "रूसचे लोक लढाईच्या कामांत आमचे पक्के चेले बनले. !"

युद्धास आरंभ करण्यापूर्वीं पीतरानें आपल्या सैन्याचे दोन भाग केले. त्यांपैकीं एक एके बाजूस पाठविला, आणि दुसरा दुसरीकडे ठेविला. त्या सैन्यभागांपुढें, त्यांच्या रक्षणार्थ त्यानें पडकोट उभारविले; त्या पायदळाच्या मागें स्वार, आणि त्या स्वारांच्या मागें तोफखाना अशी व्यवस्था लाविली. नंतर लढाईस आरंभ झाला. उभयपक्षांच्या कितीएक लहानमोठ्या झटापटी उडाल्या. त्यांपैकीं एकींत स्वतः चार्लसास गोळी लागली. तिच्या योगानें तो अतिशयित व्याकुल झाला. नंतर, शस्त्रवैद्यांच्या प्रयत्नानें त्यास जरासें बरें वाटलें. तरी कितीएक दिवसपर्यंत त्याला आंथरूण धरून पडावें लागलें होतें. असें असतांही त्याच्या सैन्यानें पीतराच्या सैन्यावर एकवार हल्ला करून त्यास मागें हटविलें.

पुढें युद्धाचें काम मोठ्या निकरानें चाललें. पीतराच्या उजव्या बाजूच्या टोळीवर मुख्य सरदार बाअर हा होता; डावीकडचीवर मेंझिकाफ होता; आणि मधलीचें आधिपत्य स्कीरीमाताफ ह्याजकडे होतें. हें युद्ध सुमारें साहा घटिका एकसा-

रखें चाललें होतें. दोहीं कडचे युद्धधुरंधर, म्हणजे पीतर आणि चार्लस, हे आपापल्या पक्षांच्या विजयार्थ, जीवांकडे न पाहतां झटत होते. त्या दोघांच्या ही मनांत असें येऊन चुकलें होतें कीं, आपणांस जें काय यश किंवा अपयश यावयाचें, तें ह्या वेळच्या जयापजयावर अवलंबून आहे. पीतर हा आपल्या घोड्यावर बसून, आपल्या सैन्यास उत्तेजन देण्याकरितां इकडे तिकडे विजेसारखा फिरत होता. चार्लसास समरांगणीं येण्याचें सामर्थ्य नव्हतें, तो हातांत पिस्तोल घेऊन डोलींत बसून हळूहळू आपल्या फौजेस धीर देत होता. त्याच्या डोळकरांपैकीं एकास एक गोळी लागली; तेणेंकरून तो खालीं पडला; तेव्हां अर्थातच चार्लस खालीं आला. तरी तितक्यांत त्वरा करून, दुसऱ्या वाहनावर बसून, तो पुनः पूर्ववत् फिरूं लागला. पीतराच्या टोपींतून एक गोळी पारनिघून गेली; त्याच्या कपड्यांस कितीएक गोळ्या लागल्या; व त्याच्या खालच्या जिनास ही कितीएक गोळ्या लागून गेल्या होत्या. सारांश, ह्या समरांगणीं तो बचावला, ही केवळ परमेश्वराच्या कृपेची गोष्ट होय. ! नाहींतर ज्या गोळ्या इतक्या जवळ येऊन भिडल्या होत्या, त्यांतली एकादी त्याला लागून जीव जाण्यास कांहीं वेळ लागता काय. ? तसेंच, मेंझिकाफ ह्याचे खालचे तर, एकामागून एक, असे तीन घोडे गोळ्या लागून पडले; तेव्हां तो देखील मोठ्या शर्तीनें वांचला, असें म्हटलें पाहिजे,

ह्या युद्धांत चार्लस राजाचा अगदीं पराभव झाला. स्वीद लोक पळून गेले तेव्हां त्यांस देमायधरणीठाय झालें. त्यांचा सगळा घोंटाळा होऊन गेला. ह्या प्रसंगाचें वर्णन पीतर ह्यानें स्वतः लिहून ठेविलें आहे. त्यांत असें आहे कीं, "नऊ हजार दोनशें चोवीस लोक समरांगणीं पडकोटाजवळ पडले; शिवाय दोन तीन हजार पाडाव केले ते वेगळेच. आमचें नुकसान फार झालें नाहीं. फार रक्तपात न होतां व फार त्रास न पडतां, स्वी-

दनच्या गर्विष्ठ राजावर आमच्या सैन्यास जय प्राप्त झाला, ही परमेश्वराच्या कृपेची गोष्ट होय." खरोखर, जगाच्या इतिहासामध्यें जीं युद्धें प्रसिद्ध आहेत, त्यांतच ह्याची गणना आहे. युरोपांतले दोन बलाढ्य राजे, आपल्या प्रचंड सैन्यांसहवर्तमान, जीवांची आशा न धरितां, समरांगणीं स्वदेशहितार्थ झगडत आहेत, आणि त्यांचें तुमुल युद्ध माजलें आहे, असें पाहून वीररसानंद होणार नाहीं, इतका अरसिक पुरुष ह्या पृथ्वीवर कोणी असेल काय. ? ज्यांस अशा प्रकारचीं युद्धें पहावयास सांपडतील, ते त्या अप्रतिम मधुर रसाची चव घेतील ह्यांत कांहीं शंका नाहीं; कांकीं अशा प्रकारच्या युद्धांच्या वर्णनश्रवणानेंसुद्धां रसिकांच्या अंतःकरणांत तो वीररसानंद स्फुरूं लागतो. असो.

ज्या दिवशीं हें महायश पीतरास प्राप्त झालें, त्या दिवशीं सायंकाळीं त्यानें आपल्या तंबूमध्यें मोठा मेजवानीचा थाट केला. त्या ठिकाणीं त्यानें केवळ आपलेच सरदार बोलाविले होते असें नाहीं; तर स्वीदन राजाचे जे सरदार पाडाव करून आणिले होते, त्यांसही तेथें येण्याविषयीं आमंत्रण दिलें होतें. ते सर्व आले. पीतरानें सर्वांचा मोठा आदर सत्कार केला. सगळे आपापल्या जागीं बसले. पात्रें वाढिलीं. भोजनास आरंभ झाला. नंतर इकडच्या तिकडच्या गोष्टी चालल्या. तेव्हां पीतर म्हणाला, "ज्यांनीं मला ही युद्धविद्या पढविली, त्या गुरूंचें निरंतर कल्याण असो." तें ऐकून रेनस्केल्द म्हणून जो स्वीदनचा सरदार तेथें होता, त्यानें त्यास विचारिलें कीं, "महाराज, आपले गुरु ते कोण. ?" पीतरानें उत्तर दिलें, "अहो, तुम्ही शूर स्वीद सरदार, हेच माझे युद्धविद्येंतले गुरु आहां. तुम्हीच मला ही विद्या शिकविली." त्यावर भीड न धरितां त्या सरदारानें त्यास विचारिलें, "अहो, आम्ही स्वीद सरदार जर तुमचे गुरु आहोंत, असें तुम्ही म्हणतां, तर तुम्ही आम्हांशीं कृतघ्न होऊन इतक्या कडक रीतीनें वागावें, हें तुम्हांला शोभतें का-

य. ?" त्यावर पीतरानें कांहीं उत्तर दिलें नाहीं; आणि त्याचा त्याला रागही आला नाहीं. परंतु, त्याविषयीं आणखी कांहीं बोलणें नीट नाहीं असें जाणून त्यानें ती गोष्ट सोडून दिली. ठीकच आहे. मनुष्य मोठा शाहणा असो अथवा मोठा समर्थ असो. तो एकदा बोलून फसला, म्हणजे त्याला चूप राहणे भाग पडतें.- नंतर पीतरानें रेन्स्किल्द ह्यास आणखी असें विचारिलें कीं, "तुमचा राजा एवढा शाहणा आणि एवढा युद्धविद्याभिज्ञ असून, एवढेंसें सैन्य बरोबर घेऊन, त्यास कांहीं माहीत नाहीं अशा ह्या आमच्या देशांत आला कसा. ?" त्यानें सांगितलें, "आमच्या राजास लढाईच्या कामांत नेहमीं नेहमीं आपल्या सरदारांचें मत घ्यावयास नको. तो आमचा प्रभु आहे; आणि आम्ही त्याच्या प्रजा आहोंत; त्यानें आज्ञा करावी, आणि आम्हीं ती शिरसा वंद्य मानावी, एवढें आम्ही समजतों." हें भाषण ऐकून पीतरास मोठा संतोष झाला. आणि त्यानें त्या सरदाराची निस्पृहता आणि स्वराजनिष्ठा पाहून त्यास आपली तरवार बक्षीस दिली. ! ह्याचें नांव गुणज्ञता. ! वास्तविक पाहिलें असतां, ह्या सरदाराची स्वराजनिष्ठा ती पीतरास अत्यंत भयप्रद होती; ही गोष्ट कोणाचेही लक्षांत येण्याजोगी आहे; ती पीतराचे मनांत आली नसेल काय. ? परंतु, तो एकपक्षी विचार करणारा पुरुष नव्हता. सोनें हें कोणाचेही हातीं असलें तरी तें सोनेंच; तें शत्रूच्या हातीं गेलें तरी कांहीं पितळ व्हावयाचें नाहीं. त्याप्रमाणें स्वराजनिष्ठा ह्या सद्गुणाचा विचार थोर पुरुष करितात. रेनस्केल्द ह्याशीं जें पीतरानें आचरण केलें, तें ऐकून कोणालाही नवल वाटल्यावांचून राहणार नाहीं. तैमूरलंगास अशीच गुणपरीक्षा होती, व एके वेळीं त्यानें आपल्या शत्रूच्या पाडाव केलेल्या सरदारास अशीच एकदा शाबासकी दिली, असें एका पुस्तकांत लिहिलें आहे. थोरांच्या अंतःकरणांचे एकमेकांशी पुष्कळ सादृश्य असतें.

स्वीद फौजेची वाताहात झाली, तेव्हां तिचा प्रभु राजा चार्लस हा कोठें गेला ह्याचा पत्ता कांहीं वेळपर्यंत लागेना. त्याच्या लोकांच्या प्रेतांचा खच पडला होता, त्यांत देखील पीतरानें पुष्कळ शोध करविला. परंतु, ते सर्व श्रम व्यर्थ गेले. कारण, काल विपरीत दिसल्याबरोबर तो जो रणांगणांतून निघाला, तो कांहीं लोकांसहवर्तमान, बोरिस्थिनीस ही नदी पोंहून उतरून, तुर्कस्थानच्या बादशाहाच्या अमलांत बाग येथें पोहोंचला. तेथें सुलतानाचा सुभेदार होता. त्यानें त्याचा सत्कारपूर्वक स्वीकार केला. नंतर तो अतशाकव्ह शहराजवळ प्राप्त झाला. त्यास आंत येण्याविषयीं तेथचा सुभेदार परवानगी देईना; कारण, तसें केलें असतां सुलतानाची मर्जी खपा होईल कीं काय, अशी त्याला भीति होती. चार्लस राजा तेथून जो निघाला, तो नीट नीपरनदीच्या तीरीं बेंदर शहरीं आला. तें शहर तुर्कस्थानच्या सुलतानाच्या राज्यांत होतें. तेथून त्या सुलतानास कांहीं प्रकर्णी लिहिण्याचें कारण पडलें; तेव्हां त्यास लिहावयाची जी एक नियमित पद्धति होती, ती त्यास तेथच्या तुर्क लोकांनीं सांगितली. ती त्याला आवडली नाहीं. आणि त्यानें त्यांस साफ सांगितलें कीं, अशा रीतीनें सुलतानास लिहिणें हें मला लघुत्व आहे; तें मी कधीं करणार नाहीं. अशा त्याच्या हट्टी आणि हेंकड स्वभावामुळें त्यास नानाप्रकारचीं संकटें भोगावीं लागलीं. ह्याविषयीं व्हालतेर ह्यानें तर असें स्पष्ट लिहिलें आहे कीं, "कालदेशानुरूप कसें वर्तावें, हें चार्लसास मुळींच कळत नव्हतें." हें खरें दिसतें.

इकडे चार्लसाची जी सेना अवशेष राहिली होती, तिचा पाठलाग करण्याकरितां, लढाई झाल्यानंतर तीन दिवसांनीं, पीतरानें, बरोबर मोठें सैन्य देऊन, गालितझिन आणि बाअर ह्यांस रवाना केलें. ते चार्लसाच्या लोकांच्या दृष्टीस पडतांच, आपला काल प्रतिकूल जाणून, ते त्यांच्या स्वाधीन झाले. ह्यावि-

नं.

षयीं पीतरानें एकेठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, "कांहीं वर्षांपूर्वी जे लोक साक्सनीमध्यें छावणी करून राहिले असतां सर्व युरोपास थरथरां कांपवीत होते, ते परमेश्वराच्या कृपेनें आमच्या हातीं लागले." मोठमोठाले शूर सरदार गाईप्रमाणें गरीब होऊन आपल्या लोकांच्या ताब्यांत बसलेले पाहून पीतरास अतिशयित वाईट वाटलें; आणि तो वारंवार असें म्हणे कीं, केवळ आपली इच्छा पुरविण्याकरितां चार्लसानें एवढ्या सैन्यास संकटांत पाडिलें, हें कांहीं नीट केलें नाहीं. ! त्या लोकांविषयीं तो इतक्या दयार्द्र शब्दांनीं बोलला खरें; तरी त्यांची व्यवस्था लावतेवेळीं त्यास त्यांची दया आली नाहीं. त्यानें त्यांस सैबीरिआ प्रांतांत पाठवून दिलें, आणि त्यांजकडून तेथें वस्ती करविली. तो प्रदेश मनुष्यांस राहण्यास सर्व प्रकारीं दुःखप्रद होता. परंतु, बिचारे ते, निरुपाय होऊन, तेथें जाऊन स्थायीक झाले. ! मनुष्यास वेळाप्रमाणें व्हावें लागतें. ! दुसरा उपाय नाहीं. !

पलतुवा येथील युद्धामुळें सर्व युरोपभर मोठी गडबड होऊन राहिली. जुलमाच्या आणि बेबंदीच्या योगानें साक्सन लोक त्रस्त होऊन ओरडत होते. आगस्तस ह्यानें जाहीरनाम्यांच्या द्वारें असें प्रसिद्ध केलें कीं, " मी जी पूर्वी गादी सोडिली होती, ती स्वसंतोषानें सोडिली नव्हती; गादी सोडण्याविषयींचें भाषण मजकडून बलात्करानें वदविलें होतें; मी पोलांदामध्यें पुनः सिंहासनारूढ होणार. " पोलंदच्या लोकांचींही मनें त्याजकडे वळलीं होतीं. आणखी, आपला आश्रयाचा मूळ खांब जो चार्लस, त्याची अशी अवस्था पाहून स्तानिलास हा घाबरला, आणि मी राज्यत्यागास सिद्ध आहें, असें तो उघडपणें म्हणूं लागला. स्वीदनच्या लोकांस चार्लसाचा पत्ता पुष्कळ दिवसपर्यंत लागला नाहीं, तेणेंकरून तो कोठेंतरी मरण पावला असें समजून, पुढें राज्य चालविण्याची व त्याच्या रक्षणाची वाट काय, ह्या फिकीरींत ते पडले होते. व्हालतेरानें तर असें

लिहिलें आहे कीं, "पलतुवा येथील लढाईचा कांहीं धक्का इग्लंदांत सुद्धां अनुभवास आला. तो असा.—त्या वेळीं म्हणजे इ० स० १७०८ त इंग्लंद्च्या दरबारीं मातविआफ हा पीतराचा वकील होता. त्यास फार कर्ज असल्यामुळें त्याचे धनकोनें त्याला कैदेंत ठेविलें होतें. ही गोष्ट चुकून झाली, समजून उमजून झाली नाहीं, हें झार ह्यास प्रदर्शित करण्याकरितां इंग्लंदाची राणी आन हिनें लागलाच असा एक कायदा ठरविला कीं, कर्जाच्या कारणावरून कोणत्याही परदेशीय वकीलास प्रतिबंधांत घालूंनये. आणखी झार ह्याचा राग शमविण्याकरितां व्हाइतवर्थ नामक एक गृहस्थ त्याजकडे पाठविला." म्हणजे, व्हालतेराच्या म्हणण्याचें तात्पर्य असें कीं, पालतुवा येथील लढाई झाल्यावर युरोपांतलीं राष्ट्रें पीतरास पहिल्यापेक्षां अधिक भिऊं लागलीं. परंतु, ह्या मतास सबल प्रमाणें नाहींत, असें कितीएक ग्रंथकारांचें म्हणणें आहे.

पलतुवा येथें पीतरास जो जय मिळाला, तो त्यास आणखी मुलुख जिंकण्यास फार उपयोगीं पडला. एलबींग ह्या नांवाचें एक मोठें बळकट ठिकाण स्वीदनच्या राजाच्या ताब्यांत होतें, तें पीतराच्या फौजेनें हस्तगत केलें. पुढें रिगा नामकस्थलास ही त्याच्या सैन्यानें वेढा घातला होता; परंतु, तेथें जी एका रोगाची सांत उद्भवली, तिच्या योगानें सुमारें दाहा हजार रूस लोक प्राणांस मुकले. तरी तेथला वेढा उठविला नाहीं. शेवटीं, इ०स० १८१० च्या जुलै महिन्यांत, निरुपाय होऊन, तेथील लोक पीतराच्या सरदाराच्या स्वाधीन झाले. त्या स्थलाचा सुभेदार स्तेंबर्ग ह्यानें एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, त्या रोगाच्या सांतीनें त्या शहरांत व त्याच्या सभोंवतीं मिळून सुमारें साठ सहस्र माणसें मरण पावलीं. ! पुढें लवकरच परनाव आणि विरील हीं ठिकाणें रूसच्या फौजेनें घेतलीं. अशा प्रकारें सर्व लिव्होनिया देश पीतराच्या ताब्यांत आला.

तिकडे पोलांदामध्यें सर्व लोक आगस्तसाची वाट पाहात होते; आणि स्तानिलस हाही त्या घोंटाळ्यांतून मोकळा होण्याची संधी केव्हां प्राप्त होईल ह्याची वाट पाहात होता. परंतु, पीतरास भेटल्यावांचून आणि त्याचें मन प्रसन्न करून घेतल्यावांचून सिंहासनारूढ होणें हें सुलभ नाहीं, आणि चांगलेंही नाहीं, असें आगस्तसास वाटे; आणि पुनः त्याचे मनांत असें येईकीं, पीतराशीं आपण थोडे दिवसां पूर्वीं इतक्या कृतघ्नपणानें आणि मूर्खपणानें वागलों आहों, त्या अर्थीं त्याजकडे जाणें आणि त्याची मर्जी संपादण्याची खटपट करणें ह्यासारखें दुसरें लघुत्व नाहीं. म्हणजे, त्याच्या मनाला एकीकडे लोभ ओढी आणि एकीकडे अभिमान ओढी, परंतु, लोभाचा ओढा अत्यंत प्रबल होय. म्हणून शेवटीं त्यासच जय प्राप्त झाला. आगस्तस हा, पूर्वीं केलेल्या अपराधांची पीतरापाशीं क्षमा मागण्याकरितां थार्न येथें गेला. पीतर त्याला भेटला; आणि मागची कांहीं एक गोष्ट मनांत न आणितां, त्यानें त्याचा आदरसत्कार केला. वास्तविक पाहिलें असतां, पीतर रागीट स्वभावाचा होता, ह्यास्तव तो असें करावयाचा नव्हे. परंतु, तो मोठा मतलबी आणि दूरदृष्टि होता. त्याचे मनांत, मिळवितां येतील तितके राजे स्वपक्षास अनुकूळ करून घेऊन चार्लसावर स्वारी करावयाची होती. त्यामुळें उभयतांची भेट होऊन लागलाच मित्रत्वाचा तह ठरला. आणि त्या कटांत देन्मार्क व प्रुशिया येथील राजेही त्यानें मिळविले.

प्रुशिया देशच्या राजाशीं, मरीनवर्दर येथें तह ठरविल्यावर, पीतर तेथून निघाला तो तावडतोब रिगा येथें गेला. तेथची राज्यव्यस्था पुढें कशी काय ठेवावयाची, ह्याविषयीं नीट बंदोबस्त करून तो तेथून निघून पीतर्सबर्ग येथें गेला. तेथें शहराच्या सुधारणेचीं वगैरे कामें चालविलीं होतीं, तीं त्यानें पाहिलीं व त्यांत कोठें कमजास्त कसें पाहिजे तें सांगितलें. तो कोणत्या-

ही मोठ्या कामांत गुंतलेला असला, तरी पीतर्सबर्ग शहराकडे त्याचें लक्ष असे. पलतुवा येथें तर तो युद्धांत अगदीं निमग्न झाला होताना; तरी देखील त्या वेळेस, म्हणजे जय मिळाला त्या-दिवशीं सायंकाळीं नऊ वाजतां त्यानें एक खासगी पत्र लिहिलें, त्यांत त्यानें असें म्हटलें आहे कीं, "पीतर्सबर्ग शहराचा पाया पडला, ही परमेश्वराच्या कृपेची अत्युत्तम देणगी होय." पीतर्स-बर्ग येथून तो जो लागलाच निघाला, तो मास्को शहरांत प्राप्त झाला. तेथें सर्व लोक एकत्र जमून, आपल्या प्रभूनें स्वदेश-हितार्थ जे परिश्रम केले, त्यांबद्दल त्याचे आभार मानून महोत्सव करीत होते, हें पाहून पीतरास किती संतोष झाला असेल, तें त्याचें त्याला ठाऊक. त्याचें वर्णन करितां यावयाचें नाहीं. ह्या वर सांगिलेल्या ठिकाणीं पीतर फार थोडक्या वेळांत हिंडला,तेव्हां तो किती मेहनती होता, व तो स्वदेशहिताची किती काळजी वाहात असे, ह्याचें सहज अनुमान करितां येईल. असो.

चार्लसाची स्वारी पळत पळत आणि अश्रय मागत मागत बेंदर पर्यंत गेल्याची हकीकत आम्हीं वर लिहिली आहे, ती आमच्या वाचकांच्या लक्षांत असेलच. तेथून त्यानें क्रिमिआ-च्या खानाशीं संधान बांधिलें. आणि त्याजकडून तुर्कस्थान-च्या सुलतानास पीतराच्या प्रबलतेचें सर्व वर्तमान कळविलें; आणि क्रिमिआच्या सरहद्दीवर तो पुष्कळ मुसलमान लोकांस अत्यंत दुःख देत असे, ही गोष्टही त्यानें त्याचे कानावर घात-ली. तेव्हां सुलतानाचें मन तेव्हांच चार्लसाच्या सूचनेस मान्य झालें. त्यानें चार्लसाबरोबर लागलेंच सख्य करून, पीतराशीं युद्ध करण्याचा ठराव केला. सुलतानाच्या दरबारीं, म्हणजे कांन्स्तांतिनोपल शहरांत, कौंटतालस्तय म्हणून जो वकील हो-ता, त्यास धरून, त्याच्या कुटुंबासहवर्तमान, सात बुरुजांच्या किल्ल्यावर प्रतिबंधांत टाकिलें. हीच युद्धाची सूचना.

व्हालतेर ह्यानें एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, "प-

रदेशच्या दरबारांत पाठविलेल्या वकीलांच्या योगानें पीतराला जितका अपमान सोसावा लागला, तितका आपमान दुसऱ्या कोणत्याही राजास कधींही सोसावा लागला नसेल. पहा. ह्या थोडक्या मुदतीमध्यें, त्याचा लंदनचा वकील कर्जाच्या कारणावरून तुरुंगांत पडला होता; पोलंदांतला त्याचा वकीलतर चार्लसाच्या आज्ञेवरून अत्यंत नीच रीतीनें ठार मारला होता; आणि ह्या कन्स्तांतिनोपल येथल्या वकीलास, एकाद्या दरवडखोराप्रमाणें, रस्त्यांतल्या रस्त्यांत पकडून किल्ल्यावर टाकून दिलें." होय. हे हाल त्या वकीलांचे झाले खरे; परंतु, ते स्वतः आपले झाले असें पीतरास वाटलें असेल, आणि तेणेंकरून त्यास अतिशयित दुःख झालें असेल, ह्यांत संशय नाहीं. इतर सर्व प्रकारचीं आपलीं व्यंग राजा सहज दूर करितो; परंतु अपमानाची जखम भरून काढण्यास त्यास अतिशयित श्रम करावे लागतात. एवढेंच नव्हे; तर, अतिशयित श्रम करून देखील ती जखम बुजत नाहीं.

तुर्कस्थानचा सुलतान आपणाशीं युद्ध करण्यास सिद्ध झाला आहे, असें पीतरास समजतांच, तोही आपल्या तयारीस लागला. त्यानें प्रथम असा हुकूम केला कीं, पोलांदामध्यें जें सैन्य आहे, त्याची एक टोळी एकदम मोलदेव्हिआ येथें निघून जावी; स्किरिमाताफ ह्यानेंही आपल्या सैन्यासहवर्तमान लिव्होनिआ येथून निघून त्याच स्थलाचा मार्ग धरावा; बालतिक समुद्रामध्यें अझोफ येथें जें आरमार आहे, त्याचें स्वामित्व आप्राक्झिन ह्यानें घ्यावें; क्रुइस ह्या दच सरदारानें लिव्होनिआचा किनारा संभाळावा; आणि मेंझिकाफ ह्यानें पीतर्सबर्ग येथील सर्व कामेंकाजें पाहावीं. इतकी व्यवस्था लाविल्यावर पीतर हा पीतर्सबर्ग शहराहून निघाला तो, राज्यकारभाराची व्यवस्था लावून देण्याकरितां मास्को शहरीं आला. कारण, तुर्कस्थानच्या सुलतानाशीं युद्ध करण्यास एकदा गुंतल्यावर राज्यव्यवस्थेकडे

लक्ष देण्यास आपणाला सवड होणार नाहीं, हें तो पूर्णपणें समजत होता. तेथें त्यानें बंदोबस्त केला, तो असा.— त्यानें एक आठ गृहस्थांची सभा नेमिली; त्यांत गालिटझिन आणि दोलगोरोकी हे मुख्य केले. ते लागलेच भजनालयामध्यें गेले; आणि तेथें, झार, बडे लोक, आणि इतर मंडळी ह्यांच्या समक्ष त्यांनीं अशी शपथ वाहिली कीं, " आम्ही आपलीं सर्व कामें, प्रभुवर निष्ठा ठेवून, इमानेंइतबारें बजावूं; न्यायानें वागूं; न्यायकरूं; कोणावर नाहक्क जुलूम जबरदस्ती होऊं देणार नाहीं; आणि राजहिताकडे लक्ष ठेवून पैशाचा खर्च करूं. " पुढें लष्कर तयार करतांना एक मोठी अडचण आली. ती अशी कीं, सैन्यांत खालच्या प्रतीच्या अधिकारांवर जे लोक होते, ते सगळे हलक्या कुळांतले होते, त्यांस मोठ्या हुद्याच्या जागा देणें प्रशस्त वाटेना; आणि कुलीन पुरुष फौजेंत मिळतना, आणि तशा जागा भरल्याखेरीज काम पुढें चालेना. ही गोष्ट पीतरास कळतांच, त्यानें असें ठरविलें कीं, अमुक वयाच्या बडे लोकांच्या मुलांनीं लष्करांतली अमुक जागा धरलीच पाहिजे. ती आज्ञा लोकांनीं मान्य केली; आणि फौजेची व्यवस्था सर्व बरोबर लागली.

ह्या प्रमाणें मास्को येथील कारभाराचा बंदोबस्त केल्यावर, सुलतानाशीं युद्ध करण्यास जें सैन्य सिद्ध झालें होतें, त्यास मिळण्याकरितां पीतराची स्वारी निघाली. त्या दिवशीं मोठा समारंभ करून, त्यानें सर्व लोकांस पुनः एकवार असें विदीत केलें कीं, क्याथेराइन ही माझी पट्टराणी आहे. खरोखर, ह्या स्त्री पुरुषांची जी प्रीति एकमेकांवर होती, ती अप्रतिम होती. ही स्त्री जशी रूपवती, आणि गुणवती होती, तशी शूरही असे. झाराची स्वारी तुर्कस्थानच्या सुलतानाशीं लढण्याकरितां जाण्यास निघाली, तेव्हां आपणास बरोबर घेण्याविषयीं तिनें त्याला मोठी गळ घातली. हें स्त्रीरत्न अति सुकुमार, ह्याला प-

वासाचे कष्ट सोसावयाचे नाहींत, अति श्रम होतील, असें मनांत येऊन पीतराच्यानें तिला होय म्हणवेना; आणि तिच्या प्रेमानें त्याचें अंतःकरण भरून गेलें होतें, तें त्याला नाहीं म्हणूं देईना. शेवटीं तिनें आपलें म्हणणें खरें केले. म्हणजे पीतरानें तिला आपणाबरोबर घेतलें. पहा. युद्धप्रसंग हा बहुधा फार भयंकर असतो; त्यामध्यें सुख तर प्राप्त व्हावयाचें नाहींच, परंतु संकटें हटकून यावयाचीं; हें म्हणजे त्या चतुर स्त्रीस कळलें नसेल, असें नाहीं. परंतु, झारावर तिची प्रीतीच अतिशयित, आणि त्याजवांचून तिला पळभर सुद्धां करमेना, म्हणून ती त्याबरोबर निघाली. तिचें जन्म हलक्या कुळांत झालें होतें; आणि तिला शिकविण्यासवरण्याचीही म्हणजे कोणीं फार मेहनत केली होती असें नाहीं. परंतु, परमेश्वरानें तिला स्वभावतः उत्तम गुण दिले होते. दुसऱ्याचें मन कसें वळवावें, राग कसा शांत करावा, आणि, कोणास न दुखवितां आपला हेतु कसा सिद्धीस न्यावा, ह्या कला तिच्या ठायीं पूर्णपणें वसत होत्या. आणखी शिवाय, ती लावण्याची केवळ खाण होती. तेणेंकरून पीतराला ती जीव का प्राण वाटे; खरोखरच, ती जवळ असली म्हणजे जसें पीतरास सुख होई, तसें दुसऱ्या कोणत्याही गोष्टीनें होत नसे. फार काय सांगावें, कांहीं कारणांवरून पीतराला जर अतिशयित राग आला, आणि तो त्याच्या योगानें अगदीं वेडा होऊन गेला, तर तिला त्याजकडे पाठवावें, म्हणजे लागलाच तो सर्व राग विसरून, त्यानें शुद्धीवर यावें आणि तिजपाशीं मजेनें बोलूं लागावें, असें हमेषा घडे, असें तेव्हांचे ग्रंथकारांनीं लिहून ठेविलें आहे. जनरल गार्दन ह्याचें मत असें आहे कीं, “ती अत्युत्तम स्वभावाची होती म्हणूनच ती त्याला इतकी आवडत असे; दुसरें कांहीं कारण नाहीं. ती कधीं कोणाशीं खिसखीस घालीत नसे, व कधीं कोणावर रागावत

नसे; तिनें कधीं कोणाचा अपमान केला नाहीं, व तिचें थोडें काम कोणीं केलें तरी त्याचे उपकार मानल्याखेरीज ती राहिली नाहीं; परहित करण्याचा प्रसंग आला तर ती तो कधीं फुकट जाऊं देतनसे; आणि ती आपली पूर्वस्थिति कधींही विसरली नाहीं." व्हालतेर असें म्हणतो कीं, "क्यायेराइन हिच्या मध्यस्थीनें, पीतराचा क्रोध शांत होऊन, कितीएक बिचाऱ्या निरपराधी मनुष्यांचे फटके चुकले, इतकेंच केवळ नव्हे, तर प्राणही बचावले; इतके उपकार लीफोर्त ह्यांचे हातून देखील झाले नव्हते." ही स्त्री मूळची पाहिली तर अगदीं हलक्या कुळांतली होती; आणि ती आपल्या सौंदर्याच्या व गुणांच्या योगानें महत्पदास चढली होती; तरी ती कधीं कोणाच्या डोळ्यांत खुपली नाहीं; ह्यावरून तिच्या स्वभावाची योग्यता फार मोठी होती, असें म्हटलें पाहिजे.

आधीं गरीबी असून मग वैभव प्राप्त झालें असतां, मनुष्यास पहिले दिवस आठवूं नयेत, व पूर्वींच्या माणसांची ओळख राहूंनये, असा प्रकार ह्या जगामध्यें फार दिसून येतो. ती गोष्ट क्यायेराइन हिला लागू नव्हती. ती पृथ्वीपतीची पट्टराणी होऊन बसली होती, तरी तिचे पहिले विपत्तीचे दिवस तिला नेहमीं डोळ्यांपुढें दिसत असत. त्या वेळच्या ओळखीचा कोणी मनुष्य दृष्टीस पडला असतां, ती त्याचा मोठा आदरसत्कार करी, त्याशीं पहिल्याप्रमाणें मोकळेपणें बोले, आणि त्याच्या योग्यतेनुरूप त्याची संभावना करी. ती पूर्वीं ग्लक ह्याचे घरीं असतां, त्याच्या मुलांस शिकविण्याकरितां वरंब ह्या नांवाचा एक गृहस्थ त्यानें ठेविला होता, तो एके वेळीं तिच्या दृष्टीस पडला. तेव्हां तिनें त्याला बुद्ध्या बोलावून आणून म्हटलें कीं, "अहो, आपण अद्यापि जीवंत आहां काय. ? बरें; मी तुमच्या निर्वाहाची तजवीज करून देतें." असें बोलून लागलेंच तिनें त्याला कांहीं पेनशन करून दिलें. ग्लक ह्याच्या कुटुंबाचाही ती पुष्कळ

समाचार घेत असे. तिनें त्याच्या बायकोला कांहीं थोडें पेनशन करून दिलें; त्याच्या मुलास चाकरीस ठेविलें, आणि त्याच्या दोन मुलींस स्वतः आपणापाशीं बाळगिलें. ह्यावरून तिला पहिले दिवस किती आठवत होते, हें सहज लक्षांत येईल. असो.

तुर्कस्थानच्या सुलतानाशीं युद्ध करण्याकरितां झार ह्याची स्वारी क्याथेराइन इजसहवर्तमान निघाली, ती, सोरोकत येथें आपल्या मुख्य सैन्यास जाऊन मिळाली. तेथें, त्याचें सर्व लष्कर सुमारें तीस हजार होतें, असें ब्रूसनामक ग्रंथकारानें लिहिलें आहे. त्या लष्कराचे, सारखेसारखे असे पांच भाग केले होते. त्यांतल्या पहिल्या भागाचें आधिपत्य झारानें आपणाकडे घेतलें; आणि बाकीच्या चोहोंवर वेगवेगळे सरदार नेमिले. ह्या सेनेबरोबर तोफखानाही मोठा होता. तीस हजार स्वारांची एक टोळी तुर्क सरकारचा एक मोठा किल्ला कावीज करण्यास व त्यांतील युद्धसामग्री घेण्यास योजिली होती. आणि कोसाक वगैरे लोक पीतराच्या सैन्यास मिळण्याकरितां निघाले होते. ते सर्व जर एकत्र होते, तर पीतराच्या फौजेंत एकलक्ष तीसहजार लोक झाले असते. परंतु, ते, वेळेस येऊन पोहोंचले नाहींत, म्हणून अगदीं आणीबाणीच्या वेळीं, झाराच्या हाताखालीं चाळीस हजारांपेक्षां अधिक सैन्य नव्हतें, असें एके ठिकाणीं लिहिलें आहे.

इतर कोणाची वाट न पाहतां एकदम मोहिमीवर निघण्याचा निश्चय पीतरानें केला; आणि असा सक्त हुकूम फरमाविला कीं, लष्करावरोबर ज्या बायका आहेत, त्यांनीं मागें राहिलें पाहिजे. तेव्हां क्याथेराइन हिनें त्यास अशी विनंती केली कीं, "कृपा करून मला बरोबर न्यावें; आपल्या विरहाचें दुःख माझ्यानें सोसवणार नाहीं." त्यावर पीतरानें तिला असें उत्तर दिलें कीं, "तूं फार सुकुमार आहेस; ज्या प्रदेशीं जावयाचें, तो प्रदेश अतिशयित रखरखीत आणि भयानक आहे; आणि यु-

द्धाच्या प्रसंगीं कोणती वेळ कशी येईल ह्याचा नियम नाहीं; ह्यास्तव तूं स्वदेशीं स्वस्थ राहावें, हें आम्हांस बरें दिसतें; ह्या-उपर तुझी मर्जी. !" इतकें सगळें बोलणें तिनें स्तब्धपणें ऐ-कून घेतलें, पण तिचें मन एक तिळभर देखील वळलें नाहीं. बरोबर येण्याविषयीं ती आपला आग्रह सोडीना; असें पाहून पीतरानें तिच्या म्हणण्यास रुकार दिला. ती कधीं फारशी गाडींत बसत नसे; तर नेहमीं मोठ्या खंद्या घोड्यावर बसून, एकाद्या मोठ्या जुनाट सरदाराप्रमाणें आपल्या सैन्याच्या अग्रभागीं चाले; आणि ती शूर दिसे. तेणेंकरून पीतराच्या लष्करांतील शिपायांस युद्धाविषयीं स्फुरण चढे. कोणी शिपाई किंवा अमलदार आजारी पडला असें समजल्याबरोबर ती त्यास औषध आणि पथ्यपाणी पाठवून देई. तेव्हां, पीतराच्या लष्करांतले लोक तिला फार चांगले चाहात असत, व तिचा मान ठेवीत असत, ह्यांत कांहीं नवल नाहीं. झारानें आपली राणी बरोबर घेण्याचा विचार केला असें पाहून, इतर सरदारांनीं, तिच्याच मार्फत, आपल्या बायका बरोबर घेण्याच्या परवानगीविषयीं त्यास विनंती केली. ती तिच्या मध्यस्थीनें त्यांस मिळाली. ह्या प्रकारें ह्या मोहिमीबरोबर जनानखाना निघाला. एक ग्रंथकार असें म्हणतो कीं, "हा जनानखाना बरोबर होता, म्हणूनच पीतराचा व त्याच्या सैन्याचा बचाव ह्यावेळेस झाला; नाहींतर, त्यांचीच काय, पण सगळ्या रूस देशच्या राज्याची धूळधाणी झाली असती." ह्या म्हणण्याचें तात्पर्य वाचकांस पुढील हकीकतीवरून दिसून येईल.

पीतराची स्वारी जास्सी शहराकडे चालली. तेव्हां वाटेनें जातांना, त्यानें वालाकिया येथील राजाशीं तह करून त्यास आपले पक्षाकडे वळवून घेतलें. व त्यानें त्यास साह्य करण्याविषयीं वचन दिलें. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. तेव्हां झाराचें सैन्य तसेंच पुढें चाललें. तथापि, तो काळ त्या-

ला अनुकूल नव्हता. ह्यामुळें त्याला एकामागून एक अशीं सं-
कटें प्राप्त झालीं, तीं कशीं तीं पहा. प्रथमतर त्याचे मागें टो-
ळांचा उपद्रव लागला. तो असा कीं, ते त्या सैन्याबरोबर ने-
हमीं चालत, व वाटेंतील झाड पाल्याचा व गवत काडीचा इत-
का फन्ना पाडीत कीं, लष्करांतील जनावरांस उगाच तोंड हालं-
विण्यास देखील कोठें जागा मिळेना. ! फार काय सांगावें. !
झाडांवरच्या कोंवळ्या कोंवळ्या सालीसुद्धां त्यांनीं राहूं दिल्या
नाहींत. ! तेव्हां त्यांच्या पानांचें नांव कशास पाहिजे. ! त्यांस
घिसपिटावून लावण्याकरितां पीतराच्या सरदारांनीं पुष्कळ तोफा
सोडिल्या व बंदुका उडवून पाहिल्या. परंतु, त्यांचा उपद्रव
तिळभर देखील कमी झाला नाहीं. ! तेव्हां सर्व लोक अगदीं
त्रस्त व निराश होऊन गेले. !

तरी पीतरानें धैर्य सोडिलें नाहीं. त्या वेळेस ब्रूस म्हणून
जो एक इंग्लिश सरदार त्याचे लष्करामध्यें चाकरीस होता, त्या-
चा ह्याविषयीं लेख आहे, तो असा.– "आम्हीं ता० १८ जून
रोजीं प्रूथनदीवर येऊन पोहोंचलों. तेथें आमच्या ओझ्याच्या
घोड्यांनीं अतिशयित पाणी प्याल्यामुळें, त्यांतील कितीएक
तत्काळ मरण पावलीं. २१ व्या तारखेस आम्ही प्रूथनदीच्या
बाजूनें खालीं चाललों तों पुनः टोळांच्या एका मोठ्या टोळीनें
आम्हांस गांठिलें. ते आम्हांस कधीं सोडीत नसत. म्हणजे,
आम्ही चालत असलों म्हणजे आम्हांबरोबर राहात; आणि आ-
म्हीं मुकाम केला कीं ते सगळ्या लष्करास व्यापून टाकीत. हे
आम्हां बरोबर २७ व्या तारखेपर्यंत होते. त्याच दिवशीं तुर्क
लोकांची फौज प्रूथ नदी उतरतांना आमच्या दृष्टीस पडली.
त्यांस आड येण्याकरितां पीतरानें, कांहीं सैन्या सहवर्तमान, जन-
रल जानसन ह्यास पाठविलें. परंतु, ह्या कृत्यास फार उशीर
लागल्यामुळें, तुर्क लोकांचें तें लष्कर ती नदी उतरून अलीक-
डे आलें. त्या सैन्यांत दोन लक्ष लोक होते."

हें प्रचंड सैन्य दृष्टीस पडतांच पीतरानेंही युद्धाची सिद्धता केली. तेव्हां, त्यांस आपल्या स्वारांकडून वेढा घालवून, त्यांची आणि नदीची जी संनिधता होती ती नाहींशी करावी, असें तुर्क सरदारांच्या मनांत होतें. व त्याकरितां त्यांनीं प्रयत्न ही पुष्कळ केले. परंतु, ते सगळे व्यर्थ गेले. कारण पीतरानें, आपल्या लष्कराच्या रांगा लागल्याच त्या नदीच्या उजव्या तीरापर्यंत पसरिल्या. तथापि, त्याच्या लोकांची पूर्वींच फुटाफूट झाली होती; व त्यांचे घोडे पुष्कळ मेले होते; तेणेंकरून, बरोबर न घेतां येण्यासारख्या सामानास जी त्यांनीं आग लावून दिली, तिच्या योगानें रूस देशच्या लष्कराची किती धांदल उडाली आहे, हें मात्र तुर्क सरदारांस तत्काल दिसून आलें. पहा. आपलें सामान शत्रूंच्या हातीं लागूं नये, म्हणून जी ही खटपट पीतराच्या लोकांनीं केली, तिचा परिणाम अगदीं उलटा झाला. म्हणजे, तिच्या योगानें फायदा व्हावयाचा एकीकडेसच राहून, मोठा तोटा झाला. तो असा. झाराचे लष्करांत अशी धांदल आहे असें समजतांच तुर्क लोकांनीं त्यांजवर एकदम हल्ला करण्याचा निश्चय केला; म्हणजे, त्यांस पराभवाची भीति मुळींच राहिली नाहीं. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं, पीतरानें आपलें सैन्य नदीच्याकांठीं चौरसाकृति उभें केलें; तिची चवथी बाजू नदीच होती. त्या चौरसामध्यें गाड्यांचें कोंडाळें करून त्यांच्या मध्यें बायकामुलांस ठेविलें. त्यांजवर तुर्क सैन्याचा मार चालू झाला. रुसाकडील लोक आधींच थकले होते; आणखी त्यांचें सामान सुमान सरलें होतें; आणि शिवाय प्रबल शत्रूंनीं त्यांस तिहींकडून वेढून टाकिलें होतें; तेव्हां त्यांची स्थिति कशी झाली असेल, हें त्यांच्याच मनांस पुसलें पाहिजे, इतरांस त्यांची कल्पना देखील करतां यावयाची नाहीं. असा मार एकसारखा तीन दिवस चालला होता. तेव्हां पीतर सुद्धां अगदीं घाबरून गेला. त्याला कांहीं एक सुचेनासें झालें. त्याला असें वाटलें

कीं, काय व्हावयाचें असेल तें होवो असें समजून लढण्यास कंबर बांधावी एक; अथवा शत्रूस शरण जावें एक, ह्यांवेगळी दुसरी गति राहिली नाहीं. चवथा दिवस उजाडल्यावर त्यास असें कोणीं येऊन सांगितलें कीं; लढाईचें सामानसुमान सर्व सरून गेल्यामुळें सरदार लोक मोठ्या पंचाइतींत पडले आहेत. हें कानीं पडतांच, घोड्यावर बसून शत्रूची फळी फोडून जाण्याचा विचार त्यानें मनांत आणिला; आणि त्याप्रमाणें आपणाबरोबर येण्याविषयीं आपल्या कितीएक सरदारांस सांगितलें, असें ब्रूस साहेबानें लिहिलें आहे. परंतु, आपल्या आवडत्या शूर लोकांस व जीवापलीकडच्या पट्टराणीस अशा संकटावस्थेंत टाकून निघून जाण्याची इच्छा पीतरास व्हावी, असें त्याच्या स्वभावावरून दिसून येत नाहीं. व्हालतेर ह्या सुज्ञ ग्रंथकारानेंही ह्या प्रसंगाचें वर्णन केलें आहे. त्याचें तात्पर्य असें आहे कीं, “युद्धप्रसंग करून आपणास, आपल्या लष्करास, आणि आपल्या प्राणप्रियेस, महत्संकटांत घालावें अथवा दुसरें काय करावें, अशा विचारांत गुंग होऊन; अगदीं गडबडून, तो एकटा आपल्या तंबूंत जाऊन बसला; आणि तंबूचीं दारें बंद करून त्यानें असा सक्त हुकूम देऊन ठेविला कीं, कोणास ही आंत येऊं देऊं नये. हें वर्तमान, याची राणी क्याथेराइन हिला समजतांच, ती लागलीच त्याच्या तंबूंत गेली. तेव्हां नेहमींप्रमाणें, त्याचें अंतःकरण किंचित शांतता पावलें; आणि, तिला बरोबर आणिल्याचें फळ त्या वेळीं त्याच्या अनुभवास आलें.”

संनिध प्राप्त झालेल्या संकटाचें महत्व क्याथेराइन हीस चांगलें स्पष्ट दिसत होतें. तें आपल्या प्रिय पतीच्या मनांत भरवून, तिनें त्यास आपले मतास अनुकूल करून घेतलें. तेथें त्याच्या अनुमतानें तिनें असें ठरविलें कीं, एका वकिलापाशीं कांहीं मोलवान नजराणा देऊन त्यास तुर्क सरदाराशीं तह करण्याकरितां पाठवावें. नंतर तिनें आपल्या आंगावरचे दागिने

काढिले; तसेच, लष्करांतील इतर लोकांपाशीं जें कांहीं बहुमोल जवाहीर होतें तें तिनें त्यांजपासून घेऊन, त्यांच्या किमती मास्को येथें परत गेल्यावर देण्याचे कबुलायतीविषयीं पत्रें लिहून दिलीं; त्या नजराण्या सहवर्तमान, बरोबर एक पत्र देऊन, शाफिराफ ह्या नांवाचा एक प्रधान तुर्क सरदाराकडे पाठविला; आणि अशा प्रकारें शत्रूचें मन शांत करून तिनें त्यांशीं तह ठरविला. ही गोष्ट तारीख २३ जुलै रोजीं घडली. ह्या तहामध्यें अनेक कलमें होतीं. त्यांत दोन तीन फार महत्वाचीं होतीं, तीं हीं:— झार ह्यानें पोलंद देशच्या लोकांशीं कोणत्याही प्रकारें संबंध ठेवूनये; अझोफ घेतलें आहे तें परत द्यावें; आणि, स्वीदनचा राजा चार्लस ह्यास त्याच्या राजधानीस जाण्यास आपल्या देशांतून निर्भय मार्ग द्यावा. हीं सर्व कलमें झार ह्यानें कबूल केलीं. इतकेंच नव्हे; तर, तीं अमलांत येतपर्यंत ओलीस राहण्याकरितां आपले एकदोन सरदार त्यास तुर्क सरदाराकडे पाठवावे लागले. पहा. पीतर एवढा पराक्रमी असून देखील त्याला असा अनिष्ट प्रसंग प्राप्त झाला. ! काळ फिरला म्हणजे यशःसंरक्षण हें परम दुष्कर होय.

तिकडे बारावा चार्लस बेंदर येथें होता, त्याची अगदीं दुर्दशा झाली होती. त्याचें आणि तुर्कस्थानच्या सुलतानाच्या प्रधानमंडळीचें वैमनस्य आलें होतें. ह्यास्तव, त्या मंडळीस सुलतानाकडून घालवून देण्याविषयीं त्याने प्रयत्न चालविला होता. ह्या कामीं त्यानें अनेक उपाय योजिले. ते सर्व व्यर्थ जाऊन उलटें एवढें मात्र झालें कीं, त्याच्या निर्वाहार्थ तुर्क सरकारांतून जी नेमणूक त्याला मिळत होती, ती बंद होऊन, त्यानें तुर्कस्थानच्या राज्याच्या अमलांतून एकदम निघून जावें, असा सक्त हुकूम सुटला. ! पहा, प्रारब्धाची गति कशी विचित्र आहे ती. ! जो पुरुष पाहिजे त्यास राजा बनविण्यास समर्थ होता, त्यास राहण्यास थारा नाहींसा होऊन निर्वाहाची पंचाईत पडली. !

अशा गोष्टी इतिहासांतरीं पाहून धनांधांनीं सावध व्हावें. असो.

वर सांगितल्याप्रमाणें पीतराचा व तुर्क सरदारांचा तह झाला. सर्व गोष्टींची शांतता झाली. तरी चार्लसानें आपली खटपट सोडिली नाहीं. पीतराशीं युद्ध करण्याकरितां जें तुर्कस्थानच्या सुलतानाचें सैन्य आलें होतें, त्यावरचा मुख्य अधिकार त्यानें आपल्या वजीरास दिला होता, त्या वजीराकडे चार्लस गेला; आणि त्यानें त्यास बुद्धचा आपण होऊन असें सांगितलें कीं, " तुमच्या तावडीस झार इतका सांपडला असून, तुम्हीं त्याला कैदेंत ठेविलें नाहीं, ही मोठी चूक केली." त्यावर वजीरानें त्यास असें म्हटलें कीं, "अहो, मीं जर त्याला धरून कैद केलें असतें, तर त्याचें राज्य कोण चालविता. ? मी तुम्हांला खरोखरच सांगतों, राजांनीं सहसा आपलीं घरें दारें सोडून अशा परदेशांत कधीं येऊं नये, हें चांगलें." बरें इतकें झाल्यावर तरी चार्लसानें चूप बसावयाचें होतें कीं नाहीं. ? पण, त्याच्यानें स्वस्थ राहवेना. तो त्या वजीरास बोलला, "अहो, अझून मला वीसहजार लष्कर द्या, मी त्याला चतुर्भुज करून आणितों." त्यावर वजीरानें उत्तर केलें, "छिः छिः ! अशी गोष्ट तोंडांतून काढूं सुद्धां नका. ! अहो, त्याशीं आम्हीं तह केला, आणि त्याचे ओलीचे लोक सुद्धां पतकरिले, आणि आतां असा विश्वासघात करावा काय. ? " हे शब्द कानीं पडतांच चार्लसाच्या पायांची आग मस्तकास चढली; आणि त्यानें रागानें पाय आपटून, वजीराचा झगा फाडून घोड्यावर बसून, नीट वाट धरिली. ! ह्या वृत्तीस काय म्हणावें बरें. ?

---

## भाग पांचवा.

आपल्या वजीरानें पीतराचा पराभव करून त्यापासून पाहिजेतसा तह ठरवून घेतला, असें वर्तमान कान्स्तांतिनोपल

येथें सुलतानास समजलें, तेव्हां त्याला मोठा संतोष झाला. ताळूस्ताय म्हणून पीतराकडचा वकील जो सात बुरुजांच्या किल्ल्यांत प्रतिबंधामध्यें ठेविला होता, त्यास मोकळें करण्याची परवानगी झाली. आणि शाफिराफ व स्केरिमानाफ हे दोन गृहस्थ जे झाराकडून ओलीस म्हणून आले होते, त्यांचा त्यानें आदरपूर्वक स्वीकार केला. तहामध्यें ठरल्याप्रमाणें, जीं जीं ठिकाणें तुर्क सरदाराकडे द्यावयाचीं होतीं, तीं झारानें लागलींच सोडिलीं. तरी; त्यांहीपेक्षां दुसरा विशेष अनुकूल तह करून घेण्याविषयीं सुलतानाचे मनांत कोणीं भरवून दिल्यावरून, पुनः नवा तह ठरला. त्यावर पीतराच्या आज्ञेवरून, ताळूस्ताय ह्यानें सही केली.

चवथ्या भागांत सांगितलेलें युद्ध संपवून पीतर परत आला, तेव्हां, त्याची प्रकृति, काळजीनें व कष्टानें अगदीं बिघडली होती. म्हणून, तो पाणी पालटण्याकरितां, कार्ल्सबाद* येथें जाऊन राहिला. आणि तेथून त्यानें असा हुकूम फर्माविला कीं, पोमरानिया ह्या स्वीदनच्या ताब्यांतल्या प्रांतावर हल्ला करावा, व स्त्रालसंद हें ठिकाण छापा घालून घ्यावें. म्हणजे त्याचा निश्चय झाला होता कीं, जर्मनी देशामध्यें स्वीदनच्या राजाचा अमल तिळभर देखील राहूं द्यावयाचा नाहीं. थोड्या दिवसांनंतर तो कार्ल्सबाद येथून निघून ड्रेसदन येथें गेला. तेथें त्याची व त्याचा पुत्र आलेक्सिस ह्याची गांठ पडली. तेव्हां आलेक्सिस सुमारें बावीस वर्षांचा होता. ते बापलेंक तेथून निघून थर्गा येथें गेले; तेथें जर्मनीच्या बादशाहाच्या राणीच्या बहिणीचें लग्न आलेक्सिसाशीं होण्याची सर्व तयारी झाली होती. ती स्त्री आठ वर्षांची होती. आलेक्सिस हा अगदीं बिघडलेला आणि बदचालीचा असल्यामुळें त्याचें आणि त्याच्या बायकोचें कधीं बनलें नाहीं.

---

* हें शहर आस्त्रालिआमध्यें आहे.

ह्या लग्नसमारंभांत क्याथेराइन मुळींच नव्हती; तिला पीतरानें थार्न येथें ठेविलें होतें. कारण, हिचा विवाह आपणांशीं जसा संस्कारपूर्वक व्हावा तसा नझाल्यामुळें, त्या कार्यांत, जर्मनलोक, हिचा मानमरातब यथायोग्य ठेवणार नाहींत, आणि तेणेंकरून हिला उगाच राग येईल, ह्यास्तव, तो प्रसंग मुळींच टाळावा, असा त्याचा हेतु होता. आलेक्सिसाचा लग्नसमारंभ आटपल्यावर, झाराची स्वारी, तारीख २९ दिसेंबर सन १७११ रोजीं परत पीतर्सबर्ग शहरीं गेली. तेथें त्यानें असें मनांत आणिलें कीं, क्याथेराइन हिशीं आपलें लग्न संस्कार पूर्वक झाल्याखेरीज युरोपच्या राष्ट्रांमध्यें तिची मानमान्यता बरोबर राहणार नाहीं, ह्यास्तव तें एकदा करून टाकिलें पाहिजे. त्याप्रमाणें इ० स० १७१२ च्या फेब्रुवारी महिन्याच्या २६ व्या तारखेस तो टोलेजंग संस्कार त्यानें यथाविधि करून घेतला. तेव्हां शहरामध्यें मोठी आरास केली होती, व दारूकामही पुष्कळ उडविलें.

पीतर असा गुंतला होता, तरी, सेंत पीतर्सबर्ग शहराच्या व राज्याच्या सुधारणेकडचें त्याचें लक्ष कमी झालें नव्हतें. त्यानें कांहीं नवीं गलबतें बांधण्याचें काम सुरू केलें; तोफा व बंदुका ओतण्याचा कारखाना पुरता तयार करविला; कांहीं नवे कालवे खणविण्याचा विचार केला; कांहीं नवे रस्ते बांधिले; परदेशाशीं व्यापार करण्याविषयीं उत्तेजन दिलें; पीतर्सबर्ग शहरांत आणखी घरें बांधण्याविषयीं लोकांस हुकूम फर्माविला; आणि कारभारीमंडळीची सभा जी मास्को शहरांत भरत असे, ती पीतर्सबर्ग शहरामध्यें भरत जावी, असा नियम त्यानें ठरविला.

बारावा चार्लस बेंदर येथें तुर्क सरकाराच्या औदार्यावर निर्वाह करीत आणि त्याशींच भांडत राहिला असतां, इकडे पीतरानें देन्मार्क आणि साक्सनी येथील राजांस अनुकूळ करून घेऊन, त्यांच्या साह्यानें पोमरानिआ प्रांतावर हल्ला करण्याचा

विचार केला. त्याप्रमाणें सर्व सिद्धता झाली. मेंझिकाफ त्यानें आपल्या तीस हजार लोकांसहवर्तमान, उभयतां साह्यकारी राजांच्या एकत्र झालेल्या सैन्यास जाऊन मिळावें असा झाराचा हुकूम झाला. पीतर स्वतां आपल्या पट्टराणीसहवर्तमान पुष्कळ सैन्य बरोबर घेऊन निघाला, तो प्रथम स्त्रालसंद येथें आला; आणि तें स्थळ त्यानें छापा घालून घेतलें. स्वीदन देशाकडील स्तीनबाक ह्या नांवाचा सरदार, बरोबर अकराबारा सहस्र सेना घेऊन ह्या त्रिकुटाच्या सैन्याशीं टक्कर देण्यास आला होता. त्याचें लष्कर आणि देन्मार्क व सास्कनी येथील एकत्र फौजा हीं जवळ जवळ प्राप्त झालीं तेव्हां रूस देशचें सैन्य दोनतीन कोस मागें होतें. ह्यास्तव, पीतरानें देन्मार्कच्या सरदारास सांगून पाठविलें कीं, आम्ही तावडतोब निघून येऊन तुम्हांस मिळतों, तों पर्यंत तुम्ही शत्रूवर हल्ला करण्याची घाई करूनये. परंतु, त्या सरदारास असें वाटलें कीं, रूसच्या सैन्याची वाट पाहून, त्यास आपल्या यशास विभागी करण्यापेक्षां शत्रूवर एकदम चाल करून आपलें सामर्थ्य प्रगट करावें, हें बरें. असा विचार करून त्यानें स्वीदनच्या सैन्यावर एकदम हल्ला करून यश मिळवायाचा घाट घातला. परंतु, तें त्याला साधलें नाहीं. त्याचा केवळ पराभव झाला, आणि स्तीनबाक हा विजय पावला.

स्तीनबाक हा शूर आणि बुद्धिमान योद्धा होता. परंतु, त्याचा स्वभाव कांहींसा हेंकट आणि दुराग्रही असे. गादीबस्क येथें त्याची फत्ते झाल्यावर तो, मोठा जयजयकार करीत आलतोना ह्या गांवीं गेला. तेथील लोक व्यापारधंदा करून आपली उपजीविका करीत असत; आणि त्यांनीं कधीं कोणत्याही पक्षाच्या वतीनें हातीं शस्त्र धरिलें नव्हतें. असें असतां, त्या दुष्टानें त्या गांवांतील घरांस मध्यरात्रीं आग लावून सर्व मुलांमाणसांची होळी करून टाकिली. ! वास्तविक पाहिलें असतां तीं बिचारीं अगदीं निरपराधी होतीं. परंतु, त्यांजवर असा ग-

जब गुदरला. ! पहा जगाची राहटी कशी विलक्षण चालली आहे ती. ! असो. स्तीनबाक ह्याच्या मागोमाग पीतर त्या गांवीं आला. तेव्हां, त्या लोकांची ती दुर्दशा पाहून त्याला अतिशयित वाईट वाटलें. आणि त्यानें तेथल्या गरीब लोकांस थोडथोडा पैसा वांटिला. नंतर, स्तीनबाक फ्रेदरिकस्ताद ह्या शहरीं जाऊन राहिला. तेथें पीतरानें त्याजवर हल्ला केला. तेव्हां तो त्यास भिऊन तानिनजेन येथें जाऊन बसला. इतकें होत होतें तों हिंवाळा आला. ह्यास्तव पीतराचें लष्कर आपल्या राहावयाच्या ठिकाणीं गेलें, आणि तो स्वतः पीतर्सबर्ग येथें आला.

ह्यानंतर, पीतर, बरोबर पुष्कळ जाहाजें घेऊन फिनलांदांत गेला. तेथील मुख्य शहर आबो व दुसरें मोठें शहर बोर्गीं हीं जीं स्वीदनच्या राजाच्या अमला खालीं होतीं, तीं त्यानें मोठ्या पराक्रमानें घेतलीं. आबो येथें एक मोठें विद्यालय होतें, व त्याजमध्यें पुष्कळ पुस्तकें होतीं, तीं त्यानें सगळीं पीतर्सबर्ग शहरीं पाठवून देऊन तेथच्या पाठशाळेंतल्या पुस्तकालयांत ठेविलीं. नंतर, तेथील सर्व अधिकार व कारभार गालितझिन ह्याजवर सोंपून, तो परत सेंतपीतर्सबर्ग येथें आला. गालितझिनानें स्वीदनच्या सैन्याचा पाठलाग करून, त्यास ताव्हर्तस येथून हांकून लाविलें, आणि त्यांचे पुष्कळ सामान व कितीएक तोफा त्यांजपासून छिनावून घेतल्या. पीतर पीतर्सबर्ग येथें परत आला खरा; तरी त्याला स्वस्थ राहावयास सांपडलें नाहीं. कारण, त्या वेळीं फिनलांदामध्यें स्वीदनच्या आरमाराची मोठी तयारी चालली होती; तेव्हां त्याला त्याशीं टक्कर देण्यास सिद्ध व्हावें लागलें. त्या समयीं पीतराच्या आरमाराची तयारी फार चांगली होती. तेणेंकरून त्यास यश येऊन स्वीदनचें आरमार पराभव पावलें. हा जय प्राप्त झाला तेव्हां पीतरास जो हर्ष झाला तो त्याच्या पोटांत मावेना. स्वीदन देशचे लोक म्हटले म्हणजे प-

हिल्यापासून आरमाराच्या कामांत प्रवीण; त्यांजवर आपण जय मिळविला, असें मनांत घेऊन त्यास आनंद झाला असेल, ह्यांत कांहीं नवल नाहीं. ज्या गोष्टीच्या सिद्ध्यर्थ मनुष्यास फार श्रम करावे लागतात, ती सफल झाली असतां अंतःकरणास जें कांहीं सुख वाटतें, त्याची कल्पना वर्णनानें कोणाचे मनांत यावयाची नाहीं; तर, त्याची प्रतीति स्वानुभावानेंच घेतली पाहिजे. असो.

असा जयजयकार करीत मोठ्या आनंदानें तो शहरांत प्रवेश करीत होता, तों, पट्टराणी क्यायेराईन ही सुरक्षित पणें प्रसूत होऊन, कन्या झाल्याचें वर्तमान त्यास समजलें. मग काय विचारावें. १ त्याच्या उल्हासास पारावार नाहींसा झाला. अतिशयित अवडती बायको गरोदर असली, आणि त्यांत तिला नऊ महिने भरत आले, म्हणजे, दयाळू, प्रीतिवंत आणि कोमल अंतःकरणाच्या नवऱ्याच्या मनाची स्थिति कशी होत असते, आणि त्याचे मागें काळजी केवढी असते, हें त्याचें त्यासच ठाऊक. बायको हातीं पायीं सुटली असें कळलें, म्हणजे आपल्या डोक्यावरचें ओझेंच जसें काय हलकें झालें असें त्याला वाटूं लागतें. आणि, झार व क्यायेराईन ह्यांचा परस्पर प्रेमभाव तसा होता. तेव्हां, तिची सुटका ऐकून त्याला खचीतच मोठा संतोष झाला असेल, ह्यांत संशय नाहीं. ह्या खेपेस क्यायेराईन हिला जी मुलगी झाली होती, ती एक वर्षाची होऊन मरण पावली.

स्वीद सरकाराच्या आरमारास आपल्या आरमारानें हटविलें, असें कळल्यावर सर्व रूस लोकांस मोठा आनंद झाला. त्या संबंधानें झारास कितीएक बडे लोकांनीं मोठमोठ्या मेजवान्या दिल्या. एव्हरेन स्किल्ड म्हणून स्वीदनच्या आरमाराचा थोर सरदार धरून आणिला होता, त्यालाही त्या समारंभांस बोलावीत असत. त्याजवर पीतर फार ममता करीत असे. एके दिवशीं मेंझिकाफ ह्याजकडे मंडळी बोलाविली होती. तेथें जेवणें खाणें आटोपल्यावर, इकडच्या तिकडच्या गोष्टी चालल्या. तेव्हां

पीतर, एव्हरेनू स्किल्ड ह्याजकडे बोट करून, मंडळीस म्हणाला, " अहो, हा पहा शूर सरदार किती धन्य आहे तो. ! हा मोठा इमानी आहे, आणि आपल्या धन्याचा खरा चाकर आहे. ह्यानें आपल्या यजमानाचीं मोठमोठीं कामें बजावून भारीभारी बक्षिसें मिळविलीं आहेत. माझ्या मोठमोठ्या सरदारांचे प्राण ह्यानें घेतले आहेत; तरी, जावत्काळपर्यंत हा मजपाशीं आहे, तावत्कालपर्यंत मी ह्याचा चांगला सांभाळ करीन." नंतर त्या सरदाराकडे वळून तो त्यास बोलला, "कांहीं चिंता नाहीं; मी तुम्हांस तुमच्या सर्व अपराधांची क्षमा करितों; मी तुम्हांस कांहीं कमी पडूं देणार नाहीं; ह्या माझ्या वचनावर तुम्ही स्वस्थ राहा; कांहीं काळजी करूंनका." त्यावर एव्हरेन स्किल्द ह्यानें पीतरास उत्तर केलें, " ठीक आहे. आपण जो मजवर लोभ करितां, त्याबद्दल मी आपला आत्यंत अभारी आहें. मी आपल्या धन्याशीं कसाही बरावाईट वागलों म्हणा; परंतु, मला तर असें वाटतें कीं, माझें जें कर्तव्य कर्म असें मी समजतों, त्याहून अधिक असें मीं कांहींएक केलें नाहीं. मीं मरण मिळविण्याचे पुष्कळ प्रयत्न केले; परंतु, तें मला प्राप्त झालें नाहीं, त्यास माझा उपाय नाहीं. असो, परमेश्वर ठेवील तसें राहणें भाग आहे. तथापि, दुःखांत सुख एवढेंच कीं, मी आपणांसारिख्या सुजाण आणि दयाळू प्रभूच्या हातीं सांपडलों आहें. ! आपलें निरंतर कल्याण असो."

इतकें झाल्यावर, पीतर आपल्या इतर लोकांस उद्देशून बोलला, तें असें.– "मद्देशबांधवहो, वीस वर्षांपूर्वीं मी गलबतें बांधण्याच्या कामांत गुंतलों होतों, तेव्हां आपले लोकांत एवढें शौर्य आहे, आणि ते एवढ्या प्रबल लोकांशीं युद्ध करून असा अप्रतिम जय मिळवितील, अशी कोणाचे मनांत कल्पना तरी आली होती काय. ? इतिहासकारांचें मत असें आहे कीं, ग्रीसदेश हें विद्यादेवीचें माहेर आहे; तेथें विपरीत काल प्राप्त हो-

ऊन तिला थारा न राहिल्यामुळें, ती इतालीदेशांत गेली, आणि तेथून सर्व युरोपभर पसरली; ती, आपल्या वाडवडिलांच्या हेंकटपणामुळें, कांहीं कालपर्यंत पोलांदांत राहिली होती. पोल लोक आणि जर्मन लोक पूर्वीं अगदीं, आपणांप्रमाणेंच, आज्ञानांधःकारांत चांचपडत होते; परंतु, त्यांच्या राज्यकर्त्यांच्या उद्योगाच्या योगानें, ग्रीक लोकांप्रमाणें, विद्याज्ञान, कलाकौशल्य आणि इतर सुधारणा ह्यांचा त्यांनीं यथेच्छ उपभोग घेतला. त्या विद्याज्ञानसुखाचा उपभोग घेण्याची आतां आपली पाळी आली आहे, असें मला वाटतें. तुम्ही आज्ञाधारक तर आहांच, आणखी ज्ञान संपादनाचा उद्योग करा, म्हणजे झालें. माझा अभिप्राय असा आहे कीं, मनुष्याच्या शरीरांत रक्त जसें फिरत असतें, त्याप्रमाणें, विद्याज्ञानकलादिकांचें वर्चस्व ह्या पृथ्वीच्या पाठीवर फिरत आहे. सांप्रत कालीं हें वर्चस्व ब्रितन, फ्रान्स, जर्मनी, ह्या देशांमध्यें आहे; तें आपलें बिऱ्हाड तेथून उचलून, कांहीं वर्षें आपणांमध्यें घालविण्याकरितां इकडे निघून येईल; आणि मग कदाचित् आपल्या पहिल्या घरीं म्हणजे ग्रीस देशास निघून जाईल. परंतु, तें जोंपर्यंत आपणांमध्यें आहे, तोंपर्यंत तुम्ही उद्योग करा, आणि यशप्राप्त्यर्थ जगदीश्वराची प्रार्थना करा, हेंच माझें तुम्हांपाशीं मागणें आहे. अहो, परमेश्वर कृपा करील तर, तुम्ही आम्ही जीवंत आहों तोंच असें घडेल, आणि आपल्या देशाकडे पाहून इतर देश थक्क होऊन राहातील.!"

हें भाषण ऐकून सर्व लोक अगदीं थक्क होऊन गेले. जशी येथें मेजवानी झाली, तीप्रमाणें सर्व सरदारांच्या व बडे लोकांच्या घरीं, पाळीपाळीनें मेजवानी अमुक अमुक मुदतीनें व्हावी, अशी त्यानें योजना केली. आणि त्या मेजवान्यांस, सर्व लोकांच्या बायकांनीं, मुलांनीं, व मुलींनीं यावें, आपल्या आप्त जनांशीं स्वस्थपणें गोष्टी सांगाव्या, खावें, प्यावें, हंसावें,

खेळावें, असा त्यानें पाठ घातला. तेणेंकरून त्या लोकांस व त्यांच्या माणसांस बोलण्याचालण्याची व उठण्याबसण्याची उत्तम रीति लागली; आणि त्यांचीं मनें प्रशस्त झालीं.

पीतराचें खाणेंपिणें बेताबाताचें असे. तरी, आपल्या जवळच्या लोकांनीं पुष्कळ दारू पिऊन मस्त व्हावें, आणि गोंधळ घालावा, हें पाहण्याची त्याची इच्छा असे. तो दररोज दुपारीं बारावाजतां जेवी. जेवणाचे पदार्थ अगदीं साधे असत; म्हणजे, त्यांत उंची पक्वान्न असें फारसें नसे. त्याला ऊनऊन खाणें फार आवडे; म्हणून, तो स्वैंपाकाच्या खोलीजवळच्या दिवाणखान्यांत भोजनास बसे, आणि खिडकींतून ताट घेऊन लागलाच जेवायास बसे. भोजन झाल्यावर तो एकवाजतां निजे, तो दोन वाजतां उठे. आणि तेव्हांपासून रात्रीचे दाहा घटका रात्रीपर्यंत तो आपला सगळा काळ गमतींत घालवी. तो रात्रीं दाहावाजतां निजावयास जाई, तो पाहांटेस बरोबर चारवाजतां उठे. आणि तेव्हांपासून जेवायाची वेळ होई तोंपर्यंत तो, आपल्या प्रधानमंडळीस हाताखालीं घेऊन, राज्याचें काम पाही. असा त्याचा नित्यक्रम होता. तो संध्याकाळीं जेवीत नसे; तरी, क्यार्थराईन वगैरे घरचीं माणसें जेवूं लागलीं म्हणजे त्यांजपाशीं बसून इकडच्या तिकडच्या पुष्कळ गोष्टी सांगे.

पीतर्सबर्ग शहराजवळ एक बेट आहे, तेथें पीतरानें एक बंगला बांधविला होता. तेथें मेजवान्यांचे थाट तो हरहमेष करीत असे. त्या ठिकाणीं जाण्यास लोकांस होड्या लागत. त्या, पीतरानें, त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें, लहानमोठ्या बांधून दिल्या होत्या. पण, त्या लोकांपासून असा करार करून घेतला होता कीं, ह्या होड्या आम्ही नेहमीं दुरुस्त राखूं. सरकारी पैशानें बांधून दिलेल्या होड्या, पाहिजे तेव्हां लढाईच्यावगैरे उपयोगीं पडाव्या, आणि, होड्यांची यथास्थित तजवीज ठेवण्याची संवय आपल्या लोकांस लागावी, हा पीतराच्या मनांतला मुख्य

आशय होता. सरकारी पैशाच्या खर्चानें पीतर जें कांहीं करी, त्याचा सगळा रोंख लोकांच्या सुधारणेकडे असे.

ह्या संधीस त्याला त्रास उत्पन्न होण्यासारखी एक गोष्ट त्याच्या नजरेस आली. ती अशी. आपल्या देशाचा व्यापार कसाकाय चालला आहे, अशाविषयीं त्यानें दच व्यापाऱ्यांत बारीक रीतीनें चौकशी केली. तेव्हां त्याला असें दिसून आलें कीं, व्यापाराचें सगळें सूत्र सरकारी कामदारांनीं आपल्या हातीं ठेविल्यामुळें तो कमी होत चालला आहे; फौजेंतल्या लोकांस रोजमुरा वेळच्यावेळीं मिळत नाहीं; सरकारी अमलदार खजिन्यातला पैसा वापरतात; सरकारचें उत्पन्न कमतावत चाललें आहे; आणि सर्व राज्यकारभारांत घोंटाळा होऊन गेला आहे, असें त्यास समजलें. तेव्हां त्याला अतिशयित वाईट वाटलें. त्यानें लागलीच त्याची चौकशी चालविली. त्या वेळीं, त्या प्रकरणांत मेंझिकाफ वगैरे मेहरबानींतल्या मंडळीचेंही आंग आहे, असें त्याच्या दृष्टोत्पत्तीस आलें. परंतु, आम्ही बाहेर मोहिमींवर होतों, मागें कोणीं काय केलें तें आम्हांला माहीत नाहीं, अशी त्यांनीं तकरार घेतली. ती कांहीं अंशीं खरी होती. तथापि ते निर्दोष ठरले नाहींत; ह्यास्तव पीतरानें त्यांच्या जिनग्या जप्त करविल्या. आणि ज्यांवर ते अपराध चांगले साबीद झाले, त्यांस सैबीरिआ देशामध्यें काळ्यापाण्यावर पाठविलें. ह्या ठि-काणीं एक गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ती ही कीं, मेंझिकाफ वगैरे मंडळीवर जरी झार याची मोठी मेहरबानी असे, तरी, ते अपराधांत सांपडल्यावर त्यांची जिनगी जप्त करण्यास त्यानें मागें पुढें पाहिलें नाहीं.

नंतर थोड्या वेळानें अशीच एक दुःखदायक गोष्ट घडून आली. ती कोणती ती ऐका. पीतर ह्याची सून, म्हणजे अलेक्सिसाची बायको, गरोदर होती, ती प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. ही स्त्री स्वभावानें फार उत्तम असल्यामुळें, ती

ारास, क्यायेराइनीस, आणि दरबारच्या सर्व मंडळीस फार आवडत असे. परंतु, तिचा भ्रतार वाईट चालीचा आणि व्यसनी होता. त्यास ती केवळ दुष्टासारखी दिसे. तो तिजवर वारंवार रागें भरे, तिचा अपमान करी, आणि तिच्या समक्ष आपल्या राखेशीं नानाप्रकारचे विलास करी. तेणेंकरून त्या सुशील स्त्रीला अत्यंत दुःख होत असे. ती मरणाची अगदीं मार्गप्रतीक्षा करीत होती. तिला पुत्र झाल्याचें कांहीं एक वाटलें नाहीं. त्या बाळांतपणांत ती फार अजारी पडली, तेव्हां पीतर तिला औषधोपचार करवूं लागला. वैद्य औषधाचा पेला घेऊन तिजपाशीं गेला त्या वेळीं तिनें त्याला हात जोडून म्हटलें, "महाराज, मला हें औषधविवषध कांहीं नको आतां. ! मला मरण पाहिजे. ! जगून तरी काय करायाचें. ? मरूंद्या मला आतां स्वस्थ. !" पीतरही स्वतः फार आजारी होता; तो हें तिचें बोलणें ऐकून तिजकडे वळला. तेव्हां, अति नम्रपणानें, सन्मानपूर्वक तिनें त्यास असें सांगितलें कीं, "मामोजी, मीतर आतां निघालें. ! मजवर लोभ असावा, आणि माझ्या ह्या तान्ह्याचा प्रतिपाळ आपण करावा, एवढेंच माझें शेवटचें मागणें आहे. !" हे शब्द कानीं पडतांच, त्या शूर झाराच्या नेत्रांतून खळखळां अश्रुधारा वाहूं लागल्या. ! त्यानें त्या मुलाचा उत्तम रीतीनें सांभाळ करण्याविषयीं तिला अभिवचन दिलें; तें कानीं पडतांक्षणीं तिनें प्राण सोडिला. ! पहा.! 'सबसें जी प्यारा' असें म्हणतात. पण, आईला, आपल्या जीवापेक्षां मुलाचा जीव अधिक प्रिय वाटतो. ! असो. हेंच बालक मोठें होऊन, क्यायेराइन राणीच्या मागून दुसरा पीतर असें नामधारण करून, रूसच्या गादीवर बसलें.

पीतराची सुशील सून निवर्तली त्या दिवशीं त्याला अत्यंत दुःख झालें, हें खरें. पण तें पुरतें एक दिवस देखील टिकलें नाहीं. कारण, ती दुःखकारक गोष्ट घडली त्याच्या दुसऱ्याच

दिवशीं क्यायेराइन राणी पुत्र प्रसवली. तेव्हां पीतरास परम आल्हाद झाला. पीतर्सबर्ग शहरामध्यें, तत्संबंधीं, एक सारखा दाहा दिवस उत्सव चालला होता. त्या समारंभांत मद्यपानाची तर कांहीं कमाल होऊन गेली. पीतराच्या वाड्यामध्यें शेवटची मजालस झाली, त्या वेळीं, प्रत्येक गृहस्थाने एक एक तोव्या दारू प्याली पाहिजे, असा त्यानें आग्रह चालविला. तेथच्या गोंधळाचें वर्णन कपतान ब्रूस साहेबानें केलें आहे. त्यांत असें आहे कीं, " त्या भानगडींतून आपण कसें तरी बाहेर पडून जावें, म्हणून मी त्या दिवाणखान्यांतून हळूच निघालों. मला दारावरच्या पाहरेकऱ्यानें ' मज्जाव ' केलें; परंतु, त्यास मीं असा बाहणा सांगितला कीं, मी झार साहेबांचा कांहीं निरोप कोणास सांगावयास जात आहें; तेव्हां त्यानें मला सोडिलें. तेथून जो मी निघालों, तो नीट केलदनमन ह्या नांवाच्या गृहस्थाच्या घरीं गेलों. तो गृहस्थ पूर्वीं झाराचा गुरु होता; व त्यावर त्याची मोठी मेहेरबानी असे. मी जाऊन बसलों; इतक्यांत, तोव्याभर दारू पिऊन त्या गृहस्थाची स्वारी डुलत डुलत तेथें येऊन मेजाजवळ एका खुर्चीवर बसली. त्यानंतर त्यानें, थोडासा वेळ जाऊं देऊन, आपलें डोकें त्या मेजावर टेंकिलें, आणि त्याला तेथें गाढमूढ झोंप लागली असें दिसलें. परंतु, अशी झोंप त्याला नेहमीं लागे, म्हणून त्याच्या घरांतल्या माणसांनीं त्याजकडे लक्ष दिलें नाहीं. परंतु कांहीं हालचाल नाहीं असें पाहून, त्याची बायको त्याजपाशीं गेली, आणि त्याला हालवूं हुलवूं लागली. तों तो गतप्राण झाला आहे, असें तिला समजलें. ! मग तेथें जो आकांत झाला त्यास पारावार नाहीं. ! मीं लागलेंच हें वर्तमान पीतरास कळविलें. तेव्हां त्यास फार वाईट वाटलें, आणि तो ताबडतोब त्याच्या घरीं आला. त्यानें त्याच्या विधवा स्त्रीचें सांत्वन केलें; आणि तिच्या भ्रताराास सत्कारच्या खर्चानें मूठमाती द्यावी, असें ठरविलें. नंतर, त्या

गरीब विचाऱ्या विधवेस त्यानें थोडेंसें पेनशन ही करून दिलें.- पीतर हा एवढा विचारी आणि प्रजेस जपणारा राजा असून, त्याच्या छांदिष्टपणामुळें अशा दुःखदायक गोष्टी घडाव्या, हें शोभत नाहीं.

इ० स० १७१४ च्या शेवटीं कांहीं महिने, व इ० स० १७१५ च्या आरंभीं कांहीं महिने पीतर हा पीतर्सबर्ग शहरांत राहिला होता; तेव्हां त्या शहराची भरभराट पाहून त्याला अत्यानंद झाला. तो स्वतः, त्याचे प्रधान, व त्याचे दरबारचे इतर वडे लोक तेथें येऊन राहिल्यामुळें, त्या शहरांतील घरें लांकडी बांधीत असत, तीं ह्यापुढें विटांचीं बांधावीं, असें त्यानें ठरविलें. गोद्या वगैरे सरकारी इमारती बांधण्याकरितां सुमारें ४०००० बंदीवान त्यानें लाविले होते. त्यांतले पुष्कळ लोक रोगानें व थंडीच्या कडाक्यानें मरण पावले. तरी, क्याथेराइन, दयालुत्वेंकरून, त्यांस औषधें व जाडींभरडीं वस्त्रें वारंवार वांटीत असे. सेंतहिलायर ह्या नांवाचा एक फ्रेंच गृहस्थ मुख्य गुरु नेमून त्यानें तेथें एक मोठी पाठशाला स्थापिली. तींत भाषा, गणित, दांडपट्ट्याचे खेळ, घोड्यावर बसणें इत्यादि उपयुक्त विद्या शिकवीत असत. पीतरास त्याच्या प्रवासामध्यें जो एक अप्रतिम कृत्रिम भूगोल मिळाला होता, तो त्यानें ह्या पाठशाळेंत आणून ठेविला.

ह्या वेळेच्या सुमारास जगामध्यें पीतराची कीर्ति किती वाढली होती, हें प्रदर्शित करण्यास आम्ही एक गोष्ट सांगतों. ती ही कीं, इराणच्या बादशाहा कडून, एक हत्ती आणि पांच सिंह असा नजराणा घेऊन, एक वकील त्याचे दरबारीं आला होता; आणि तार्तार लोकांच्या त्रासांतून मुक्त होण्यास साह्य मागण्याकरितां, उजबेग लोकांचा सरदार महंमद ह्याजकडूनही एक वकील आला होता. इतक्या अंतरावरचे राजे पीतराची मर्जी

संपादण्याविषयीं व त्याचें साह्य घेण्याविषयीं झटत होते, ही गोष्ट झार त्यास अत्यंत भूषणप्रद होय.

स्वीदनच्या बाराव्या चार्लसाविषयीं जें मागच्या भागांत सांगितलें आहे, तें वाचकांच्या लक्षांत असेलच. तो तुर्कस्थानच्या सुलतानाच्या मुलुखांतून गुण उधळून निघाला, तो, वेष बदलून इ० स० १७१४ च्या नोवेंबर महिन्याच्या १४ व्या तारखेस स्त्रालसंद येथें आला. नंतर त्यानें आपलें खरें स्वरूप प्रकट केलें. आपला राजा इतके दिवस नाहींसा झाला होता तो आला, असें पाहून त्याच्या प्रजेस परम संतोष झाला. त्यांनीं त्याचा मोठा आदरसत्कार केला. ठीकच आहे. इतर राजांनीं त्याचा पराभव केला, म्हणून तो आपले प्रजेचा राजा नाहीं असा झाला कीं काय. १ त्याच्या हातून राज्यव्यवहारांत ज्या चुक्या घडल्या होत्या, त्या म्हणजे त्याच्या लोकांस माहीत नव्हत्या असें नाहीं. तथापि, त्या सगळ्या एके बाजूस ठेवून त्यांनीं त्याला पुनः नवें २५००० सैन्य ठेवण्यापुरतें द्रव्य दिलें.

ही इकडे तयारी झाली असें समजतांच, पीतरानें, प्रुशिया, देन्मार्क, पोलंद, आणि इंग्लंद येथील राजे आपणाकडे वळवून घेऊन, युद्धाची सिद्धता केली. त्या तिघांचें एकत्र सैन्य स्त्रालसंद येथें जमून त्यानें त्यास वेढा घातला. तेव्हां चार्लस हा आंत कोंडला गेला. त्याला असें वाटलें कीं, कांहीं दिवसांपूर्वीं आपण तुर्क सरकारच्या मुलुखांत एकान्तस्थलीं होतों, ते आतां स्वदेशामध्यें प्रतिबंधांत पडलों. स्त्रालसंद हें स्थल मोठ्या बंदोबस्ताचें होतें; तेणेंकरून वेढा घालणारांचा उपाय चालेना. तथापि, इ० स० १७१७त आंतले लोक अगदीं टेंकीस आले; आणि आतां शत्रूच्या हातीं लागण्याशिवाय दुसरा उपाय राहिला नाहीं, असें जेव्हां त्यांस झालें, तेव्हां त्यांनीं, आपल्या राजास एका होडींत बसवून, दहा लोकांसहवर्तमान, मोठ्या युक्तीनें काढून दिलें; आणि आपण प्रुशिआच्या राजाच्या स्वाधीन झाले.

इतक्यांत पीतरानें, फिनलांद सगळें काबीज केलें, आणि तेथच्या बंदोबस्तास गालिटझिन ह्याच्या हाता खालीं पुष्कळ फौज त्या ठिकाणीं ठेविली. स्केरिमाताफ हा, चवदा पंधरा हजार लोकांसहवर्तमान पायरानिआ ह्या प्रांतांत होता; आणि ब्रूस व बाअर ह्यांच्या हाताखालीं २०००० लष्कर दिलें होतें, तें पोलंदांत राहिलें होतें. पीतरानें लिव्होनिआ आणि एस्थोनिआ ह्यांतील पुष्कळ प्रांत आपणाकडे जिंकून घेतले; शिवाय, फिनलांदच्या दोन्ही किनाऱ्यांवरचा मुलुख त्याजकडे होता तो वेगळाच. सारांश, त्यास, स्वीदनच्या राजाचें भय असें कोठें राहिलें नाहीं. तेव्हां, पुनः एकदा युरोप खंडांत प्रवास करण्यास निघावें, असें त्याच्या मनांत आलें.

त्याप्रमाणें तो देश पहावयास निघाला. तेव्हा त्याजबरोबर त्याची पट्टराणी क्याथेराइन ही होती. ह्या खेपेस त्यानें स्त्रालसंद, मेक्लिनबर्ग, हांमबर्ग, आणि पिरमौंत हीं स्थलें पाहिलीं; आणि तो मग स्क्यूरिन येथें आला. नंतर तेथून तो कोपेनहेगेन येथें गेला. तेथें तो दोनतीन महिने राहिला. आणि त्या ठिकाणीं जें कांहीं पाहण्यासारखें म्हणून होतें, तें सर्व त्यानें लक्षपूर्वक पाहिलें. येथें देन्मार्कच्या राजानें त्याची बरदास्त उत्तम प्रकारची ठेविली होती. तेथून तो निघाला तो हालंदांत गेला. त्याची प्रिय पत्नी जरा आजारी पडली होती, म्हणून ती कांहीं मुकाम मागें राहिली होती, तीही त्यास लवकरच येऊन मिळाली. तेव्हां तिच्या तिसऱ्या खेपेचे दिवस अगदीं भरले होते. तेथें प्रवासांतच ती प्रसूत झाली. तिला पुत्र झाला होता, तो लागलाच दुसरे दिवशीं मरण पावला. पीतर झांदाम येथें पोंचतांच त्याची ओळखीची सगळी जुनी मंडळी त्यास भेटली. तेणेंकरून त्याला परम संतोष झाला. त्या मंडळीनें त्याचा फार आदरसत्कार केला; आणि तोही त्यांशीं, मन मोकळें करून, अगदीं बरोबरीच्या नात्यानें वागला. तो एकुणीस वर्षां-

पूर्वीं जसा होता, तसाच त्या लोकांस तो ह्या वेळीं आढळला. त्याच्या प्रकृतीमध्यें त्यांस फरक काय तो एवढाच दिसला कीं, पूर्वीं त्याला मंडळी पाहिली म्हणजे थरकांप होत असे, ती त्याची खोडी जाऊन, तो मंडळींत पुष्कळ बोलूं चालूं लागला. अशी खोडी जाऊन, तो मंडळींत पुष्कळ बोलूं चालूं लागला. अगदीं पहिल्यानें, मागच्या खेपेस, सुतारकाम शिकते वेळीं, तो ज्या खोलींत राहात होता, ती त्यानें बुद्ध्या जाऊन पाहिली. ती, तेथच्या लोकांनीं चांगली दुरुस्त राखून, तिला 'राजवाडा' असें नांव दिलें होतें. ती झोंपडी अद्यापपर्यंत जतन करून ठेविली आहे, असें म्हणतात. त्याच्या एका खोलींत एक मेज आणि तीन खुर्च्या ज्या तेंव्हां होत्या, त्या अद्यापि तशाच आहेत. त्या खोलींत पाऊल ठेवितांच पीतराला ते पहिले दिवस आठवले, आणि तो किंचित स्तब्ध राहिला. त्या वेळीं त्याचे मनांत काय काय विचार आले असतील, हें त्याचें त्यास ठाऊक. ह्या खोलींत, एकांतीं बसून तो परमेश्वराची प्रार्थना करीत असे. तें त्याच्या स्मरणांत आलें असेल. आणि ते केवळ आभ्यासाचे दिवस निघून जाऊन हा सुखाचा समय विश्वंभरानें ह्याच ठिकाणीं आज एकुणीस वर्षांनंतर दाखविला, म्हणून त्याचे ठायीं भक्तिरस उभा राहिला असेल; असो.

ह्या नंतर तो पारिस शहरीं गेला. तेथच्या बादशाहानें त्याच्या आदरातिथ्याची मोठी तयारी केली होती. परंतु, तो डामडौल त्याला आवडत नसे. म्हणून तो त्या राजधानींत केंव्हां चुटकर आला हें फार कोणाला समजलें देखील नाहीं. त्यास उतरण्याकरितां बादशाहानें एक चांगला मोठा वाडा तयार करून ठेविला होता. तेथें तो राहिला नाहीं. त्यानें शहरच्या एका कोंपऱ्यास एक लहानसें घर घेतलें, आणि तेथें आपलें बिऱ्हाड ठेविलें. तरी बादशाहा त्याचे बरदास्तीकरितां आपले लोक तेथें पाठवीत असे. ते त्यास खाण्याचे उंची उंची पदार्थ आणून देत, आणि त्याच्या पुढें पुढें करीत, तेंव्हां तो त्यांस

म्हणे कीं, "बाबानो, मी शिपाई आहें; थोडीशी भाकर आणि थोडीशी साधी दारू मला मिळाली, म्हणजे मला दुसरें कांहीं लागत नाहीं; मला मोठ्या दिवाणखान्यांपेक्षां लहानसर खोल्या विशेष आवडतात; डौल आणि समारंभ ह्यांची इच्छा मला मुळींच नाहीं; ते मला खरोखर नकोत; आपले लोकांस व्यर्थ श्रम मी कधींही देणार नाहीं." पीतर असें बोले आणि असाच चाले, ही गोष्ट, राजे लोकांसच नव्हे, तर सर्व प्रकारच्या लहान मोठ्या मनुष्यांस कित्ता घेण्यासारखी आहे.

पीतरानें, पारीस शहरांतल्या पाहण्यासारख्या होत्या तितक्या सर्व वस्तु पाहिल्या. तो जेथें जेथें गेला, तेथें तेथें त्याला संतोषविण्याची सर्व तजवीज योजिलेली असे. स्वतः त्याची व क्याथेराइनीची तसबीर मोठ्या सन्मानानें ठेविलेली अशी त्यानें एक जागा पाहिली. तो एके दिवशीं तेथील टांकसाळ पहावयास गेला, तेव्हां, तेथील यंत्रांतून उडून एक नाणें पटकर त्याच्या पायांपाशीं पडलें. तें तो उचलून पाहूं लागला तों त्याजवरही त्याचा मुखवटा खोदलेला त्याच्या दृष्टीस पडला, तेणेंकरून त्याला परम संतोष झाला.

त्या संधीस तेथें वालेस ह्या नांवाचा एक इंग्लिश गृहस्थ नेत्रवैद्य होता; तो, डोळे अगदीं गेले असले तरी देखील ते चांगले नीट करीत असे. अशा प्रकारची एक गोष्ट पीतरास त्यानें प्रत्यक्ष करून दाखविली. तिचा त्याला मोठा चमत्कार वाटला. त्यानें वालेस ह्याची फार तारीफ केली. आणि त्यास असें सांगितलें कीं, आम्ही रूस देशीं परत गेल्यावर एक चांगला हुशार तरुण मनुष्य आपणांकडे पाठवून देऊं, त्यास ही विद्या कृपा करून शिकवावी. झाराचें म्हणणें वालेस ह्यानें मोठ्या आनंदानें कबूल केलें. उपयुक्त विद्या परकीय मनुष्याचे ठायीं आढळली म्हणजे ती आपले लोकांस प्राप्त करून देण्याविषयीं

ह्याची किती उत्सुकता होती, हें ह्या गोष्टीवरून विशेष स्पष्ट दिसून येतें. दरिद्री, धनलोभी मनुष्य सुवर्णकणाविषयीं जितकी आस्था बाळगितो, तीहीपेक्षां अधिक पीतर स्वदेशकल्याणोपायांविषयीं अधिक दक्षता ठेवीत असे, असें म्हटल्यास चिंता नाहीं.

फ्रान्स देशाची उत्तमावस्था होण्यास जे पुरुष कारणीभूत झाले, त्यांत रेशलू ह्याची गणना आहे. हा पुरुष फार शाहणा कारभारी होता. त्याला फ्रेंच लोक मोठा मानितात. त्याचा पुतळा पाहण्याकरितां पीतराची स्वारी गेली होती. ती मूर्ति दृष्टीस पडल्याबरोबर त्याच्या थोरपणाविषयीं पूज्यभाव झार ह्याचे मनांत उभा राहिला. त्या पुतळ्याकडे पाहात तो कांहीं वेळपर्यंत अगदीं स्तब्ध उभा होता. नंतर जरा हंसल्या सारखें करून तो त्याजकडे वळून म्हणाला, “ महाराज आपण धन्य आहां. ! आपण जर मला राजनीति पढवितां, तर मी आपणांस आपलें अर्धें राज्य दिलें असतें. ! ” पीतर असें बोलला ह्यांत कांहीं नवल नाहीं. कारण, रेशलू ह्याच्या राजनीतीची योग्यताच खरोखर तशी होती.

पीतर पूर्वीं इंग्लंदास गेला होता, तेव्हां जसे त्यानें तेथून कितीएक कारागीर आपणाबरोबर नेले, तसे ह्या वेळीं फ्रान्स देशांतूनही कांहीं नेले. त्यानें फ्रान्स देशांतले बहुतेक कारखाने पाहिले, आणि त्यांत जें त्यास विशेष दिसलें, तें त्यानें लक्षांत ठेविलें. तो इंग्लंदास गेला होता, तेव्हांची पार्लमेंत पाहण्याची जी त्याची गोष्ट मागें लिहिली आहे, ती वाचकांच्या लक्षांत असेलच. तसा प्रकार फ्रान्सामध्यें ह्या खेपेस घडला नाहीं. कारण, पीतराचे ठायीं तेव्हां जो लाजाळूपणा आणि भित्रेपणा होता, तो ह्या वेळीं नाहींसा होऊन, तो चांगला सभाधीट झाला होता. त्यानें फ्रान्स देशाची पार्लमेंत सभा, आंत

जाऊन, सावकाशपणें पाहिली; आणि मंडळीमध्यें जाऊन कितीएक थोर पुरुषांच्या भेटी घेतल्या.

ह्याप्रमाणें पारिस शहरांतलें काम आटपल्यावर, पीतर परत आमस्तर्दाम येथें आला. तेथें त्याची प्रिय भार्या क्याथेराइन ही राहिली होती, ती त्याला भेटली. त्या ठिकाणीं दच अमलदारांनीं तिची चांगली बरदास्त ठेविली होती. तिला चैन पडेना किंवा तिचा वेळ जाईना तेव्हां, जाहाजांच्या लुटुपुटूच्या लढाया तिला दाखवून, ते तिची कालक्रमणा करीत.

तेथून आपली प्रिय पत्नी बरोबर घेऊन, पीतर बर्लिन शहरास जावयास निघाला. तो साक्सनी देशांतून चालला तेव्हां त्याला वाटेंत वित्तेंमबर्ग हें गांव लागलें. तेथें पाहण्यासारखें काय आहे, ह्याविषयीं चौकशी करीत असतां त्यास कोणीं असें सांगितलें कीं, खीस्ती धर्मपंथांची उत्कृष्ट सुधारणा करणारा प्रसिद्ध धार्मिक आणि पवित्र पुरुष जो लूथर*, त्याची बसण्याची खोली अद्याप तेथें जशीची तशीच राखून ठेविली आहे, व त्याचा पितळेचा पुतळा केलेला आहे. तेव्हां ती जागा व तो पुतळा पाहण्याविषयीं त्यास फार इच्छा उत्पन्न झाली. जेवणास जरा उशीर होता; म्हणून तो तसाच उठून पुतळा पाहावयास गेला. तो दृष्टीस पडला तेव्हां पीतर म्हणाला, “अंः! ह्या एवढ्या थोरल्या पुरुषास हा एवढासा मान म्हणजे कांहींच नाहीं.!” नंतर तो त्याचे बसावयाचे खोलीकडे गेला. त्या खोलीच्या एका भिंतीवर मोठा थोरला एक शाईचा डाग पडला होता, त्याजकडे त्याची दृष्टि गेली. तेव्हां, ती जागा दाखविण्याकरितां जो मनुष्य त्याजबरोबर आला होता, त्यानें त्यास असें सांगितलें कीं, लूथर हा पवित्र पंथाविषयीं कांहीं लिहीत असतां, सैतान त्याचे डोळ्यांसमोर येऊन नाचूं लागलें; त्यावर संतापून, त्यास मा-

* हा पुरुष इस्लियन येथें इ० स० १४८३ त जन्मला; आणि तेथेंच इ० स० १५४६ त मरण पावला.

रण्याकरितां म्हणून जी दऊत त्यानें फेंकिली, तिजमधील ही शाई तेव्हां उडालेली आहे; कांहीं केलें तरी हा डाग जात नाहीं.! ही भोळसरपणाची गोष्ट पीतरास अगदीं खोटी वाटली. कारण, लूथर एवढा विद्वान आणि विचारी असतां, आपणापुढें सैतान उड्या मारीत आहे, अशी कल्पना त्याचे मनांत कशी आली असावी, ह्याचा उलगडा त्याच्यानें होईना. तें स्थल ज्यांनीं पाहिलें होतें, त्यांनीं आपलीं नांवें तेथील धुरकटलेल्या काळ्या भिंतीवर पांढऱ्या खडूनें लिहून ठेविलीं होतीं, त्यांखालीं पीतरानें आपलें नांव स्वहस्तें रूस लिपीमध्यें लिहून ठेविलें; तें अद्यापपर्यंत देखील दिसतें असें सांगतात.

क्यायेराइन हीस मागून सावकाश यावयास सांगून, पीतर, आपण सडा फार जलदीनें बर्लिन येथें गेला. तेथील राजा हा झार सकुटुंब यावयाचा म्हणून मोठी तयारी करून राहिला होता. परंतु, असा अवेळीं आणि गुपचूप तो एकाद्या साधारण माणसाप्रमाणें शहरांत आला, कीं तें त्याला लवकर समजलें सुद्धां नाहीं. तो येणार म्हणून त्याच्या वकीलानें त्याजकरितां एक वाडा पाहून ठेविला होता; त्यांत तो जाऊन उतरला. नंतर फ्रेदरिक राजानें आपला एक मोठा अमलदार त्याजकडे पाठवून, त्याचे द्वारें झारास कळविलें कीं, आपण आलां येणेंकरून आम्हांस बहुत संतोष झाला आहे. त्यावर त्यानें राजास असें सांगून पाठविलें कीं, ‘आपली जर मर्जी असेल, तर उद्यां दुपारीं आपणांस भेटेन.’ तें ऐकून राजास बरें वाटलें. आणि त्यानें दुसरे दिवशीं त्या वेळीं, आपले दोन तीन रथ, त्यास आणण्याकरितां त्या वाड्यासमोर नेऊन उभे करविले. पीतरानें विद्याभ्यासाकरितां जे कांहीं रूसचे तरुण पुरुष पूर्वींच तेथें पाठविले होते, तेही त्या रथांत त्याची वाट पाहात बसले. तो वाड्यांतून आतां येतो घटकें येतो, असें होतां होतां बराच वेळ झाला. तों इकडे, मागील दारानें पीतर बाहेर पडून, राजवा-

ड्यांत जाऊन, राजाजवळ गोष्टी सांगत बसला सुद्धां ! हें ऐकून सर्व लोकांस मोठें नवल वाटलें. असा एकाएकी आणि एकाकी झार आपणाकडे आला असें पाहून राजाही अगदीं चकित झाला. त्या वेळीं पीतरानें त्यास असें सांगितलें कीं, " डामडौलाचा मला अगदीं कंटाळा आहे. त्याची मला मुळींच सवय नाहीं. मी आज चाललों ह्याच्या पांचपट देखील मी एका दिवसांत चालेन. "

झार येऊन पोहोंचल्यावर दोन तीन दिवसांनीं क्याथेराइन हिची स्वारी बर्लिनास आली. तेथें पीतराचा व तिचा आदर सत्कार फ्रेदरिकानें उत्तम प्रकारें केला. मेजवान्यांचा वगैरे सर्व थाट यथास्थित झाला. तेथें कितीएक चमत्कारिक वस्तूंची खरेदी केल्यावर, व जें पाहण्यासारखें होतें तें पाहिल्यावर, पीतराची स्वारी पुनः हालंद देशांत प्राप्त झाली. तेथें जे अनेक पदार्थ त्यानें विकत घेतले, त्यांमध्यें शरीररचनेच्या संबंधीं प्राण्यांचे जे असंख्यात मासले रेस्कनामक विद्वान गृहस्थानें पन्नास वर्षें खपून जमविले होते, ते सर्व ३०००० फ्लॉरिन्सांस* खरीद केले, आणि स्वदेशीं नेले.

हें सगळें बाहेरून यथास्थित चालत होतें. परंतु, पीतरास कुटुंबकलहापासून जें मोठें दुःख भोगावें लागलें, तें अद्याप सांगावयाचें राहिलें आहे. तें आतां सांगतों. झार ह्याचा पुत्र आलेक्सिस हा फार वाईट चालीचा पुरुष असून, त्याच्या जाचामुळेंच त्याची पत्नी मरण पावली, ही गोष्ट मागें वर्णिली आहे, ती आमच्या वाचकांच्या लक्षांत असेलच. आणखी शिवाय असें होतें कीं, पीतराच्या विरुद्ध जो जुन्या लोकांचा कट होता, त्यांत हा अग्रगण्य असे. आणि झार जी सुधारणा करी, तीस तो नांवें ठेवी इतकेंच केवळ नव्हे; तर, ती जेणेंकरून बंद पडेल, तसे प्रयत्न तो करीत असे. हें सगळें वर्तमान पीतरास

---

* एक फ्लारिन्स म्हणजे सुमारें तीन आणे.

विदीत होतें; व आपल्या पश्चात ह्याच हातीं राज्य गेलें म्हणजे हा इतक्या सगळ्या उद्योगाची व लोकसुधारणेची मृत्तिका करून टाकील, असें त्याच्या मनांत येऊन चुकलें होतें. ह्यास्तव, ह्यास ताळ्यावर आणावें, अथवा ह्यास राजाधिकार मिळूंनये असा बंदोबस्त करून टाकावा, असा त्याचा निश्चय झाला होता. ह्याविषयीं तो नेहमीं विचार करीत असे. फ्रान्स वगैरे देश पाहण्यास निघण्यापूर्वी त्यानें आलेक्सिसास एक पत्र लिहिलें. त्यांत असें होतें, कीं, “ त्वां जें जें कांहीं केलें आहे, आणि तूं जें जें करीत आहेस, तें तें सर्व आम्हांस विदीत आहे; असें भलतेंच करीत जाऊं नको; अझून तरी शुद्धीवर ये; इतकें सांगूनही जर तुझे डोळे न उघडतील, तर शरीराचा निरुपयोगी वाईट अवयव जसा कापून टाकितात, तसा मी तुला राजाधिकार मिळण्याच्या नात्यापासून तोडून टाकीन; तुला नुसतें भय घालण्याकरितां मी असें म्हणतों, असें तूं समजूं नको; मी बोलतों त्याप्रमाणें करावयास चुकावयाचा नाहीं. आणखी तूं असें मनांत आणशील कीं, मी वडील मुलगा आहें, तेव्हां मला राज्य सहज प्राप्त होईल. परंतु, बाबा, ह्या भरंवशावर राहूं नको. अरे, स्वदेशसुधारणा आणि स्वदेशी जनांचें हित ह्यांच्या प्रीत्यर्थ ज्यानें आपल्या स्वतःच्या जीवाकडे पाहिलें नाहीं,तो, तूं जो ह्या दोहोंविषयीं परवा न करणारा मनुष्य,त्या तुझ्या जीवाची आस्था काडीभर तरी बाळगील काय. ? माझें राज्य आणि माझा देश हीं तुजसारख्या अप्रयोजक अयोग्य पुत्राच्या हातीं देण्यापेक्षां मी तीं एकाद्या शाहण्या तिऱ्हाइताच्या हवालीं करीन, हें खचीत लक्षांत ठेव. ”

ह्याचें उत्तर आलेक्सिसानें असें दिलें कीं, “ठीक आहे. मला राज्याची गरज नाहीं. मी परमेश्वर स्मरून सांगतों कीं, मी राज्यावर वारसा असा कधीं ही सांगणार नाहीं. माझ्या एवढ्या मुलांचा प्रतिपाळ आपण करावा; आणि माझ्या जीवांत

जीव आहे तोंपर्यंत मला अन्न वस्त्र द्यावें, एवढेंच माझें मागणें आहे." त्यावर त्याच्या बापानें त्यास पुनः असें लिहिलें कीं, "तूं आपल्या पत्रांत राज्याच्या वारीसपणाचा मात्र निकाल केला, परंतु तुझ्या अशा दुराचरणापासून जें आम्हांस अतिशयित दुःख होतें म्हणून आम्हीं प्रदर्शित केलें होतें, त्याचें तुला कांहींच वाटत नाहीं असें दिसतें. अरे, म्यां तुझ्या बापानें तुला उपदेश केला, त्याच्या योगानें तुझें मन तिळभर देखील वळूनये काय. ? चिंता नाहीं. आणखी एकवार तुला हें पत्र लिहून पाहतों. पण हें पत्र शेवटचें आहे असें समज. त्वां मागच्या पत्रांत जें मला प्रतिज्ञापूर्वक सांगितलें आहे, त्याप्रमाणें तुझ्यानें वागववणार नाहीं. ते लांब दाढ्यांचे लोक तुजवर आशा धरून आहेत. ते तुला नानाप्रकारच्या थापा देतील, भलभलत्या मसलती सांगतील, तुझी बुद्धि फिरवितील, आणि तुला तुझें वचन मोडायास लावितील, ह्याचा तूं पुरता विचार कर. अरे, तूं त्या लोकांस इतका भजतोस; आणि ज्यानें तुला जन्म दिलें, त्याशीं कृतघ्न होऊन फिरून पडतोस काय. ? अरे तुला समजूं लागल्यापासून, त्वां मला कोणत्या एकाद्या कामांत तरी साह्य केलें आहे काय. ? तूं माझी निंदा करीत नाहींस काय. ? आणि मी आपल्या लोकांच्या बऱ्याकरितां जें जें करितों, त्याचा तूं तिरस्कार करीत नाहींस काय. ? तुझे हातीं जर राज्याधिकार आला, तर, जें कांहीं मीं केलें आहे किंवा करीत आहें, त्याचा तूं विध्वंस करून टाकिशील, हें मला कळत नाहीं काय. ? आतां तरी शुद्धीवर ये. आपलें आचरण सुधारून माझ्या पश्चात् राज्य करण्यास योग्य हो; अथवा एकदा जोगी तरी हो. ह्या पत्राचें उत्तर तूं स्वतः मला भेटून दे, अथवा लिहून पाठीव. ह्यांतून तूं कांहींच करणार नाहींस, तर मी तुला गुन्हेगार समजून तुजशीं वागेन."

ह्याचें उत्तर आलेक्सिसानें असें लिहून पाठविलें कीं, "आ-

पगांकडून तारीख १९ मीनहूचें पत्र आलें, तें मला काल स-
काळीं पावलें. मी आजारी आहें म्हणून आतां माझ्यानें फार
लिहवत नाहीं. मी जोगीपणा स्वीकारण्यास सिद्ध आहें. त्यास
आपली आज्ञा असावी, एवढेंच मागणें आहे. " हें पत्र वाचि-
ल्यावर पीतर स्वतः त्यास जाऊन भेटला. तेव्हां तो आंथरु-
णावर पडला होता; मग तो खरोखर आजारी होता, किंवा आ-
जारीपणाचें सोंग त्यानें घेतलें होतें, हें बरोबर समजलें नाहीं.
तथापि मी खचीत जोगी होणार, असें त्यानें त्यास शपथ वाहू-
न सांगितलें. तेव्हां पीतरानें त्यास बोध केला कीं, " बाबारे,
जोगी होणें हें सुखाचें नाहीं. तो आश्रम फार कठीण आहे.
त्यांत अनेक दुःखें सोसावीं लागतात. उगाच उतावळीपणा क-
रून भलताच निश्चय करूं नको. पुरता विचार कर. आणि
ह्या विचार फार महत्त्वाचा आहे, म्हणून मी तुला साहा महिन्यां-
चा अवकाश देतों. तुझा निश्चय काय होतो तो मला आज-
पासून साहा महिन्यांनीं कळीव. " इतकें बोलणें झाल्यावर, वर
सांगितल्याप्रमाणें, झार हा फ्रान्स वगैरे देश पाहण्यास बाहेर
पडला. तो कोठ कोठें गेला व त्यानें काय काय केलें, ह्याविष-
यींची संक्षिप्त हकीकत मागें लिहिली आहे. ती वाचकांच्या
लक्षांत असेलच. तिकडे आलेक्सिसाची चैन एकसारखी चा-
ललीच होती. झार आपणापाशीं बोलला काय, आणि त्याविषयीं
विचार करावयाचा काय, ही गोष्ट त्याच्या ध्यानीं मनीं सुद्धां
नव्हती. परंतु, पीतराचें लक्ष साहा महिन्यांच्या मुदतीवरून
चळलें नव्हतें. तो युरोपांत प्रवास करीत असतां कोपेनहेगेन
येथें आला, तेव्हां दिलेल्या मुदतीवर एक महिना होऊन चुकला
होता, तरी आलेक्सिसाकडचें कांहींच उत्तर आलें नाहीं, असें
पाहून झार ह्यास अतिशयित संताप आला. त्यानें त्याला लाग-
लेंच असें लिहून पाठविलें कीं, " तूं उत्तर पाठविण्यास उशीर
लाविलास, हें बरोबर नाहीं. तूं कांहीं शुद्धीवर आला आहेस

काय. ? हें राज्य माझ्यामागें तुला मिळावें, अशा पंथास तूं लागला आहेस काय. ? असें जर कांहीं असेल, तर, आठ दिवसांचे आंत येथें येऊन मला भेट. परंतु, जोगी होण्याचा आपला पहिलाच हेंका जर अद्याप धरून बसला असशील, तर तसेंच स्पष्ट कळीव; आणि कोणत्या दिवशीं त्या पंथाची दीक्षा तूं घेणार, हें मला सांगून पाठीव." हें पत्र पाहून, त्याच्या सोबत्यांनीं त्यास अशी मसलत दिली कीं, पीतर इतका तप्त झाला आहे, त्यापेक्षां त्याच्या जवळ जाणें हें आतां नीट नाहीं. म्हणून त्या सर्वांनीं मिळून त्याशीं एक कपट लढविलें. तें असें.- मी आपल्या पित्याच्या आज्ञे प्रमाणें कोपेनहेगेनास जाणार, असें त्यानें दरबारच्या लोकांस कळवून, मेंझिकाफ ह्याजपासून वाटखर्चाकरितां पुष्कळ पैसा घेतला. तो लिव्होनियाच्या सरहद्दीवर आल्यावर, त्यानें विएना शहराचा मार्ग धरिला. आणि त्या शहरीं पोंचल्यावर त्यानें स्वसंरक्षणाविषयीं तेथील बादशाहास विनंती केली. आणि त्याजपाशीं एवढेंच मागितलें कीं, पीतर मरेपर्यंत आपण माझा सांभाळ करावा. परंतु, ह्या मुलाचें बोलणें मान्य करून रूस देशच्या झारास दुखवावें, हें त्या बादशाहास बरें वाटलें नाहीं. तेव्हां आलेक्सिस तेथून निघून नेपल्स शहरीं गेला.

हें वर्तमान पीतरास समजतांच त्यानें रोमांझाफ आणि तोलस्ताय हे दोन गृहस्थ, बरोबर एक पत्र देऊन, आलेक्सिसाकडे पाठविले. तें पत्र तारीख १० जुलै, सन १७१७ चें होतें. त्यांतला मतलब असा.- " तोलस्ताय आणि रोमांझाफ हे गृहस्थ तुजकडे गेले आहेत, हे आमचा सर्व मनोदय तुला कळवितील. तूं आमचें ऐकावयास तयार असलास, तर आम्ही तुला शिक्षा करणार नाहीं, हें आम्ही परमेश्वर स्मरून वचन देतों, ह्यावर त्वां पूर्ण विश्वास ठेवावा. तूं माझ्या म्हणण्याप्रमाणें वागूं लागलास, तर मी तुला जीवकाप्राण करीन, हें खचीत स-

मज- पण जर तूं आपली दुर्बुद्धि सोडणार नाहींस, व आमच्या इच्छेनुरूप वागणार नाहींस, तर, ईश्वरी संकेतानें, तुझें पितृत्व जें मला प्राप्त झालें आहे, त्याच्या नात्यानें मी तुला असा शाप देतों कीं, तुझें कधीं ही बरें व्हावयाचें नाहीं; आणि तुझा मी राजा ह्या नात्यानें मी तुला खचीत सांगतों कीं, तुझ्या अपराधांबद्दल तुला शासन केल्याखेरीज मी कधीं राहणार नाहीं. माझा पक्ष खरा आहे; तो जगदीश्वरास मान्य आहे; तो मला तुझा सूड उगविण्यास साह्य देईल ह्यांत संशय नाहीं. "

आलेक्सिसानें हें पत्र वाचून पाहिलें. आणखी शिवाय त्या दोघां गृहस्थांनीं त्यास पुष्कळ सांगितलें; तेव्हां आलेक्सिस आपल्या वेश्येसहवर्तमान झार ह्याजकडे यावयास निघाला. ते सगळे तारीख १७ फेब्रुवारी स० १७१८ इसवी रोजीं मास्कोशहरास पोंचले. त्याच दिवशीं पितापुत्रांची भेट एकांतीं झाली. तेथें काय काय घडलें, हें कोणाला समजलें नाहीं. तरी, त्यांचें वैमनस्य मोडलें, असा लोकांनीं अदमास केला.

परंतु तो अदमास बरोबर नव्हता; म्हणजे त्या भेटीनें त्यांचें वैमनस्य मोडलें तर नाहींच, परंतु उलटें पुष्कळ वाढून, गोष्ट निकारास आली. दुसरे दिवशीं पीतरानें मास्कोच्या किल्ल्यामध्यें सगळे धर्माधिकारी, प्रधान, व बडेलोक बोलावून दरबार केलें. तेथें आलेक्सिस ह्यास धरून आणिलें, तेव्हां तो झाराच्या पायां पडला, आणि त्याचे हातांत त्यानें एक कागद दिला. त्यांत असें लिहिलें होतें कीं, " मी सर्वस्वीं अपराधी आहें; मी राजाधिकारास योग्य नाहीं, ही गोष्ट खरी आहे; तथापि कृपा करून मला जीवदान द्यावें, एवढेंच मागणें आहे. " हें वाचिल्यावर, पीतरानें त्या मुलास जवळ घेऊन, हातांत धरून एकांतीं नेलें. तेथें त्यांचीं काय काय भाषणें झालीं हें कोणास कळलें नाहीं. तथापि बाहेर आल्यावर पीतरानें असें म्हटलें कीं, " हा अमचा मुलगा आळशी, बेकूब, आणि दुष्टाची संगति धरणारा, सर्व

सुधारणांचा द्वेष करणारा, आणि अत्यंत दुराचारी आहे; ह्यानें आपल्या बायकोस इतका त्रास दिला कीं, तिला जगण्यापेक्षां मरणें बरें वाटलें; ह्यानें एक नीच स्त्री ठेविली आहे; हा मला नविचारितां जर्मनी देशाच्या बादशाहाकडे जाऊन त्याजपाशीं आश्रय मागत होता; हा आमची फार निंदा करितो; आणि ह्यानें त्या बादशाहास असें सांगितलें कीं, मी रूसदेशास परत गेलों तर झार मला जीवंत ठेवणार नाहीं. बरें कांहीं चिंता नाहीं. आतां आम्हीं जें वाचून दाखवितों तें सर्वांनीं लक्षपूर्वक ऐकावें. " असें बोलून पीतरानें एक कागद वाचिला, त्याचा सारांश येणेंप्रमाणें.-" पहा, आमच्या मुलाची वर्तणूक अशी आहे. तो परमुलुखांत पळून गेला होता, व त्यानें आम्हांवर जीं कुभांडें घेतलीं होतीं, त्यांवरून पाहिलें असतां ह्यास देहान्त शासन योग्य आहे. परंतु ममतेमुळें आमच्यानें तें त्यास करवत नाहीं. म्हणून आम्ही त्या त्याच्या अपराधांची क्षमा करितों. परंतु, त्याची वर्तणूक इतकी वाईट आहे कीं, आमच्या मागें राज्याचा मालक तो व्हावा, असें आमच्यानें म्हणवत नाहीं. जर राज्य त्याचे हातीं गेलं, तर आम्हीं मिळविलेलें यश हा घालवील, आणि जो नवीन मुलुख आम्हीं संपादिला आहे, तो सगळा हा गमावील. आम्हीं आपली प्रजा जर ह्याचे स्वाधीन केली, तर तिची इतकी दुर्दशा होईल कीं, तितकी दुर्दशा तिची पूर्वीं कधींही झाली नसेल. ह्यास्तव, आमच्या देशांत जी अशी चाल आहे कीं, माझा मुलगा माझे जिनगीचा वारीस नाहीं, असें पाहिजे असल्यास बापानें ठरवावें, त्या चालीच्या आधारानें, व आमच्या राज्याधिकाराच्या आधारानें, देशाच्या कल्याणाकरितां, आम्ही असें प्रसिद्ध करितों कीं, आमच्या अंतकाळीं दुसरा कोणीही वारीस जरी आमच्या राज्यास नसला, तरी ही आमची गादी ह्या आलेक्सिससास मिळूंनये.-आमच्या मागें ह्या सिंहासनावर आमचा दुसरा पुत्र पीतर ह्यानें बसावें,

असें आम्ही ठरवितों.-हा आलेक्सिस जर कधीं ही गादी मिळविण्याविषयीं प्रयत्न करील, तर ते निष्कल होवोत.-हें जें आम्हीं म्हटलें, त्यास आमच्या प्रजेची व आमच्या सर्व कामदारांची मान्यता असावी; त्यांनीं असें समजावें कीं, आमच्या मागें ह्या गादीवर, आमचा दुसरा मुलगा पीतर ह्यानें बसावें, अशी आमची इच्छा आहे. आजपासून जे कोणी ह्या आलेक्सिसास आमच्या राज्याचा वारीस समजतील, अथवा हें राज्य त्यास मिळण्याकरितां साह्य करतील, ते महापातकी राजद्रोही आहेत असें समजून त्यांस आम्ही मोठें शासन करूं.— हा ठराव मला माहीत झाला नाहीं, असें म्हणण्यास कोणालाही जागा राहूंनये, म्हणून हा सर्वत्र प्रसिद्ध करण्याविषयीं हुकूम दिले आहेत.— तारीख १४ माहे फेब्रुवारी सन १७१८ इसवी— ह्यावर आम्हीं स्वहस्तें सही व मोर्तब केलें असे.—"

हें वाचिल्यानंतर, आलेक्सिसानें आपले तर्फे जो लेख आपल्या पित्यास लिहून दिला, तो वाचिला. त्याचा सारांश येणें प्रमाणें.- " माझे हातून अनेक अपराध झाले आहेत, आणि त्यांमुळें मी राजासनारूढ होण्यास अयोग्य झालों आहें, ही गोष्ट खरी आहे, हें मी परमेश्वरस्मरण करून कबूल करितों. आणि शपथपूर्वक मी असें सांगतों कीं, माझ्या पित्यानें जो हा ठराव मजविषयीं केला आहे, त्याप्रमाणें मी चालेन, त्याचें उल्लंघन मी कधीं करणार नाहीं, ह्यास विश्वंभर साक्ष असो. ही गादी मिळविण्याचा मी कधींही प्रयत्न करणार नाहीं, तिजवर कधीं वारसा सांगणार नाहीं, व कसाही प्रसंग आला तरी ती पतकरणार नाहीं. माझा धाकटा भाऊ पीतर हा माझ्या लित्याच्या मागें गादीचा मालक व्हावा, ही गोष्ट मी संतोषपूर्वक मान्य करितों. हा कागद मी स्वहस्तें लिहून दिला असे."

ह्या प्रकारेंकरून पीतर आणि आलेक्सिस ह्यांच्या फारखती झाल्या. पुत्राशीं अशा कडक रीतीनें वागण्याचा प्रसंग प्रा-

म होणें, ही पीतराच्या दुर्दैवाची गोष्ट होय. व्हालतेर असें म्हणतो कीं, ह्या प्रकरणांत पीतरास आडविहीर झाली होती. म्हणजे, इकडे पुत्रप्रीतीच्या पाशांत गुंतून, त्यास गादीवर बसूं द्यावें, तर दोन कोटि लोकांच्या सुखावर पाणी ओतावें; बरें, तिकडे राजधर्म मनांत आणून केवळ जनहित करावयास लागावें, तर स्वपुत्रास दुःख द्यावें. अशी त्याच्या जीवाची ओढाताण चालली होती. त्याला आलेक्सिसाची फार दया येत असे. परंतु, त्याच्या सुखार्थ आपल्या प्रजेकडे दुर्लक्ष करण्यास त्याचा जीव वाहीना. तेव्हां त्याला अशी तुटातूट करणें भाग पडलें. तथापि हा पितापुत्रांचा कलह येथें संपला नाहीं. त्याचा भयंकर प्रकार तो अद्याप पुढें यावयाचाच आहे. त्याचें निरूपण पुढच्या भागीं करूं.

---

## भाग साहावा.

आलेक्सिसाचा कोणत्याही प्रकारचा संबंध गादीशीं नाहीं, असें संस्कारपूर्वक कायदेशीर रीतीनें जरी आपण करून टाकिलें आहे, तरी त्यास पुष्कळ लोक अनुकूल आहेत ह्यामुळें राज्यामध्यें कदाचित आंतले आंत लढाई उत्पन्न होईल; ती न्व्हावी एतदर्थ हें प्रतिकूल प्रकरण अगदीं नाहींसें करून टाकावें, किंवा निदान निर्बल तरी करून टाकावें अशा हेतूनें त्याची चौकशी पीतरानें पुनः चालविली. त्याचे मनांत एवढेंच होतें कीं, आपल्या व्रात्य मुलाचा कट केवढासा आहे तो आपणास कळावा, आणि त्यांतले पुढारी कोण कोण आहेत हें समजावें, म्हणजे त्याप्रमाणें त्यांचा बंदोबस्त ठेवण्यास ठीक पडेल. ह्याविषयीं त्यानें प्रथम आलेक्सिसास विचारिलें. तेव्हां त्यानें शपथपूर्वक असें कबूल केलें कीं, मी कांहीं एक चोरून न ठेवितां सर्व

सांगेन. त्यावर विश्वास ठेवून झारानें त्याजकडे कांहीं प्रश्न पाठविले. त्यांचीं उत्तरें त्यानें सगळीं खोटीं दिलीं. आणखी त्यांत त्यानें एके ठिकाणीं तर असें म्हटलें कीं, " मेक्लिनबर्ग येथील बंड जर चांगलें जमलें असतें, व त्या बंडखोरांनीं जर मला बोलाविलें असतें, तर आपण जीवंत असतां सुद्धां मी त्यांस जाऊन मिळालों असतों. " तो विएना येथें असतां त्यानें रूस देशाच्या अधिकाऱ्यांस जें पत्र लिहिलें होतें, तें सांपडलें. त्यांत असें लिहिलें होतें कीं, " मला वारंवार अतिशयित त्रास होऊं लागला म्हणून मीं देशत्याग केला आहे. थोडें चुकलें, नाहींतर, त्यांनीं मला माझ्या आईबरोबर, मठांत, कोंडून ठेविलें असतें. तूर्त मला एका मोठ्या राजाचा आश्रय आहे. तुम्ही मला सोडूं नका म्हणजे झालें. "

अफानासीफ ह्या नांवाच्या मनुष्यानें अशी जबानी दिली कीं, " मुख्य धर्माधिकाऱ्यांच्या कानांत एक गोष्ट सांगितली, म्हणजे ते ती आपल्या हाताखालच्या लोकांस कळवितील, आणि ते ती सर्व लोकांचे मनांत भरवितील, मग मी नको नको म्हटलें तरी मला सहज गादी मिळेल, असें आलेक्सिस बोलत होता, तें मीं स्वतः ऐकिलें." आलेक्सिसाच्या खुद वेश्येनें असें सांगितलें कीं, तो जर्मनी देशांत पळून गेला, तेव्हां त्याला त्याच्या आईचें व बहिणीचें अनुमत होतें, हें मला पक्कें ठाऊक आहे. जाकेस नामक एका धर्माधिकाऱ्यास थोडीशी कडक समज दिल्याबरोबर त्यानें असें लिहून दिलें कीं, " माझा बाप मेला तर बरें होईल, असें आलेक्सिसानें मजपाशीं एक वेळ म्हटलें आहे. आणि तेव्हां मीं त्यास असें उत्तर दिलें कीं, होय आमची सर्वांचीही इच्छा तशीच आहे. "

जर्मनींतली हकीकत पीतरानें त्यास विचारिली. तेव्हां त्यानें त्यास असें सांगितलें कीं, " मी बादशाहास भेटलों नाहीं. तथापि त्याच्या एका मोठ्या सरदारानें असें मला सांगितलें होतें

कीं, तुम्ही स्वस्थ राहा; बादशाहा तुम्हांला केवळच ना म्हणणार नाहीं, तुम्हांला गादी प्राप्त होण्याकरितां तो सैन्याची मदत देईल. " आणखी दुसऱ्या एका ठिकाणीं त्यानें असें लिहून दिलें कीं, " बापाच्या वळणावर मी कधीं जाणार नाहीं, असा माझा निश्चय झाला आहे; ह्यास्तव कोणत्यातरी रीतीनें, म्हणजे परदेशच्या राजाच्या मदतीनें सुद्धां मी गादी मिळविण्याचा प्रयत्न करीत होतों. तो जर सिद्धीस जाता, तर मला गादी खचीत खचीत मिळाली असती. " पीतरानें ज्या अनेक अटी आलेक्सिसास सांगितल्या होत्या, त्यांमध्यें एक अट अशी होती कीं, ह्या पळण्याच्या वगैरे प्रकरणांत कोण कोणाच्या मसलती होत्या, हें त्यानें सर्व खरें खरें सांगितलें पाहिजे, तरच त्यास त्याच्या अपराधांची क्षमा व्हावयाची, एरव्हीं व्हावयाची नाहीं. ही अट आलेक्सिसानें पाळिली नाहीं. त्यानें कितीएकांचीं नांवें चोरिलीं, हें पीतराच्या दृष्टोत्पत्तीस आलें. तेव्हां त्याला अतिशयित संताप आला. त्याच्या अंतःकरणांतली दयामाया तर अगदीं नाहींशी झाली. आणि त्यानें असा ठराव केला कीं, ह्या राजद्रोही कपटी अपराध्याची चौकशी मुख्य न्यायसभेनें करून त्यास योग्य शिक्षा दिली पाहिजे.

त्याप्रमाणें आलेक्सिसाचा न्याय करण्यास सभा भरली. तींत कांहीं न्यायाधीश होते, आणि कांहीं धर्माध्यक्ष होते. चौकशीस आरंभ होण्यापूर्वीं झार ह्यानें त्या सभेपुढें फार चित्तवेधक भाषण केलें. त्याच्या उत्तरार्धाचें तात्पर्य असें:- " माझ्या पुत्रानें आपलें इमान खांचेंत घातलें. ! तो खुशाल घालो. ! परंतु, माझें कर्तव्य कर्म म्हणून जें मला वाटतें, तें केल्या वांचून मी राहणार नाहीं. अहो, ह्या प्रकरणाचा तुम्ही चांगला विचार करा बरें. ! लक्ष लावून हा खटला तपासा, आणि जी अगदीं वाजवी शिक्षा तुम्हांला वाटेल, तीच ह्याला द्या. तुम्ही माझी मुरवत धरूं नका. ह्या अपराधास शिक्षा अगदीं थोडी असा-

वी, असें जर तुमच्या मनांस वाटेल, तर थोडी शिक्षा दिल्यानें मला राग येईल, असें बिलकूल मनांत आणूं नका. मी आपणांस शपथपूर्वक ईश्वर स्मरून असें सांगतों कीं, खरा न्याय करण्यास तुम्हांला कोणालाही भ्यावयास नको.— आपल्या प्रभूच्या पुत्राची चौकशी करण्याचा प्रसंग आपणांस प्राप्त झाला आहे, असें मनांत येऊन तुम्हांस वाईट वाटण्याचें कारण नाहीं. मनुष्याच्या योग्यतेकडे वगैरे लक्ष न देतां केवळ न्याय करा. अन्याय करून माझ्या आणि आपल्या अशा दोघांच्या आत्म्यांचा नाश करूंनका. सर्व समर्थ प्रभु न्याय करावयास बसेल, त्या दिवशीं आपणांस पश्चात्ताप करण्याचें आणि मान खालीं घालण्याचें कारण न पडे, असा न्याय करा, आणि देशाची हानि होणार नाहीं अशी तजवीज ठेवा, एवढेंच सांगणें आहे."

हें भाषण झाल्यावर सभेनें चौकशी चालविली. तींत आलेक्सिस अपराधी ठरला. आणि त्यास देहान्त शासन असावें, असा त्यांचा अभिप्राय पडला. तो तपशीलवार लिहून त्यांनीं झारास कळविला. त्यांत, अमुक पर्यायानें ही शिक्षा अमलांत आणावी, असें त्यांनीं लिहिलें नव्हतें. हा ठराव तारीख ५ जुलै रोजीं प्रसिद्ध झाला. तो आलेक्सिसास समजतांच त्याची प्रकृति अतिशयित बिघडली. तो अगदीं अर्धमेला झाला, असें म्हटलें तरी चालेल. कसा झाला तरी राजपुत्रचतो. ! तो आजारी पडतांच वैद्योपचार चालले. परंतु, त्यांचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. तो घडोघडीं अधिकाधिक पिचत चालला. तें पीतरास कळलें तेव्हां तो आपल्या प्रधानमंडळीसहवर्तमान त्यास भेटावयास गेला. त्या वेळची हकीकत खुद झारानें लिहून ठेविली आहे. तिचें तात्पर्य असें:—
" आम्ही त्याजपाशीं जाऊन बसलों. नंतर त्यानें आपलीं सर्व पापकर्में आठवून मोठा सुस्कारा टाकिला, आणि डोळ्यांत पाणी आणून त्यांजबद्दल मजपाशीं क्षमा मागितली. मी धर्मशास्त्र

आणि पितृधर्म मनांत आणून त्यास सांगितलें कीं, बाबारे, तुझ्या सर्व अपराधांची क्षमा मीं तुला केली आहे. ह्यानंतर तारीख ७ जुलैरोजीं सायंकाळीं साहावाजतां त्यानें प्राण सोडिला. !" हरहर ! जो अर्ध्या पृथ्वीचा राजा, पराक्रमी पीतर, त्याच्या प्रत्यक्ष पुत्रास देहान्त शिक्षा ठरून असें मरण यावें काय. ? परंतु, होणारा पुढें मनुष्य काय करील. ?

आलेक्सिसाच्या मरणाविषयीं अनेक ग्रंथकारांचीं अनेक मतें आहेत. कोणी म्हणतात, त्यास झारानें विषप्रयोग करविला; कोणी म्हणतात त्याची मान कुऱ्हाडीनें तोडून पुनः शिवली होती; आणि कोणी म्हणतात कीं तो शिक्षेच्या धास्तीनें पिचून पिचून मरण पावला. ह्यांपैकीं हें शेवटचें मत विशेष विश्वसनीय आहे, असें पुष्कळ सुज्ञ लोक समजतात. आणि तेंच खरें दिसते. पहा, पीतर हा स्वेच्छाचार बादशाहा होता; त्यास कोणतीही गोष्ट उघडपणें करण्यास कांहीं हरकत नव्हती; आणि सर्वमान्य न्यायाधीशांनीं, पुरावा वगैरे पाहून, आलेक्सिसास देहान्त शासन ठरविलें होतें; तेव्हां अशा निंद्य रीतीनें स्वपुत्राचा प्राण घेण्यास पीतरासारख्या थोर मनाच्या मनुष्यास अतिशयित लज्जा वाटावी, ह्याविषयीं कोणाही विचारी पुरुषास संशय यावयाचा नाहीं. असो. कोणत्याही प्रकारें म्हणा, ह्या पितापुत्रांच्या वैमनस्याचा परिणाम असा झाला. ! स्वदेशकल्याणाची उत्कंठा, आणि पुत्रप्रीति ह्यांचें युद्ध पीतराच्या अंतःकरणांत लागून, शेवटीं स्वदेशकल्याणाच्या उत्कंठेचा जय झाला. ! जगाच्या इतिहासांत अशा चमत्कारिक गोष्टी फार थोड्या आढळतील. ! असो.

इकडे असें चाललें होतें, तरी, स्वीदनच्या राजाशीं जी लढाई चालू होती, ती म्हणजे बंद पडली होती असें नाहीं. तथापि, परमेश्वराच्या संकेतानुरूप एक मोठी गोष्ट एकाएकीं घडून त्या युद्धाचा शेवट झाला. त्याचा प्रकार असा.— बारा-

वा चार्लस, मागें सांगितल्याप्रमाणें, तुर्कस्थानांतून पळून आल्यावर, नार्वेदेशावर स्वारी करून फ्रेदरिकस्ताद ह्या शहरास वेढा घालीत होता, तेथें त्यास गोळी लागून तो मरण पावला. हें वर्तमान इ० स० १७१८ त घडलें. त्यानंतर लागलाच रूसदेशचा व स्वीदनदेशचा तह, इ० स० १७२१ च्या सप्तंबर महिन्याच्या १० व्या तारखेस न्यैस्ताद येथें झाला. त्यावरून लिव्हिनिया, इस्थोनिया, इनग्रिया, कार्लिया, आणि वैबर्ग हीं सगळीं पीतरास मिळालीं. शिवाय फिनलांदही त्याच्याच ताब्यांत आलें. ह्या तहानें जो हा लाभ त्यास झाला, त्याकरितां त्यास एकसारखे वीस वर्षें श्रम करावे लागले.

स्वीदनासारख्या प्रबल राष्ट्राशीं लढतां लढतां शेवटीं आपणास एवढें यश प्राप्त झालें, हें पाहून पीतरास व त्याचे सर्व प्रजेस परम संतोष झाला. जे स्वीद लोक सैबिरीयामध्यें प्रतिबंधांत ठेविले होते, ते लागलेच मोकळे सोडिले; आणि पीतरानें त्यांस उघडपणें असें सांगितलें कीं, तुम्ही पाहिजे असल्यास स्वदेशीं जा अथवा येथें स्वस्थ राहा, तुमच्या केंसासही कोणी धक्का लावणार नाहीं. बाराव्या चार्लसाकरितां जीवाकडे न पाहतां, जे पुरुष रणांगणीं लढून, शेवटीं पीतराच्या हातीं सांपडले होते, त्यांस तर त्यानें मोठीं अब्रूचीं पत्रें देऊन स्वीदनच्या नव्या राजाकडे पाठविलें. त्यांचा त्यानेंही बहुमान केला. असें पीतराचें मन होतें. पहा पूर्वी सांगितलेला एहरेन स्किल्द ह्यासही ह्याच वेळीं सुटका मिळाली. तो पीतराचा निरोप घेऊन निघाला तेव्हां त्या शूरास त्यानें, जडावाच्या चौकटींत बसविलेली आपली स्वतःची तसबीर बक्षीस दिली.! तो स्वीदनास पोहोंचल्यावर नव्या राजानें त्यास एका मोठ्या जागेवर नेमिलें.

एवढ्या मोठ्या युद्धामध्यें परमेश्वरानें आपणास विजयी केलें, आणि तेणेंकरून आपला इतका फायदा झाला, असें मनांत आणून, पीतरानें, मोठ्या समारंभानें स्तुतिस्तोत्रपूर्वक

त्याचे फारफार आभार मानिले. आपल्या प्रजेनें आपणास चांगलें साह्य केलें म्हणून त्यांचे उपकार प्रदर्शित करून, त्यांच्या संतोषार्थ असा ठराव केला कीं, जे कोणी लोक सरकारचा पैसा थकल्यामुळें प्रतिबंधांत ठेविले असतील, त्यांस एकदम सोडून द्यावें; तसेंच ज्यांकडे बाकी यावयाची राहिली असेल, तीही मागूंनये; आणि चोरी व खून ह्या अपराधांवरून शिक्षा पावलेले कैदी खेरीज करून बाकीच्यांस मोकळें करावें. आपला प्रभु इतका अनंदित झालेला पाहून सर्व प्रजा परमसंतोष पावली. पीतर हा महापराक्रमी असून, त्यानें आपल्या प्रजेस केवळ पोटच्या पोरापेक्षां अधिक ममतेनें वागविलें आणि सुधारिलें, ही गोष्ट त्या प्रजेंतील सर्व सुज्ञ जनांच्या मनांत येऊन चुकली. तेव्हां त्यांनीं, सर्वानुमतें, त्यास “ पीतर घि ग्रेत ( पराक्रमी ), सर्व रुशियन लोकांचा बादशाहा, आणि देशाचा केवळ मायबाप ” असा बहुमानाचा किताब स्वीकारण्याची विनंती केली. ती त्यानें मान्य केली. त्या समयीं प्रधानसभेमध्यें जो मोठा जनसमाज जमला होता, त्यानें, “ पीतर घि ग्रेत ह्याचें निरंतर कल्याण असो, ” असा त्रिवार जयघोष केला. आणि त्या दिवशीं नानाप्रकारचीं वाद्यें वाजून, सर्व शहरभर मोठा आनंद झाला. हा उत्सव सुमारें पंधरा दिवस चालला होता.

नंतर, इ० स० १७१८ ह्या वर्षापासून जे अनेक कारखाने पीतरानें सुरू केले होते, त्यांची देखरेख त्यानें चालविली; सर्व राज्याच्या बंदोबस्ताकरितां पोलीस स्थापिलें; नवीन कालवे बांधण्याचे बेत केले; जुगार खेळेल त्यास शिक्षा होईल, असा कायदा ठरविला; निराश्रित पोरक्या पोरांच्या संरक्षणाकरितां कितीएक गृहें बांधिलीं; जागोजाग दवाखाने ठेविले; आणि सर्व राज्यामध्यें वजनेंमापें एकसारखीं चालावीं, असा कायदा केला. त्या वेळीं अर्थशास्त्राचें ज्ञान फार कमी असल्यामुळें, मनुष्यास अवश्य लागणाऱ्या सर्व पदार्थांच्या किमती ठरवून टाकण्याविष-

यीं पीतरानें यत्न केला होता. तसेंच, उंची पोषाक म्हणजे अमुक किमतीपर्यंत असावा, अधिक किमतीचा असतां कामास नये, अशीही कांहीं इयत्ता त्यानें ठरविली होती. मास्को आणि पीतर्सबर्ग येथील रस्त्यांस फरसबंदी त्यानें केली. भिकार फार वाढून लोकांस त्रासवीत असे, तें मोडून टाकिलें, आणि अमंगलपणादि ज्या गोष्टींनीं लोकांच्या प्रकृतीस धक्का पोहोंचेल असें त्यास वाटलें, त्या नाहींतशा करण्याविषयीं सक्त तजवीज ठेविली होती. स्वदेशाबाहेर जाणें हें रूसदेशचे जुने लोक अगदीं अशुद्ध मानीत; परंतु, तें फार उपयोगाचें आहे, असें पाहून पीतरानें आपल्या सरदार लोकांच्या मुलांस, त्यांच्या कुटुंबांसहवर्तमान बाहेर पाठवावें, आणि तद्वारा परदेशांतील चांगल्या रीतीभाती आपल्या देशांत याव्या, असा क्रम चालविला असे. आणि ह्याच हेतूनें तो परक्या देशांतील लोकांस आपल्या देशामध्यें राहवून घेऊन त्यांजवर विशेष ममता करी. परदेशांत जें कांहीं चांगलें म्हणून आहे, तें कोणत्या तरी पर्यायानें आपल्या देशांत यावें, अशी त्याची अतिशयित उत्कंठा होती, ह्यांत संशय नाहीं.

त्यानें सेंतपीतर्सबर्ग येथें लहानसहान हत्यारें करण्याचा एक कारखाना घातला होता. तो पाहावयास तो नेहमी स्वतः जात असे. लोंकरीचीं वस्त्रें करण्याचे कारखाने ज्यांनीं तेथें घातले होते, त्यांस उत्तेजन येण्याकरितां तो द्रव्यद्वारा पुष्कळ साह्य करी. तेणेंकरून असें झालें कीं, लष्कराच्या पोषाकाकरितां जर्मनींतून जें कापड आणावें लागे, तें तेथच्या तेथें तयार होऊन मिळूं लागलें. त्याच्या राज्यामध्यें सोनें, रुपें, लोखंड, आणि तांबें ह्यांच्या खाणी मोठ्या धनत्तर होत्या; त्यांजविषयीं चौकशी करण्यास त्यानें एक मंडळी नेमिली. तिचें काम एवढेंच होतें कीं, ते धातु काढण्याचे कामीं जो खर्च होतो, तो, त्या धातूंच्या किमतीपेक्षां कमी होतो किंवा अधिक

होतो, हें पाहावें, आणि त्याविषयींची हकीकत पीतरास कळवावी. जमाखर्चाविषयीं पीतराची नजर फार बारीक होती.

पूर्वी युरोप खंडांतल्या इतर देशांतील माल प्रथम आर्केंजल येथें येत असें, तो पीतर्सबर्ग येथें एकदम यावा आणि तेथें त्याचा क्रयविक्रय व्हावा, असें पीतरानें ठरविलें. इराणांतून पुष्कळ रेशीम आस्त्राखान शहरीं जाई; त्यांतील व्यापाऱ्यांसही त्याचा चांगला अश्रय असे. सैबीरिया आणि चीन देश ह्यांच्यामध्यें व्यापार बहुधा बैलगोंग्यांच्या योगानें चाले; तो व्यापार, मध्यंतरीं, लमाण लोकांच्या दांडगाईवरून चिनी लोकांनीं बंद ठेविला होता. परंतु, पुढें कांहीं दिवसांनीं त्यांचा बादशाहा कांगही हा अजारी पडला. त्यास चिनी वैद्यांच्या औषधांनीं गुण येईना; आणि युरोपांतले ज्योतिषी चीनच्या ज्योतिष्यांपेक्षां पुष्कळ चांगले आहेत, अशी जशी त्याची खातरी झाली होती, तशीच त्याचे मनांत अशी कल्पना आली कीं, तिकडचे वैद्यही तसेच श्रेष्ठ असतील. ह्यास्तव त्यानें आधीं व्यापार चालू करून, पीतरापाशीं एक वैद्य मागितला. त्यानें बेल ह्या नांवाचा एक गृहस्थ त्याजकडे पाठविला. त्यानंतरही पुनः एकदा लमाणावरून तंटा झाला होता. पण तो लवकरच मिटला. हल्लीं कितीएक तरुण रुशियन लोक पेकिन येथें व्यापारी होऊन राहिले आहेत.

पीतर्सबर्ग येथील काम आटपल्यावर पीतर मास्को शहरीं आला. तेथें पुष्कळ घोंटाळा त्याच्या दृष्टीस पडला. तो नाहींसा करण्याकरितां त्यानें एक मंडळी नेमिली. तेव्हां पुष्कळ खटले उपस्थित झाले. त्यांत सैबीरिआ प्रांताचा सुभेदार गाजारिन ह्यानें लमाण लोकांस लुटून पुष्कळ पैसा जमविला आहे, असें उघाडीस आलें. त्याला लागलेंच कैदेंत ठेविलें. तेथें झार ह्यानें स्वतः जाऊन असें वचन दिलें कीं, तूं खरें खरें सगळें वर्तमान सांगशील, तर मी तुला तुझ्या सर्व अपरा-

धांची क्षमा करीन. त्यास तो कबूल झाला. त्यानें, आपले सगळे अपराध एका कागदावर स्वहस्तें लिहून, तो पीतरास दिला. तो कागद न्याय सभेपुढें वाचिला तेव्हां गाजारिन ह्यानें तेथल्या तेथें असें सांगितलें कीं, "झारानें मजवर जुलूम करून हें मजपासून लिहून घेतलें आहे, वास्तविक पाहिलें असतां ह्यांतलें एक अक्षर देखील खरें नाहीं." हें ऐकून पीतर क्षणभर स्तब्ध राहिला; आणि म्हणाला, "बरें, खराखरा न्याय व्हावा अशी माझी इच्छा आहे. ह्याचा साक्षी पुरावा घ्या, आणि मग काय तो निकाल सांगा." त्याप्रमाणें पुरावा घेतला. त्यावरून त्यावर भरपूर शाबिदी झाली. आणि त्यांनीं त्यास फांशींची शिक्षा ठरविली. तेव्हां तो डोळ्यांत आंसवें आणून म्हणाला, "आतां महाराजांनीं मजवर कृपा दृष्टि करावी, असें मीं कांहीं ठेविलें नाहीं." शेवटीं त्यास न्यायसभागृहापुढें त्याच्या सर्व आप्तांसमक्ष फांशीं दिलें.

पीतर राज्याच्या एवढ्या मोठ्या प्रकरणांत गुंतला होता, तरी देशकल्याणाकडचें त्याचें लक्ष कमी झालें नव्हतें. त्यानें कांहीं तरुण लोक हालंद आणि इताली ह्या देशांत चित्रें काढण्याची विद्या व सुंदर इमारती बांधण्याची कला शिकण्याकरितां पाठविले होते. ते तयार होऊन आल्यावर त्यांजकडून देवालयांवर नानाप्रकारचीं चित्रें काढविलीं, व राजवाडे वगैरे सुंदर इमले बांधविले. त्याला नाटकांचा मोठा नाद असे. त्यानें इताली देशांतली नाटक करण्याची रीति आपल्या लोकांत चालू केली.

सार्वजनिक मेजवान्यांची व्यवस्था नीट चालून, आपल्या देशांतील स्त्रीपुरुषांच्या रीती चांगल्या व्हाव्या, ह्या हेतूनें त्यांजविषयीं त्यानें कांहीं नियम केले होते. त्यांचें तात्पर्य आम्ही येथें लिहितों. म्हणजे त्या वेळीं रूस देशच्या लोकांची स्थिति कशी होती, हें सहज लक्षांत येईल.– " १ मेजवानीची जाहि-

रात मेजवानांच्या घरावर लावावी.– २ लोकांनीं पांच वाजल्या-
चे आंत जमूं नये, व दाहा वाजल्यावर राहूं नये.– ३ घरच्या
धन्यानें खुर्चा, दिवाबत्ती, खाण्यापिण्याचे पदार्थ, गंजिफा वगैरे
खेळण्याचें सामान इत्यादि सर्व गोष्टींची तयारी ठेवावी; परंतु,
त्यानें स्वतः त्यांच्या सेवेस सिद्ध असलें पाहिजे असें नाहीं; तर
तो तेथें नुसता असला म्हणजे पुरे.– ४ नेमल्या वेळांत पाहिजे
त्यानें पाहिजे तेव्हां यावें आणि पाहिजे तेव्हां जावें.– ५ प्रत्ये-
कानें बसावें, फिरावें, खेळावें, बोलावें, किंवा जसें त्याला वाटेल
तसें राहावें. त्यांत जर कोणीं कांहीं गैर काम केलें, तर त्यास
एक मोठा तांब्याभर दारू पाजावी, ही शिक्षा आहे.– ६ सर-
कारचे मुलकी, लष्करी, व आरमारावरील कामदार, प्रतिष्ठित
व्यापारी, गलबतें बांधणारे, इत्यादिकांनीं आपल्या बायकामुलां-
सह ह्या मेजवान्यांस यावें. नौकर लोकांस बसण्यास जागा
वेगळी असावी." ह्या नियमांच्या योगानें पुष्कळ सुधारणा
झाली. रुशियन लोकांस दारू पिऊन झिंगण्याची चटक फार
असे, ती बहुत करून गेली, असें म्हटल्यास चिंता नाहीं.

पीतर ह्यास तरुणपणीं दारू पिण्याचा फार छंद होता. पण
पुढें पुढें ती खोड त्यानें अगदीं सोडून दिली होती. तो क्यायेराइन
हीस बरोबर घेऊन जेवावयास बसे. तेव्हां आपला एक चा-
कर आणि राणीची एक दासी, अशीं दोन माणसें मात्र तो तेथें
राहूं देऊन, बाकीच्या सर्वांस जावयास सांगे. तो एके दिवशीं
इराणच्या वकिलास पंक्तीस घेऊन जेवावयास बसला असतां
त्यास म्हणाला " हुजऱ्ये आणि खिदमतगार हे नेहमीं आपल्या
धन्यांच्या तोंडांकडे टक लावून पाहात असतात. धनी काय
बोलतात तें ते लक्ष देऊन ऐकत असतात; त्यांच्या बोलण्याचा
अर्थ भलताच करितात; तेव्हां अर्थातच त्यांच्या योगानें लोकांत
नाहीं नाहीं त्या गप्पा पसरतात." हें कांहीं अंशीं खरें आहे.

पीतर ह्याच्या वेळीं लहान मोठे पुरुष व स्त्रिया, पाहिजे ते-

व्हां जोगीपणाचें धारण करून, मठांत जाऊन राहात. आणि त्यांच्या खाण्यापिण्याचा खर्च सरकारावर पडे. हें झार ह्यास नीट दिसलें नाहीं. सामोपचारानें कोणी ऐकत नाहीं असें पाहून, त्यानें असा एक कायदा केला कीं, मनुष्यास पन्नासावें वर्ष पुरें झाल्याशिवाय त्यानें जोगीपणा घेतां कामासनये. तो ह्याविषयीं एकदा असें म्हणाला कीं, " मुलकी आणि लष्करी खात्यांची सुधाराणा मीं केली असून जर धर्म खात्याची सुधारणा मीं केली नाहीं, तर मला परमेश्वर काय म्हणेल. ? " सारांश, सर्व धर्माचें आधिपत्य ह्याप्रमाणें त्यानें आपणाकडे घेऊन, वर सांगितलेला कायदा एकदम अमलांत आणिला. हें काम त्यानें उत्तम केलें ह्यांत संशय नाहीं. कारण, तरुणपणामध्यें सन्यासधारण हें मानवस्वभावास अगदीं विसंगत दिसतें.

ह्या वेळेच्या सुमारास पीतर आपल्या राज्यांतील व्यापाराविषयीं विचार करीत असतां, त्याचे मनांत असें आलें कीं, पूर्वीप्रमाणें कास्पियन समुद्रावर आपली सत्ता चालेल तर फार चांगलें होईल. इतक्यांत त्या समुद्राच्या कांठावर एक गोष्ट घडली, ती अशी. इराण देशचा शाहा हुसेन हा फार विषयी आणि ढिला असल्यामुळें, त्याच्या राज्यावर अफगाण लोकांचा राजा मीरमहंमद ह्यानें मोठ्या सैन्यासहवर्तमान येऊन एकीकडून स्वारी केली; आणि लेसजियन लोक काकेशस पर्वतावरून दुसरीकडे येऊन त्यांनीं शेमाची शहर घेऊन तेथील सर्व लोकांस ठार मारिलें. त्यांत तेथें राहणाऱ्या तीनशें रुशियन लोकांची कत्तल उडाली. मीरमहंमद ह्यास मोठा जय मिळाला. त्यानें हुसेनाकडून आपलें सार्वभौमत्व कबूल करविलें. एवढें कारण पीतरास बस झालें. आपल्या देशचे तीनशें लोक प्राणांस मुकले, त्याबद्दलचा सूड घेण्याच्या निमित्तानें, कास्पियन समुद्रावर अंमल बसविण्याच्या उद्योगास झार लागला. त्यानें मीरमहंमदाकडे आपला वकील पाठविला. त्यानें त्याचा व त्याच्या यज

मानाचा, म्हणजे झाराचा, फार आपमान केला, हें एक; आणि तुसेनाकडून साह्याची मागणी आली होती, हें दुसरें. अशीं कारणें मनांत आणून, आपण कास्पियन समुद्रावर स्वारी करावी, असा पीतरानें निश्चय केला. त्याप्रमाणें पुष्कळ सैन्य बरोबर घेऊन, त्यानें कास्पियन समुद्रावर व इराण देशावरही चाल केली. परंतु त्यापासून त्यास कांहीं लाभ झाला नाहीं. असो.

पीतर ह्या स्वारींत बाहेर गुंतला असतां, मास्को येथें कित्तीएक अपराधी चौकशीकरितां अडकवून ठेविले होते. त्यांमध्यें, स्काफिराफ ह्या नांवाचा, झाराच्या मेहेरबानींतला एक मनुष्य होता. त्याजवर न्यायसभेमध्यें अनेक अपराधांची शाबिदी होऊन त्यास देहान्त शिक्षा ठरली होती. ती, उद्यां सकाळीं अमलांत येणार तों आज सायंकाळीं त्याविषयीं चोहोंकडे दौंडी पिटविली. तेणेंकरून, त्या शिक्षेच्या ठिकाणीं त्या वेळीं हजारों लोक जमले. सर्व तयारी झाली. कैदीस तेथें आणिलें. त्याचें शिक्षापत्र त्यास वाचून दाखविलें. त्यानें, अति पश्चात्ताप पावून, आपले सर्व अपराध कबूल केले. इतक्यांत नेमलेला काल प्राप्त झाला. तेव्हां, परमेश्वराचें स्मरण करून, त्या दुर्दैवी स्काफिराफानें आपली मान ठोकळ्याचावर ठेविली; डोकें कापणारानें कुऱ्हाड वर उचलिली; आणि तो ती आतां त्याच्या मानेवर घालणार, इतक्यांत एक जासूद येऊन मोठ्यांनीं ओरडला, "अहो दमधरा, दमधरा; महाराजानीं ह्याच्या जीवावर दया केली आहे. !! ह्यास मारावयाचें नाहीं. !!" तेव्हां त्यास पुनः कैदेंत नेऊन ठेविलें. ह्या मनुष्यानें सरकारचीं कांहीं मोठमोठीं कामें केलीं होतीं, तीं मनांत आणून, पीतरानें त्याचें देहान्तशासन कमी करून, त्यास देशपार केलें, आणि त्याची सर्व जिनगी जप्त करून सरकारांत आणिली. ही रदबदली क्याथेराइन हिनें केली होती असें सांगतात. कारण, तिची

त्यावर फार मर्जी असे. पीतराच्या पश्चात ती गादीवर बसली, तेव्हां तिनें त्याला सैबीरियांतून परत बोलावून आणिलें होतें.

पुढें इ० स० १७२३ च्या मार्चमहिन्यामध्यें पीतर सेंतपीतर्सबर्गशहरीं आला. तेथें त्यानें एक मोठें सर्व शास्त्रांच्या संग्रहाचें विद्यालय स्थापिलें. तें वाढत वाढत हल्लीं अत्युत्तम स्थिति पावलें आहे. तेथें जवळच जीं गलबतें बाधण्याचीं ठिकाणें होतीं, त्यांचीही त्यानें पुष्कळ सुधारणा केली. म्हणजे, पहिल्या व्यवस्थेंत जें त्याला कमीसें वाटलें होतें, तें त्यानें ह्या खेपेस पुरें करून टाकिलें.

ह्या नंतर पीतरानें स्वहस्तें, आपली प्राणप्रिया राणी क्याथेराइन, हिला राज्याभिषेक केला. तो समारंभ मोठा टोलेजंग झाला. त्यापूर्वी सर्व लोकांची एक मोठी सभा भरून, झार ह्यानें जें भाषण केलें, त्याचें तात्पर्य असें.- "लोकहो, गेल्या वीस वर्षांच्या युद्धामध्यें, आम्ही आपल्या जीवाकडे न पाहतां, आपल्या देशाच्या कल्याणाकरितां किती झटलों हें तुम्हांस विदित आहे; आम्हीं सांगितलें पाहिजे असें नाहीं. त्यांत आपल्या देशास यश प्राप्त झालें, हें जगदीश्वराच्या कृपेचें फल होय. आमची परमप्रिय राणी, क्याथेराइन, ही, आपण होऊन आम्हांबरोबर संकटांत आली, आणि, हिनें स्त्रीजाति असून, उत्तम मसलत देऊन आम्हांस पुष्कळ साह्य केलें, हें ही तुमच्या लक्षांत असेल. प्रुथ येथें आपणापाशीं केवळ वीस हजार सैन्य होतें, आणि तें तुर्क सरकारच्या एक लक्ष वीसहजार सैन्यानें वेढिलें होतें, तेव्हां आणीबाणीच्या वेळीं, हिनें आपला सर्वांचा कसा बचाव केला, तें आपणां सर्वांस चांगलें आठवत आहे. खरोखर, त्या प्रसंगीं हिचें जें चातुर्य आणि जें धैर्य दिसून आलें, तें चातुर्य आणि तें धैर्य स्त्रियांचे ठायीं आढळणें कठीण. ही आम्हांकरितां फार श्रमली आहे, व ही आमच्या फार उपयोगीं पडली आहे, म्हणून आम्ही हिच्या मस्तकीं मुकुट घालून हिचा

बहुमान करावयास इच्छितों. असें करण्यास आम्हांस परमेश्वरानें अधिकार दिला आहे, ही बहुत संतोषाची गोष्ट होय. ”

नंतर त्या समारंभाची तयारी करविली. राजवाडे रंगविले. रस्ते सुशोभित केले. नानाप्रकरचीं शुभवाद्यें वाजूं लागलीं. सर्व लोक, उत्तम उत्तम पोषाक करून, मोठ्या आनंदानें राज वाड्यांत जमले. मजालस भरली. पीतराची स्वारी क्याथेराइन सहवर्तमान आली. तेव्हां सर्व लोकांनीं एकच जयघोष केला. सर्व मंडळी आपापल्या जागीं बसल्यावर, मुख्य धर्माध्यक्षानें, राणीच्या मस्तकावर हात ठेवून, मोठ्या गंभीर मुद्रेनें म्हटलें, “ हे सर्वसाक्षी परमेश्वरा, तूं आपल्या परम पवित्र आकाशसदनांतून ह्या आमच्या राणीकडे कृपादृष्टीनें पहा. तुझ्या प्रिय पुत्राच्या रक्तपातानें ही तुझ्या दयेस पात्र झाली आहे. आणि ही आमच्या प्रभूची राणी असावी, अशी त्वां योजना केली आहे. हिला शक्ति दे, हिला राजचिन्हांनीं युक्त कर; हिला शतायु कर; मुक्तिप्राप्तीचा दंड हिच्या हातीं दे; हिला न्यायासनावर बसीव; आपल्या कृपावलोकनानें हिचें संरक्षण कर; हिच्या सैन्यास बळ दे; सर्व प्रजांनीं हिच्या अधिकरास मान्य व्हावें, असें कर; हिच्या अंतःकरणानें तुला भजावें, असें तूं कर; हिनें तुझ्या इच्छेप्रमाणें चालावें असें तूं कर; हिनें लोकांचा योग्य न्याय करावा, दुःखितांवर दया करावी, आणि अनाथ मुलांस रक्षावें; आणि शेवटीं हिनें तुजपाशीं येऊन निरंतर मुक्तिसुख भोगावें, असें तूं कर. ” हें भाषण झाल्यावर झार ह्यानें स्वहस्तें क्याथेराइन हीस पोषाक नेसविला, तिच्या मस्तकीं मुकुट घातला, आणि तिच्या हातीं राजदंड दिला. तेव्हां ती प्रेमभरांत येऊन त्याच्या पायां पडण्यास ओणवली, इतक्यांत त्यानें तिला वरचेवर धरून आलिंगिलें. ! ह्या प्रसंगाचें वर्णन किती म्हणून करावें. ? सर्वांस अत्यानंद झाला, आणि ते आपापल्या घरीं निघून गेले.

ह्याच वर्षी झार ह्याची थोरली मुलगी आन हिचें लग्न झालें. ती स्वरूपानें अति सुंदर असून, तिची उठण्याबसण्याची ढब फारच चित्तवेधक होती. ती आपल्या तारुण्याच्या भरांत असतां, कौन्तआक्राक्सिन ह्या रुशियन सरदाराचें मन तिजवर जडलें. तें इतकें कीं ती आपणास प्राप्त होत नाहीं, असें त्याला वाटून तो अगदीं झुरणीस लागला. तिजवांचून त्याला चैन पडेना, आणि ती तर मिळेना. शेवटीं, तिला एके दिवशीं एकीकडे गांठून त्यानें तिचे गच्च पाय धरिले. आणि तरवारीकडे बोट दाखवून म्हटलें, " आतां ही तरवार घेऊन माझी मान तरी काप एकदा, म्हणजे मला हें परम दुःसह विरहदुःख सोसावयास नको. ! " ती पुढें हात करून म्हणाली, " बरें तर द्या ती इकडे. ! लक्षांत ठेवा. ! तुमच्या सारख्या अधमांचा वध करण्यास ही शूर झाराची मुलगी कधीं चुकावयाची नाहीं बरें. ! " हें ऐकतांच त्या कामातुराची गुंगी उतरली, आणि तो भयभीत होऊन तिची क्षमा मागूं लागला. ही गोष्ट त्या तरुण मुलीनें आपल्या बापास भरकचेरींत सांगितली, तेव्हां तोही गृहस्थ तेथें होता. त्या वेळीं त्याला काय झालें असेल हें त्याचें त्याला ठाऊक. ! कामातुर मूर्खांची अशी केव्हां तरी फजीती व्हावयाचीच. ! असो.

पीतर हा शरीरप्रकृतीनें बरा होता, व तो खाण्यापिण्याविषयींही बराच नेमस्त असे, तेणंकरून त्यास सहसा दुखणें येत नसे. आणि जरा कांहीं कमजास्त वाटलें म्हणजे वैद्य लागलेंच त्याला औषध देऊन बरें करीत. त्याच्या मूत्राशयांत कांहीं विकृति होऊन, ती कितीएक वर्षांपासून थोडी थोडी वाढत होती; पण ती त्यानें कोणास कळविली नव्हती. तेणंकरून तीस उपचार झाला नाहीं. परंतु, ती जेव्हां अतिशयित दुःखप्रद झाली, आणि त्याच्यानें तें दुःख सोसवेना, तेव्हां त्यानें तो रोग बुर्मेत्रास्तनामक एका नामांकित वैद्यास दाखविला. तो

त्याला जबर दिसला. तेव्हां त्यानें वेदलू नामक मास्को येथील प्रख्यात वैद्यास सैंतपीतर्सबर्ग येथें बोलावून आणिलें. शिवाय हार्न ह्या नांवाचा एक इंग्लिश शस्त्रवैद्य तेथें होताच. त्या तिघांनीं विचार करून, त्याच्या रोगावर औषध दिलें. त्याचा बराच गुण आला. आणि वैद्यांच्या सांगण्याप्रमाणें तो तीन महिनेपर्यंत खोलीच्या बाहेर असा पडला नाहीं. परंतु, तीन महिन्यांनंतर त्याला जरा बरें वाटूं लागलें. तेव्हां हाडोत बसून स्क्रुसेलवर्ग येथें जाण्याचा त्यानें विचार केला. त्यास, तूर्त बाहेर न पडण्याविषयीं वैद्य लोकांनीं पुष्कळ सांगितलें, परंतु, तें सगळें फुकट गेलें. तो, आपणाबरोबर कांहीं वैद्य घेऊन, होडींत बसून तिकडे चालता झाला. त्याला तो प्रवास बरा वाटला, व हवा चांगली होती, तेणेंकरून तो त्या नेमलेल्या ठिकाणीं न उतरतां, फिनलांदच्या अखाताच्या कांठावर, लाकता येथें जाऊन उतरला. तो त्या बंदरावरून पुढें चालता होणार इतक्यांत, त्याच अखातामध्यें, एका लहानशा होडींत कांहीं शिपायी व कांहीं खलाशी बसलेले असतां, ती एका खडकाजवळ जाऊन आदळतांना त्याच्या दृष्टीस पडली. तेव्हां, त्यास त्यांची दया उत्पन्न होऊन, त्यांस मदतीस पाठविण्यासाठीं जवळची दुसरी एक रिकामी होडी लवकर आणण्याविषयीं त्यानें जवळच्या मनुष्यांस सांगितलें. ती रिकामी होडी फार पाण्यांत नव्हती, तरी मनुष्यांकडून व्हावी तितकी जलदी झाली नाहीं असें पाहून, पीतर स्वतः गुढघाभर पाण्यांत पायीं जाऊन ती होडी ओढूं लागला. तेव्हां सर्व लोक धांवले; आणि त्या होडीच्या साह्यानें, ते मरणाच्या तोंडांत सांपडलेले शिपायी व खलाशी बचावले. हें ठीक झालें. परंतु, त्या थंडीच्या योगानें रात्रीं पीतरास अतिशयित ज्वर भरला, आणि त्याच्या जठराची अव्यवस्था झाली. तेव्हां त्याला लागलेंच तेथून पीतर्सबर्ग शहरीं नेलें. त्या वेळेपासून जी त्याची प्रकृति बिघडत चालली,

ती पुनः कधीं ताळ्यावर आली नाहीं. शेवटीं तो इ० स० १७२५ च्या जानेवारी महिन्याच्या २८ व्या तारखेस, न भांभावतां, स्वस्थ अंतःकरणानें, परमेश्वरीं ध्यान लावून, मरण पावला. तेव्हां त्याचें वय ५२ वर्षांचें होतें.

आपण आतां खचीत लवकर मरणार, असें जेव्हां पीतरास वाटलें, तेव्हां कांहीं लिहून ठेवावें, अशी त्याला इच्छा झाली. परंतु, हात उचलेना; म्हणून आपल्या सांगण्याप्रमाणें कागदावर लिहिण्याकरितां त्यानें आपली आवडती कन्या आनूहिला बिच्छान्याजवळ बोलाविलें. ती जवळ येऊन बसली तों त्याचीं जीभच वांकडी पडली. तेव्हां अर्थातच सगळें जागचे जागीं राहिलें. कोणी ग्रंथकार असें म्हणतात कीं, आपल्या मागें आन हिनें आपल्या सिंहासनावर बसावें, असा झार ह्याचा हेतु होता; व तोच मजकूर तो तिजकडून लिहविणार होता. मग खरें काय असेल तें असो. परंतु, आपल्या पश्चात् आपल्या राज्याचें व आपल्या लोकांचें हित ज्याचे हातून होईल, असा उत्तम पुरुष गादीवर बसावा, असा त्याचा फार हेतु होता; ह्यांत कांहीं संशय नाहीं. प्रुथ येथील लढाईंत जेव्हां मोठें संकट प्राप्त झालें, तेव्हां त्यानें आपल्या मंत्री लोकांस तेथून जें एक पत्र लिहिलें, त्याच्या शेवटीं असें होतें कीं, "अहो जर म्यां येथें मरावें असा ईश्वरी संकेत असला, तर तें कांहीं केल्यानें टळावयाचें नाहीं. परंतु, माझें सांगणें तुम्हांला एवढेंच आहे कीं, जर मी मेलोंच, आणि माझ्या मरणाचें विश्वसनीय वर्तमान तुम्हांला समजलें, तर तुम्हांत जो कोणी फार सुज्ञ आणि फार योग्य असेल, त्याला माझ्या गादीवर बसवून राज्याचें काम चालवा." ह्या पत्रावरून, तो आपल्या देशाविषयीं किती काळजी वाहात होता, हें स्पष्ट दिसून येतें.

एकदोन गृहस्थांनीं पीतर आणि क्यायेराइन ह्यांजविषयीं एक चमत्कारिक गोष्ट लिहून ठेविली आहे. ती अशी कीं

त्याच्या दरबारामध्यें मोएन्स म्हणून कोणी एक गृहस्थ होता, त्याचें आणि राणीचें कांहीं काळेंबेरें आहे, असा झार ह्यास संशय प्राप्त झाला. तो खरा किंवा खोटा हें पाहण्याकरितां त्यानें एक युक्ति केली. ती युक्ति संशयी नवरे नेहमी करीत असतात. ती अशी. आपण शहराबाहेरच्या बऱ्याच अंतरावरच्या बागेंत कांहीं कामाकरितां जात आहोंत, असें राणीस सांगून, तो तिचा निरोप घेऊन वाड्यांतून निघून गेला. तो हळूच जवळच्या घरांत लपून बसला. त्यास दोन दिवस लोटूं देऊन, तिसरे रात्रीं, तो गुपचूप राजवाड्याजवळच्या नजरबागेंत शिरला. तेव्हां तेथें क्याथेराइन आणि मोएन्स हीं उभयतां क्रीडा करतांना त्याच्या दृष्टीस पडलीं. ! राणीची नजर त्याजकडे जातांच, तिचें तोंड खरकन उतरलें. ! आणि मोएन्स तर घाबरून पळूं लागला. पीतराच्या हातांत एक काठी होती. ती एक त्यानें राणीस लगाविली, आणि त्यास आंत येण्यास ज्या हुजऱ्यानें हरकत केली होती, त्यास एक लगावली; आणि एकही शब्द न बोलतां आपण बाहेर चालता झाला. ! ही गोष्ट जर खरी असेल, तर विषयाच्या संबंधानें पीतराचें मन कांहीं चमत्कारिक होतें, असें म्हटलें पाहिजे. !

मोएन्साविषयीं व्हालतेर ह्याचा अभिप्राय कांहीं वेगळ्या प्रकारचा आहे. तो असा-; "मोएन्स आणि त्याची बहीण हीं क्याथेराइन हिला फार प्रिय असत. तिच्या वाड्यांतला सर्व कारभार तींच पाहात असत. आणि, आपलीं कामेंकाजें करून घेण्याकरितां, लोक त्यांस पुष्कळ नजराणे देत असत. असे नजराणे घेऊंनयेत, आणि जे घेतील त्यांस देहान्त शासन मिळेल, असा कायदा पीतरानें, इ० स० १७१४ त केला होता. त्याप्रमाणें ह्या उभयतांवर अपराध साबीद होऊन, मोएन्स ह्यास मृत्यूची शिक्षा ठरली, आणि त्याच्या बहिणीस चाबुकाचे अकरा फटके मारावे, असा हुकूम झाला." तेव्हां क्याथेराइन हिनें

पीतराशीं मोठी रदबदली करून, अकरा फटक्यांची शिक्षा पांच रपाट्यांवर आणिली. असो.

पीतराचें चरित्र आतां समाप्त झालें. ह्यास्तव त्याच्या एकंदर स्वभावाविषयीं दोन शब्द बोलून हा विषय पुरा करितों. त्याच्या स्वभावामध्यें, एकमेकींस विपरीत अशा पुष्कळ गोष्टी होत्या, हें मागें वर्णिलेल्या इतिहासावरून सहज लक्षांत यावया सारखें आहे. त्याच्या देशचे लोक फार अज्ञान व फार अडाणी होते, व त्यांची सुधारणा करण्याचें काम त्यानें हातीं धरिलें होतें, तेणेंकरून त्यास प्रसंग पडले तसे आपले बेत बदलून, स्वकार्य साधावें लागलें. एकाद्यास वाईट म्हणण्यास कांहीं मोठें शाहाणपण लागत नाहीं; परंतु, आपली योग्यता संभाळून कोणाच्या धमकीस नभितां, प्रतिपक्षाचे कपटाचे बेत फसविणें, ह्यास मोठें शाहणपण लागतें, ह्यांत कांहीं संशय नाहीं. स्वदेशच्या लोकांची सुधारणा करण्यास त्याला धडधडीत त्यांच्या दाढ्या काढवाव्या लागल्या, आणि त्यांच्या आंगरख्यांचे झोल फाडवावे लागले, तेव्हां त्याची निंदा करणारे पुष्कळ निघाले असतील, हें सांगावयास नको. परंतु,

“ कोणी वंदा अथवा निंदा
आम्हां स्वहिताचा धंदा. ”

असा त्याचा बाणा असे, म्हणूनच तो तगला. दुसरा एकादा कच्च्या धैर्याचा असता, तर तो लोकांस त्रासून, इष्ट हेतु कधींच सोडून देता. इतर देशांतील लोक पीतराविषयीं कांहीं म्हणोत; त्याजकडे लक्ष न देतां, जे रुशियन लोक त्याचा उपहास करीत होते, त्यांचेच वंशज त्यास आतां कसा मानितात, हें पहावें, म्हणजे त्याच्या खऱ्या योग्यतेविषयीं कांहीं शंका राहावयाची नाहीं. ते त्यास फार थोर समजतात; त्यास देवाप्रमाणें मान देतात; सणावारीं उत्सवादिकांत त्याचें स्मरण करितात; आणि तो असा पराक्रमी होऊन गेला, म्हणूनच हा आमचा देश

इतक्या योग्यतेस चढला, असें उघड बोलतात. तेव्हां आतां दुसरी साक्ष कशास पाहिजे. १ जे जुने लोक पीतराचा द्वेष करीत असत, ते, कांहीं ईश्वरी चमत्कारानें, आपल्या थडग्यांतून उठून जर सांप्रतची स्थिति पाहतील, आणि ती कशी प्राप्त झाली हें समजून घेतील, तर, आपण पीतराचा जो द्वेष व जो छळ केला, तो नाहक केला, असें कबूल करून, अतिशयित पश्चात्ताप पावतील. रुशियन लोक पीतराच्या नांवास देखील मोठा मान देतात. त्याची टोपी; त्याचें डगलें; त्याचे पायमोजे; त्याचीं काम करावयाचीं हत्यारें; त्याच्या हातचे कारागिरीचे मासले; इत्यादि अनेक वस्तु, त्यानें स्थापित केलेल्या पाठशाळेमध्यें फार जपून ठेविल्या आहेत. त्यांजकडे पाहून पीतराविषयींची लोकांची पूज्यबुद्धि वाढते. त्याचे पुतळेही त्यांनीं करून ठेविले आहेत. सारांश, जेणेंकरून पीतराचें नांव फार दिवस राहून, त्याची कीर्ति जगांत अधिकाधिक पसरेल, असें कोणतेंही कृत्य करण्याचें त्यांनीं ठेविलें नाहीं.

मेजर जनरल गार्दन हा इंग्लिश सरदार, पीतराच्या लष्करांत पुष्कळ दिवस चाकरीस होता. व त्याची आणि झाराची पुष्कळ ओळख असे. त्यानें पीतराच्या स्वभावाचें वर्णन एका ठिकाणीं केलें आहे, तें खरें आणि मनोवेधक आहे. त्याचें तात्पर्य असें.–" थोर ह्या पदवीस पात्र असे जे कोणी पुरुष आजपर्यंत होऊन गेले, त्यांतच पीतर ह्याची गणना आहे. त्यानें अत्युत्तम रीतीनें आपल्या राज्याची सुधारणा केली; आपण स्वतः लष्करांतलीं सर्व लहान मोठीं कामें करून, स्वोद्योगानें कसें वाढत जावें, हें आपल्या लोकांस शिकवून, त्यांस युद्धविद्येची गोडी लाविली; परदेशांत स्वतः जाऊन तेथल्या लोकांच्या उत्तम चालीरीति पाहून, त्या, महत्प्रयत्नानें, स्वदेशच्या लोकांत चालू केल्या; लष्कर आणि आरमार हीं वाढवून नांवारूपास आणिलीं, आणि त्यांचे खर्च चालण्याची तजवीज करू-

न ठेविली; नानाप्रकारचे पदार्थ तयार करण्याचे कारखाने स्थापिले, आणि आपले लोकांस सर्व प्रकारचें कारागिरीचें काम शिकविलें; जलमार्गानें व्यापार करण्याचा प्रघात वाढवून, कधीं कोणाच्या स्वप्नांत देखील आल्या नव्हत्या, अशा सोईच्या व सुखाच्या वस्तु आपले प्रजेस सहज मिळत अशा केल्या; नानाप्रकारच्या युक्ति योजून शत्रूंस टेंकीस आणिलें; सारांश, तीस वर्षांच्या अवकाशामध्यें मुलकी लष्करी आणि धर्मसंबंधीं खात्यांमध्यें एवढा फेरफार करून, आपल्या प्रजेस पुष्कळ सुधारून सन्मार्गास लाविलें, असा दुसरा राजा, सृष्टि उत्पन्न झाल्यापासून आजपर्यंत कोणी झाला नसेल, असें म्हणण्यास कांहीं चिंता नाहीं. त्यानें स्वशक्तिबाह्य श्रम केले म्हणूनच तो इतके लवकर मेला. तो क्रूर नव्हता; तर कडक होता. त्यानें आपले कुलांतले लोक व दुसरे त्याच्या मेहेरबानींतले कांहीं लोक खेरीज करून, अपराध्यांस क्षमा अशी कधींच केली नाहीं. लांच घेणें हें कितीएक देशांत गैर समजत नाहींत; परंतु, पीतर तो मोठा गुन्हा समजून त्याबद्दल मोठें शासन करी. त्यानें क्याथेराइनीसारख्या नीचकुलोत्पन्न स्त्रीच्या हातीं आपलें राज्य दिलें, एवढी गोष्ट खेरीज करून, बाकीच्या आपल्या अद्भुत कृत्यांनीं, केवळ रुशियन लोकांसच काय पण सर्व जगास थक्क करून सोडिलें. त्याची तिजवर अतिशयित प्रीति होती; तो तिचेइतका भरंवसा दुसऱ्या कोणावरही ठेवीत नसे; तिनें त्याचीं मोठमोठीं कामें केलीं होतीं; आणि ती त्याला अप्रतिम सुखास कारण झाली होती; ह्या गोष्टींचा विचार केला असतां, त्यानें आपलें राज्य तिच्या हवालीं केलें, ह्यांत कांहीं विशेष केलें, अथवा मोठी चूक केली, असें कोणास वाटणार नाहीं. कारण, तें साहाजिक आहे. तो असें नकरिता, आणि आपला नातू पीतर ह्यास आपल्या गादीचा मालक ठरवून ठेविता, तर, क्याथेराइन हीस, तिच्या मुलांसहवर्तमान सैबीरियामध्यें

वनवासास जावें लागलें असतें, आणि तेथें तीं दुःखानें तत्काल मेलीं असतीं, ह्यांत संशय नाहीं. म्हणजे तिला जें राजपदीं स्थापिलें, तें तिच्या जीवाला धक्का न लागावा, म्हणून स्थापिलें; दुसरा कांहीं हेतु नव्हता.– त्याला स्वतःला असा कांहीं एक खर्च लागत नसे. राजे लोक जसा आपल्या दरबारांचा डौल करितात, तसा त्याला मुळींच आवडत नसे. त्याचें खाणेंपिणें एकाद्या साधारण मनुष्याप्रमाणें असे. त्याला मंडळींत बसणें-उठणें फार आवडे. तो मंडळींत असतां, त्याला विनोद आणि समयोचित चमत्कारिक भाषण हीं फार गोड वाटत. स्वतः तोही मोठा रसिक होता. जसें आपण खातोंपितों आणि आनंद करितों, तसें जवळच्या सर्व लोकांनीं करावें, अशी त्याची फार इच्छा असे. तो आपणाबरोबर हत्यारबंद शिपाई कधीं घेत नसे, व पांच किंवा साहा ह्यांहून अधिक मनुष्यें जवळ ठेवीत नसे. उगाच कोणी मोठ्या आदबीनें आणि जपून त्याजपाशीं बोलूं लागला तर, त्याचा तो तिरस्कार करी. आपणापाशीं सर्वांनीं मोकळ्या मनानें बोलावें, अशी त्याची फार इच्छा असे. सारांश, त्यानें राजसुख असें कधींच भोगिलें नाहीं. ह्यासारखा पुरुष ह्यापुढें कोणी होईल किंवा नाहीं, ह्याविषयीं मला मोठा संशय आहे.”

कोक्स म्हणून एक ग्रंथकार होऊन गेला. त्यानें पीतराविषयीं जें लिहिलें आहे, त्याचें तात्पर्य असें.– “ मी पीतर धिग्रेत ह्याचें थडगें पाहिलें, तेव्हां त्याविषयीं माझे ठायीं पूज्यबुद्धि आणि दराराही एकदम उत्पन्न झाली. अमुक मनुष्य अपराधी आहे खचीत, असें त्याला एकदा वाटलें पुरे; मग तो पुरुष असो अथवा स्त्री असो, लहान असो अथवा वृद्ध असो, आणि आप्त असो किंवा परका असो; त्यास योग्य शासन करावयास तो कधीं चुकला नाहीं; ह्यावरून तो क्रूर होता असें कोणीं समजूं नये; तर न्याय व्हावा, अशी त्याची फार इच्छा होती.

राजाच्या सपाट्यानें एकादी गैर गोष्ट हातून घडून गेल्यावर, तो अत्यंत पश्चात्ताप पावून उघड असें म्हणे कीं, 'मी आपल्या प्रजेस सुधारितों,पण मला स्वतःला सुधारवत नाहीं. ! काय करावें.?' एका मोठ्या विद्वानाचें म्हणणें असें आहे कीं, पीतराचे ठायीं क्रूरपण होतें खरें; परंतु, तो फार उत्तम कायदे करीत असे, म्हणून त्याचें कोणाला फारसें वाईट वाटलें नाहीं. त्यानें आपली प्रजा बरीच सुधारिली; नवीन रीतीप्रमाणें आपलें लष्कर आणि आरमार बनाविलें, कलाकौशल्यांस आश्रय दिला; शेतकी आणि व्यापार हीं पुष्कळ वाढविलीं; सारांश, त्यानें रूस देशाच्या वैभवाचा पाया घातला, असें म्हटल्यास चिंता नाहीं." एक कवि म्हणतो, "हे विद्ये, पीतर असा मोठा पुरुष होऊन गेला, ह्याचा गर्व तूं वाहूं नको; कारण, त्यांत तुझें कर्तृत्व कांहीं एक नाहीं. ! हे विश्वरचने, पीतराच्या मोठेपणाचें सर्व यश केवळ तुझें होय. ! तुझा जय असो. !"

विचार करून पाहिलें असतां, पीतरासारखे राजे ह्या भूमंडळावर फार थोडे होऊन गेले असतील. राजापासून रंकापर्यंत, लहानापासून वृद्धापर्यंत, आणि अगदीं ज्ञानशून्यापासून मोठ्या बृहस्पतीपर्यंत मनुष्याचे सर्व उद्योग स्वहितार्थ चाललेले असतात. त्यांमध्यें हिताविषयींच्या समजुती भिन्न भिन्न असल्यामुळें, जगांत उद्योगाचे क्रम नानाविध झाले आहेत. पीतर स्वदेशाच्या हितार्थ जो इतका झटत होता, त्यास, कीर्ति आणि परमार्थप्राप्ति ह्या दोहोंपैकीं कांहीं तरी एक, अथवा अंशतः अंशतः दोन्ही कारणें असावीं, असें अनुमान होतें. आपल्या प्रजेचें हित करणें हें आपलें कर्तव्य कर्म आहे, असें एका पीतरासच कळत होतें असें नाहीं; तर, ही गोष्ट अगदीं रानटी लोकांच्या राजापासून तों अगदीं उत्तम सुधारलेल्या लोकांच्या बादशाहापर्यंत माहीत असते. आतां, त्याप्रमाणें वागणें हा प्रकार अगदीं वेगळा आहे; तो भूपतीच्या स्वभावावर

असतो. सिंहासनारूढ झालेल्या मनुष्यास युद्ध, दान, स्वदेश-हित, परोपकार, दया इत्यादि अनेक साधनांनीं कीर्ति प्राप्त होण्यासारखी असते; त्यांत ज्याची जशी रुचि असते, त्याप्रमाणें तो आचरणक्रम धरितो. पीतरास स्वदेशहितासारखा दुसरा पदार्थ दिसेना; म्हणून त्याची वृत्ति तिकडे वळली. खरोखर पाहिलें असतां, राजाच्या ठायीं हाच सद्गुण असणें फार आवश्यक होय. पहा, पीतर हा एक मनुष्य होता; आणि तो राजा होता; तेणेंकरून, त्याच्या इच्छेप्रमाणें त्यास स्वदेश सुधारणा करितां आली. म्हणजे, मनुष्याच्या हातून देशसुधारणेसारखीं मोठीं कामें तडीस जाण्यास त्याचे ठायीं इच्छा आणि सामर्थ्य हीं दोन्हीं असलीं पाहिजेत; नुसत्या एकाचा कांहीं एक उपयोग होत नाहीं.

पीतर धि ग्रेत ह्यानें कोणकोणतीं कृत्यें केलीं, ह्याचें वर्णन पूर्वीं झालेंच आहे. त्या कृत्यांमध्यें पीतर्सबर्ग शहर हें अग्रगण्य होय. ज्या स्थलीं पीतर्सबर्ग शहर वसलें आहे, तेथें पीतराखेरीज दुसऱ्या बादशाहाच्यानें शहर बांधवलें नसतें, हें खचीत. तें शहर इतक्या वाईट ठिकाणीं असून, सांप्रत काळीं त्याची बरोबरी करणारीं अशीं दुसरीं शहरें पृथ्वींत फारच थोडीं निघतील. त्याची लांबी व रुंदी सुमारें साहासाहा मैलांची आहे. त्यांत इमारती फार भव्य व सुंदर आहेत; लोकसंख्या सुमारें एक लक्ष सत्तर हजार आहे; मध्यम प्रतीचे रस्त्याची रुंदी ६० फूट, व मोठ्या सडकांची रुंदी सुमारें १२० फूट आहे; पस्तीस मोठालीं भजनालयें आहेत; राजगृहें ही पुष्कळ आहेत. एक इस्पिताळ बुद्ध्या बायकांकरितां बांधिलें आहे; तेथें पाहिजे त्या स्त्रीनें गुप्तपणें प्रसूत व्हावें, आणि बाळंतपणांतून उठल्यावर, मुलास तेथें सरकारी अमलदाराच्या हवालीं करून आपण निघून जावें, अशी तजवीज ठेविली आहे. त्या मुलास सरकार संभाळितें. त्या शहरांत रहदारी फार मोठी आहे. नुसत्या एका

घोड्याच्या गाड्या सुमारें तीन हजार फिरत असतात. लोक सुखी आहेत; व त्यांचें लक्ष व्यापाराकडे फार आहे. पीतरानें ज्या इतर गोष्टी केल्या आहेत, त्यांवरून त्याचें नांव पुष्कळ दिवस चालेल हें खरें. परंतु, ह्या शहराच्या योगानें जितके दिवस त्याचें नांव गाजेल, तितके दिवस दुसऱ्या कोणत्याही गोष्टीनें गाजावयाचें नाहीं.

देशांत चांगला राजा उत्पन्न होणें, ही लोकांच्या मोठ्या सुदैवाची गोष्ट होय. शरीरामध्यें जसा जीव, तसा प्रजेमध्यें राजा असतो, असें म्हटलें तरी चालेल. पहा. जीवाची वृत्ति नीट नसली, अथवा त्याला एकादी वाईट चटक लागली, म्हणजे जशी शरीराची नासाडी होते, त्याप्रमाणें राजाच्या मूर्खत्वामुळें प्रजा दुर्दशा पावते. आतां, जीवास सुवृत्ति प्राप्त होण्यास जशी परमेश्वराची कृपा पाहिजे, तशीच, देशामध्यें चांगले भूपति उत्पन्न होण्यास परमेश्वराची कृपा पाहिजे. कितीएक मनुष्यें लहानपणापासून सुशिक्षित असूनही वाईट निपजतात; आणि कितीएकांस लहानपणापासून कोणतेंच शिक्षण नसून तीं उत्तम निघतात. अशीं दोन्हीं प्रकारचीं उदाहरणें इतिहासांत आढळतात. तेव्हां, राजा चांगला असण्यास प्रजेचें सुदैवच विशेष कारण आहे, असें म्हटलें पाहिजे. पीतरासारखे चांगले राजे उत्पन्न झाले आणि ते स्वदेशाच्या सुधारणेचा उद्योग करूं लागले म्हणजे, त्यांच्या प्रजांपैकीं कितीएकांस त्रास भोगावा लागतो, हें खरें आहे. तथापि तिकडे लक्ष देऊन उपयोगीं नाहीं. रोगाच्या निवारणार्थ कडू औषध घ्यावें लागतें, हें लक्षांत ठविलें पाहिजे.

पीतर धि ग्रेत ह्यानें स्वदेशहितार्थ जे परिश्रम केले, त्यांची हकीकत ऐकून, आळशी, विषयी, आणि मुर्ख अशा अजागळ राजांस खरोखर लाज वाटावी. हा राजा उपजत शाहणा नव्हता. तथापि, आपण व आपले लोक हे सर्व रानटी आहों, अ

स जें त्याच्या मनांत अगदीं आरंभीं आलें, तेंच त्याच्या शाहाण-
पणाचें मूळ बीज होय. मी शाहणा आहें, आणि माझे लोक
सुधारलेले आहेत, असें जर त्याला वाटतें, तर, तो ज्ञानसंपादनार्थ
परदेशीं जाताना; तो परदेश पाहताना, म्हणजे त्यास बरेंवाईट
कळतेंना, व ज्ञान प्राप्त होतेना; हें ज्ञान प्राप्त न होतें, तर तो
लोकांची सुधारणा कशी करता. ? खरोखर, पीतर असा
उद्योगी, शूर आणि पराक्रमी जर न निघता, तर रूसदेशचें रा-
ज्य स्वीदनचा राजा बारावा चार्लस ह्यानें तेव्हांच घेतलें अस-
तें, ही गोष्ट मागें सांगितलेल्या इतिहासावरून सहज लक्षांत ये-
ण्यासारखी आहे. पीतर जबरदस्त उद्योगी होता. उद्योगा-
विषयीं त्याचा कित्ता घेण्यास राजे लोकांस कठीण पडेल, ह्यांत
कांहीं नवल नाहीं; तर, त्याच्याप्रमाणें उद्योग करण्यास घडचा-
वडचा अशा एकाद्या गरीबास देखील मोठी पंचाईत पडेल ह्यांत
संशय नाहीं. त्याजविषयीं ग्रंथांतरीं जें लिहिलें आहे, त्याचा
विचार केला असतां, तो राजा असून, त्यानें एकाद्या मध्यम
प्रतीच्या सरकारी कामदाराइतकें सुद्धां सुख भोगिलें नाहीं,
असें दिसून येईल. साधारणतः पाहिलें असतां मनुष्याचा स-
गळा ओढा स्वसुखाकडे असतो. त्यास एकीकडे ठेवून, पी-
तरानें स्वदेशसुखार्थ परिश्रम केले, ही गोष्ट त्यास अत्यंत भू-
षणप्रद होय. स्वहिताकडे दृष्टि न देतां, केवळ परहितार्थ जे
साधु झटतात, त्यांजपेक्षां पीतराची योग्यता अधिक समजली
पाहिजे. कांकीं, आपल्या परिश्रमाचें फल, जें निरंतर सुख, तें
आपणांस मरणोत्तर स्वर्गलोकीं खचीत मिळेल, अशी आशा
धरून ते झटत असतात; तसा कांहीं एक प्रकार पीतराच्या
गोष्टींत आढळून येत नाहीं. तेव्हां तो, परहितसंबंधानें, साधूंपे-
क्षांही थोर, असें सर्वांनीं कबूल केलें पाहिजे.

**समाप्त.**